22-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SMT/ 10:00

22-03-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SMT/ MHM/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 10:00

<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी ही चर्चा उपस्थित केलेली आहे आणि सभागृहात विरोधी पक्षातील कोणीच सदस्य उपस्थित नाहीत.

उपसभापती : ठीक आहे. आपण सभागृहाचे कामकाज आता स्थगित करुन पुन्हा 10.15 वाजता चर्चेला सुरुवात करु.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करुन ते पुन्हा 10.15 वाजता सुरु करावे पण या विषयावरील चर्चा दुपारी 12.30 वाजता संपली पाहिजे.

उपसभापती :ठीक आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन ती 10.15 वाजता पुन्हा सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक सकाळी 10.00 ते 10.15 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: राज्यात निर्माण झालेली भयावह दुष्काळी परिस्थिती.

मु.शी.: राज्यात निर्माण झालेली भयावह दुष्काळी परिस्थिती या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, मधु चव्हाण, दीपक सावंत, विनोद तावडे, अरविंद सावंत, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री विलास अवचट व श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या प्रश्नावरील चर्चेकरिता आपण सकाळची वेळ ठरविली परंतु सदनामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते किंवा इतर सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते त्यामुळे आपल्याला सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांकरिता स्थगित ठेवावे लागले, ही गोष्ट योग्य नाही. आपण एका महत्वाच्या विषयावर चर्चा ठेवलेली आहे.

उपसभापती : माननीय विरोधी पक्ष नेते ट्राफिकमध्ये अडकले होते. त्यांचा निरोप मला त्यापूर्वी मिळालेला होता.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. मी ट्राफिकमध्ये अडकलो त्यामुळे या ठिकाणी येण्याकरिता मला उशीर झाला. परंतु मला असे समजले की त्यावेळी सभागृहामध्ये गणपूर्तीही नव्हती. त्यावेळी मला या ठिकाणी उपस्थित होता आले नाही ही सत्य परिस्थिती आहे. मी दिलगिरी व्यक्त करतो.

उपसभापती : सकाळी 10.00 वाजता मी सभागृहात आलो त्यावेळी सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम, डॉ. विजयकुमार गावीत तसेच सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी उपस्थित होते. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीचाही दुष्काळ असल्यामुळे दुष्काळावरील चर्चा पंधरा मिनिटे लांबणीवर टाकली.

या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी दुपारी 12.30 वाजेपर्यन्त वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. नितीन गडकरी (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"यावर्षी राज्यात भयावह दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असुन, राज्यातील 12,034 गावे 50 पैशापेक्षा कमी आणेवारी म्हणून जाहीर केलेली असून यात विदर्भातील 10,339 व मराठवाडयातील 1,278 गावांचा समावेश असुन, दुष्काळग्रस्त घोषित गावांच्या जवळजवळ 90 टक्के गावे ही विदर्भ व मराठवाडयातील असून गतवर्षी राज्यातील 11 जिल्हयातील 5022 गावांमध्ये पिकांची आणेवारी 50 पैशांपेक्षा कमी असतांना त्या जिल्हयांसाठी मा. राज्यपाल महोदयांची विशेष परवानगी घेऊन 1476 कोटी रुपयांची योजना आखली गेली होती, त्याच धर्तीवर गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी दुष्काळाची तीव्रता अडीच पट असतांना व तशाच प्रकारची मोठी रक्कम उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असतांना लोकसभेत दि. 14 मार्च, 2005 रोजी केंद्रीय कृषी राज्यमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाकडून दुष्काळ निवारणासाठी केंद्रीय सहाय्यतेची मागणी करण्यात आलेली नसल्याचे लेखी उत्तरात नमूद केलेले असुन, त्यांनी दिलेल्या या उत्तरामुळे दुष्काळ निवारणासाठी राज्याला केंद्रीय सहाय्य मिळालेले नसून राज्य शासनाने देखील स्वतःच्या निधीतून दुष्काळी भागातील जनतेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिलेला नसुन, शासनाच्या या कृतीमुळे दुष्काळी भागातील लोकांची कर्जमाफी घोषणा करुन देखील ती अंमलात न येणे, लोकांना रोजगार हमी योजनेची कामे मिळालेली नसल्यामुळे त्यांच्यावर आत्महत्या करण्याची आलेली पाळी, या सर्व प्रकरणी शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबतची शासनाची भूमिका."

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गेल्या पाच वर्षामध्ये दरवर्षी दुष्काळ पडला. सन 2000-01 मध्ये 20,519 गावांमध्ये, सन 2001-02 मध्ये 5174 गावांमध्ये, सन 2002-03 मध्ये 9714 गावांमध्ये, सन 2003-04 मध्ये 5022 गावांमध्ये आणि सन 2004-05 मध्ये 12,034 गावांमध्ये दुष्काळ पडला. दुष्काळ ठरविण्याबद्दलचे पॅरामीटर्स ठरलेले आहेत. ज्यावेळी आणेवारी 50 पैशापेक्षा कमी असते त्यावेळी राज्य शासन दुष्काळ जाहीर करीत असते. माझ्याकडे सरकारने काढलेले आदेश आहेत. मी याबाबतीत सगळया गोष्टी रेकॉर्डवर ठेऊ इच्छितो. महसूल व वन विभागाकडून महाराष्ट्र राज्यातील खरीप गावांची वर्षासाठी अंतिम पैसेवारी जाहीर झाली असून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. नितीन गडकरी ....

त्याबाबतीत जे आदेश निर्गमित केलेले आहेत ते पाचही वर्षाचे आदेश माझ्याकडे आहेत. ज्यावेळी 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी येते त्यावेळी स्वाभाविकपणे त्या गावामध्ये ड्रॉट जाहीर केलेला आहे. त्याचा जो जी.आर. आहे तो माझ्याकडे उपलब्ध आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

सभापती महोदय, हा जो जी.आर.आहे त्याप्रमाणे "महाराष्ट्र राज्यातील 2004-2005 सालची खरीप गावांची अंतिम पैसेवारी जाहीर झाली असून त्यानुसार 12034 गावातील 50 पैशापेक्षा वा त्यापेक्षा कमी आल्याचे दिसून आले आहे. जिल्हावार माहिती प्रपत्र-अ मध्ये सोबत जोडलेली आहे. शासन या निर्णयाद्वारे 12034 गावांमध्ये टंचाईची परिस्थिती (ड्रॉट) दुष्काळ जाहीर करीत आहे. संबंधित जिल्हाधिका-यांनी त्यांच्या जिल्हयातील ज्या खरीप गावांची अंतिम पैसेवारी 50 पैसे वा त्यापेक्षा कमी आलेली आहे त्या गावांची नावनिशीवार 50 पैसे वा त्यापेक्षा कमी आल्याची परिस्थिती आदेशासोबत प्रपत्र-ब प्रमाणे जाहीर करावी आणि त्याप्रमाणे टंचाईची परिस्थिती, दुष्काळ जाहीर करावा आणि त्या आदेशाला योग्य प्रसिध्दी जाहीर करावी. टंचाईची परिस्थिती जाहीर करुन उपरोक्त 12034 खातेदारांना टंचाईच्या संदर्भात शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुज्ञेय सवलती जिल्हाधिका-यांनी देण्याची व्यवस्था करावी." सभापती महोदय, दुष्काळ जाहीर होतो त्यावेळी सरकारला आदेश काढण्याची आवश्यकता नाही. एकदा दुष्काळ म्हटला की, काय काय केले पाहिजे याचे दिशादर्शन शासनाने केलेले आहे. 12034 गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असताना आणि तसे जाहीर झालेले असताना आपल्या लोकशाही आघाडीच्यावतीने जिल्हाधिका-यांनी यासंदर्भात कोणकोणत्या कारवाया केल्या पाहिजे व कोणत्या केलेल्या आहेत याची माहिती आपण या सभागृहाला द्यावी. माझी अशी माहिती आहे की, यासंदर्भात सभागृहात ज्या घोषणा केलेल्या असतात त्यावर कार्यवाही केली पाहिजे. त्या कार्यवाहीच्या संबंधात जिल्हाधिका-यांनी काही केलेच नाही. किंबहूना, या सरकारने यासंबंधात एक प्रकारे, आता मी कोणता शब्द वापरावा ते समजत नाही. विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उत्तर महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम या सरकारने केलेले आहे. मा.सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम आणि मा.श्री.हर्षवर्धन पाटील मी तुम्हा दोघांचे अभिनंदन करतो. मागील वेळी 544 गावांमध्ये दुष्काळ होता. याबद्दल संपूर्ण महाराष्ट्र एक आहे. तुम्ही जे केले याबद्दल मी तुमच्यावर टीका करीत नाही. परंतु त्यावेळी केंद्र सरकारकडे तुम्ही 5000 कोटीची मदत मागितली होती. तुमचे उपमुख्यमंत्री मा.श्री.आर.आर.पाटील यांनी निवडणुकीत प्रचार केला की, केंद्रातील मा.श्री.अटलजी आणि मा.श्री.अडवाणीजी यांचे एनडीए सरकार महाराष्ट्राला मदत करीत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

नाही, महाराष्ट्रावर अन्याय करीत आहे. अशा प्रकारचा भोंगा वाजवित, डमरु वाजवित संपूर्ण महाराष्ट्रभर सगळेजण फिरले. 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे असे लक्षात घेतल्यावर मा.श्री.अटलजी यांच्या एनडीए सरकारने जवळपास 1550 कोटीची महाराष्ट्र सरकारला मदत दिली. त्यापेक्षा अडीचपट जास्त दुष्काळ आता आहे. मागीलवेळी महाराष्ट्रातील 5022 गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी होती. यावेळी 12034 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. विदर्भातील 10339 गावे, मराठवाडयातील 1278, कोकणातील 135, उत्तर महाराष्ट्रातील 251 आणि पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील 31 गावे ही 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेली गावे आहेत. याचे काय केले ? यावर्षाचा खरीपाचा दुष्काळ मागील वर्षापेक्षा अडीचपट अधिक असताना शेतक-यांचे भुमिपूत्र म्हणवणा-या या सर्व लोकांनी काय केले ? मा.राज्यपालांनी राज्यभर दौरे केले, मा.मंत्रिमहोदय श्री.पतंगराव कदम यांनीही मा.राज्यपालांबरोबर दौरे केले होते. त्यांना सांगितले की, परिस्थिती अडचणीची आहे. त्यामुळे राज्यपालांकडून 1450 कोटीचे स्पेशल पॅकेज घेतले, केंद्राकडून 1500 कोटीचे पॅकेज घेतले असे एकूण 3000 कोटी रुपये पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागासाठी मिळवून दिले. त्याबद्दल मी तक्रार करीत नाही. चारा छावण्या आणखी काय काय केले, खर्च केले, छावण्यातील शेणच गायब झाले. 400 छावण्यातील 40 कोटींचे शेण खाल्ले आणि त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी या सभागृहात करण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्र पहिले शिक्षण सम्राट होते, नंतर साखर सम्राट नंतर सहकार सम्राट झाले आणि आता महाराष्ट्रामध्ये नवीन झेंडा लावला आहे, आता शेण सम्राट झाले आहेत. 40 कोटींचे शेण देखील गायब झाले. (अडथळा) त्या श्री.धस यांची बिले रोखली म्हणून ते आम्हाला सोडून गेले आहेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु....)

तुम्ही राजकारणही करता. तुमच्याबाबतीत काय बोलायचे ? छावणीच्या बाबतीत त्याला ब्लॅकमेलिंग करुन सांगितले की, आमच्याकडे ये. श्री. बाळराजेंनी सांगितले की, तू आमच्याकडे ये नाही तर तुझ्यावर कारवाई करु. बिचा-याला ब्लॅकमेलिंग केले. त्याबाबतीत मी काय बोलणार ? आम्ही आमच्या काळात हे केले नाही. मा. मंत्रीमहोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांचा यामध्ये काही दोष नाही. ते इकडे नाहीत आणि तिकडेही नाहीत. ते मध्ये आहेत. वेळ पडली तर त्यांचे कधी आमच्याशी मधुर संबंध, कधी मा. मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांच्याशी मधुर संबंध असतात. मा. मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांनी कितीही विरोधी केला तरी त्यांच्याशी मधुर संबंध आहेत. श्री. हर्षवर्धन पाटील यांचे सर्वांशी समान संबंध असल्यामुळे त्यांना संसदीय कार्य मंत्री केलेले आहे. आता त्यांना कधी श्री. अजितदादा पवार दाबतात, कधी डॉ.पंतगराव कदम दाबतात. त्यामुळे मा. संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांची काय अडचण होते याची मला कल्पना आहे...(अडथळा) अध्यक्ष महाराज, माझा एक मूलभूत प्रश्न आहे की तुम्ही जवळपास अंदाजाने 5000 कोटी रु....(अडथळा) .. सभापती महोदय, मागील वर्षी या संदर्भात 5022 गावांकरिता...(अडथळा).. मा. मंत्रीमहोदय डॉ. पंतगराव कदम यांच्या वृत्तीवर हे सभागृह खूष आहे. त्यांच्या मनातील जी भावना आहे तिच माझ्या मनातील भावना आहे आणि तिच महाराष्ट्रातील लोकांच्या मनातील भावना आहे. त्या भावनेचे प्रतीक तुम्ही आहात. म्हणून दादाच्या दबावावर आवाज उठविणारा आणि समोर जाऊन काम करणारा नेता म्हणून डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे सारा महाराष्ट्र पहातोय. सभापती महोदय, मी एकच गोष्ट सांगतो. 5000 कोटी रुपये खर्च झाल्यानंतर यावर्षी 12034 गावे दुष्काळग्रस्त असताना, तुम्ही दुष्काळाकरिता किती पैसे खर्च केलेत ? मा. उपमुख्यमंत्र्याना मी धन्यवाद देतो. मी त्यांना प्रश्न विचारु इच्छितो की, जेव्हा 5022 गावामध्ये दुष्काळ होता त्यावेळी आपण जवळपास 5000 कोटी रुपये खर्च केलेत. 1400 कोटी रु. मा. राज्यपालांकडून आणले, 1500 कोटी रु. केन्द्र सरकारकडून आणले....(अडथळा)... मा. उप मुख्यमंत्री महोदय, आपण 5000 कोटी रुपये हे 5022 गावांतील दुष्काळाकरिता शासनामार्फत खर्च केले. मा. राज्यपाल महोदयांबरोबर मा. मंत्री महोदय डॉ. पंतगराव कदम यांनी दौरे केले...(अडथळा).. सभापती महोदय, जे केले ते चांगले केले. मी त्यावेळी या सभागृहामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु....)

वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भात बोललो होतो. घटनेच्या अनुच्छेद 371(2) आणि (8)चा संदर्भही दिला होता. त्यानंतर मी असे म्हटले होते की, प्रत्यक्ष दुष्काळग्रस्तांकरिता जर महाराष्ट्रातील निधी जाणार असेल तर आमचे निकष सोडून सर्व पैसा दुष्काळासाठी खर्च करा. आमची काही हरकत नाही. असे मी या सभागृहामध्ये बोललो होतो. 5000 कोटी रु. खर्च झाले. मराठी माणसाचा एकसंघ महाराष्ट्र राहिला पाहिजे असे सर्वजण म्हणतात. पण राज्याने देखील सर्व मुलांवर सारखे प्रेम केले पाहिजे. एका मुलावर प्रेम करायचे आणि दुस-या मुलाला सारख्या लाथा मारायचे काम केले तर एकसंघ राज्य राहाणार नाही. मला याठिकाणी दु:खाने हे नमूद करावेसे वाटते की, आज या सभागृहामध्ये ड्रॉट जाहीर झाल्यानंतर या सगळ्या जिल्ह्यांमध्ये कोणकोणते आदेश निघून किती रुपये खर्च झाले याचा अहवाल मा. मंत्री महोदयांनी द्यावा. मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये मा.मत्रीमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या लक्षात आणून दिले होते की, या कापूस उत्पादक भागामध्ये शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. 500 पेक्षा जास्त शेतक-यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. ज्या गावांमध्ये 50 पैशा पेक्षा कमी आणेवारी आहे त्या गावातील कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे फेडरेशनने कापून टाकले असे मी मा.मंत्री महोदयांना सांगितले होते. त्यावर मा.मंत्री महोदयांनी सांगितले की, "ही गोष्ट तुम्ही लक्षात आणून दिली म्हणून आताच्या आता मी आदेश देत आहे की, ज्या गावामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे त्या गावातील कापूस उत्पादक शेतक-याचे पैसे जर कापले गेले असतील तर ते पैसे त्यांना ताबडतोबीने वापस करण्यात येतील." अशी भीमगर्जना महाराष्ट्राच्या विधानपरिषदेमध्ये मा. मंत्री महोदयांनी केली होती.

...नंतर श्री. गिते..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

मला तुमच्याबद्दल राग येत नाही, तुमची किव वाटते. कारण तुमच्या घोषणे नंतर एकही पैसा शेतक-याला मिळालेला नाही. तुमच्या घोषणेची कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी झालेली नाही. कापूस उत्पादक शेतक-यांचे पैसे आपण कापून घेतले. आपण कापून घेतलेले पैसे त्या शेतक-यांना परत देण्यात आलेले नाही. तुम्ही चांगले मंत्री आहात, माझे चांगले मित्र आहात, परंतु सभागृहात काहीही ठोकून देता त्यामुळे सन्माननीय श्री.आर.आर.पाटील देखील अडचणीत आले होते. तुम्ही जेंव्हा घोषण करता त्यावेळेला वस्तुस्थिती बघत नाही. पूर्ण माहिती देत नाही. त्यामुळे तुम्ही अडचणीत येता.तुम्ही जर या संदर्भात घोषणा केली तर ती तुम्ही पूर्ण का केली नाही ? तुमच्या अधिका-याने तुमचे का ऐकले नाही ? आज महाराष्ट्रात स्थिती अशी आहे की,शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत, शेतकरी मोठया प्रमाणात कर्ज बाजारी झालेले आहेत. खरीपाची 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी असताना देखील कापसाच्या कर्जातून पैसे कापले गेले. शेतक-यांना पैसे देऊन काय अर्थ आहे. एक गंभीर प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे उपस्थित आहेत. सन्माननीय राज्यमंत्री श्री. दयानंद म्हस्के या ठिकाणी उपस्थित असलेले दिसत नाही.सभापती महोदय, दि. 14 मार्च 2005 रोजी श्री.लोनाप्पन नम्बाडन, श्री. हंसराज अहिर, श्री जसवंत सिंह बिश्नोई, श्री. एम. शिवन्ना, श्री कैलाश मेघवाल, श्री. महावीर भगोरा, श्री. सुखबीर सिंह बादल, श्री. सुरेश कलमाडी, श्री.रामदास आठवले, श्री अनंत कुमार, श्री थावरचंद गेहलोत हया 11 सदस्यांनी लोकसभेत प्रश्न विचारला की, क्या कृषि मंत्री यह बताने की कृपा करेंगे क्या ? सन्माननीय श्री. पंतगराव लोकसभेत कृषी मंत्री कोण आहेत याची आपल्याला माहिती आहे.महाराष्ट्रातील शेतक-यांचे नेते,आपले सर्वांचे आवडते नेते,महाराष्ट्राचे भाग्यविधाते,श्री.आर.आर.पाटील यांचे सन्माननीय नेते,मला देखील त्यांच्या बद्दल काही गोष्टींबाबत नक्कीच आदर आहे. असे आमच्या शेतक-यांचे पंचप्राण माननीय कृषी मंत्री श्री. पवार साहेब आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, त्या प्रश्नास लोकसभेत केंद्रीय कृषी राज्यमंत्री यांनी उत्तर दिलेले आहे. असे असताना केंद्रीय कृषी मंत्री श्री. पवार साहेब यांचा उल्लेख केला जात आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी :सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे वकील आहेत, दरवेळेला त्यांना यासंबंधीची जाणीव करुन देणे मला बरोबर वाटत नाही. राज्यमंत्री नावाची संस्था लोकशाहीत अस्तित्वात नाही. कृषी मंत्री, कॅबिनेट मंत्रीच लोकसभेत उत्तर देत असतात. आपण प्रश्न वाचा. क्या कृषी मंत्री यह बताने की कृपा करेंगे क्या ...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,केंद्रीय कृषी राज्यमंत्र्यांनी ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,केंद्रीय कृषी राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु सन्माननीय लोकसभा सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, क्या कृषी मंत्री महोदय यह बताने की कृपा करेंगे ? ते सन्माननीय श्री. म्हेत्रे साहेब हे गृह राज्यमंत्री आहेत. श्री. आर.आर. पाटील हे गृह मंत्री आहेत. गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील हे ऑर्डर काढतात. बारची तपासणी करणे, तिकडे चौकशीसाठी जाणे, इतर काही दोन-चार कामे आहेत ती कामे राज्य मंत्री करतील असे आदेश काढतात. गृह मंत्री हे त्यांच्या आदेशाचे विभागणी करतात. कॅबिनेट मंत्री असतात ते राज्य मंत्र्यांना अधिकार देत असतात. राज्यमंत्र्यांना जे अधिकार देतात त्याच्या आधारावर कॅबिनेट मंत्री काम करीत असतात.

श्री. दिवाकर रावते : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मागे असे जाहीर केले होते की, आम्हाला काही अधिकार दिले नाहीत तर आम्ही राजीनामे देऊ. यासंदर्भात महाराष्ट्रात फार मोठे वादळ उठले् होते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी यांना सांगतो की,लोकशाहीमध्ये As far as the department is concerned, the powers are vested in the Cabinet Minister. The Minister delegates some of his powers to State Minister. जेंव्हा प्रश्न विचारला जातो. क्या कृषी मंत्री यह बताने कोशीश करेंगे क्या ? कृषी मंत्र्यांनी त्या प्रश्नासंबंधी ब्रिफींग घेतले. मी माहितीसाठी सांगतो की, राज्यमंत्री फक्त लाल दिव्याच्या गाडीत फिरतात. त्यांच्या गाडीत पेट्रोल देखील टाकले जात नाही. लोकसभेतील सदस्यांनी असे विचारले आहे की," क्या महाराष्ट्र सरकार ने महाराष्ट्र के कई जिलों में सूखे की गंभीर स्थिति को ध्यान में रखते हुए राहत और बचाव उपायों के लिए धनराशि के आबंटन का

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आग्रह किया है" ? असा कृषी मंत्र्यांना प्रश्न विचारला गेलेला होता. या प्रश्नाचे उत्तर माननीय श्री. पवार साहेबांच्या वतीने कृषी राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे ही गोष्ट खरी आहे.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

हे कृषी मंत्रालयाचे उत्तर आहे. त्यांनी सांगितले आहे की, " महाराष्ट्र सरकार से 2004-05 में पड़े सूखे के लिए केन्द्रीय सहायता के लिए कोई अनुरोध प्राप्त नहीं हुआ है." उपमुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, पैसे देण्याचे तर दूरच राहिले परंतु मराठवाडा आणि विदर्भ या भागामध्ये दुष्काळ असताना आमच्याकरिता निळया शाईचे दोन थेंब खर्च करुन एखादे पत्र पाठवून केंद्र सरकारकडे पैशाची मागणी सुध्दा केली नाही. 1500 कोटी रु. एलआयसीकडून आणले. गेल्या वर्षी दुष्काळ होता. दुष्काळासाठी जनावरांच्या छावण्या उघडल्या. तुमच्या लोकांना या छावण्या दिल्या. त्याच्यामध्ये घोटाळा झाला. शेण गायब झाले. हात मारायला सगळे जण तयार असतात. परंतु आमच्याकरिता एक पत्र सुध्दा शासनाने का पाठविले नाही ? विदर्भ आणि मराठवाडयामध्ये मागील वेळेपेक्षा अडीच पट अधिक दुष्काळ असताना केंद्र सरकारकडे एका फुटक्या पैशाची सुध्दा मागणी का केली नाही ? पैसे देणे तर दूरच राहिले. दिल्लीमध्ये आमचे सरकार आले आहे मुंबईमध्ये आमचे सरकार आले तर महाराष्ट्रामध्ये विकास कामाकरिता पैशाचा महापूर आणू. महापूर तर सोडाचा पैशाचा थेंब सुध्दा आणला नाही. दिल्लीमध्ये तुमचे राज्य, प्रधानमंत्री तुमचे,मुख्यमंत्री तुमचे,उपमुख्यमंत्री तुम्ही स्वत:,कृषी मंत्री तुमचे. एकसंघ महाराष्ट्राचे हित तुम्ही जपले पाहिजे. विरोधी पक्षनेते म्हणून आम्ही काम करीत असलो तरी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आमचे नेते आहेत. सभागृहाचे नेते आहेत. सन्मान दिला पाहिजे. आमच्या प्रश्नाचे समाधान करुन द्या. विदर्भातील जनतेला तुम्ही काय सांगणार ? कोकणातील जनतेला काय सांगणार ? कापसाला 2700 रु. भाव दिला पाहिजे. अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी काल बजेट मांडताना सांगितले की, पुढील वर्षापासून एकाधिकार कापूस खरेदी योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालवू. मिनीमम प्राईझवर चालवू. मिनीमम प्राईझ केंद्र सरकार जाहीर करते. मिनीमम प्राईझ देण्याची जबाबदारी केंद्र शासनाची आहे. मिनीमम प्राईझवर कापूस सीसीआय खरेदी करते. तुमची योजना कशाला ? पुढील वर्षापासून योजना बंद. ना. श्री.रणजित कांबळे याठिकाणी उपस्थित आहेत. पुलगांवला आरडा-ओरड झाली की आपल्या लक्षात येईल कापूस एकाधिकार योजना बंद झाली आहे. उपमुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, तुमच्याबद्दल मला इतरांच्या तुलनेत आदर आहे. आपण सांगितले होते की, जाहीरनाम्याचे पालन करण्यासाठी अजून पावणेपाच वर्षांचा कालावधी बाकी आहे. या वर्षांमध्ये कापसाला 2700 रु. भाव देऊ. काल

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

अर्थमंत्र्यांनी जाहीर केले की, कापूस एकाधिकार योजना ना नफा ना तोटा या तत्वावर सुरु ठेऊ. मिनीमम प्राईझ देणार आहात. 1960 रु. प्राईझ आह. 2700 रु. भाव कसा देणार आहात ? तुम्ही त्याप्रमाणे कमिटमेंट करणे आवश्यक होते. यानंतर महाराष्ट्रामध्ये कापूस एकाधिकार योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालेल आणि फक्त मिनिमम प्राईझमध्ये कापसाची खरेदी होईल असे धोरण बजेटमध्ये मांडण्यात आले आहे. अर्थमंत्र्यांनी तुम्हांला विश्वासात घेतले किंवा नाही हे मला माहीत नाही. तुम्ही त्यांना विचारले किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्यांनी तुमच्या धोरणाच्या चिंधडया उडविल्या आहेत. उपमुख्यमंत्र्यांनी तीन दिवसात पैसे आणून दिले आणि पणनमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, आम्ही अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी सगळे पैसे कापूस उत्पादक शेतक-यांना देऊ.

यानंतर श्री. गायकवाड ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. नितीन गडकरी ....

त्यामुळे आता हे पैसे मिळतील असे मी समजतो. कापूस उत्पादक शेतक-यांना जो भाव देण्यात आला आहे तो सुध्दा कमी आहे.विदर्भातील बुलढाणा,यवतमाळ , वर्धा,अमरावती,वाशिम हा कापूस उत्पादनाचा ट्रॅक आहे आणि यवतमाळ - वाशिम हा भाग आंध्र प्रदेशला लागून आहे त्या भागातील कापूस उत्पादक शेतक-यांनी मोठया प्रमाणावर आत्महत्या केल्या आहेत. कापूस उत्पादनाचे जे क्षेत्र आहे त्यातील बुलढाणा,यवतमाळ,अमरावती,अकोला, वाशिम इत्यादी जिल्हयात 50 टक्यापेक्षा कमी आणेवारी आलेली आहे.त्या भागातील कापूस खरेदी करीत असतांना दुष्काळी परिस्थितीत कर्ज वसूल केले जाऊ नये असे आपले आदेश आहेत. परंतु प्रत्यक्षात ड्रॉट जाहीर झालेला असतांना आणि कर्ज वसूल केले जाऊ नये असे आपले आदेश असतांनासुध्दा कापसाच्या पैशातून शेतक-यांचे कर्ज वसूल केले गेले आहे. ड्रॉट जाहीर झाल्यानतर जी मार्गदर्शक तत्वे सांगण्यात आलेली आहेत त्या मार्गदर्शक तत्वाची ड्रॉट जाहीर झाल्यानंतर अंमलबजावणी करावयास पाहिजे होती परंतु प्रत्यक्षात मात्र अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.सन्माननीय उपमुख्य मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, ड्रॉट जाहीर झाल्यानंतर व त्याचा जी.आर.काढल्यानंतर त्या जी.आर.प्रमाणे अंमलबजावणी करावयास पाहिजे परंतु ती केलेली नाही. केन्द्र सरकारकडे पैशाची मागणीसुध्दा केलेली नाही.तेव्हा शासनाने दुष्काळाच्या संदर्भात आतापर्यत काय काय कामे केलेली आहेत ? हे मला माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. केवळ मंत्रालयातून ऑर्डर्स काढल्या म्हणजे दुष्काळावर उपाययोजना केली असे आहे काय ? आजच्या चर्चेला कोणते मंत्री उत्तर देणार आहेत ?

डॉ.पतंगराव कदम : मी उत्तर देणार आहे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, या चर्चेला महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. मदत कार्य करणा-या मंत्रिमहोदयांना दुष्काळ जाहीर करण्याचा अधिकार नाही. ही तर मोठी शोकांतिका आहे. जखमेवर मीठ चोळण्याच्या ऐवजी जखमेतून खिळयाने रक्त काढावयाचे असा हा प्रकार आहे. या खात्याने अजून कोणतीही मदत केलेली नाही.महसूल आणि वन विभागाने जे आदेश काढलेले आहेत त्याप्रमाणे प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेली नाही त्या विभागाच्या मंत्र्यांनी या चर्चेला उत्तर दिले पाहिजे. सभापती महोदय, मला अतिशय वाईट वाटते की,1476 कोटी रुपये

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. नितीन गडकरी ....

कृष्णा खो-यासाठी विशेष बाब म्हणून दुष्काळाच्या नावाखाली माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार दिले गेले आहेत.असे असतांना या वर्षी आपण का मदत करीत नाही. पिण्याच्या पाण्याची योजना देण्याकरता आपण मदत का करीत नाही ? . कायम दुष्काळी भागासाठी आपण या योजना का आखत नाहीत ? या प्रश्नांची उत्तरे योग्य प्रकारे माननीय महसूल मंत्र्यांनी दिली पाहिजेत. महाराष्ट्रामध्ये या वर्षी अभूतपूर्व टंचाई आहे.दुष्काळी परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मागे मार्गदर्शक तत्वे सांगितली होती.ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असेल तर काय काय उपाययोजना करावयाच्या आहेत हे त्यात सांगितलेले आहे. त्यानुसार नवीन विंधण विहिरी घेणे(हात पंपसह), नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या नळ योजना घेणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे, टॅन्कर्स आणि बैलगाडयांव्दारे पाणीपुरवठा करणे , विहिरी खोल करणे, दुरुस्तीची कामे घेणे इत्यादीचा त्यात समावेश करण्यात आला आहे.या पैकी आपण कोणती कामे केलेली आहेत याबाबतीत खुलासा करण्यात यावा. 12 हजार 24 गावामध्ये या पैकी कोणती कामे जिल्हाधिका-यांच्या मार्फत करण्यात आली आहेत ? हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले पाहिजे.माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी काहीही काम केलेले नाही.ज्या भागात ड्रॉट जाहीर केला होता त्या भागातील विद्यार्थ्यांची एस.एस.सी. परीक्षेची फी माफ केली जाते. परंतु ही सवलत सुध्दा या विद्यार्थ्यांना दिलेली नाही.जनावरांच्या चा-यासाठी छावण्या सुरु करावयास पाहिजे परंतु त्या सुध्दा करण्यात आलेल्या नाहीत.रोजगार हमी योजनांची कामे सुरु करावयास पाहिजे. रोजगार हमी योजनांची कामे सुरु करण्यात यावीत यासाठी किती दुष्काळी गावामध्ये मागणी करण्यात आली होती आणि त्यापैकी कोणत्या ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्यात आलेली आहेत .सभापती महोदय, मला अंत्यत खेदाने सांगावेसे वाटते की,अजून पर्यन्त अनेक भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्यात आलेली नाहीत.ज्या ठिकाणी ही सुरु केली आहेत त्यठिकाणी मजुरी मिळत नाही.दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्या नंतर ज्या काही उपाययोजना सरकारने करावयास पाहिजेत त्या सरकारने केलेल्या नाहीत.या उपाययोजना सरकारने का केल्या नाहीत?. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री. नितीन गडकरी ....

उत्तर दिले होते त्या उत्तराच्या भाषणाची प्रत माझ्याकडे आहे. त्यात असे सांगण्यात आले आहे की बुलढाणा जिल्हयात खरीपाच्या तेरा तालुक्यातील साडेतीन लाख हेक्टर जमिनीवर दुबार आणि तिबार पेरण्या करण्यात आल्या होत्या. दुबार आणि तिबार पेरण्यांचा वस्तुनिष्ठ सर्वेक्षण शासकीय यंत्रणेने वेळीच केले नाही.आपल्या रेकॉर्डप्रमाणे ही स्थिती आहे की, बुलढाणा ,मौताळा चिखली या तीन तालुक्यातील 200 पेक्षा जास्त गावांची आणेवारी सदोष काढण्यात आली होती. खरिपाचे हेक्टरी 20 ते 25 क्विंटल पीक अपेक्षित असतांना शेतक-यांना सहा ते सात क्विंटल पीक मिळालेले आहे.यवतमाळ जिल्हयात 1700 गावातील जनतेवर पाण्यासाठी दाहीदिशा फिरण्याची वेळ आली आहे.

नंतर श्री.कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

डिसेंबर महिन्यात ही स्थिती तर आजची स्थिती काय आहे, याची कल्पना करा. या वर्षी जिल्ह्यातील कोणत्याही धरणातील पाण्याचा साठा 40 टक्क्यापेक्षा वाढलेला नाही. ही यवतमाळ जिल्ह्याची परिस्थिती आहे. जिल्ह्यात 1856 गावे आहेत. त्यापैकी 1700 गावांना आज पाणी टंचाई भेडसावत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा, दिग्रस, पुसद, घाटंजी, पांढरकवडा या ठिकाणी कधी नव्हे ती पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये अत्यल्प पडलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील 5 तलाव आताच कोरडे पडलेले आहेत. 40 प्रकल्पांतील पाणीसाठा लघुत्तम पातळीच्या खाली गेलेला आहे. कमी पावसामुळे भूगर्भाच्या पाण्याच्या पातळीत कमालीची घट झालेली आहे. खेड्यापाड्यातील विहिरी, कुपनलिका कोरड्या पडलेल्या आहेत,पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न भेडसावत आहे. शेतशिवारातील पाण्याचे स्रोत कोरडे झालेले आहेत. यवतमाळ जिल्ह्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटिल बनलेला आहे. वाशिम जिल्ह्यात 2 मध्यम, 68 लघू असे एकूण 70 प्रकल्प आहेत. अपुऱ्या पावसामुळे प्रकल्पात पुरेसे पाणी नसल्यामुळे उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवून शेती वापरावर बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आहेत, याची मा.डॉ.पतंगराव कदम यांना माहिती आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम (बसून) : मी माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगेन.

श्री.नितीन गडकरी : आपल्याला माहीत नाही. आपल्याकडे पुनर्वसन व मदत कार्य विभाग आहे, त्यामुळे आपल्याकडे महसूल विभागाचे अहवाल नसतील. वाशिम तालुक्यातील कार्ला, सावंगी, मंगरूळपीर तालुक्यातील पिंपरी, नांदखेड, रिसोट तालुक्यातील करडा, मांडवा या ठिकाणी पाण्याची समस्या इतकी गंभीर आहे की, दोन महिन्यात पिण्याचे पाणी नाही. सभापती महोदय, माझ्याकडे प्रत्येक जिल्ह्याची माहिती आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये दरवर्षी मुबलक पाऊस पडतो. वैनगंगा, गोदावरी खो-यातील 2 लाख हेक्टर जमिनीपैकी फक्त 17 हजार हेक्टर जमिनीला सिंचन होते. यावर्षी दिना प्रकल्पासह 22 लघू व 3 उपसा जलसिंचन योजनेमध्ये पुरेसे पाणी न मिळाल्यामुळे सिंचन योजना बंद पडलेल्या आहेत. 15 वर्षापूर्वी तुलतुले, कारभागा, चेन्ना या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली होती, मात्र वन विभागाने आडकाठी आणल्यामुळे, वन संवर्धन कायद्याच्या बडग्यामुळे ते प्रकल्प आजही बंद आहेत. माझी विनंती आहे की, पिण्याच्या पाण्याकरिता राज्यपाल महोदयांच्या आदेशान्वये रिलॅक्सेशन घेऊन 1500 कोटी रुपयाची कामे आपण पश्चिम महाराष्ट्रात केली. ती कामे केली याचा आनंद आहे. त्या ठिकाणच्या पिण्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू.....

पाण्याचा प्रश्न कायमचा सुटावा म्हणून कामे केली तर मग या वर्षी राज्यपाल महोदयांकडून परवानगी घेण्याची गरज नाही, या जिल्ह्यात बॅकलॉग आहे. त्यासंदर्भात राज्यपालांचे आदेश आहेत.,निर्देश आहेत. मग आपण या वर्षीच्या बजेटमध्ये दुष्काळग्रस्त विदर्भ आणि मराठवाडयातील गावांकरिता तरतूद करुन प्रधान्याने ही कामे का घेतली नाहीत, ? यावेळी घटनेच्या 371 (2) (8) या कलमाचा भंग करून घटनाबाह्य रितीने 1400 कोटी रुपये राज्यपालांची परवानगी घेऊन विशेष बाब म्हणून कामे घेतली. आमच्याकडे बॅकलॉग असतांना, या वर्षीच्या बजेटमध्ये आपण मागासलेल्या भागातील दुष्काळी परिस्थितीसाठी पैशाची तरतूद का केली नाही, याचे उत्तर तुम्ही आम्हाला द्यावे. म्हणून आपली यासंबंधीची वागणूक चांगली नाही, हे मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. सभापती महोदय, नागपूर जिल्ह्यातील प्रकल्पांची काय स्थिती आहे ते सांगतो. चंद्रभागा प्रकल्पाचे 30.68 टक्के काम झालेले आहे. मोरगाव प्रकल्पाचे 12.22 टक्के काम झालेले आहे, केशरनाला 8.33 टक्के काम झालेले आहे, उर्मी प्रकल्पाचे 10.60 टक्के काम झालेले आहे. कन्हान नदी नागपूर जिल्ह्याचे एकमेव पाण्याचे स्त्रोत आहे, त्यावर गावच्या पाणीपुरवठ्याच्या योजना आहेत. त्या नदीमधील रेतीचा प्रचंड उपसा झाला, परिणामी पाण्याची पातळी कमी होण्यास सुरुवात झाली, सगळया नागपूर जिल्हयामध्ये पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण झालेले आहे. या सगळया पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाकरिता काहीही कार्यवाही झालेली नाही. कळमेश्वर तालुक्यातील मोहपा या गावात भरणारा बैलबाजार हा सर्वात मोठा आहे. या ठिकाणी वर्षाकाठी सरासरी 2 कोटी रुपयाची उलाढाल होते, वैरणीच्या भीषण टंचाईमुळे शेतकऱ्यांना बैल पोसणे म्हणजे हत्ती पोसण्यासारखे झालेले आहे. वैरणीसाठी शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत. शेतकरी कवडीमोल भावाने बैलांची खाटकाकडे विक्री करत आहे. याबाबत आपण आढावा घ्या. विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.रमेश बंग यांचा तो मतदार संघ आहे. पाहिजे असेल तर सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्याकडून याबाबतची माहिती घ्यावी. पण ते सभागृहात उपस्थित नाहीत. चारा नसल्यामुळे तेथील शेतकरी आपली जनावरे खाटकांकडे विकत आहेत.. पण आमचा आवाज डॉ.पतंगराव कदम साहेब आपल्यापर्यन्त पोहोचत नाही.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. गडकरी ...

महाराष्ट्रातील एका भागातील जनतेला भावना आहेत, संवेदनशीलता आहे आणि विदर्भ-मराठवाडा भागातील लोकांना मात्र कोठल्याही भावना नाहीत, संवेदनशीलता नाही. एका भागातील लोकांचे दु:ख म्हणजे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे दु:ख आहे, सरकारचे दु:ख आहे, हे केंद्र सरकारचे दु:ख आहे. परंतु विदर्भ-मराठवाड्याचे दु:ख म्हणजे सरकारचे दु:ख नाही, मुख्यमंत्र्यांचे दु:ख नाही, केंद्र सरकारचे दु:ख नाही. तुम्ही कमाल केली हो ? तुम्ही सगळे रेकॉर्ड तोडले ? सन्माननी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना मी विचारू इच्छितो की, तुम्ही कोणत्या तोंडाने विदर्भ-मराठवाड्यामध्ये फिरणार आहात ? हे राष्ट्रवादी काँग्रेसवाले तुमची वाट लावतील. पश्चिम महाराष्ट्र हा यांचा बेस आहे, त्यासाठी त्यांनी 1500 कोटी आणले, 5 हजार कोटी खर्च केले, त्यासाठी तुमच्यावर दबाव आणला. तुम्हीही तिकडचेच आहात. तुम्हीसुद्धा यासाठी राज्यपाल महोदयांना भेटण्यासाठी त्या मंडळींमध्ये गेला होता, नेतृत्त्व करण्यासाठी गेला होता. ...

डॉ.पतंगराव कदम : मी नव्हतो गेलो. मी साऱ्या महाराष्ट्राचे हित पाहतो त्यामुळे मी तेव्हा तेथे गेलो नव्हतो.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, पण मी मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, तुमचे मंत्रीपद तुम्हाला कोणामुळे मिळालेले आहे ? विदर्भामुळेच मिळालेले आहे ना ? पश्चिम महाराष्ट्रात तर सर्वत्र राष्ट्रवादी पक्षच आहे. तुमच्यासारखे इतर पक्षाचे लोक मोजकेच तर निवडून आले आहेत तेथून. पण ज्याच्या भरवशावर तुमची पार्टी उभी आहे त्या विदर्भ-मराठवाड्याची वाट लागली आहे. आज त्यामुळे तेथे तुम्ही फिरू शकणार नाही. आपले जे नवीन सदस्य आहेत त्यांना वाटल्यास आपण विचारावे की, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आज काय स्थिती आहे ? सन्माननीय राज्यमंत्री श्री.रणजित कांबळेंना विचारा की, त्यांच्या वर्ध्यामध्ये काय स्थिती आहे ? विचारा त्या सन्माननीय सदस्य श्री.निकोसेंना की, नागपूर जिल्ह्यामध्ये काय स्थिती आहे. त्यांचा आवाज तुमच्या पर्यंत पोहोचत नाही. कारण तुम्हाला सत्तेचे जे वाटप झालेले आहे त्यामुळे तुम्हाला किती जरी मार पडला तरी राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर तुम्हाला काम करावयाचे आहे. पण यामध्ये तुमचा सारा बेस संपणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला विदर्भ-मराठवाड्यामध्ये फारसे अस्तित्व नाही. तेथे तुमची आणि आमच्यामध्येच लढत आहे आणि अशा स्थितीत तुम्ही त्या विभागाकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे.

..... आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी ....

राष्ट्रवादी काँग्रेसने तुमच्या काँग्रेस पक्षाला तेथून संपूर्णपणे संपविण्याचा केलेला हा नियोजित कट आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. विदर्भ-मराठवाड्यातील तुमच्या पक्षाची विश्वासार्हता संपविण्या करिता आणि जनतेत तुम्हाला बदनाम करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्राच्या वेळेस पश्चिम महाराष्ट्रा साठी मदत मागावयाची, तेथे पाच हजार कोटी रुपये खर्च करावयाचे ....

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेते या ठिकाणी वारंवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाचा उल्लेख करीत आहेत. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, कालच परभणीमध्ये विधान परिषदेतील एका जागेसाठी निवडणूक झाली त्यामध्ये शिवसेना आणि भाजपा हे दोन पक्ष एकमेकांपासून किती दूर गेलेले आहेत याचे चित्र स्पष्ट झालेले आहे. तेव्हा वारंवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षामध्ये मोठी तफावत आहे असे चुकीचे चित्र त्यांनी निर्माण करू नये एवढीच मी त्यांना विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, आमचे आणि शिवसेनेचे काय होईल ते आम्ही आणि सन्माननीय श्री.रावते साहेब पाहून घेऊ. पण या ठिकाणी प्रश्न एवढाच आहे की, विदर्भामध्ये आणि मराठवाड्यामध्ये दुष्काळाची स्थिती असताना या सरकारने कोणतीही मदत केलेली नाही, केंद्र सरकारकडे एकाही पैशाची मागणी केलेली नाही. रोजगार हमी योजनेची कामे सुरू केलेली नाहीत. पिण्याच्या पाण्याची टंचाई असताना ती दूर करण्याच्या दृष्टीने उपाय योजना केलेली नाही. कापूस उत्पादक शेतकरी किंवा अन्य शेतकऱ्यांना टंचाई परिस्थितीमध्ये कर्ज वसुलीला स्थगिती दिलेली नाही. उलट त्याच्या जखमेवर मीठ चोळून त्याच्या कापसाच्या पैशातून कर्ज वसुली केली. सांगूनही आदेश पाळले गेले नाहीत. टंचाईच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांना जेवढी म्हणून मार्गदर्शक तत्त्वे आहेत त्याप्रमाणे पालन केले गेलेले नाही. अध्यक्ष महाराज, सन्माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना माझा प्रश्न असा होता की, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी हे मनातून खूष आहेत... त्यांना गुदगुल्या होऊन राहिल्या आहेत. कारण त्यांचे स्वप्न पूर्ण होण्याचे त्यांना पहावयास मिळत आहे, त्यामुळे त्यांना मनातून आनंद होणे स्वाभाविक आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना देखील आनंद होणे स्वाभाविक आहे. परंतु भोळ्या-भाबड्या काँग्रेसच्या मंडळींना.. सन्माननीय सदस्य श्रीमती सुधा जोशी यांचा जरा आपण विचार करायला पाहिजे. सन्माननीय श्री.रणजित कांबळे बिचारे तरूण आहेत... त्यांच्या मतदारसंघात ते फिरू

.... आय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकणार नाहीत. उस्मानाबादचे आमचे तरूण मंत्री आलेले आहेत ते त्यांच्या जिल्ह्यात कसे फिरतील ? त्यांना लोक प्रश्न विचारतील की, मागील वर्षी 5022 गावांमध्ये दुष्काळ होता तेव्हा केंद्र सरकारकडे 5 हजार कोटीची मागणी करून 1200 कोटी रुपये तुम्ही आणले. या वर्षी आमच्या भागामध्ये दुष्काळ आहे तर तुम्ही किती पैसे आणले ? तेव्हा हे सांगतील, सॉरी. आमच्या सरकारने यासाठी एक साधे पत्र पाठवून मागणी देखील केलेली नाही. तेव्हा यांची जनतेमध्ये काय स्थिती होईल याचा जरा आपण विचार करावा. एकाही गोष्टीची अमलबजावणी तुम्ही केलेली नाही. तुम्ही विदर्भ-मराठवाड्यातील जनतेचा विश्वासघात केलेला आहे. याचा परिणाम राष्ट्रवादी काँग्रेसला नाही तर काँग्रेसला भोगावा लागणार आहे. दुर्दैवाने हे तुमच्या लक्षात येत नाही पण मला हे या निमित्ताने तुमच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या प्रश्नावर आपण विदर्भ-मराठवाड्यावर अन्याय केला आहे. केंद्रीय कृषी मंत्री सन्माननीय श्री.शरद पवार यांनी दिल्लीमध्ये सांगितले की, या सरकारने यासाठी एक पैशाची देखील मागणी केलेली नाही. तेव्हा तुम्ही एक प्रकारे विदर्भ-मराठवाड्यातील जनतेचा विश्वासघात केलेला आहे. विजेच्या बिलाची माफी करणार म्हणून सांगितले होते पण तेथूनही आपण्या बॅकआऊट झालात. कर्जावरील व्याज माफ करू म्हणून सांगितले पण त्याची देखील ऑर्डर काढली नाही. तुम्ही केवळ घोषणा करता पण प्रत्यक्षात आपण विदर्भ-मराठवाड्यातील लोकांचा विश्वासघात केलेला आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र तसे झालेले नाही. त्यांच्याबद्दल न्याय केलात त्याबद्दल जरूर स्वागत आहे. ...

(यानंतर श्री.जागडे ....जे 1 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

ASJ/ D/ MAP/ MHM/ SBT/ 10:55

श्री. नितीन गडकरी...

त्यांना जे निकष लावले, ते निकष विदर्भ आणि मराठवाड्याला शासनाने लावले नाहीत. आमच्यावर अन्याय केला आहे. म्हणून आलेल्या दुष्काळावर मात करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे, हे या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी सदनासमोर दुष्काळाबाबतचा प्रस्ताव मांडला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात निर्माण झालेल्या भयावह दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने युध्द पातळीवर उपाययोजना करावयाला पाहिजे होती, ती शासनाने केली नाही तसेच दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र शासनाकडे अर्थसहाय्य मागण्याची आवश्यकता होती, त्यामध्ये देखील शासनाने कुचराई केली आहे, अशा प्रकारचे वक्तव्य मा. श्री. नितीनजी गडकरी यांनी केले आहे. यातील काही बाबी ख-याही असतील.

सभापती महोदय, राज्यातील 12034 गावात 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे. शासनानेच जाहीर केलेली ही आकडेवारी आहे. 12034 गावांपैकी 10339 गावे विदर्भातील आणि 1287 गावे मराठवाड्यातील आहेत. म्हणून 90 टक्के गावे विदर्भ आणि मराठवाड्यातील आहेत. गेल्या वर्षी राज्यातील 11 जिल्ह्यामध्ये 1022 गावांमध्ये आणेवारी कमी असताना त्यावेळी राज्यपाल महोदयांची परवानगी घेऊन 1500 कोटी रुपयाची योजना शासनाने आखली होती. त्याबद्दल आम्ही शासनाचे अभिनंदन करीत आहोत.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

आम्ही शासनाचे कौतुक करतो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती मा. श्रीमती फौजिया खान)

परंतु गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी राज्यामध्ये दुष्काळाची तीव्रता अधिक असतांना 11 जिल्हयातील जवळपास 5 हजार गावांतील टंचाईग्रस्त परिस्थितीला तोंड देण्यासाठी करण्यात आलेली तरतूद पुरेशी नाही. ही बाब लक्षात घेता विदर्भ, मराठवाडा या विभागांकरिता मुबलक प्रमाणात शासनातर्फे निधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे या परिस्थितीशी सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून वेगळया प्रकारची तरतूद प्राप्त करुन घेऊन या परिस्थितीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागात पाणी टंचाई, चारा टंचाई व इतर बाबतीत उपाय योजना करण्याकरिता अधिक निधीची मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे करावयास पाहिजे. परंतु ती मागणी करण्यामध्ये कुचराई करण्यात आली अशाप्रकारचा आरोप सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केला. त्याबाबत मंत्रिमहोदय खुलासा करतील असे मला वाटते. परंतु हे पुरोगामी राज्य असल्यामुळे असे काही झाले असेल असे मला वाटत नाही. परंतु त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असेही आरोप केले की, लोकसभेमध्ये माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरद पवार साहेबांना प्रश्न विचारण्यात आला असता, त्यांनी "अशाप्रकारची मदतीची मागणी राज्य सरकारकडून आलेली नाही" असे उत्तर दिल्याचे सांगितले. व त्यासंबंधीची माहिती सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिली. परंतु जर असे असेल तर राज्याच्या एका विशिष्ट भागाकडे दुर्लक्ष करणे हे राज्याच्या पुरोगामित्वाच्या प्रवृत्तीला शोभणारे नाही असे मला स्पष्टपणे म्हणावेसे वाटते. राज्य सरकारने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता होती. ग्रामीण भागामध्ये अत्यंत भयानक दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी ज्यांच्याकडे 11 ते 15 एकर जमीन आहे अशा शेतकऱ्यांना सुध्दा रोजगार हमी योजनेच्या कामावर जावे लागत आहे. काल परवा मी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीया व नागपूरच्या ग्रामीण भागांचा दौरा केला त्यावेळी मला प्रकर्षाने जाणवले की, ग्रामीण भागातील टंचाईग्रस्त लोकांची परिस्थिती भयानक झालेली आहे. त्या भागामध्ये शेतीचे उत्पन्न नाही, हाताला कामधंदा नाही अशा परिस्थितीत त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांमध्ये फ्रस्ट्रेशनची भावना निर्माण झाल्यामुळे त्यांच्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याला आळा घालण्यासाठी शासनाने पाऊले उचलली पाहिजेत. आज रोजगार हमी योजनेची कामे तुरळक प्रमाणात चालू आहेत, ती जास्तीत जास्त प्रमाणात ग्रामीण भागात सुरु करणे आवश्यक आहेत. ती जर सरकारने केली असतील तर ती चांगली गोष्ट आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी राज्यातील 11 जिल्हयात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली त्यावेळी जवळ जवळ 1500 कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगितले. परंतु विदर्भ व मराठवाडयाबद्दल...

श्री. नितीन गडकरी : 1500 कोटी केंद्र सरकारचे व दिड ते दोन हजार कोटी राज्याचे असे जवळपास 5 हजार कोटी रुपये खर्च केले...

प्रा. जोगेंद्र कवाडे : 1476 कोटी केंद्र सरकारचे व 1476 कोटी राज्य सरकारचे असे मिळून जर 5 हजार कोटी रुपये खर्च झाले असतील तर चांगली गोष्ट आहे. आपण 10 हजार कोटी रुपये खर्च करावेत त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु या राज्यातील विदर्भ आणि मराठवाडयातील जनतेच्या मनामध्ये सापत्नपणाची भावना निर्माण होता कामा नये. आम्ही या राज्याचे घटक असतांना आमच्याशी सवतीचा व्यवहार केला जातो, सापत्नपणाची वागणूक दिली जाते, आमच्याविषयी व्देष बाळगला जातो अशाप्रकारची भावना विदर्भ, मराठवाडयातील जनतेमध्ये निर्माण होणार नाही याबाबत आपण दक्षता घेणे आवश्यक आहे. म्हणून राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी जर पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला नसेलतर तो ताबडतोब उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

दुष्काळी परिस्थतीला तोंड देण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनाला जेवढा निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे किंवा त्यापेक्षाही जास्तीत जास्त प्रमाणात हा निधी . . . .

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : केंद्र शासन देणार नाही. या शासनाने मागणी केलेली नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, राज्य शासनाने मागणी केलेली नसली तरी त्याबाबतीत भांडत न बसता लवकरात लवकर महाराष्ट्राकरता लवकरात लवकर हा निधी कसा आणता येईल आणि विदर्भ व मराठवाडयातील दुष्काळी परिस्थितीला कशा प्रकारे तोंड देता येईल यादृष्टीने शासनाने निश्चितपणे विचार करावा. म्हणून माझ्या या वक्तव्याला पूर्णविराम देण्यापूर्वी मी एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छि5तो की, विदर्भ, मराठवाडयात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून त्याला गंभीरपणे आणि खंबीरपणे तोंड देण्यासाठी शासनाने अत्यंत प्रामाणिकपणे ज्या घोषणा केलेल्या आहेत, त्या इमानेइतबारे राबविण्याची गरज आहे आणि विदर्भ व मराठवाडयातील जनतेला सहाय्य करण्याची गरज आहे. त्यांच्यामध्ये अशा प्रकारची भावना निर्माण होता कामा नये की, हे शासन केवळ पश्चिम महाराष्ट्राचे आहे, विदर्भ आणि मराठवाडयाचे नाही. त्यामुळे दुष्काळाच्या संदर्भात त्वरित उपाययोजना करावी आणि विदर्भ व मराठवाडयातील जनतेला दिलासा द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो. धन्यवाद. जय भीम.

. . . .एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, आज याठिकाणी महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाच्या परिस्थिती संदर्भात चर्चा होत आहे आणि काल मांडलेल्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा मागमूस नसावा असे विदारक चित्र योगायोगाने निर्माण झालेले आहे. काल सकाळी चर्चा झाली असती, तर संध्याकाळी बजेटमध्ये काय केलेले आहे हे कळले नसते.

सभापती महोदया, दुष्काळावर चर्चा करताना केवळ शासनावर टीका करण्यासाठी आम्ही उभे नाही. ते शासन आहे आणि आम्ही विरोधी पक्षात आहोत. दुष्काळग्रस्त भागापर्यंत शासनाची मदत आणि शासनाची कृतीशीलता पोहोचविण्यासाठी आजची ही चर्चा आहे. शासनाने न केलेल्या बाबी मांडत आहोत, याचा अर्थ आम्ही शासनाला झोडपून काढत आहोत अशातला भाग नाही. पण जर काळीज नसलेले शासन असेल तर अशा वेळी त्याचे ऑपरेशन करणे हे आमचे काम आहे. याठिकाणी माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम उपस्थित आहेत, आनंद आहे. पण माननीय महसूल मंत्री येथे उपस्थित नाहीत. आम्ही ठरावात म्हटल्याप्रमाणे ज्या भागातील गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाली आहेत, त्यातील 90 टक्के गावे मराठवाडा आणि विदर्भातील आहेत. 2000-2001 मध्ये एकंदर 20,519 गावांमध्ये 50 टक्के आणेवारी होती. 2001-2002 मध्ये ही संख्या 5174 इतकी होती. ही आकडेवारी संपूर्ण महाराष्ट्राची म्हणजे मराठवाडा, विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र मिळून आहे. 2002-2003 मध्ये 9714 गावे होती. 2003-2004 मध्ये 5022 गावे आणि यावर्षी म्हणजे 2004-2005 मध्ये एकूण 12,034 गावांमध्ये शासनाने 50 टक्के आणेवारी जाहीर केलेली आहे. तेथील सत्य परिस्थिती फार मोठी भीषण आहे. 12034 गावांपैकी 11617 गावे मराठवाडा आणि विदर्भातील आहेत. विदर्भातील गावांची संख्या 10339 आणि मराठवाडयातील गावांची संख्या 1278 आहे. ही शासनाची आकडेवारी आहे, आमची नाही. आमच्या आकडेवारी प्रमाणे 12,034 गावांच्याऐवजी एकंदर 22,000 गावे आहेत. पण शासनाच्या तिजोरीत पैसे नाहीत. मात्र या दुष्काळग्रस्तांना मदत करावी लागेल, आपण केलेल्या घोषणा अंमलात आणाव्या लागतील. दुष्काळग्रस्त भागात फिरत असताना अनेक शेतकरी भेटतात, त्यांचे कुटुंबीय भेटतात आणि ग्रामीण भागात फिरताना त्यांचे तळतळाट जाणवतात. मी अत्यंत जपून शब्द वापरत आहे. हे तळतळाट कशासाठी ? तर शासनाने 50 टक्क्याहून कमी आणेवारी जाहीर केलेली असताना सुध्दा, तोंडी आदेश दिलेले आहेत की, 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असली तरी ती 50 टक्क्याच्या वर दाखवा.

. . . .एल-3

श्री.पतंगराव कदम(खाली बसून) : 50 टक्क्याच्यावर दाखवा ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, होय. मी अधिकृत बोलत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ख-या अर्थाने ज्यांची 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी दाखवायला पाहिजे, तेथे केवळ शासनाच्या तिजोरीत पैसे नसल्यामुळे, नुकसान भरपाई जास्त द्यावी लागेल, या भयापोटी अधिकारी अशा प्रकारचे चुकीचे अहवाल शासनाकडे पाठवितात. म्हणून मी म्हटले की, एवढी काटकसर करुन, एवढे आदेश देऊन सुध्दा महाराष्ट्रात कमी आणेवारीची बारा हजार गावे दाखवावी लागली. सभापती महोदय, मला एका गोष्टीचा आनंद होतो की, राज्यकर्ते कामाला लागले आणि राज्यकर्त्यांनी निर्धार केला की, अमुक एका भागातील दुष्काळ पळवून लावायचाच तर ते करता येते, याचे चित्र पश्चित महाराष्ट्रात दिसते. पश्चिम महाराष्ट्रात एवढे पैसे ओतल्यानंतर आपण तेथे कामे निर्माण केलेली आहेत. मी शासनाचे अभिनंदन करतो. कर्तुत्वाला साद धातलीच पाहिजे. या वर्षीच्या दुष्काळातील 12043 गावापैकी पश्चिम महाराष्ट्रातील फक्त 31 गावे पन्नास टक्के आणेवारीच्या खाली आहेत आणि ती बहुतेक माननीय मंत्रिमहोदयांच्याच जिल्हयातील असावित.ते मघाशी बसता, बसता बोलले की मी दुष्काळग्रस्त भागातील आहे. त्यांच्याकडे बघून तर वाटत नाही.

डॉ. पतंगराव कदम : माझा तालुका परमनन्ट डी.पी.ए.पी.मधील आहे.

श्री. दिवाकर रावते :साता-यातील 31 गावे आहेत. याचा अर्थ दुष्काळावरील उपाययोजना पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी राबवली. मी त्यांना धन्यवाद देतो आणि मनापासून अभिनंदन करतो की, त्या भागातील दुष्काळ पळविण्याचे सामर्थ्य त्यांनी निर्माण करुन दाखविले. पण ती कृतीशीलता आपण मराठवाडा आणि विदर्भाच्या बाबतीत दाखवित नाही, ही व्यथा आहे. ते करण्याची कुवत आहे. करण्याची हिंमत आहे. करण्याची इच्छाशक्ती मनात आणली आहे. परंतु मराठवाडयाला आणि विदर्भाला नेहमीच कोल्हाटयाच्या पोरासारखे तुम्ही कायम एका बाजूला करता हीच आमची व्यथा आहे. या दुष्काळी गावांच्या आकडेवारीच्या बाबतीत घडलेल्या दोन गोष्टी मी या ठिकाणी सांगतो. डॉ. पतंगरावाना हिंमत असेल तर त्यांनी ते नाकारुन दाखवावे. 2002-2003 मध्ये विदर्भामध्ये भीषण दुष्काळ पडला, विदर्भात दुष्काळ पडला. गारपिटीने पछाडले गेले. अतिवृष्टीने पछाडलेगेले. महापुराने पछाडले गेले. त्यावेळेला सन्माननीय विलासराव देशमुख अमरावतीमध्ये आले आणि त्यांनी विरोधी पक्षाच्या सर्व आमदारांची बैठक घेतली. त्यावेळेला ते असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणाले की, मुख्यमंत्री या नात्याने मी सर्व काही अधिका-याकडून माहिती घेतली आहे आणि माझे ठाम मत झालेले आहे की, पश्चिम विदर्भ हा दुष्काळग्रस्त भाग आहे. शेतक-यांच्या प्रचंड आत्महत्तेने त्या भागात थैमान घातले होते. तेथे मुख्यमंत्र्यानी प्रेस कॉन्फरन्स घेतली आणि असे सांगितले की, दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे आणि मी मुंबईला गेल्या गेल्या दुष्काळ जाहीर करतो. हे सगळे रेकॉर्डवर आहे. मुख्यमंत्री मुंबईला आले आणि त्यांनी दुष्काळ जाहीर करण्याऐवजी त्यांनाच या पदावरुन जावे लागले. सभापती महोदय, मला वाईट एवढेच वाटते की, मुख्यमंत्री मुख्यमंत्री असतात. व्यक्तिला महत्व नाही. पश्चिम विदर्भात येऊन. प्रेस कॉन्फरन्स घेऊन सर्व लोकांसमोर सांगितले की, दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे, हे मला मान्य आहे. अधिका-यांचे अहवाल तसे आहेत. मी मुंबईला गेल्या नंतर कॅबिनेट मिटिंग घेतो आणि ताबडतोब तसे जाहीर करतो असे सांगणारे मुख्यमंत्री दुर्दैवाने त्या पदावरुन निघून गेले आणि नव्या मुख्यमंत्र्यांनी ते काही झालेच नाही अशा प्रकारे आणि आत्महत्तेचे प्रमाण 500 च्या घरात गेलो. त्या सर्वांच्या घरी आम्ही गेलो होतो. श्री. नितीन गडकरी गेले होते, श्री. फुंडकर गेले होते. आम्ही सगळीकडे जातो. शेवटी काय करणार? आश्रु पुसणे एवढेच काम करु शकतो. जमत असेल तर मदत देतो. बाकी काहीच करु शकत नाही. सभापती महोदय, दुबार पेरण्या, डॉ. पतंगराव कदम आपण उत्तर द्या. तुम्ही मला कन्फर्म उत्तर दिले तर मला आनंद होईल. कारण मला माहीत आहे, हे झालेले नाही. दुबार पेरणीचे संकट आले. तिबार पेरणीचे संकट आले. मी आंदोलन केले. विरोधी पक्षांने आंदोलन केले. मला हेही सांगायला अभिमान वाटतो की, कॉन्ग्रेसच्या काही जागृत कार्यकर्त्यांनीसुध्दा त्यांचे शासन असतांना सुध्दा शेतक-यांकरिता काही ठिकाणी किरकोळ आंदोलने उभी केली. ज्यांना संवेदना आहेत ते कुठल्याही पक्षात असले तरी आंदोलन करण्यासाठी उभे राहातात.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तिबार पेरणीची परिस्थिती होती. आज या घडीला सुध्दा किरकोळ मदतीशिवाय अजूनही तेथे मदत पोहोचलेली नाही. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, ते उध्वस्त झाले परंतु मदत पोहोचली नाही. परत तसेच दृष्य, तशीच परिस्थिती होती. त्यावेळी कुपोषणाच्या प्रचंड वादळाचे महाराष्ट्रामध्ये आणि देशभरामध्ये थैमान माजले होते. त्यावेळी श्रीमती सोनिया गांधी दुष्काळग्रस्त, कुपोषणग्रस्त भागामध्ये पाहणी करण्याकरिता येणार होत्या. आपल्या सरकारने अगोदरच काही तरी केले पाहिजे. प्रचंड आत्महत्या होत होत्या. तिबार पेरणीचे संकट होते आणि कुपोषणाचा प्रचंड हलकल्लोळ होता. या परिस्थितीमध्ये तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी त्या भागामध्ये येण्याचा निर्णय घेतला. आमची ससेहोलपट काय आहे ते सांगतो. दुष्काळग्रस्तांची ससेहोलपट कशी असते ते सांगतो. आपल्या नेत्यांचा आदर प्रत्येकाने करावा. आम्हीही करतो. आमच्या नेत्यांसाठी आम्ही सुध्दा जीव टाकतो आणि जीव लावतो. तसे तुम्हीही केले त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिवस ठरविला. माननीय मुख्यमंत्री खाजगी विमानाने अमरावतीला आले. योगायोग असा की, विमान सकाळी 9.00 वाजता येणार होते. त्यांचे विमान लेट झाले. ते 11.00 वाजता आले. मी त्यांना दोष देत नाही. आज सकाळी आम्हाला थोडा उशीर झाला. माननीय विरोधी पक्ष नेते ट्राफिकमध्ये अडकले. उशीर झाल्याबद्दल माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मोबाईलवरुन फोन केला की मी येत आहे. काही न कळणाऱ्या गोष्टी असतात. चर्चेला 15 मिनिटे झालेल्या उशिराचे गांभीर्य नंतर आहे. परंतु आपले सन्माननीय मुख्यमंत्री सव्वानऊ वाजता येणार होते. काही झाले असेल. विमान उशिरा उडाले असेल किंवा धावपट्टीवर काही झाले असेल पण ते सव्वाअकरा वाजता आले. सव्वाअकरा वाजता आल्यानंतर त्यांचा पहिला ठरलेला कार्यक्रम कारने मेळघाटला जाण्याचा होता. त्यावेळी माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम सुध्दा उपस्थित होते की नाही मला माहीत नाही. माननीय मंत्रिमहोदय उपस्थित होतो असे म्हणत आहेत. म्हणजे बरेच झाले. ते साक्षीदार आहेत. माननीय मुख्यमंत्री मेळघाटला बाय रोड गेले आणि बाय रोड परत आले. तीन आदिवासींच्या झोपडयांच्या दरवाज्यात उभे राहिले आणि चौकशी केली. उशीर झाला होता म्हणून अधिकाऱ्यांची 20 मिनिटे बैठक घेतली. त्यांनी तसे नाटक केले असे मी म्हणणार नाही. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या बाबतीत असे म्हणण्याचे धारिष्टयही करणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

श्री. दिवाकर रावते .....

नाही. पण वेळच फार झाला होता आणि दुष्काळग्रस्तांची बैठक घ्यावयाची होती. धावपळ होत होती. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम यांना माहीत आहे. अधिकारी सारखे सांगत होते की, दुष्काळग्रस्तांची बैठक आहे. शितावरुन भाताची परीक्षा त्याप्रमाणे एका झोपडीवरुन कुपोषणाची परीक्षा केली. आपल्या म्हणीचा अर्थ त्या ठिकाणी प्रकट झाला. माननीय मुख्यमंत्र्यांना अमरावतीमध्ये परत येण्यासाठी 3.00 वाजले. मंत्री आहेत, ताफा आहे म्हणजे जेवणाचा प्रश्न असतोच. आपण ज्याप्रमाणे अर्धा तास ब्रेक घेतो त्याप्रमाणे त्यांनी अर्ध्या तासाची सुट्टी घेतली. दोन तासाचा अधिकृत ब्रेक असताना अर्ध्या तासाची सुट्टी घेतली. शेतकऱ्यांबद्दलची जाणीव होती त्यामुळे अर्ध्या तासाचा ब्रेक घेतला. अर्ध्या तासाचा एक तास झाला. 4.00 वाजता आपण जिल्हाधिकारी कार्यालयात आला. 4.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यानंतर दुष्काळग्रस्तांची बैठक चालू झाली. तिबार पेरणी, उध्वस्त शेतकरी, अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती या सर्व परिस्थितीतील शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्याकरिता 4.00 वाजता बैठक चालू झाली. माननीय मंत्रिमहोदयांचे पी.ए.आपल्याला माहीत आहेत. माननीय सभापती महोदया, आपल्याला संधी मिळेल तेव्हा कळेल. सभापती महोदया, 4.00 वाजता बैठक चालू झाली आणि दहा मिनिटांनी पी.ए. त्यांच्या कानाला लागले. लवकर आटपा, पाच वाजण्याच्या आत विमान उडावयाचे आहे म्हणून पी.ए. कानाला लागले. ते विमान सूर्यास्तापूर्वी 5.00 वाजता धावपट्टीवरुन उडवावेच लागते. मी एक शब्दही इकडचा तिकडचा सांगत नाही. 4.20 वाजता बैठक संपविली.

डॉ. पतंगराव कदम : बाकीचे बोलण्यात काय अर्थ आहे ? आपण दुष्काळावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : मी दुष्काळावरच बोलत आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. मी गांभीर्यानेच सांगत आहे. 4.20 वाजता बैठक सपविल्यानंतर 5.00 वाजता विमान उडवावयाचे होते. बिचारे पत्रकार बाहेर उभे होते. धावत धावत माननीय मुख्यमंत्री त्यांना परत हेच शब्द बोलले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मी बैठक घेतली, सभा झालेली आहे, मी माहिती घेतली आहे आणि आणखीन माहिती मुंबईला गेल्यावर घेईन. दुष्काळी परिस्थिती आहे याबद्दल एकमत झालेले आहे असे सांगून सायंकाळी 5 वाजता फडफड करुन मुंबईला निघून गेले. तुम्ही त्या विमानामध्ये होते. ही बैठक केवळ 20 मिनिटे झाली. (अडथळा) मी अमरावतीबाबत बोलत आहे. मी एकही शब्द इकडचा तिकडे करीत नाही आणि एकही मिनिट इकडता तिकडे करीत नाही. मुंबईला मा.श्री.सुशीलकुमार शिंदे आल्यानंतर गेल्यावर अमरावतीच्या दुष्काळाची घोषणा झाली नाही. आजही छातीवर हात ठेवून त्यावेळच्या दुबार आणि तिबार पेरणीची नुकसान भरपाई मिळालेली नाही. एवढे दुर्दैवाने तोंडी आदेश देऊनही 50 टक्के आणवारी करु नये ? त्या भागात 2-2 मुख्यमंत्री दुष्काळ जाहीर केला पाहिजे असे सांगतात. दुष्काळाने होरपळलेला हा महाराष्ट्रातील भाग आहे. तुमच्या त्या पश्चिम महाराष्ट्रात 2001 मध्ये फक्त 601 गावे दुष्काळाने पीडित होती. त्यांची संख्या पुढे 200 ने वाढली. त्यामध्ये किती तालुके होते ? सांगलीचा अर्धा भाग, सातारा जिल्हयाचा अर्धा भाग, संपूर्ण जिल्हा सुध्दा नाही. त्याकरिता दे माय धरणी ठाय असे केले. त्याच्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र डोक्यावर घेऊन फिरत होते. सगळे बजरंगबली झाले होते, द्रोणागिरी जसा डोक्यावर उचलतात तसा दुष्काळ डोक्यावर घेऊन फिरत होते. विरोधी पक्षाला झोडत होते, आकांत करीत होते, छात्या पिटत होते. केंद्रातून पैसा आणत नाही, अमूक करीत नाही असे सांगत होते. तुम्ही दुष्काळग्रस्त जिल्हयासाठी कोटयवधी रुपये लावण्याचे सामर्थ्य दाखविले, 5 हजार कोटीच्यावर पैसा लावला. मग मराठवाडा व विदर्भामध्ये आज 11617 गावे दुष्काळाने होरपळलेली आहेत त्यांच्यासाठी का निधी देत नाही ? भावना कशा असतात ते सांगतो. माझ्याजवळ विदर्भातील दुष्काळासंबंधीचा लेख आहे. त्यातील लेखकाने दुष्काळासंबंधी इतक्या जीवंत भावना व्यक्त केलेल्या आहेत की त्या वाचल्यावर ज्याला काळीज असेल ते हलल्याशिवाय राहणार नाही. त्यात त्यांनी असे लिहिले आहे की, सन 2004-2005 च्या मे महिन्यात मराठवाडयामध्ये मी पाच दिवस रोज फिरत होतो. दिवसदिवस अर्धपोटी इ ोपी जाणा-या माणसांच्या शोधात मी फिरत होतो. रोज ज्यांना पुरेसे जेवण मिळत नाही, ज्यांच्या घरीच पुरेसे खायला नाही अशी माणसे सहज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सापडणार नाहीत असे वाटते. परंतु जसे वाटले तसे काही घडले नाही. पोटात भुकेची आग असलेली बरीच माणसे भेटली. आम्ही काय काम करतो असे म्हणणारी म्हातारी माणसे भेटली. मुलगा कामाला हैद्राबादला गेलेला आहे त्याची घरात बसून वाट पाहत घरातील अन्न पुरवून खाणारी माय दिसली. गावामध्ये जेसीबीने रोहयोची कामे चालू असल्यामुळे तेथील मजूर 20 रुपये रोजाने दुस-या गावामध्ये मजुरीसाठी जात आहे. एक कि.मी. चढणीवरुन पाणी आणणारी बाई दिसली. तिच्या गावातील सर्वच्या सर्व हातपंप निकामी दिसले. दुष्काळाने शाळा सोडलेली मुले दिसली. काही गावातील लहान मुलींना वेश्याव्यवसायाकरिता लावण्याचा प्रकार झाल्याचे लोकांकडून ऐकण्यास मिळाले," असे असताना मा.श्री.पतंगरावजी आपण किती संवेदनाहीनतेने प्रश्न विचारला की, कसला लेख, कोण लेखक, काहीतरी लिहितात ? नाही, कोणीतरी लेखक उन्हातान्हातून लोकांमध्ये जातो आणि समाजसेवेच्या चळवळीच्या माध्यमातून लिहितो. श्री.अनिल शिदोरे नावाचे लेखक आहेत, त्यांना भेटण्यासाठी बोलवावे. ते ऐरे गैरे आहेत काय ते पहावे. आपल्यालाही त्याची माहिती आहे. परंतु या लेखाकडे आपण टिंगलटवाळीने पाहता तर मग दुष्काळाकडे काय पाहणार ? कारण तुमच्याकडे महसूल खाते नाही हे तुमचे दु:ख असू शकेल. मी समजू शकतो. परंतु श्री.पतंगरावजी, नागपूरच्या अधिवेशनामध्ये मा.पणनमंत्र्यांनी "दुष्काळी भागामध्ये आम्ही पेमेंट देऊ" असे जाहीर केले होते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

त्या भागातील कर्ज वसुली परत देऊ. परंतु असे घडलेले आहे काय ? तसे घडले असेल तर छातीवर हात ठेवून सांगावे, म्हणजे हक्कभंग आणायला आम्ही मोकळे. निवडणुकीच्या तोंडावर भिकेला लागेलेला, उद्ध्वस्त झालेला, दुष्काळाने संपुष्टात आलेला आमचा शेतकरी टाचा घासत होता. त्याला आकृष्ट करण्याकरिता कापसाला अमूक इतका भाव देऊ, फुकट वीज देऊ अशी आश्वासने दिलीत. मा. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शेतक-याचा 7/12चा उतारा कर्जमाफीच्या संदर्भात कोरा करण्याचे जाहीर केले. मग त्यावर कडी करण्याकरिता तुम्ही कर्ज माफी देऊ असे सांगितले. कर्जमाफी दिली असे तुम्ही आज जाहीर करा. आम्ही त्यासंदर्भात हक्कभंग आणतो. शेतक-याला आकृष्ट करण्यासाठी निरनिराळ्या घोषणा केल्या जातात. परंतु त्याला काहीही दिले जात नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या संदर्भात आपण जी राजकीय जिगर दाखवली, राजकीय इच्छाशक्ती दाखवली त्याचे आम्ही कौतूक करतो. परंतु तुमची हीच इच्छा शक्ती मराठवाडा आणि विदर्भाच्याबाबतीत कोठे लडखडते ? ह्या आमच्या व्यथा आहेत. सभापती महोदय, केवळ दुष्काळाच्या गोष्टी बोलण्यासाठी ही चर्चा आम्ही आणलेली नाही. कुठे पाणी नाही, कुठे धान्य नाही, जनावरांना चारा नाही, रोजगार हमीची दुर्दशा काय आहे? ह्या सर्व गोष्टी मी प्रत्यक्ष फिरुन पाहिलेल्या आहेत. काही गोष्टी तुमच्या हाताबाहेर असतीलही. न्या. सावंत आयोगाच्या निष्कर्षाने हे सिध्द झालेले आहे की, मंत्र्यांचे जर आपल्या खात्यावर नियंत्रण नसेल तर ती बाब सुध्दा मालप्रॅक्टीसेसचा भाग होते आणि ते अकार्यक्षम मंत्री ठरतात...(अडथळा).. याठिकाणी सहकार खात्याचे तसेच मदत आणि पुनवर्सन खात्याचे मा.मंत्री महोदय उपस्थित आहेत. सरकारच्या योजना शेतक-याच्या झोपडीपर्यन्त जात नसतील, त्याला घोटभर पाणी मिळत नसेल, थोडेसे अन्न मिळत नसेल, जनावरांना जगविण्याकरिता चारा मिळत नसेल तर ह्या गोष्टी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत संबंधित मंत्री महोदय अकार्यक्षम ठरत असल्यामुळे सावंत आयोगाच्या निष्कर्षाप्रमाणे त्या मंत्री महोदयांनी राजीनामा द्यावयास पाहिजे. हीच सरकारची संवेदना आहे. आमच्या शेतक-याच्या नशिबी कायम दुर्दैवच लागलेले आहे. कालपरवा गारपीट झाली. मी याबाबतीत मालेगाव मधील परिस्थितीची पाहणी केली त्यावेळी अनेक शेतक-यांनी मला निवेदने दिली. या गारपिटीत शासनाने कोणती मदत केलेली आहे ? माझ्याकडे नावानिशी निवेदने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

दिलेली आहेत. श्री. तुकाराम सखाराम राठोड, राहाणार अमानपूर, ता. उमरखेड, शेत सव्हे नं.3, जिल्हा यवतमाळ, या शेतक-याच्या 2.5 एकरावरील गव्हाच्या पिकाचे नुसान झाले. श्री. किशोर सूर्यभान वानखेड, शेत सव्हे. नं 231, राहाणार सुकळी, ता. उमरखेड, जिल्हा यवतमाळ या शेतक-याच्या 5 एकर गव्हाच्या पिकाचे नुकसान झाले. श्री. जनार्दन आनंदराव मुटकुले, शेत सर्व्हे नं. 203, राहाणार वरुड-बिबी, ता. उमरखेड, या शेतक-याच्या 2 एकर गव्हाच्या पिकाचे नुकसान झाले. श्री.पांडुरंग हरी वानखेड, शेत सव्हे नं. 83, राहाणार नागेशवाडी, जिल्हा यवतमाळ, या शेतक-याच्या 3 एकर हरभ-याच्या पिकाचे नुकसान झाले. या शेतक-यांची नांवे रेकॉर्डवर यावीत, त्यांना मदत मिळावी म्हणून मी ती नावे सांगत आहे. आता पर्यन्त गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. मी जेव्हा प्रत्यक्ष पाहणी केली त्यावेळी त्या भागातील संपूर्ण शेती गारपिटीने उद्ध्वस्त झालेली दिसली. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य तसेच विजेचा अभाव आणि ही गारपिट यामुळे शेतक-यांच्या शेतीचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या गारपीटग्रस्त शेतक-यांना शासन नुकसान भरपाई देत नाही. दिलीच तर ती शे-दोनशे रुपया पर्यन्त दिली जाते. ती नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात खरे तर शासकीय यंत्रण शेतक-याच्या दारी जावयास पाहिजे. परंतु असे न होता उलट शेतक-यालाच हेलपाटे मारावे लागत आहेत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते...

राज्यातील सावकार माजता आहेत. शेतकरी उध्वस्त होत आहे. आत्महत्त्येचे नवीन षडयंत्र उभे रहात आहे. काल जो अर्थसंकल्प सभागृहात सादर केला गेला त्यावर आम्ही उद्या आम्ही निश्चितपणे बोलू.राज्यातील दुष्काळग्रस्त 12 हजार गावातील उध्वस्त शेतक-यांच्या बाबतीत एकही शब्द शासनाकडून नोंदविला गेलेला नाही. या उध्वस्त शेतक-यांसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत हे देखील सांगितले गेले नाही. अर्थसंकल्पामध्ये तुम्ही गोंडस सांगितले आहे. परंतु गेल्या चार,पाच वर्षापासून दुष्काळात होरपळलेल्या शेतक-यांसाठी तुम्ही कोणती उपाययोजना केली, त्यांच्यासाठी किती तरतूद केली यासंबंधी आपण काहीही सांगितलेले नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. हे महाराष्ट्र शासन कितीही गोंडस बोलत असेल तरी राज्यातील उध्वस्त झालेल्या शेतक-यांला,ग्रासलेल्या शेतक-यांला विकसीत करण्यात तसेच त्यांच्या आत्महत्त्या थांबविण्यास हे शासन अपयशी ठरलेले आहे हे खेदाने नमूद करतो आणि पुन्हा एकदा पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी जशी जीगर दाखविली तशी जीगर मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-यांसाठी शासन दाखवील काय असे प्रश्नचिन्ह उपस्थित करुन मी माझे मनोगत थांबवितो.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : आपल्याला उत्तराचे भाषण दुपारी 12.00 वाजता सुरु करावयाचे आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, वेळ कमी असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात महत्वाचेच मुद्दे आपल्या भाषणात कव्हर करावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, स्वातंत्र्याचे महान सेनानी महात्मा गांधी यांनी सांगितले आहे की, खेडे हा माझा आत्मा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, या देशातील जनतेच्या समस्या सुटल्या नाहीत तर या देशात उद्रेक होण्याची शक्यता राहील. हे 50 वर्षाच्या पूर्वी सांगितले आहे.तीच परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण होत आहे याकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे.मागील वर्षापेक्षा या वर्षी भयावह दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. विदर्भात 10399 च मराठवाडयात 1278 गावांत असे एकूण 12 हजार 34 गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आहे. 50 टक्के आणेवारीच्या आतील 90 टक्के गावे ही विदर्भातील आहेत. आम्ही स्वतंत्र विदर्भ मागितले परंतु ते तुम्ही देत नाही. पूर्वी आम्ही महाराष्ट्रात सामील होऊन गेलो. तुम्ही मोठे भाऊ आणि आम्ही लहान भाऊ असे संबंध प्रस्तापित केले.परंतु मोठया भावाकडून लहान भावास पूर्णपणे न्याय मिळत नाही. विदर्भात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. गावामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. विदर्भातील अनेक शेतक-यांची गुरे कत्तलखान्यात पाठविली जात आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, विदर्भातील या दुष्काळाकडे शासनाने गंभीरतेने पाहण्याची गरज आहे. मार्च महिन्यापासून विदर्भातील ब-याच गावांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. अजून तर मे, जून महिना यावयाचा आहे त्यावेळी पिण्याच्या पाण्याची काय परिस्थिती राहील याचा शासनाने आतापासूनच विचार करणे गरजेचे आहे. या वर्षी शेकडो शेतक-यांना आत्महत्त्या कराव्या लागल्या याची जाणीव सभागृहाला देखील झालेली आहे. या संदर्भात सभागृहात चर्चा झाली. माननीय मंत्र्यांनी यासंदर्भात सभागृहात व्यक्तव्ये केलेली आहेत. परंतु यापुढे विदर्भातील शेतक-यांनी आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होऊ नये म्हणून शेतक-यांसाठी विविध योजना आणि सवलती देण्याची गरज आहे. शासनाचे मी एका बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो. मागील वर्षी सरकारने 1476 कोटी रुपयांची योजना आणली होती. या वर्षी देखील राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे 5000 कोटी रुपयांची योजना जाईल अशी अपेक्षा आहे. राज्य शासनाने दुष्काळाची चाहूल घेता केंद्र शासनाकडे दुष्काळ निवारण सहाय्यता मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत असे कृषी मंत्र्यांनी सांगितले. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी यासंबंधीचा दाखला दिला. याचा अर्थ असा की, मंत्रालयातील कृषी विभागाच्या सचिवांनी या दुष्काळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले दिसते. मला आठवते की, कै. कन्नमवार,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे..

कै.वसंतदादा पाटील हे या राज्याचे मुख्यमंत्री होऊन गेले.कै.वसंतदादा पाटील हे फार कमी शिकले होते. ते अधिका-यांना सांगत होते की, हे काम झाले पाहिजे. त्यावेळी अधिकारी म्हणत असत की, सदर काम नियमात बसत नाही. त्यावेळी कै.वसंतदादा पाटील,माजी मुख्यमंत्री त्यांना विचारीत असत की, तुम्ही पगार किती घेता. अधिकारी सांगत असत की, 20 हजार रुपये पगार घेतो. नंतर ते मुख्यमंत्री सांगत होते की, तुम्हाला आम्ही 20 हजार रुपये पगार कशासाठी देतो. नियमात कामे बसविण्यासाठी तुम्हाला नेमले आहे. लोकांच्या हिताची कामे झाली पाहिजेत असा मनात दृष्टीकोन ठेवून त्यांची कामे नियमात बसावा अशा प्रकारचे आदेश ते देत असत. या दोघा माजी मुख्यमंत्र्यांचा आदर्श घेण्याची गरज आहे. आजच्या घडीला मंत्रालयात 1 कोटी 70 लाख फाईल्स मंत्रालयात पडून आहेत ही बातमी आजच्या वृत्तपत्रात आलेली आहे. नागपूर जिल्हयातील कोटोल, नखरेड, सावनेर तालुक्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी पाचशे ते आठशे मिटरपर्यन्त खाली गेली आहे. नागपूर शहराला ऑरेंज सिटी असे आम्ही मोठया अभिमानाने म्हणत होतो. परंतु नागपूर जिल्हयातील सर्व संत्रा सुकून गेला.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ MAP/ 11:35

श्री. रमेश निकोसे ...

भंडारा जिल्हयाला भंडार म्हणत असत. संपूर्ण महाराष्ट्राला उत्कृष्ट तांदूळ या जिल्हयातून पुरविला जातो. चंद्रपूर जिल्हा. गोंदिया हे विभाग होते. त्या विभागात फार मोठया प्रमाणात दुष्काळ आहे .झ ाडे तोडली गेली. पाणी पडत नाही. धानाच्या बागा ओस पडलेल्या आहेत. यासाठी सरकारने जंगल निर्माण करण्याची मोठी मोहीम उभी करावी. तसेच, मोठया प्रमाणात झाडे लावावीत. मराठवाडयात लक्ष दिले नाही तर तेथे वाळवंट निर्माण होईल. दुसरी बाब म्हणजे, पेंच प्रकल्पाच्या बाबतीत मी बोलतो. पेंच -1 आणि पेंच-2 प्रकल्पांमध्ये पाणी नाही. पेंच नदीला पाणी नाही. अशा परिस्थितीमध्ये नागपूर शहराचा पाणी पुरवठा केव्हाही खंडित होईल आणि अडचण निर्माण होईल. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. नागपूर शहर 300 वर्षापूर्वी निर्माण झाले. हे शहर वसत असताना राजे-भोसले यांनी त्यावेळेच्या शासन दरबारी फुटाळा तला,गोरेगांव तलाव अंबाझरी तलाव,सोनेगांवचा तलाव,इंदोरा येथे तलाव होता तेथे आता झोपडपट्टी झालेली आहे या तलावाची निगा राखली. मध्यभागामध्ये तलाव खोदला. शुक्रवार तलाव खोदला. पाण्याची पातळी बरोबर राहण्यासाठी हा तलाव आवश्यक आहे असे त्यावेळी त्यांचे मत होते. अलिकडे पाण्याची समस्या नागपूर शहरामध्ये आतापासूनच सुरु झालेली आहे. मे महिन्यामध्ये गावागावामध्ये किती टँकर देणार आहात आणि पाण्याची समस्या कशी सोडविणार आहात यासंबंधी शासनाने निवेदन करावे. पावले उचलण्याची गरज आहे. रोजगार हमी योजनेची कामे सुरु झालेली नाहीत. ती सुरु होण्याची आवश्यकता आहे. कै.वसंतराव नाईक यांनी रेल्वेच्या कामांची योजना आणली त्यावेळच्या मंत्रिमंडळाने ही योजना आणली. कारण दुष्काळामध्ये लोकांना कामे मिळाली पाहिजेत. गोरगरीब पाण्यासाठी तळमळून मरुन जातील. एक घोट पाण्यासाठी कुणाचा मुलगा किंवा आई मरु शकते. पाणी पाजा,प्राण माझा जाते आता अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणून मी शासनाला विनंती करतो की,भंडार,चंद्रपूर,नागपूर,गोंदिया आणि गडचिरोली या जिल्हयासाठी गोसीखुर्द प्रकल्प झाला पाहिजे. या प्रकल्पासाठी त्यावेळेचे पंतप्रधान कै. राजीव गांधी आले होते. हा प्रकल्प अजून तसाच पडून आहे. त्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात निधीदेण्याची गरज आहे. तो प्रकल्प झाला तर नागपूर शहराला पाणी मिळू शकते. या चारही जिल्हयांना पाणी मिळून ते दुष्काळपासून मुक्त होऊ शकतात. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, वक्त की आंधीमें जहाँ बदल जाता है. उम्र की

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ...

राहपर इन्सान बदल जाता है. कुसुर मैंने नहीं किया रोटी की कसम, भूख की दुनियामें इमान बदल जाता है. गरीबाच्या जीवनाशी कोणत्याही सरकारने आणि अधिका-याने खेळता कामा नये असा इशारा मी यानिमित्ताने देतो आणि डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे की, लोकांच्या भावनांकडे लक्ष दिले नाही तर तळमळून मरणारी माणसे कोणत्याही दिशेने जाऊ शकतात आणि काहीही करु शकतात असा इशारा देतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : अधिका-यांच्या बेपवाईमुळे टंचाईग्रस्त भागातील लोकांचे किती हाल होतात याचे समर्पक वर्णन सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांनी भाषणाच्या शेवटी केलेले आहे.चासकमान प्रकल्पातून रोटेशनपध्दतीने पाणी देण्याची पध्दत आहे. असे असतांना सुध्दा या प्रकल्पातून शिरुर तालुकयातील भागाला श्री.मदसूद हे कार्यकारी अभियंता आणि श्री.गाडेकर उप अभियंता या दोन अधिका-यांनी जाणीवपूर्वक पाणी सोडले नाही. त्यांना यासाठी एकदा नव्हे तर दोन - तीन वेळा आठवण करुन दिल्यानंतर पंधरा तारखेला सोडतो, वीस तारखेला सोडतो आणि चोवीस तारखेला सोडतो असे त्यांच्याकडून सांगितले गेले.तेव्हा अशा प्रकारे जाणीवपूर्वक केली जाणारी लोकांची थट्टा शासनाने ताबडतोब थांबवली पाहिजे. आजच्या आज तेथील पाणी नियमितपणे सोडण्याच्या सूचना शासनाकडून संबंधितांना देण्यात याव्यात.या सूचना कोण देणार आहे ?

डॉ.पतंगराव कदम (बसून) : सभापती महोदय, मी सूचना देईन.

उप सभापती : आजच्या आज तातडीने या सूचना देण्यात याव्यात कारण रोटेशन पध्दतीने पाणी सोडावयाचे असतांना सुध्दा गेल्या पंधरा दिवसापासून मुद्दाम त्यांनी पाणी सोडलेले नाही.

डॉ.पतंगराव कदम (बसून) : सूचना देऊ

प्रा.जोगेन्द्र कवाडे : सभापती महोदय, आता आपण पाणी न सोडणा-या अधिका-यांचा येथे उल्लेख केलेला आहे.केवळ पाणी सोडण्याच्या संदर्भात त्यांना सूचना देऊन भागणार नाही. जर ठरलेल्या नियमानुसार त्यांनी पाणी सोडले नाही तर त्या अधिका-यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी.

उप सभापती :ठीक आहे

एक सन्माननीय सदस्य : त्यां अधिका-यांची नावे सुध्दा मंत्रिमहोदयांनी लिहून घेतली नाहीत.

डॉ.पतंगराव कदम : माझ्या डोक्यात कॉप्युटर आहे.तेथे ही नावे फिड झालेली आहेत.

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, रोटेशनने पाणी सोडले जात नाही याबाबतीत आताच आपण सांगितलेले आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, ताकारी प्रकल्पातून अशा पध्दतीने कधीच पाणी सोडले जात नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती :रोटेशन पध्दतीने पाणी न सोडणा-या अधिका-यांची एकदा रोटेशनने बदली करण्यात यावी.

श्री.जी.एल.ऐनापुरे : या संदर्भात शासनाने गांभीर्याने उपाययोजना केली पाहिजे.

उप सभापती :रोटेशनने पाणी न सोडणा-या अधिका-यांची बदली केली पाहिजे..एकाच ठिकाणी हे अधिकारी थांबलेले आहेत त्यामुळे बरेच पाणी साठलेले आहे.चासकमान प्रकल्पातील संबंधित अधिका-याची नावे मी सांगतो. श्री.मदसूद कार्यकारी अभियंता आणि श्री.गाडेकर हे उप अभियंता आहेत.

डॉ.पतंगराव कदम (बसून) : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर):सभापती महोदय,अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मराठवाडा विभागातील आकडेवारीसुध्दा आपल्या कॉम्प्युटरमध्ये ठेवली तर त्याचा त्यांना अधिक उपयोग होऊ शकेल. सभापती महोदय,दुष्काळग्रस्त भागाकडे शासन कसे बघत आहेत याची मी आपल्याला काही आकडेवारी सांगत आहे.मराठवाडा विभागात 1278 गावे दुष्काळग्रस्त आहेत व ती संख्या सरकारने मान्य केलेली आहे.त्याठिकाणी 50 ते 60 हजार मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थित होते.आजची आकडेवारी लक्षात घेतली तर मजुरांची संख्या 85 हजारापर्यन्त गेलेली आहे. गेल्या दोन तीन दिवसापासून ही आकडेवारी वाढलेली आहे.गेल्या वर्षी याच काळात 1600 पेक्षा जास्त गावे टंचाईग्रस्त असतांना 4 लाख 72 हजार मजूर कामावर होते. नवीन पुरोगामी सरकार सत्तेवर आले आणि 4 लाख .72 हजारावरुन ही संख्या 50-60 हजाराची झालेली आहे. ही संख्या फक्त 15 टक्के एवढी झाली आहे बाकीचे 85 टक्के मजूर कमी झालेले आहेत मजुरांची संख्या कमी होण्यासाठी आपले सरकार इतके पारदर्शक आणि गतीमान झालेले आहे काय ? हा मुद्दा आपल्या कॉम्प्युटरमध्ये फिड झालेला आहे. तेव्हा ही संख्या कमी होण्याची मुलभूत कारणे काय आहेत यासंबंधी उत्तर देतांना आपण त्याबाबतचा खुलासा करावा. यानंतर टॅन्करच्या बाबतीत मला बोलावयाचे आहे. या ठिकाणी घोषणा करण्यात येतात पंरतु त्याप्रमाणे खालच्या यंत्रणेकडून कार्यवाही केली जात नाही. त्यासाठी शासनाचा आपल्या यंत्रणेवर कन्ट्रोल राहिलेला नाही.वेगवेगळया लॉबी आणि वेगवेगळया अधिका-यांची मस्ती यामुळे त्याचे फायदे जनतेपर्यन्त पोहोचत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. गेल्या वर्षी मराठवाडयात 15 मार्च नंतर 1200 टॅन्कर्स चालू होते.आज या टॅन्कर्सची संख्या 300 एवढी झाली आहे.टंचाईग्रस्त गावाची संख्या त्यावळी 1278 होती आणि आता साडे तीन हजार गावामध्ये पाणी टंचाई आहे.महिलांना चार चार किलोमिटर्स अंतरावरुन पाणी आणावे लागते. कालच बीड जिल्हयाची पाणी टंचाईची बैठक झाली होती.माननीय मंत्रीमहोदय हे संभाजीनगर जिल्हयाचे पालक मंत्री आहेत.त्यांना मी विनंती केली होती की,आमच्या जिल्हयात तीव्र पाणी टंचाई आहे.त्यासाठी वेगळी बैठक घेण्यात यावी परतु आतापर्यन्त ही बैठक झालेली नाही हे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. मी घेतलेल्या माहिती नुसार 450 गावामध्ये पाणी टंचाई आहे.त्या ठिकाणी सात ते आठ किलोमिटर्स अंतरावरुन पाणी आणावे लागते.तेथे पाणी

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टंचाईची बैठक झालेली नाही. फक्त एकच डी.पी.डी.सी.ची बैठक झाली होती.पाणी टंचाईची बैठक घेण्याचे त्यांनी कबूल केले होते परंतु ती बैठक झाली नाही. एप्रिल अखेरपर्यन्त अधिवेशन चालणार आहे तेव्हा मे महिन्यात बैठक घेऊन त्याचा काय उपयोग होणार आहे ?

डॉ.पतंगराव कदम : त्या ठिकाणी आचारसंहिता लागू आहे.

श्री.श्रीकात जोशी : आपण पाणी टंचाईची बैठक येथे धेऊ शकता तसेच आचारसंहिता शहरापुरती आहे ती ग्रामीण भागात नाही.

नंतर श्री.कानडे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (पुढे चालू...

कालच खुल्ताबादला खासदार महोदयांनी व्हीजिलन्स समितीची बैठक घेतली. सरपंचांना पाण्याच्या टंचाईसंबंधाने विचारण्यात आले. सगळयात महत्वाचे म्हणजे टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत सरकारचे अडवणुकीचे धोरण का आहे, हा एकमेव प्रश्न आपल्याला विचारला होता. मी सांगू इच्छितो की, रोजगार हमी योजनेमधील भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यासाठी विभागीय आयुक्त श्री.भोगे साहेबांनी काही हालचाली केल्या,एका दृष्टीने त्यांनी काही चांगली पावले उचण्यास सुरुवात केली. याचा परिणाम सरकारी अधिकाऱ्यांच्या लॉबीने ती सगळी कामेच बंद करण्याचे ठरविले. 100 मीटरपेक्षा जास्त लीड असेल तर ट्रॅक्टर वापरावा, अशापध्दतीचा नियम सरकारने केला. पूर्वी हे काम दीडशे मीटरपेक्षा जास्त लीड असेल तर ट्रॅक्टरने वाहतूक करावी असा नियम होता. हा निकष बदलून 100 मीटरपर्यन्त आणला. याचा परिणाम असा झाला की, सगळी अथवर्कची कामे, माती कामे -मग ती रस्त्याची असो किंवा इतर कोणतीही असो. ती कामे बंद करण्यात आली. याबाबतचे खरे कारण सांगण्यात आले की, सरकारकडे पैसे उपलब्ध नाहीत. ही कामे सुरू केली तर करोडो रुपयाची लायबिलिटी सरकारवर येते. रोहयोच्या कामासाठी प्रोफेशन टॅक्समधून जरी 2400 कोटी रुपये जमा होत असले तरी दुष्काळग्रस्त भागाला पैसे देण्यासाठी सरकारकडे पैसे नाही, सरकारची आर्थिक परिस्थिती नाही, मन:स्थिती नाही, त्याचबरोबर मुळामध्ये राजकीय इच्छाशक्तीही नाही. त्यामुळे अप्रत्यक्षात कुशल आणि अकुशल भागाचे काम करावे लागते. ही दोन्हीही कामे एकत्र केली तर कामाचा दर्जा रहात नाही. अकुशल कामाचे पैसे आपल्याला देता येतील. परंतु कुशल कामाचे पैसे देण्यासाठी सरकारकडे पैसे कमी असल्यामुळे अकुशल कामेच कशी बंद पडतील या दृष्टीनेच निकष बदलण्याबाबत राज्य सरकारने 16 ऑगस्टला जी.आर. काढलेला आहे, अशी शंका येते. माझा मंत्री महोदयांना थेट प्रश्न आहे की, त्यांनी उत्तराच्या भाषणामध्ये 16 ऑगस्टचे लीडचे निकष बदलले, त्यामुळे मराठवाड्यातील रोजगार हमी योजनेची कामे अधिका-यांनी बंद केलेली आहेत. ही कामे ताबडतोब चालू करण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार निकष बदलण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याना देणार आहात काय, हे स्पेशिफिक सांगावे. तरच 1278 गावातील रोजगार हमी योजनेची कामे चालू होऊ शकतील. सभापती महोदय, आयुक्त श्री.भोगे साहेबांनी रोजगार हमी योजनेच्या कामावरील गैरप्रकारास आळा घालण्याच्यादृष्टीने काही प्रयत्न केले. 5 टक्के ज्युनियर इंजिनियर, 5 टक्के डेप्युटी इंजिनियर, 5 टक्के एक्झीक्युटिव्ह इंजिनियर, 5 टक्के स्थानिक रोहयो समितीचे अध्यक्ष आणि 5 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्रालयामध्ये पैसे द्यावे लागत होते, ही वस्तुस्थिती मी गांभीर्यपूर्वक सांगत होतो. जेव्हा आयुक्तांनी कामाची चौकशी करण्यास सुरुवात केली, त्यावर सगळ्यांचे धाबे दणाणले. आता खोटे बोलता येत नाही, सगळे सांगता येत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेची कामेच बंद करण्याचा मराठवाड्यामध्ये सपाटा लावलेला आहे. आजच्या परिस्थितीत संपूर्ण मराठवाड्यामध्ये कामे करण्यास उत्सुक असलेली हातांची संख्या ही 10 लाखापेक्षा जास्त आहे,पण त्यांना आपण काम देऊ शकत नाही,ही वस्तुस्थिती आहे. याकडे गांभीर्याने लक्ष देणार आहात की नाही, हा खरा प्रश्न आहे. दुष्काळ हा केवळ ईश्वर निर्मित नसून, सरकार निर्मित आहे, मानव निर्मित आहे. मंत्रीमहोदयांनी वेळोवेळी कामे न केल्यामुळे पुढच्या वर्षीचे संकट येत असते. जलसंधारणाची कामे आहेत, बंडिंगची कामे आहेत, सिमेंट बंधारे आहेत. मी गेली दोन वर्षे सातत्याने आमदार म्हणून एसजेआरवाय आणि कलेक्टरांना सांगतो की सिमेंट बंधाऱ्यातील स्कील पोर्शनचे काम हे आमच्या आमदार निधीमधून घ्यावे. त्यातील सिमेंट आणि वाहतुकीचा खर्च आहे तो आम्ही आमच्या निधीतून करु. बाकीचा खर्च आपण रोजगार हमी योजनेतून करावा. आमच्या मराठवाडयातील टँकरने पाणीपुरवठा करणारी गावे आहेत, त्याठिकाणी सिमेंट बंधाऱ्याची साखळी करुन दिली तर मी मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की,आपला कायमचा टँकरने पाणीपुरवठा करण्याचा खर्च वाचेल. पण त्याला वित्त विभागाची मान्यता लागते. आमदार निधी आणि रोजगार हमी योजनेचा निधी एकत्र करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्याबाबतीत जीआर काढलेला आहे. टॅकर फेड व्हीलेजेस कायमस्वरुपी काढावयाची असतील तर आपण आपल्या उत्तरामध्ये सांगा की,आमदार निधी आणि रोजगार हमी योजनेची कामे यांच्या मॅचिंग ग्रँडचे कपल करण्याचे परिपत्रक तुम्ही काढणार आहात काय ? तर आमच्या आमदार निधीतून सिमेंट बंधाऱ्याची कामे कमी खर्चामध्ये घेता येतील. सात-सात, आठ-आठ लाखाचा एकेक बंधारा होईल आणि त्या गावच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. मी शेवटचा मुद्दा सांगतो. आणेवारीच्या संदर्भाने सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी उल्लेख केला. खरे म्हणजे 50 टक्के आणेवारी आणली कोठून हे समजत नाही. मा.डॉ.पतंगराव कदम साहेबांना स्पष्टपणे विचारावयाचे आहे की, परभणी नांदेड जिल्ह्यातीलशेतकऱ्यांची पहिली पेरणी वाया गेली, दुसरी पेरणी वाया गेली. तिसरी पेरणी करण्याची ताकद त्या शेतक-याजवळ नव्हती. नशीबाने शेवटचा पाऊस नंतर आला. पावसानंतर रब्बीचे पीक चांगले आले,पण दुर्दैवाने ते पीक गारपीटीने उध्वस्त झाले. मी आपल्याला यासंबंधातील फोटोग्राफ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे चालू....

दाखवितो. परभणी जिल्ह्यातील दोन रेल्वे स्टेशनचे फोटोग्राफ्स 'लोकमत' या दैनिकामध्ये छापून आलेले आहेत, हे रेल्वे स्टेशन सिमला नाही,तर हे रेल्वे स्टेशन परभणी जिल्ह्याचे आहे. त्या ठिकाणी प्रचंड गारपीट झाली, संपूर्ण परभणी, देगलूर, नायगाव हे तालुके एक दिवसासाठी बर्फमय झालेले होते. त्यामध्ये प्रचंड मोठमोठ्या गारा पडल्या त्यामुळे प्रचंड नुकसान झालेले आहे. मला हे समजत नाही की, दोनवेळा पेरणी होऊन शेतकऱ्यांच्या हातातून खरीपाचे पीक गेले, रब्बीचे पीक पूर्ण झोपले, तरीसुध्दा 50 टक्क्यापेक्षा जास्त आणेवारी आली, असे सांगणारा हा ग्रेट अधिकारी कोण आहे ? ज्याला रब्बी पीक आणि खरीपाचे पीकही शेतकऱ्याच्या हातून गेले तरी त्या ठिकाणची 50 टक्क्यापेक्षा जास्त आणेवारी आल्याचे त्याला दिसले. मला वाटते, या सगळया प्रकरणाची तपासणी करायला पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यामध्ये गेल्या काही वर्षामध्ये 25 पेक्षा जास्त हुंडाबळी झालेले आहेत.

यानंतर श्री.सुंबरे (पुढे चालू.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

ज्यावेळेस या हुंडाबळी प्रकरणांच्या खोलामध्ये मी गेलो तेव्हा एका गावातील महिलेच्या घरातून मला असे समजले की, गेल्या पाच वर्षापासून आमच्याकडे दुष्काळ आहे. घरामध्ये लक्ष्मी येत नाही तर मग घरातील या लक्ष्मीला हाकलून द्यावे म्हणून तिचा जीव घेऊनच तिला मारले आहे. अशी उदाहरणे आहेत. अध्यक्ष महाराज, अशा परिस्थितीमध्ये दुर्दैव हे की, आपले सरकार आणि सरकारी अधिकारी गावनिहाय नेमके आकडेवारी देऊ शकलेले नाहीत. आकडेवारी विचारण्यास गेले की, आकडेवारी उपलब्ध नाही म्हणून सांगतात. रोजगार हमी योजनेकडे, एकूण दुष्काळाकडे, टँकरकडे आणि शिक्षणाकडे-विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीकडे देखील दुर्लक्ष करतात. खरी माहिती आपल्याकडे येऊ देत नाहीत. तेव्हा आपण मंत्र्यांनी प्रत्येक जिल्ह्यात जाऊन आपल्या अधिकाऱ्यांच्या खरोखरी या पार्श्वभूमीवर बैठका घेतल्या तर आपल्याला नेमकी परिस्थिती, वस्तुस्थिती, समजून येईल. आज 50 पेक्षा कमी आणेवारी असलेली केवळ 1200 गावे मराठवाड्यामध्ये आहेत असे जे आपल्याला सांगण्यात आलेले आहे ते संपूर्णत असत्य असून माझ्या माहितीप्रमाणे किमान साडेतीन हजार गावांमध्ये 50 पेक्षा कमी आणेवारी आहे हे मी आपल्याला खात्रीपूर्वक आणि निश्चितपणे सांगू इच्छितो. त्याकडे आपण लक्ष द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

****

(यानंतर श्रीमती फौजीया खान यांचे हिंदी भाषण श्री.दत्त यांचेकडे ....

(यानंतर श्री.जागडे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त) : माननीय सभापति महोदय, जब संकट आता है तो वह अकेला नहीं आता, अपने साथ वह बहुत सारी मुसीबतों को लेकर आता है, इस बात का अनुभव पूरे राज्य के साथ मराठवाडा भी कर रहा है. लेकिन भविष्य में आने वाली मुसीबतों का मुकाबला करने के लिए जो दूरगामी नियोजन और तैयारी की जरुरत है, मुझे पूछना है कि क्या उस पर हमने कभी गंभीरता से ध्यान दिया है ? शायद इसी का नतीजा है कि हर अधिवेशन में सभागृह के अंदर दुष्काळ का मुद्दा बड़े जोर शोर से उठता है. यहाँ मैं कोई किसी एक राजकीय पक्ष या किसी एक सरकार की बात नहीं कर रही हूं. बल्कि जब से राज्य की निर्मिती हुई है तब से अब तक यह समस्या हमें बार बार सताती रही है.

माननीय सभापति महोदय, 1972 का दुष्काळ तो अभी भी भुलाये नहीं भूलता. उस दुष्काळ का सामना करने के लिए रोजगार हमी योजना जैसी महत्वाकांक्षी योजना हमारे इस राज्य में लागू की गयी. इस योजना के शुरु होने से लोगों के हाथों को काम तो मिला लेकिन दुष्काळ का सामना करने के लिए यह योजना पर्याप्त नहीं है. माननीय सभापति महोदय, यह बात सच है कि नैसर्गिक आपत्ति बोलकर नहीं आती और यह भी एक कठोर वास्तविकता है कि उसका मुकाबला भी केवल बोलकर नहीं किया जा सकता. मैं बताना चाहूंगी कि जून और जुलाई 2004 में जो कम बारिश हुई उसकी वजह से अल्प और अत्यल्प भूधारक किसानों का नुकसान 50 प्रतिशत से भी ज्यादा हुआ है. इसीलिए सरकार ने 24 अगस्त, 2004 के निर्णय के अनुसार अल्प और अत्यल्प भूधारकों को प्रति हेक्टेयर के हिसाब से 1000 रुपए की आर्थिक सहायता दी. साथ ही साथ पीने के पानी, रोजगार हमी योजना के काम और जानवरों को चारा आदि जैसी चीजों में बड़े पैमाने पर रिलेक्सेशन दी गयीं. यह निर्णय राज्य के 122 तालुकों में लागू किया गया.

माननीय सभापति महोदय, महाराष्ट्र राज्य जब दुष्काळ का सामना कर रहा था तब मराठवाडा और राज्य के कई अन्य हिस्सों में जनवरी महीने में तूफानी गारपीट हुई. इस कारण बड़ी मात्रा में जीवित और वित्तिय हानि हुई. लेकिन निधि के अभाव के कारण अभी तक अनुदान और कर्ज की सहायता पीड़ित लोगों तक नहीं पहुंच सकी है. अभी यहां पर माननीय सदस्य

अशोधित प्रत / अशोधित नहीं

श्रीमती फौजीया खान.....

श्री जोशी ने बताया कि परभणी जिले के 21828 हेक्टेयर जमीन में शेतीपीक और फलपीक का नुकसान हुआ है. इन किसानों को भी निधि अभाव के कारण अनुदान नहीं दिया गया. देखा जाए तो यह नुकसान ही किसानों की कमर तोड़ने के लिए काफी था. लेकिन निसर्ग शायद उनकी सहनशीलता का अंत देखना चाहता था. शायद इसीलिए मार्च 2005 में एक बार फिर गारपीट हुई और फिर से एक बार तबाही हुई. लेकिन पूरी तरह से टूट चुके किसान आज भी आर्थिक सहायता से वंचित हैं जैसा किसी ने कहा कि मुश्किल इतनी पड़ी उन पर कि आसान हो गयी. यह बात अलग है कि केवल आर्थिक सहायता करने से यह टूटा हुआ किसान खड़ा नहीं हो सकता. लेकिन यह सहायता डूबते को तिनके का सहारा जरुर बन सकती है. इसलिए यह तिनका मुहैया कराने में अब और देर नहीं होनी चाहिए.

माननीय सभापति महोदय, दुष्काळ का सामना करने के लिए शासन को कुछ बुनियादी बातों पर ध्यान देने की जरुरत है. मैं कहना चाहूंगी कि राज्य का लगभग हर किसान किसी न किसी कर्ज में डूबा हुआ है. इन कर्जों की वजह से वह मानसिक रुप से भी टूट चुका है. ऐसे किसानों में नयी उम्मीद जगाने के लिए शासन द्वारा आर. बी. आय. को यह शिफारिश करनी चाहिए कि वह इन कर्जों को री - शेड्युल करे. मेरा दूसरा सुझाव यह है कि जिस प्रकार से बी.पी.एल. के लोगों को आधी कीमत पर अनाज दिया जाता है उसी प्रकार से जहां गारपीट हुई है और किसान पूरी तरह से उद्धवस्त हो गया है, जिनके पास कुछ नहीं बचा है. वहां पर भी उस गांव के हर किसान को कम से कम तीन महीने तक आधी कीमत पर अनाज मुहैया कराया जाये, क्योंकि हमारे गोदामों में बहुत सारा अनाज भरा पड़ा है. यह अनाज उन किसानों के लिए और जानवरों के भी खाने के काम आ सकता है और ऐसा करने से उन किसानों को तत्काल मदद मिल सकेगी. इस तरह का काम परभणी जिले के गोदावरी दूधना के कर्मचारियों के लिए वहां के प्रशासन ने किया है और इसकी वजह से वहां के लोग जो कि बार बार मोर्चे निकाल रहे थे वे लोग थोड़ी देर के लिए शांत हो गए क्योंकि उनको खाने के लिए इस तरह से अनाज मिला है.

इसके बाद श्री तालेवार के पास....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

11:55

श्रीमती फौजीया खान.....

इसके साथ ही साथ मैं यह सुझाव देना चाहती हूं कि चारा तगाई अुनदान फौरन दिया जाए और वैरण विकास योजना पर भी ध्यान देने की आवश्यकता है. वैरण विकास योजना के तहत अगर बियाणे और खत में सब्सिडी दी जाएगी तो जानवरों के चारे का प्रश्न बहुत हद तक छूट सकता है.

सभापति महोदय, जहां तक परभणी की बात है, यहां के कृषि विद्यापीठ में लगभग 200 हेक्टर जमीन एक्सेस है. इस एक्सेस जमीन में से 100 हेक्टर जमीन पर चारा उगाने का प्रस्ताव कृषि विद्यापीठ के प्रशासन ने 15 मार्च, 2005 को महसूल सचिव और पुनर्वसन सचिव को सबमिट किया है. इस काम के लिए केवल 6 लाख 90 हजार रुपयों की जरुरत है. अगर इस प्रस्ताव को मंजूरी दी जाती है तो जानवरों के चारे का मसला हल हो सकता है. मैं इस संबंध में यह कहना चाहती हूं कि शेतकरी द्वारा आत्महत्या करने के बाद जहां सरकार उसके परिवार को 1 लाख रुपये की मदद देने की बात करती हैं, वहां अगर सरकार 6 लाख 90 हजार रुपये का प्रावधान कृषि विद्यापीठ के लिए करें तो परभणी जिले के 440 दुष्काल ग्रस्त गांवों का मसला हल हो सकता है. इसलिए सरकार से मैं अनुरोध करती हूं कि परभणी के कृषि विद्यापीठ ने जो प्रस्ताव भेजा है, उस काम के लिए धनराशि का प्रावधान किया जाए. मैं इस अवसर पर यह कहना चाहती हूं कि यह उपाययोजना भी कोई लांग टर्म हल नहीं है. दुष्काल के संदर्भ में जब हम चर्चा करते हें तब हमें एक बात की ओर ध्यान केंन्द्रित करने की जरुरत है, वह यह कि इसका हल केवल पानी और पानी ही है. इसके अलावा दूसरा कोई आल्टरनेटिव नहीं है. लेकिन जिस तेजी से वाटर लेवल नीचे जा रहा है और जंगलो की अवैध कटाई हो रही है, उसे देखते हुए आने वाले दिनों में पानी की समस्या और भी गंभीर होने वाली है. आने वाले इस भयानक संकट का मुकाबला करने के लिए एक और लोक जाग्रति और दूसरी ओर वाटर लेवल बढ़ाने के लिए पर्याप्त आर्थिक प्रावधान करना अब अनिवार्य हो चुका है. यह हमें फौरन करना चाहिए. खास तौर से वन विभाग के लिए जो निधि दिया जाता है, उसका आउटले बढाया जाए, क्योंकि उसके सिवा पानी का लेवल बढ़ना मुश्किल है. अगर इस दिशा में समय पर कदम नहीं उठाए गए तो भविष्य में कदम कदम पर हमें दुष्काल का सामना करना पड़ेग. मैं यह चिंता प्रकट करते हुए सदन से अनुरोध करती हूं कि इस ओर गौर करें.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ SBT/

11:55

श्रीमती फौजीया खान.....

सभापति महोदय, हमारा किसान और हमारे देश के ग्रामीण भाग में बसने वाला नागरिक अहसान कभी भूलता नहीं है क्योंकि हमारी संस्कृति ग्रामीण भाग में बसती है.

टूटे उजड़े हुए लोगों में वफ़ा के मोती,
यह ख़ज़ाने तुझे मुमकिन है खराबों में मिलें.

सभापति महोदय, मैं यह बात खास तौर पर मराठवाड़ा और विदर्भ के किसानों के संबंध में कहना चाहती हूं. अंत में मैं यह अनुरोध करती हूं कि मैंने यहां पर जो सुझाव रखें हैं, सरकार उस पर गौर करें. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद.

.....

इसके बाद मा.श्री पतंगराव कदम का भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (सहकार, पुनर्वसन व मदत मंत्री) : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्राच्या अन्य भागामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर चर्चा करण्याकरिता काल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपणाकडे नोटीस दिली होती. आणि आपण दिलेल्या निदेशानुसार आज सकाळी दहा वाजल्यापासून अडीच तासाची अल्पकालीन चर्चा या सभागृहामध्ये सुरु आहे. माझे परमस्नेही माननीय श्री. नितीन गडकरी हे या चर्चेला सुरुवात करणार होते, परंतु काही माननीय सभासद वेळेवर सभागृहामध्ये उपस्थित न राहू शकल्यामुळे सभागृहाचे कामकाज सव्वा दहा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. माझ्या दृष्टीने तो विषय महत्वाचा नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये राजकारणावर अधिक बोलत बोलत दुष्काळासंबंधी आपली मते प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला. ते सातत्याने सांगत होते की, मराठवाडा आणि विदर्भाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे व पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने फार मोठया प्रमाणात खर्च केला आहे. माननीय राज्यपालांकडून 1500 कोटी रुपये आणले, केंद्र सरकारकडून 1500 कोटी रुपये आणले, आणखी कुणाकडून आणले असे मिळून 5 हजार कोटी रुपये खर्च केले असे ते म्हणाले. दुष्काळ हा विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये वेगवेगळा आहे असे नाही तर दुष्काळ हा दुष्काळ असतो. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेता एकाला एक वागणूक आणि दुसऱ्याला दुसरी वागणूक अशाप्रकारची भूमिका राज्य सरकार घेत नाही, व कधी घेतलेली नाही. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी 5 हजार कोटींची भाषा वापरली, वस्तुस्थिती तशी नाही. त्यावेळच्या सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या कानावर दुष्काळी परिस्थितीची माहिती गेल्यानंतर त्यांनी मला दुष्काळी भागातील परिस्थिती पहावयाची आहे असे म्हणून स्वत:हून दौरा काढला. दौऱ्यामध्ये पहाणी केल्यानंतर त्यांनी स्वत:हून श्री. केरकर यांना पत्र लिहिले व एल.आय.सी. कडून 1500 कोटी रुपयांचे कर्ज मिळविले. तसेच, हे पैसे टंचाईच्या भागामध्ये खर्च करुन ती कामे सहा महिन्यात पूर्ण होतील यासाठीच वापरले पाहिजेत अशी त्यांनी अट घातली. त्या काळात केंद्र सरकारकडून पैसे मिळाले, त्यामध्ये एन.सी.एफ. कडून 2003-2004 मध्ये 77 कोटी मिळाले. 2004-2005 मध्ये 165 व 36 कोटी असे मिळून 201 कोटी मिळाले. 1500 कोटी केंद्राकडून मिळाले नाहीत....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये दिले गेलेले उत्तर आहे. सभागृहामध्ये सांगितलेल्या माहितीच्या आधारावर मी सांगितले आहे. केंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सरकारकडून दुष्काळा करिता धनधान्याच्या स्वरुपात मदत मिळाली, ती त्या किंमतीच्या आधारावर मिळाली...

डॉ. पतंगराव कदम : पैसे किती मिळाले ते मी आपल्याला सांगितले. आपण 1500 कोटी रुपयांचा उल्लेख केला म्हणून मी त्या मुद्दयापुरते सांगितले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये लागोपाठ गेली चार वर्षे दुष्काळ पडला. त्याठिकाणी रोजगार हमी योजनेच्या कामावर 2 हजार, 5 हजार मजूर काम करायचे त्याठिकाणी आज 50 हजार ते 1 लाखापर्यंत मजुरांची संख्या वाढली आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

सभापती महोदय, जनावरांच्या चा-याचा प्रश्न निर्माण झाला. रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे देण्याचा प्रश्न निर्माण झाला आणि त्यादृष्टीकोनातून शासनाने कार्यवाही केली. जनावरांच्या चा-याच्या बाबतीत स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था पुढे आल्या. श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : मंत्र्यांच्या.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कलेक्टर्सनां अधिकार देऊन. मंत्र्यांच्या कोणत्या संस्था ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राष्ट्रवादीच्या कोणाकोणाला दिले याची आम्हाला यादी द्या.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, कोणाला देण्याचा प्रश्न नाही. जे-जे पुढे आले. तुमच्यापैकी पुढे आले, त्यांनाही परवानगी देऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि मंत्री यांना चारा छावण्या दिल्या आहेत. मी हे अधिकृतपणे बोलतो.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याठिकाणी अतिशय महत्वाची चर्चा सुरु आहे. येथे राजकारणावर फार बोलू नये. आपण नंतर चर्चा करुन निर्णय घेऊ. सभापती महोदय, चा-याची मागणी आल्यानंतर कलेक्टर्सनां अधिकार दिले. चा-याची एवढी भयानक टंचाई निर्माण झाली की, डहाणू आणि इतर सर्व भागातून रेल्वेने चारा आणावा लागला. अशी गंभीर, भयावह परिस्थिती सतत गेल्या चार वर्षामध्ये पश्चिम महाराष्ट्रात झाली. मी सुरुवातीला सांगितले की, दुष्काळाचे राजकारण आणि माणसाच्या जीवनाशी खेळण्याचे काम या शासनाकडून होणार नाही. म्हणून शासनाने माझ्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची सब कमिटी नेमली आणि दर मंगळवारी त्याची बैठक होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ते जुने झाले. आम्ही 2004-2005 मधील दुष्काळावर चर्चा करीत आहोत.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याठिकाणी चर्चा करताना सांगितले की, पश्चिम महाराष्ट्राला वेगळा न्याय आणि विदर्भाला वेगळा न्याय दिला जातो.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सांगतो, ते सन्माननीय सदस्यांनी शांतपणे

. . . .एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

ऐकून घ्यावे. तुम्ही बरोबर, चुकीची अशी कसलीही माहिती देत असताना मी शांतपणे ऐकलेली आहे.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : ऐकायलाच पाहिजे.

डॉ.पतंगराव कदम : तसे तुम्ही माझे उत्तर ऐकावे. याठिकाणी कामाच्या संदर्भात चर्चा झाली की, कामे सुरु नाहीत, मजूरांना काम नाही. शेवटच्या दहा मिनिटांमध्ये माननीय रोजगार हमी मंत्री यासंबंधात उत्तर देणार आहेत. पण अमरावती मध्ये 2025 रोजगार हमी योजनेची कामे सुरु आहेत आणि तेथे 69,722 मजूर आहेत. नंतर यासंबंधात माननीय मंत्री महोदय सविस्तरपणे सांगणारच आहेत.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : ते उत्तर देणार आहेत ना ?

डॉ.पतंगराव कदम : होय.

श्री.दिवाकर रावते(खाली बसून) : मग तुम्ही मदतीबद्दल सांगावे.

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेबांनी मदत कार्याबद्दल जे सांगितले, त्याबाबत सांगणार आहात की नाही ?

डॉ.पतंगराव कदम : जरा. थांबा, दम धरा. सर्व उत्तर मिळेल. नागपूर विभागामध्ये 1467 कामे सुरु आहेत आणि तेथे 1,05,617 मजूर आहेत.

. श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, वेळ कमी आहे. माननीय डॉ.पतंगराव कदम हे सहकार मंत्री आहेत. 12044 गावांमध्ये दुष्काळ जाहीर झाला. अशा वेळी या भागामध्ये स्थगिती कधी दिली ? किती निधी दिला ? याची माहिती द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, त्याच्या स्टॅण्डींग ऑर्डर आहेत की, सर्व ठिकाणी स्थगिती दिलेली आहे. दुष्काळी भागातील कर्जाची स्थगिती . . . .

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम हे माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांचे उत्तर देत आहेत. मी मघाशी आमच्या भागातील माहिती दिली. जेथे 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे, त्याठिकाणी कापसाच्या क्षेत्रामध्ये कापसाचे पैसे कापलेले आहेत. एकाही ठिकाणी स्थगिती दिलेली नाही. तुम्ही सहकार मंत्री आहात.

. . . .एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : हे कोणते तालुके आहेत, ते सांगावे.

डॉ.पतंगराव कदम : सबंध महाराष्ट्रात जेथे 50 टक्क्याच्या खाली आणेवारी आहे, तेथे स्थगिती दिलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, कुठेही स्थगिती दिलेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडे माहिती नाही.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माहिती आहे म्हणून सांगत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : मी तुम्हाला माहिती देतो. माझ्या तालुक्यामध्ये कापूस पिकविणा-या शेतक-यांची त्याठिकाणी पन्नास टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असतांना देखील सगळयांच्या कापसाच्या पैशाची वसुली केली गेली. कुठेही सहकारी बँकानी,जिल्हा बँकानी वसुलीला स्थगिती दिलेली नाही. आता भूविकास बँकानी तर 46 गावातील वसुलीची ऑर्डर काढली आहे. आणि आपण स्थगिती दिली म्हणता.?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या सभागृहात दुष्काळावरील चर्चा उपस्थित केलेली आहे. त्या चर्चेमध्ये भाग घेतांना मराठवाडा आणि विदर्भातील जिल्हयांची नांवे सांगितली होती. नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय हर्षवर्धन पाटील उत्तर द्यायला उभे राहिले होते. त्यावेळेला आम्ही मालेगाव, यवतमाळ या भागातील तालुके सांगितले होते. त्यावेळेला श्री. हर्षवर्धन पाटील यांनी असे सांगितले होते की, या तालुक्यांमध्ये उद्या कार्यवाही झालेली असेल. सभापती महोदय, मंत्रिमहोदय, डॉ. पतंगराव कदम हे काल छाती फोडून सांगत होते.या शासनाचे गणित काय आहे,हे मला काही कळत नाही. जिथे 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असते, जी गावे टंचाईग्रस्त जाहीर होतात, त्या गावामध्ये महसुलच्या माध्यमातून लिलाव थांबतात, कर्जाची वसुली थांबते, सावकारी वसुली थांबते, तुम्ही असेही सांगितले की, त्या गावामधील हर्राशी आम्ही आता बंद करु.

डॉ. पतंगराव कदम : आपण माझा वेळ घेऊ नका. यासंबंधीची सगळी उत्तरे मी देतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये त्या गावांना आणि तालुक्यांना केलेल्या मदतीचे उल्लेख आले पाहिजेत. कारण मी माझ्या भाषणात असे म्हणालो आहे की, मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये थोडी जरी चूक झाली तरी आम्ही हक्कभंग आणल्या शिवाय राहणार नाही. म्हणून आम्हाला मदतीचा तपशील सांगावा. येथे कापसाचा काय संबंध आहे?

डॉ. पतंगराव कदम : हा निर्णय संबंध महाराष्ट्रासाठी घेतलेला आहे. ज्या ठिकाणी 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे, तेथे या सहकारी बँन्केच्या कर्ज वसुलीला स्थगिती दिलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : स्थगितीचे आदेश कधी निघाले?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाच्या निघालेल्या आदेशामध्ये औरंगाबादची 1336 गावे होती. ती प्रत्येक जिल्हयातील 50 पैशापेक्षा कमी आणेवारीची गावे मी आपल्याला वाचून दाखवितो. जालना-5, बीड-37, उस्मानाबाद-92, लातूर-333, परभणी-440,नांदेड-42,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

हिंगोली 329, नागपूर-846, वर्धा-429, भंडारा 799, चंद्रपूर-455, गडचिरोली 687, गांदिया-901, अमरावती-1981,अकोला-999 , वाशिम-662,यवतमाळ 1635 बुलढाणा 1048, अध्यक्ष महाराज, या कुठल्याही गावात कर्ज वसुलीला स्थगिती दिली गेली नाही हे मी वचनपूर्वक सांगतो. हे सांगत आहेत की, स्थगिती आदेश दिलेले आहेत. दुष्काळी भागात कर्जाची वसुली सुरु आहे. जप्त्या सुरु आहेत,कारवाई सुरु आहे. कर्जाच्या वसुलीला कुठलीही स्थगिती दिलेली नाही. कापूस उत्पादकांना शासनाने पैसे द्यावयाचे होते. मंत्रिमहोदयांनी रेकॉर्डवर सांगितले होते की, या गावातील कर्ज वसुलीला स्थगिती दिली जाईल आणि ज्यांच्या कडून कर्ज वसुली केली आहे त्यांना पैसे परत दिले जातील. मी जबाबदारीने सांगतो. एकाही गावात पैसे वापस दिले गेले नाहीत. सगळया ठिकाणी कारवाई सुरु आहे. सभापती महोदय, हा कार्यक्रम आहे काय? काहीही कारवाई सुरु नाही. या गावांमध्ये आता काय सुरु आहे ते मंत्रिमहोदयांनी आता सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : हा स्टँन्डीग आदेश आहे. ज्या ठिकाणी अशी वसुली केली जाईल त्यांची तपासणी करुन त्यांच्यावर कारवाई करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एकाही ठिकाणी ही स्थगिती सुरु नाही. सरकारचे स्ट्रॅन्डीग आदेश असतात काय?

डॉ. पतंगराव कदम : ज्या ठिकाणी दुष्काळ आहे त्याठिकाणी कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिलेली आहे. ज्या ठिकाणी हा कर्जवसुलीचा आदेश पाळला गेला नसेल. . .

(काही सदस्य वेलमध्ये येऊन बोलतात.)

डॉ. पतंगराव कदम : कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : हे आदेश कधी काढले ते सांगा?

श्री. नितीन गडकरी : कोणत्या दिवशी हा कर्ज वसुलीच्या स्थगितीचा आदेश काढला ते सांगा?

श्री. विनय कोरे (बसून) : तो स्थायी आदेश आहे.

श्री. नितीन गडकरी :स्थायी आदेश असतो काय? पाचशे शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे. त्यांच्या कुटुंबियांना शासनाने एक पैशाची सुध्दा मदत केलेली नाही. सभापती महोदय, ही गावांची यादी मी आपल्याकडे देतो. (गावांची यादी सभापतीमहोदयांकडे पाठविण्यात येते.)

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी ज्यावेळी भाषण करीत होतो त्यावेळेला माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक सांगत होतो की, तुम्ही दुष्काळी भागाकरिता जे आदेश काढले ते आम्हाला प्राप्त झाले पाहिजेत. तुम्ही ते गावासहीत सांगा अशी त्यांना विनंती केली होती. ज्यावेळी व्याज माफी विषयी तुम्ही जाहीर केलेले आहे तर कोणत्या भागामध्ये, कधी व्याज माफ केले ते सांगा. तुम्ही जाहीर केलेले नाही असे आम्ही अधिकृतपणे सांगत आहोत. व्याज माफ केले त्याचे आदेश कधी काढले ते सांगा. दुष्काळग्रस्त भागात टंचाई जाहीर केल्यानंतर टंचाई जाहीर केल्याचे आदेश काढले काय ते सांगावे. आम्हाला तारखा सांगा. स्थायी आदेश आहेत, ते कधी काढलेले आहेत ? ते आदेश अंमलात असतात असे सांगत आहेत. असे कधी होते काय ? स्थायी आदेश आहेत असे ते म्हणाले. ही सांगण्याची पध्दत आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : हे चालूच असते असे सांगण्याने सरकार चालते काय ?

श्री. दिवाकर रावते : शेतकऱ्यांच्या भावनांची ही टिंगलटवाळी आहे.

श्री. नितीन गडकरी : एखादा मंत्री असता तर त्याने सर्व गावांच्या बाबतीत सहकार विभागाकडून सगळया बँकाना स्थगिती देण्याचे आदेश काढले असते आणि सांगितले असते की, 50 टक्क्याच्या आत आणेवारी असलेली ही गावे आहेत, त्यांची काळजी घ्या, त्या ठिकाणी वसुली होता कामा नये. त्यांनी आदेश काढलेले नाहीत आणि स्थायी आदेश आहेत असे सांगत आहेत. मागच्या वेळी पश्चिम महाराष्ट्रामध्ये कर्ज वसुलीकरिता स्थगितीचे आदेश काढले. त्या ठिकाणी आदेश काढले परंतु या ठिकाणी आदेश का काढले नाहीत ?

डॉ. पतंगराव कदम : जे आदेश काढलेले आहेत ते महाराष्ट्रातील दुष्काळी भागाकरिता काढलेले आहेत. तुमच्याकडे वसुली केली असेल तर त्याची चौकशी करुन कारवाई करु.

श्री. नितीन गडकरी : तुमचा एकही आदेश पाळला गेला नाही. कापसाचे पैसे कापले गेले.

डॉ. पतंगराव कदम : तुम्ही याची यादी द्या.

श्री. नितीन गडकरी : तुमच्या स्थगिती आदेशाची एक टक्का सुध्दा अंमलबजावणी झाली नाही. कापसाचे पैसे कापले. सगळयांच्या जप्त्या सुरु आहेत. भूविकास बँकेचे अधिकारी जप्त्या करीत आहेत, वसुली करीत आहेत. सगळया ठिकाणी हे सर्रास सुरु आहे. ते असे म्हणतात की, 50 टक्केपेक्षा कमी आणेवारी असलेले तालुके, गावे आहत त्या ठिकाणी हे ताबडतोब स्थगित करा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी .....

असे स्पष्ट आदेश आमच्या जिल्हयाला, तालुक्याला शासनाकडून मिळालेलेच नाहीत. यांनी आदेश काढलेलेच नाहीत. माननीय मंत्रिमहोदय स्थायी आदेश आहेत असे सांगत आहेत. हा मनोरंजनाचा कार्यक्रम आहे काय ? सरकारी अधिकारी यांच्या आदेशाशिवाय काम करणार आहेत काय ? 500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांच्या घरातील भांडीकुंडी बाहेर काढून लिलाव सुरु आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या ठिकाणी .....

श्री. नितीन गडकरी : आपण आदेश काढले आहेत काय ? आदेश का काढले नाहीत ?

श्री. दिवाकर रावते : आपण माननीय मंत्रिमहोदयांना निदेश द्यावेत.

उपसभापती : माननीय मंत्रिमहोदयांना स्पष्टीकरण करु द्या. त्यानंतर समाधान झाले नाही तर मी निदेश देतो.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, कर्जाच्या बाबतीमध्ये मी सांगितले की,...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. महसूल मंत्री म्हणून या ठिकाणी येण्याची माननीय मुख्यमंत्र्यांची जबाबदारी होती. या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत. आम्ही रेव्हेन्यूचा प्रश्न मांडला. माननीय महसूल मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. माननीय राज्यमंत्री उपस्थित नाहीत. त्यांचा रिपोर्ट यांना माहीत नाही. या ठिकाणी आपल्या सभागृहाच्या सदस्यांव्यतिरिक्त बाकीचे अदृश्य असतात. आपल्याला ते दिसत नसतात. पण संवेदनशील सरकार आपल्या सचिवांना सांगते की, हा महत्वाचा प्रश्न आहे, तुम्ही सभागृहात जा आणि ऐका. तेथील माहिती घ्या. रेव्हेन्यूचे आदेश काढणारे जे आहेत ते पलीकडे असतात. ते तुमच्या हातामध्ये नाही. तुम्ही या ठिकाणी उगीच तोफेच्या तोंडी आला आहात. तुम्ही पत्र लिहिले नाही एवढाच तुमचा गुन्हा आहे. हे रेव्हेन्यू विभागाकडून कोऑर्डीनेट करावयास पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे रेव्हेन्यू खाते आहे. त्यांनी याबाबतीत अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात ताबडतोबीने आदेश काढणे आणि सूचना देणे हे त्यांचे काम आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांना मी कशाला दोष देऊ ? त्यांनी सांगितल्यावर अधिकारी त्यांचे एकत नाहीत. त्यांनी आदेश काढले. याबाबत त्यांनी सभागृहात सांगिले. पण त्यांच्या आदेशाला अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखविली. जिल्हाधिकारी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. नितीन गडकरी .....

एस.डी.ओ., बी.डी.ओ. हे सगळे रेव्हेन्यू खात्याच्या अंतर्गत काम करतात. ते खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. तुम्ही त्यांच्या वतीने काहीही बोलू शकत नाही. तुमचे बोलणे त्यांच्यावर बंधनकारक सुध्दा नाही. ते ऐकत नाहीत. मी आपल्याला संवेदनशील प्रश्न विचारतो. या सभागृहामध्ये एवढया महत्वाच्या विषयावर चर्चा करीत असताना आमच्या भावना काय आहेत, आमच्या व्यथा काय आहेत हे ऐकण्यासाठी महसूल खात्याचे सचिव हजर नाहीत. तेच पॉलिसीमेकर आहेत. पुढे काय करावयाचे हे तेच सांगणार आहेत. आजपर्यन्त आम्ही हे पाहत आहोत की, ज्यावेळी विधानमंडळामध्ये संवेदनशील विषयावर चर्चा होते त्यावेळी उच्चस्तरीय सचिव या ठिकाणी उपस्थित असतात. या ठिकाणी अवर सचिव, डेस्क ऑफीसर यांना पाठवितात. पुन्हा तुमची नोट गेल्यावर ते निगेटीव्ह करणार. आम्ही या ठिकाणी गावे सांगतो, आकडेवारी देतो, तारखा देतो, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे सांगतो. ते ऐकावयास कोणी उपस्थित नाही. बोलायला कोणी उपस्थित नाही. उत्तर देण्यासाठी सुध्दा कोणी उपस्थित नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

महाराष्ट्रातील 12 हजार गावांचा जीवनमरणाचा प्रश्न आहे परंतु कोणी ऐकत नाही. मा.पतंगरावजी कदम यांच्या मदतकार्य विभागाचा काही संबंध नाही. त्यामुळे आम्ही काय बोलावे ? सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. ते म्हणतात की, स्थायी आदेश आहेत. हा त्यांचा दोष नाही, मा.मंत्रिमहोदय, तुम्ही मंत्रिमंडळाच्या उपसमितीमध्ये 5 निर्णय करावयास पाहिजे होते. त्या निर्णयावर मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची गरज नाही, कारण त्यासंबंधी उपसमितीला अधिकार होते. त्याच्यावर मा.मुख्यमंत्र्यांनी सही करावयास पाहिजे होती आणि तुम्ही प्रत्येकाने स्पेपिसिक तुमच्या खात्याला लिहिले पाहिजे होते की, जिल्हयामध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे तेथे वसुली स्थगित करा, परीक्षा फॉर्मची फी भरा, चा-याची व्यवस्था करा, रोजगार हमी योजनेची कामे सुरु करा, त्याचे मॉनेटरिंग करा, परंतु यापैकी काही झाले नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये काम चांगले केले त्याबाबत मी तुम्हाला दोष देत नाही आणि तसा उल्लेख करणे बरोबर नाही. तुमच्याकडे राज्यपाल महोदय आले, तुमचा तो भाग आहे, तुम्ही केले. परंतु तुम्ही संपूर्ण महाराष्ट्राचे नेते आहात, तुम्ही केवळ सांगली जिल्हयाचे मंत्री नाही. महाराष्ट्राचे भावी नेते म्हणून महाराष्ट्राची जनता आपल्याकडे पाहते आणि विदर्भातील जनता सुध्दा पाहते. तुम्ही मात्र अशावेळी आम्हाला मदत करीत नाही. तुम्ही मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष होता. तुमच्याकडे मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे मिनिट्स आहेत. ते सगळया विभागाकडे पाठविले असतील आणि तुमच्या ऑर्डर्सवर मा.मुख्यमंत्र्यांचे एन्डॉर्समेंट काय आहे त्याची सभागृहाला माहिती द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, दिनांक 19.7.2004 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या उपसमितीमध्ये निर्णय झालेले आहेत. मा.मुख्यमंत्री आणि आम्ही अमरावती व विदर्भामध्ये गेलो. त्यावेळी 24.8.2004 रोजी शासनाने ज्या तालुक्यात 75 टक्क्यापेक्षा कमी पर्जन्यमान झालेले आहे, अल्प व अत्यल्प पर्जन्यमान झालेले आहे त्यांच्या नुकसानीच्या आधारावर 1 हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे पिकांच्या नुकसानीचा सर्व्हे करण्यात आला व 8.12.2004 रोजी शासनाने 83 कोटी रुपये मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यापैकी 40 कोटी मिळाले आहेत आणि उर्वरित 40 कोटी रुपये देण्याचे काम चालू आहे. दिनांक 8.12.04 रोजी विदर्भ, मराठवाडयाची परिस्थिती पाहता अंतिम परिस्थितीची वाट न पाहता हंगामी पैसेवारीच्या आधारावर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

9 हजारापेक्षा जास्त गावांमध्ये टंचाई जाहीर करण्याचा निर्णय घेतला. दि. 9.12.2004 च्या जी.आर.नुसार रोजगार हमी योजनेचे सर्व निकष शिथिल करण्यात आले आहेत. पाणीपुरवठयासाठी...

श्री.दिवाकर रावते : सभापती माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा.मंत्रिमहोदय उपसमितीच्या मिनिट्सचे वाचन करीत आहेत. ते वाचत असताना त्यातील गंभीर मुद्दा काय आहे ते सांगतो. आणेवारी काढण्याची जी प्रचलित पध्दत आहे ती पूर्णपणे डावलून विदर्भ आणि मराठवाड्यातील आणेवारीचा बट्टयाबोळ करण्याची काळजी घेतली आहे. 75 टक्के पर्जन्यमान हे कोठून काढले ? 75 टक्क्याचे हे गणित कोठून काढले ? महसूल विभागामध्ये अशाप्रकारे आणेवारी काढण्याची पध्दत नाही.

डॉ.पतंगराव कदम : मा.सदस्य विषयच समजून घेत नाहीत. शेतक-यांच्या नुकसानीच्या आधारावर त्यांना मदत करण्यासाठी आणेवारी काढली आहे आणि ती फायनल नव्हे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. तुमची फायनल पैसेवारी संपलेली आहे.

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.नितीन गडकरी : उपसभापती महोदयांकडे मी प्रत दिलेली आहे. त्याप्रमाणे सहकार मंत्री म्हणून दुष्काळग्रस्त सर्व भागासाठी कर्ज वसुलीच्या स्थगितीचे आदेश का काढले नाही ?

श्री.दिवाकर रावते : 75 टक्क्यापेक्षा कमी पर्जन्यमानानुसार आणेवारी काढली जात नाही.

(विरोधी पक्षातील काही मा.सदस्य उभे राहून बोलत असतात.)

डॉ.पतंगराव कदम : ती आणेवारी नाही. सुरुवातीला जी मदत करावयाची असते त्यासाठी निकष लावले होते.

श्री.नितीन गडकरी : ते संपल्यानंतर जी.आर.काढला, तुम्ही आदेश काढले, हे पत्र मी दाखविले आहे, 12 हजार गावे तुम्ही काढली आहेत, 50 टक्के कमी आणेवारी काढून तुम्ही जाहीर केले आहे.

उपसभापती : मा.मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर मा.सदस्यांना प्रश्न विचारावयाचे असतील तर प्रश्न विचारु शकतात.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सहकार मंत्री म्हणून या तालुक्यामध्ये सर्व प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांच्या कर्ज वसुलीला का स्थगिती दिली नाही ? दिनांक 15 फेब्रुवारी, 2005 पर्यंत हे आदेश निघाले नाही. तेथे जप्त्या सुरु आहेत. तुमची जेवढी जबाबदारी आहे ते आपण सांगावे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...

ते तुम्ही सांगा. परंतु येथे काहीच सांगितले जात नाही. अजून विचार सुरु आहे, सेमी फायनयल आहे, फायनल व्हायचे आहे, असेच सांगितले जात आहे.

श्री. दिवाकर रावते : आता जून महिन्यातील आकडेवारी सांगितली जात आहे.

डॉ. पतंगराव कदम : ती मदतीच्या संदर्भात आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण सरकारमध्ये आहात ना ? सरकारने आपली जबाबदारी पार पाडायला पाहिजे. 2005 सालात 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेली गावे निश्चित केलीत. त्यासंदर्भात आदेश काढलेले नाहीत असा आमचा आक्षेप आहे. जुने काही तरी केले, ते आम्हाला कशाला सांगता. पावसाची 75 टक्के सरासरी आहे हे सांगण्याची काय आवश्यकता आहे ? या संदर्भात आपण केव्हा आदेश काढले ते सांगा.

श्री. हर्षवर्धन पाटील : 8 डिसेंबर 2004ला पैसेवारीची वाट न पाहता सुमारे 9000 गावे टंचाईग्रस्त म्हणून आपण जाहीर केली. मा. विरोधी पक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे 15 फेब्रुवारीला शासनाचे आदेश आले. अंतिम पैसेवारी जाहीर झाल्यानंतर ते आदेश आले. ती गावे 12034 आहेत. जेव्हा आपण टंचाई घोषित करतो त्यावेळी धोरणात्मक निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफी करणे, टंचाईग्रस्त भागातील विहिरींची कामे करणे, विहिरी खोल करणे...

श्री. नितीन गडकरी : हे लागू होत नाही. जिल्हाधिका-यांनी पपत्र भरावयास पाहिजे. परंतु ते पपत्र भरले जात नाही. ज्या अर्थी शासन निर्णय क्रमांक अेआर/207 गट क्रमांक 216 दि. 15 फेब्रुवरी 2005. सन 2004-2005या खरीप हंगामातील ज्या गावातील आणेवारी 50 पैशापेक्षा कमी आहे ती गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करावयाची आहे. त्या अर्थी या अनुषंगाने मी, (येथे नाव लिहायचे), जिल्हाधिकारी, जिल्हा... ,खालील नमूद केलेल्या तालुक्याच्या नावासमोर दर्शविलेल्या गावात टंचाई परिस्थिती .....

श्री. हषवर्धन पाटील : ते सर्व बरोबर आहे. ही 12034 गावांच्या संदर्भातील सर्व प्रोसेस आहे.

श्री. नितीन गडकरी : ती प्रोसेस झालेली नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

श्री. हर्षवर्धन पाटील : ज्या गवांची आणेवारी 50 पैशाच्या खाली आलेली आहे अशा 12034 गावांची नावे शासनाने 15 फेब्रुवारीला ऑफिशिअली डिक्लेअर केली. तसेच शेतक-यांना शेतसारा माफी आणि अन्य सवलती जाहीर करण्याण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. वास्तविक पाहता ह्या स्टँडिंग ऑर्डर्स आहेत. आमच्या विभागामार्फत संबंधित विभागाला, जिल्हाधिका-यांना तसेच बॅन्काना या स्टँडिंग ऑर्डर्स् जावयास पाहिजेत. त्यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ...(अडथळा)... 15 फेब्रुवारीला ऑफिशिअल डिसीजन झालेला आहे. म्हणून यासंदर्भात निश्चितपणाने कारवाई करण्यात येईल. अशा पध्दतीने जर कोणी स्टॅडिंग ऑर्डर्स्चा अवमान करीत असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे.....(अडथळा)...नागपूरच्या अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या कापसाचे चुकारे देण्यासंदर्भात मी बोललो होतो. मा. विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा यासंदर्भात मुद्दा उपस्थित केलेला होता. त्यामध्ये नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँक आणि वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँका या दोन बँकाचा उल्लेख मी केलेला होता. त्या बँकांचीही माहिती मी घेतलेली होती. ज्या गावांची आणेवारी 50 पैशापेक्षा खाली नसेल अशा गावांची वसुली होईल. कारण टंचाईसदृश्य परिस्थितीची 9 हजार गावे आपण जाहीर केली होती. ..(अडथळा)... ती सुध्दा चौकशी केली जाईल. मला असे वाटते की स्थायी आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात आपण 15 फेब्रुवारीला शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. ..(अडथळा).. यामध्ये सक्तीची वसुली करु नये. शेतसारा माफीचा निर्णय....(अडथळा)... स्थायी आदेशा प्रमाणे 15 फेब्रुवारीला संबंधित विभागाला कळविण्यात आलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

उप सभापती : सभागृहाची वेळ 12.30 वाजेपर्यन्त होती. सभागृहाची वेळ अजून 15 मिनिटांसाठी वाढवावयाची काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण वेळ वाढवावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय असल्यामुळे ही चर्चा पुन्हा सायंकाळी चालू ठेवावी..

उप सभापती : सभागृहाची वेळ मी 15 मिनिटांसाठी वाढवित आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय सन्माननीय श्री. हर्षवर्धन पाटील यांना सांगू इच्छितो की, आपल्या आदेशाचे पालन केले गेले नाही. सभागृहात दुष्काळावर चर्चा होत आहे. त्या विभागाशी संबंधीत आय.ए.एस. सचिव आहेत. ते तुमचे आमचे विचार ऐकण्यासाठी या सभागृहात येऊन बसलेले नाहीत. ते कोणी राजे झाले आहेत काय ? ते या ठिकाणी का उपस्थित राहिले नाहीत ? तुम्ही त्यांना विचारा की, तुम्ही का उपस्थित राहिला नाहीत ? महसूल विभाग असेल वा इतर विभाग असतील. ज्या विभागाची चर्चा सभागृहात असेल त्या विभागाचे संबधित अधिकारी असतील त्यांना सभागृहात उपस्थित राहण्यास सांगा. सभागृहात सदस्य जे मुद्दे उपस्थित करतात ते लिहून घ्यावयास सांगा. हे अधिकारी विभागाच्या अवर सचिव, कक्ष अधिकारी यांना सभागृहात उपस्थित रहाण्यास सांगतात. ही सरकारची संवेदनशीलता आहे काय ? माननीय मुख्यमंत्री या चर्चेस उपस्थित नाहीत. संबंधीत विभागाचे सचिव उपस्थित नाहीत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी मान्य करतो की, अशा एका महत्वाच्या चर्चेवर संबंधीत विभागाच्या सचिवांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. परंतु ते उपस्थित राहिलेले नाहीत त्यांचा निश्चितपणे खुलासा मागविण्यात येईल. सभागृहात अतिशय महत्वाची चर्चा सुरु आहे. मी सुध्दा या ठिकाणी पाहिले की, सभागृहात महसूल सचिव उपस्थित नाहीत, सहकार सचिव उपस्थित नाहीत. वास्तविक पाहता या ठिकाणी महत्वाची चर्चा उपस्थित केली गेलेली आहे. त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते. संसदीय कार्य मंत्री म्हणून निश्चितपणे त्यांच्याकडून खुलासा मागितला जाईल. या चर्चेच्या बाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की,या दुष्काळी परिस्थितीत सरकारने कोणकोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत. भविष्यात सरकार काय उपाय योजणार आहे त्याबाबतची मी माहिती सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. आपणा सर्वांना एकत्र येऊन दुष्काळावर मात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

करावयाची आहे. जवळपास 12 हजारापेक्षा अधिक गावे मराठवाडा आणि विदर्भासह दुष्काळात बाधीत झालेली आहेत. त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. ही चर्चा फार महत्वाची आहे. आहे हे मला मान्य आहे. याबाबतीत शासनाची सकारात्मक भूमिका आहे.

श्री. नितीन गडकरी : तुमची सकारात्मक भूमिका आहे. परंतु आपल्या आदेशाचे पालन झालेले नाही त्याच्या बाबतीत माहिती द्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : रोजगार हमी योजनेच्या संदर्भात माननीय श्री. गडकरी साहेबांनी काही मुलभूत प्रश्न उपस्थित केले.

श्री. दिवाकर रावते : शेतक-यांकडे असलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा निर्णय या सरकारने घेतला होता त्यासंदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारचे आदेश काढलेले नाहीत..

श्री. नितीन गडकरी :शेतक-यांकडे असलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्यासंबंधीचे आदेश सरकारने काढले की नाहीत ? याची माहिती आम्हाला सांगा. तुम्ही मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेतला होता की नाही त्याबाबतची माहिती सांगा. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या सरकारच्या निर्णयांची आम्हाला बजावणी करावयाची नाही अशी तरी आम्हाला आपण माहिती द्या. कर्जावरील व्याज माफीचे आदेश काढले की काढले नाही याची माहिती सांगा. तुम्ही या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाला आहे की नाही ते सांगा.

श्री. पांडुरंग फुंडकर : शेतक-यांच्या कापसाच्या देण्यातून कर्जावरील व्याजाचे पैसे कापले गेले त्याचे काय झाले ?

श्री. नितीन गडकरी : रोजगार हमी योजनेची कामे मराठवाडयात आणि विदर्भात काही ठिकाणी सुरु आहेत. रोजगार हमी योजना विभागासंबंधीची आमची तक्रार तीव्र नाही. आमची तक्रार कर्ज वसुलीच्या स्थगितीच्या बाबतीतील आहे. शेतक-यांकडून कर्ज वसुली सर्रास केली गेली. आपण ज्या स्टॅन्डींग ऑर्डरला दिल्या होत्या, त्या स्टॅन्डीग ऑर्डरचा पूर्णपणे धज्जा उडविला. त्या आदेशास केराची टोपली दाखविण्यात आली. सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना श्री. पतंगरावजी आपण निर्णय घेतला होता की, शेतक-यांकडे असलेल्या कर्जावरील व्याज माफ करु. व्याज माफ करण्याचा निर्णय तुम्ही निर्गमीत केला आहे काय ? तुम्ही सहकार मंत्री आहात.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना यासंबंधीचा आदेश तुम्ही का काढला नाही ? या बाबतची आपण आम्हाला माहिती सांगा.

डॉ. पतंगराव कदम : कायम स्वरुपाच्या स्टॅन्डींग ऑर्डर्स नव्हत्या. ज्या 50 टक्क्यांपेक्षा खाली आणेवारी असेल...

श्री. नितीन गडकरी : आपण स्टॅन्डींग ऑर्डर्स काढल्या होत्या त्याचे पालन संबंधित अधिका-यांनी केले नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधी निर्णय घेतला गेला त्यासंबंधीचे आदेश काढावयास पाहिजे होते परंतु ते काढण्यात आले नाहीत. जर आपण कोणत्याही प्रकारचे आदेश काढले नाहीत तर हा प्रश्न कसा सुटणार ?

डॉ. पतंगराव कदम : ज्यांनी स्टँडींग ऑर्डर्स पाळल्या नाहीत त्याची चौकशी करुन कारवाई करतो.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी विदर्भ आणि मराठवाडयातील दुष्काळग्रस्त जनतेची चेष्टा केली जात आहे. जखमेवर मीठ चोळले जात आहे. स्थायी आदेश देण्यात आलेले आहेत असे सांगितले गेले. परंतु सक्तीने कर्जवसूली होत आहे. 500 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. दुष्काळ जाहीर केल्यानंतर मुलांच्या परीक्षेची फी माफी व्हावयाला पाहिजे होती. पिण्याच्या पाण्याची कामे झालेली नाहीत. फक्त रोजगार हमी योजनेमधून थोडीफार कामे सुरु आहेत. ही कामे सोडल्यास बाकी कोणतीही कामे सुरु नाहीत. कर्जावरील व्याज माफीबाबत मंत्रिमंडळासमोर नोट गेली आहे असे सांगितले. परंतु अद्याप व्याज माफीचे आदेश काढलेले नाहीत. नुसत्या स्थायी आदेशाने कामे होत नाहीत. हे आदेश जिल्हाधिका-यांनी रेकॉर्ड तयार करुन सगळया अधिका-यांना द्यावे लागते ते अद्याप दिले गेले नाहीत. हे सरकार दुष्काळाच्या बाबतीत गंभीर नाही. केंद्रात श्री. शरद पवार कृषीमंत्री आहेत. त्यांनी लोकसभेत सांगितले की, महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे एकही पैशाची मागणी केलेली नाही. गेल्यावर्षी पेक्षा अडीच पट दुष्काळ असताना मदत मागण्यासाठी साधे पत्र सुध्दा राज्य सरकारकडून गेले नाही. कॅबिनेट सबकमिटी कशाला हवी आहे ? एक साधे पत्र केंद्र सरकारकडे पाठविले नाही. भयाण दुष्काळ असताना पैसे मागितले नाहीत. कोणतेही आदेश काढले नाहीत. विदर्भ आणि मराठवाडयातील जनतेचा विश्वासघात केला आहे. व्याजमाफीचा निर्णय बदलला. कापसाबाबतचा निर्णय बदलला. दुष्काळी भागातील जनतेची चेष्टा करणा-या सरकारचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात.)

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (पणनमंत्री) : सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून काय उपाययोजना केली जात आहे याबद्दलची माहिती विस्ताराने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात मा. विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी सभात्याग केला. शासनाच्या माध्यमातून प्रामाणिकपणाने माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. रोजगार हमी योजनेच्या संदर्भात आणि मदत व पुनर्वसन विभागाकडे जे स्थायी आदेश आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी होत आहे. दुष्काळामध्ये 4 लाख 20 हजार मजुरांसाठी रोजगार हमी योजनेमधून कामे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. जवळपास 8235 इतकी कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मंजूर केली आहेत. साधारणपणे 26 लाख मजुरांना कामे उपलब्ध होतील एवढी कामे मंजूर केलेली आहेत. कामाबाबत अटी शिथिल केलेल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळी भागासाठी जे नियम शिथिल केले त्यापेक्षा थोडे पुढे जाऊन विदर्भ आणि मराठवाडा विभागासाठी अटी शिथिल केल्या आहेत. मोठया प्रमाणात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामांना मान्यता दिली आहे. संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भ परिसरामध्ये रोजगार हमी योजनेमधून मागेल त्याला कामे आणि ते दोन कि.मी.परिसरामध्ये उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सरकार दुष्काळाच्या बाबतीत पूर्णपणाने जबाबदारीने आणि गांभीर्याने काम करण्याचा प्रयत्न करीत आहे. विरोधाकरिता विरोध आणि राजकारणाकरिता राजकारण करण्याचा हा विषय नाही. दुष्काळी भागातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याच्या बाबतीत सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केलेला आहे. या विषयाच्या बाबतीत सरकार पॉझीटीव्ह आहे आणि दुष्काळी भागातील जनतेला मदत करणार आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, या विषयावरील चर्चेमध्ये सुरुवातीपासून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी एकच मुद्दा ठेवला होता की, पश्चिम महाराष्ट्राला आणि विदर्भाला वेगळा न्याय दिला जातो. परंतु ही वस्तुस्थिती नाही. पश्चिम महाराष्ट्रात गेली चार वर्षे सातत्याने दुष्काळ पडत होता. विदर्भ आणि मराठवाडयातील स्वयंसेवी संस्था याबाबतीत मदत करण्यासाठी पुढे आल्या तर त्यासंदर्भात जिल्हाधिका-यांना निर्देश दिले जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम ...

75 टक्के रक्कमेच्या बाबतीत माननीय सदस्यांनी सुरुवातीला माहिती दिली होती परंतु पश्चिम महाराष्ट्राला अशा प्रकारे पैसे दिलेले नव्हते. फक्त 83 कोटी रुपये खास बाब म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.आज सुध्दा सुरुवातीपासून माननीय सदस्य असे सांगत आहेत की, विदर्भासाठी केन्द्र सरकारकडे मागणी का करण्यात आलीनाही ?याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, जर आपण त्यासाठी मागणी केली आणि केन्द्र सरकारची समिती पहाणी करण्याकरता आली व दुष्काळाची तीव्रता जर त्यांच्या लक्षात आली नाही तर ते सुध्दा फयद्याचे होत नाही. परंतु पुन्हा एकदा केन्द्र सरकारकडे निश्चितपणे मागणी करण्यात येईल.

उप सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा: भरेल.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 40 मिनिटांनी, दुपारी 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली)

नंतर श्री.किल्लेदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी मा.सभापती

पृ.शी. व **मु.शी** . : तोंडी उत्तरे.

राज्यात विशेषत: मुंबई, ठाजे, -वी मुंबई, चंद्रपूर,अमरावती,जाल-ा, अज ोला, वाशिम, रत्-ाजिरी, रायजड, पुजे, सांजली, सातारा, सोलापूर व ज ोल्हापूर या जिल्हयात साथीच्या रोजाची लाजज झाल्याबाबत

(1) * 1957 **श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. रजजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया जा□, श्री. जितेंद्र आव्हाड , श्री विलासराव शिंदे , श्री. वि□द तावडे , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. मधुज र चव्हाज , श्रीमती संजीव□ रायज र** : स-मा-ा-नीय सार्वजनिज आरोज्य व ज ुटुंब ज ल्याज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) राज्यात विशेषत: मुंबई, ठाजे, -वी मुंबई, चंद्रपूर,अमरावती,जाल-ा, अज ोला, वाशिम, रत्-ाजिरी, रायजड, पुजे, सांजली, सातारा, सोलापूर व ज ोल्हापूर या जिल्ह्याच्या ठिज ाजी व जिल्ह्यातील ज ाही तालुक्यात माहे डिसेंबर,2004 ते जा-ेवारी,2005 या ज ालावधीत मलेरिया, ज ॅस्ट्रो,डेंज्यू,लेप्टोस्पायरोसीय,ज ावीळ, अतिसार, विषमज्वर या साथीच्या रोजाची लाजज होऊ-ा अ-ेज जज मृत्यूमुजी पडले आहेत, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, या प्रज रजी शास-ा-े चौज शी ज ेली आहे ज ाय?

(3) चौज शीत ज ाय आढळू-ा आले व त्या-ुसार या साथीच्या रोजांचे नि-र्मुल-ा ज रज्यासाठी शास-ा-े ज ोजती उपाययोज-ा ज ेली वा ज रज्यात येत आहे,

(4) अद्याप ज ोजतीही उपाययोज-ा ज ेली -ासल्यास त्याची ज ारजे ज ाय आहेत ?

श्री.रणजित कांबळे डॉ.विमल मुंदडा यांचेकरिता : (1) हे अंशत: जरे आहे.

साथ उद्रेज होऊ-ा हिवतापामुळे मुंबई येथे 2, चंद्रपूर येथे 1, डेंज्युमुळे पुजे येथे 1 आजि ज ावीळमुळे सोलापूर येथे 1 असे एज ूज 5 रुज्जांचे मृत्यू झालेले आहेत.

(2) होय.

(3) माहे डिसेंबर 2004 ते जा-ेवारी 2005 या ज ालावधीत प्रश-ात -ामूद ज ेलेल्या जिल्हयातील सर्व ज ेत्रात जालीलप्रमाजे साथीच्या रोजाची लाजज व मृत्यू झालेले आहेत.

जि टज ज-य आजारांच्या साथीची माहिती

साथीचे -ाव	साथ संज्या	लाजज			मृत्यू
		उद्रेज स्वरुपात	नि-यमित सर्वेजज	एज ूज	
मलेरिया	4	11	3,917	3,928	3
डेंज्यू	46	201	--	201	1

जलज-य आजारांच्या साथीची माहिती

रोजाचे -ाव	साथ संज्या	लाजज	मृत्यू
ज ॅस्ट्रो	3	108	0
लेप्टोस्पायरोसीस	0	0	0
ज ाविळ	5	340	1
अतिसार	0	0	0
विषमज्वर	0	0	0

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.1957 (पुढे चालू.....

- जलजन्य व जिटजजन्य आजारांचे साथ नियंत्रजासाठी जालीलप्रमाजे उपाययोजना जरज्यात आल्या.
- साथीची माहिती मिळताच वैद्यजीय अधिजाऱ्यांनी आरोज्य जर्मचाऱ्यांसह साथग्रस्त जावांना त्वरीत भेट देऊन रुज्ज सर्वेजज व रुज्जांवर औषधोपचार जेले. रुज्ज सहवासितांना प्रतिबंधात्मज उपचार देज्यात आला.
- पिज्याच्या पाज्यांचे नमुने प्रयोजशाळेत नियमितपजे तपासजीसाठी पाठविज्यात येतात.
- आरोज्य जर्मचाऱ्यांमार्फत साथग्रस्त जावांतून घरोघरी साठविलेल्या पिज्याच्या पाज्याचे क्लोरिन सोल्यूशन वापरुन शुध्दीजरज जरज्यात आले.
- तापाच्या सर्व रुज्जाचे हिवतापासाठी रक्तनमुने जोळा जरुन तपासजीअंती आढळून आलेल्या हिवताप रुज्जांना तातडीने समुळ उपचार जेले.
- निवडज ताप रुज्जांचे रक्तजल नमुने राष्ट्रीय विषाजू, संस्था पुजे येथे डेंजी विषाजू परिजजासाठी पाठविले.
- साथग्रस्त जावात जिटजशास्त्रीय सर्वेजजांतर्जत एडीस डासाची उत्पत्ती स्थाने नष्ट जरज्यात आली.
- हिवताप उद्रेजग्रस्त जावात जिटजनाशजाची घरोघरी फवारजी जेली.
- डेंजी उद्रेजग्रस्त जावात जिटजनाशजाची धुर फवारजी जरज्यात आली.
- शहरी भाजात योज्य डासोत्पत्ती स्थानांवर अळीनाशजांची नियमित आठवडी फवारजी जरज्यात आली व येत आहे.
- ग्रामिज तसेच शहरी भाजात योज्य डासोत्पत्ती स्थांनामध्ये डास अळी भजज जप्पी मासे सोडज्यात आले व येत आहेत.
- राज्यातील जिल्हा रुज्जालय स्तरावर डेंजी रॅपिड डायजॉक्स्टज टेस्ट जिटस चा पुरवठा जरज्यात आला.
- लेप्टोस्पायरोसीसच्या तात्जाळ निदानासाठी निवडज जिल्हयांना रॅपिड डायजोक्स्टज टेस्ट जिटसचा पुरवठा जरज्यात आलेला आहे.
- लेप्टोस्पायरोसीसच्या निक्श्चत निदानासाठी राज्यस्तरावर बी.जे.वैद्यजीय महाविद्यालय, पुजे येथे संदर्भिय प्रयोजशाळा सुरु जरज्यात आली आहे.
- राज्यातील सर्व शासजीय रुज्जालयात साथीच्या रोजाचे उपचारासाठी आवश्यज असलेली सर्व औषधी उपलब्ध जरुन देज्यात आलेली आहेत.
- जेत्रीय अधिजाऱ्यांना राज्यस्तरीय, विभाजीयस्तरीय सभेत तसेच वेळावेळी परिपत्रजाद्वारे मार्जदर्शज सुचना देज्यात आलेल्या आहेत.
- जलजन्य व जिटजजन्य रोजाचे साथ नियंत्रजाबाबत आरोज्य शिजज जनतेला देज्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.1957 (पुढे चालू....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या उत्तरामध्ये साथ उद्रेक होऊन हिवतापामुळे मुंबई येथे 2, या वाक्याच्या पुढे गॅस्ट्रोचे 2 आणि काविळ 16 असे वाचावे. अशीच दुरुस्ती पुढील तक्त्यामध्ये वाचावी. दुरुस्ती केलेल्या उत्तरासह छापल्याप्रमाणे.

श्री.संजय दत्त : राज्यात विशेषत: मुंबईत व उपनगरात डेंगू, गॅस्ट्रो, अतिसार व काविळ या रोगांच्या साथीची लागण मोठ्याप्रमाणात असून, सदर साथीने फेब्रुवारी 2005 अखेरपर्यन्त किती लोकांचे बळी घेतलेले आहे व त्यामध्ये किती बालकांचा समावेश आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की,राज्यात मलेरिया या रोगाविरुध्द आरोग्य संचालनालय आणि जिल्हापरिषअंतर्गत हंगामीस्वरुपात फवारणी कर्मचारी नेमण्यात आले आहेत, केवळ रायगड जिल्ह्यात त्यांची 116 पदे रिक्त आहेत. राज्यभरात तसेच चित्र असून सुमारे 5 हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय ? ती पदे तात्काळ केव्हापर्यन्त भरणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या पश्नाचे उत्तर या साथीने 16 जण मृत्यूमुखी पडलेले आहेत. त्यामध्ये पुरुष 10 आणि स्त्रिया 2 आणि मुले 2 आणि मुली 2 आहेत. रायगड जिल्ह्यातील रिक्त पदाबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला. ही पदे भरण्याची प्रक्रिया चालू आहे. ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

डॉ.दीपक सावंत : मंत्री महोदयांनी फार मोघम स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला अनुसरुन माझा प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये मलेरिया म्हणजेच हिवताप,डेगू समजले जाते. मलेरियाच्या निर्मुलनाचा कार्यक्रम केंद्र सरकारच्यावतीने राबविला जातो. आपल्याकडे मलेरियासाठी पुरेसा औषधपुरवठा आहे,असे शासनाने केंद्र सरकारला पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय ? असे पत्र दिल्यानंतर शासनाने पुन्हा दुसऱ्या एका कंपनीकडून मलेरियाची औषधे बिस्तर पॅकमध्ये खरेदी केलेली आहेत, हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, राज्यात एकूण मलेरियाची किती सँपल्स शासनातर्फे घेतली गेली, त्यातील किती पॉझिटिव्ह आणि किती निगेटिव्ह आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांना औषधांचा किती स्टॉक आहे, याची माहिती हवी आहे काय ?...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

एसकेके)

ता.प्र.क्र.1957 (पुढे चालू....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न मी पुन्हा सांगतो. केंद्र सरकारकडून मलेरियाच्या औषधाचा पुरवठा केंद्र शासनातर्फे केला जातो, ही गोष्ट खरी आहे काय ? असल्यास, शासनाने केंद्र सरकारच्या संबंधित अधिका-यांना पत्र पाठवून आमच्याकडे मलेरियांच्या गोळयांचा म्हणजे क्लोरोक्विनच्या गोळ्यांच्या बिस्तर पॅकचा भरपूर पुरवठा आहे, त्यामुळे आता आम्हाला औषधे नको,असे कळविलेले आहे, त्यानंतर देखील खाजगी औषध कंपनीकडून मलेरियाची औषधे खरेदी केली आहेत, हे खरे आहे काय ? असल्यास, कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, 100 टक्के औषधे ही केंद्र सरकारकडून मिळत नाहीत. 50 टक्के औषधे केंद्र सरकारकडून आणि 50 टक्के राज्य सरकार औषधे पुरविते. सद्य:स्थितीत आमच्याकडे मलेरियाच्या औषधांचा म्हणजे क्विनाईनच्या गोळ्यांच्या औषधांचा भरपूर स्टॉक आहे, आपल्याला पाहिजे तर याबाबतचा ब्रेकअपही देऊ शकतो.

डॉ.दीपक सावंत : भरपूर स्टॉक असेल तर पुन्हा ही औषधे खरेदी का केली ? माझ्याकडे शासनाचे परिपत्रक आहे, ते आपल्याला हवे तर दाखवितो. श्री.गुप्ता या अधिका-यांनी केंद्र सरकारला पत्र पाठवून असे कळविलेले आहे की, आमच्याकडे मलेरियाच्या औषधांचा भरपूर स्टॉक आहे, असे असतांना पुन्हा ती आषधे खाजगी औषध कंपनीकडून खरेदी केलेली आहेत.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1957 ...

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माननीय राज्यमंत्र्यांना सदस्यांचा प्रश्न नीटसा कळलेला नाही असे वाटते. तेव्हा मी त्यांना विचारू इच्छितो की, आपण केंद्र सरकारला असे लिहून कळविले आहे का की, आमच्याकडे भरपूर औषधांचा स्टॉक आहे म्हणून ....

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, माझ्याकडे सध्या याची माहिती नाही. ....

डॉ. दीपक सावंत : अध्या महाराज, एकीकडे हे म्हणतात की, मलेरियाचे रोगी नाहीत, आमच्याकडे पुरेसा औषधाचा स्टॉक आहे तर मग औषधांची खरेदी का करण्यात आली ? याबाबतची माहिती माननीय मंत्र्यांकडे नसेल तर हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा. कारण हा प्रश्न महत्त्वाचा असून ही माहिती येणे आवश्यक आहे.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रश्नावर सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारला तेव्हा माननीय राज्यमंत्री खाली बसून त्यांचेकडे यासंबंधीची फाईल नाही असे म्हणाल्याचे आम्ही ऐकले आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी येथे विचारले आहे की, आपल्याकडे औषधाचा पुरेसा स्टॉक आहे तेव्हा तुमच्याकडून आम्हाला औषधांच्या मदतीची गरज नाही असे आपण केंद्र सरकारला कळविले आहे तर मग त्या औषधांची नंतर खाजगीरित्या खरेदी का केली ? त्यांच्या या प्रश्नासंबंधातील माहिती माननीय राज्यमंत्र्यांकडे नाही तर मग हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.

डॉ. विमल मुंदडा : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या ठिकाणी दोन प्रश्न विचारले आहेत. त्यापैकी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देताना मी सांगू इच्छिते की, 10,33,03 इतकी मलेरियाची सॅम्पल्स गोळा केली होती आणि त्यामध्ये सुमारे 3,389 केसेस पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. त्यानंतर त्यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छिते की, लिस्टरपॅकचा पुरवठा हा केंद्र सरकारकडून केला जातो आणि राज्य सरकारने हे औषध सध्या खरेदी केलेले नाही.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, सध्या खरेदी केलेले नाही तर यापूर्वी केव्हा केलेले होते ? राज्य सरकारकडून 3 लाखाच्या औषधाची खरेदी केली गेली असल्याची कागदपत्रे माझ्याकडे आता उपलब्ध आहेत. अध्यक्ष महाराज, प्रत्येक राज्याला केंद्र सरकारकडून मलेरिया वरील ठराविक औषधे दिले जातात असे असतानाही राज्य सरकारने या औषधाची खरेदी .. 3 लाख रुपयांची औषध खरेदी केलेली आहे ही गोष्ट खरी आहे की नाही ? ..... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, हे खरे आहे की, केंद्र सरकार आपल्याला लीस्टरपॅक देते परंतु आपल्याकडील त्याचा स्टॉक संपल्यामुळे आपण त्याची खरेदी केलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : मग ही खरेदी खाजगी कंपनीकडून का केली गेली ? गुप्ता नावाच्या आपल्या अधिकाऱ्याची त्यावर सही आहे, त्याच्या सहीने ही खरेदी झालेली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी हे लक्षात घ्यावे की, जेव्हा स्टॉक कमी झाला त्यावेळी त्यांनी त्याची खरेदी केली असे मंत्र्यांनी सांगितले आहे. ...

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, मग माझा प्रश्न असा आहे की, म्हणजे मलेरियाचे प्रमाण वाढले होते वा आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी ज्या 'गुप्ता' नावाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख केला आहे ते अधिकारी लेप्रसी संबंधातील आहेत, मलेरिया संबंधातील नाहीत.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, या औषध खरेदीसंबंधातील सर्व पेपर्स माझ्याकडे आहेत. ... माननीय राज्यमंत्री महोदय चुकीची माहिती देऊन दिशाभूल करीत आहेत. वाटल्यास मी ही सारी कागदपत्रे अध्यक्ष महाराज, आपल्याकडे देतो ..

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय स्पेसिफिक असा प्रश्न विचारला आहे. तुमच्याकडे औषधाचा स्टॉक आहे म्हणून तुम्ही केंद्र सरकारकडील औषधे नको म्हणून केंद्र सरकारला सांगितले. आणि त्यानंतर आपल्याकडील स्टॉक कमी पडला म्हणून खाजगी पुरवठादाराकडून ही औषधे का घेतली ? खाजगी पुरवठादाराकडून खरेदी केली गेली असेल तर तसे सांगावे आणि त्या मागील कारणे देखील मंत्र्यांनी सांगावित. नसेल खरेदी केले तर नाही म्हणून सांगावे.

श्री. रणजित कांबळे : अध्यक्ष महाराज, मी अगोदरच सांगितले आहे की, केंद्र सरकारकडून आपल्याला लीस्टरपॅक पाठविले जाते. परंतु आमच्याकडील स्टॉक कमी झाला तेव्हा आपण आरसी करून आणखी औषध खरेदी केले. आरसी प्रमाणेच आमची खरेदी होते.

डॉ. दीपक सावंत : पण केंद्र सरकारकडून आपल्याला औषधे येत असताना ती परत का पाठविली आणि नंतर मग खाजगी पुरवठादाराकडून खरेदी का केली ?

..... जीजी 3 ..

KBS/ MHM/ SBT/ श्री. किल्लेदार नंतर --- 13.05

ता.प्र.क्र. 1957 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : त्यानंतर सहा महिन्यांनी आपण ही औषधे घेतली आहेत ....

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, माझ्याकडे या खरेदीसंबंधातील सारे पेपर्स आहेत ते मी आपल्याकडे पाठवितो.

श्री. अरविंद सावंत : अध्यक्ष महाराज, आपण आता जी माहिती दिलेली आहे. पण काल सांगलीमध्ये गॅस्ट्रोने दोन रूग्ण दगावले आहेत हे खरे आहे काय ? म्हणजे यांचे दुर्लक्ष किती आहे ते पहा. अध्यक्ष महाराज, आज मुंबईमध्ये काविळीसह मलेरियाने देखील माणसे आजारी आहेत. ..

(यानंतर श्री.जाधडे .....एचएच 1 ...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

असे असेल तर आता याबाबत शासन कोणती कडक कार्यवाही करणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रश्न डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 या कालावधीचा विचारलेला आहे. तेव्हा तेवढीच माहिती देण्यात आली आहे. आता माननीय सदस्यांना दुसरी माहिती पाहिजे असेल तर ती देखील आम्ही नंतर देवू.

डॉ. दीपक सावंत : नंतर माहिती आम्हाला कोठे देणार आहांत ? मा. सभापतींच्या दालनात ही माहिती मा. मंत्रिमहोदय देणार आहेत काय ? असे असेल तर आम्ही सभागृहात कशासाठी यावयाचे ?

श्री. रणजित कांबळे : डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 या कालावधीतील ही माहिती आहे. माननीय सदस्यांनी या बाबतचा वेगळा प्रश्न विचारावा. माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवू.

सभापती : डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 या कालावधीतील हा प्रश्न आहे. त्याप्रमाणे शासनाने माहिती दिली आहे. माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर त्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, प्रश्न क्र. 3 च्या उत्तरामध्ये किटकजन्य आणि जलजन्य आजारांची माहिती दिली आहे. यामध्ये जलजन्य आजारांमध्ये काविळीचा उल्लेख आहे. काविळीमुळे एक जण मृत्यू पावला आहे. परंतु या आजाराच्या बाबतीत कोणती उपाययोजना शासन करीत आहे, याची माहिती देण्यात आली नाही. म्हणून मा. मंत्रिमहोदयांनी या बाबतचा खुलासा करावा.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, जलजन्य आजारांममध्ये काविळीमुळे एक जणाचा मृत्यू झाला आहे. त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण व्यवस्थितपणे झाले पाहिजे. त्या ठिकाणी असलेले सर्व पाणी जर अशुध्द असेल तर ते शुध्द करुन घेतले पाहिजे. तसेच वैयक्तिक स्वच्छता ठेवली पाहिजे. अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, प्रश्न क्र. 3 च्या उत्तरामध्ये ज्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, त्याची माहिती दिली आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयात साथीच्या रोगाचे उपचारासाठी आवश्यक असलेली सर्व औषधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. " सभापती महोदय, आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नाहीत, अशी माझी माहिती आहे. फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी जी सिव्हील हॉस्पीटल असतात, त्या ठिकाणी औषधे उपलब्ध असतात. तेव्हा या बाबतचा मा. मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. तसेच उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " पिण्याच्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत नियमितपणे तपासणीसाठी पाठविण्यात येतात." माझा प्रश्न असा आहे की, पिण्याच्या पाण्याचे नमुने किती दिवसात तपासणीसाठी पाठविले जातात. तसेच उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " आरोग्य कर्मचा-यांमार्फत साथग्रस्त गावांतून घरोघरी साठविलेल्या पिण्याच्या पाण्याचे क्लोरिन सोल्यूशन वापरुन शुध्दीकरण करण्यात आले. " आता हे काम कोणकोणत्या गावात करण्यात आले आहे ? उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, "तापाच्या सर्व रुग्णाचे हिवतापासाठी रक्तनमुने गोळा करुन तपासणीअंती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना तातडीने समूळ उपचार केले. हिवताप उद्रेकग्रस्त व डेंग्यू उद्रेकग्रस्त भागात किटकनाशकाची धूर फवारणी करण्यात आली." आता ही धूर फवारणी कोणत्या गावात करण्यात आली आहे ? सभापती महोदय, दोनच दिवसापूर्वी जी एक घटना घडली आहे, तिचा उल्लेख्ख मला करावयाचा आहे. कवठेमहांकाळ तालुक्यात औषधे नव्हती, म्हणून तेथील एका रुग्णाला सांगलीच्या हॉस्पीटलमध्ये पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आता या बाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

श्री. रणजित कांबळे : माननीय सदस्यांचा प्रश्न काय आहे, तो मला समजला नाही. माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

(गोंधळ)

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " सर्व ठिकाणी औषधे उपलब्ध आहेत." परंतु राज्यातील आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नाहीत. तेव्हा आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध आहेत की नाही, याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रत्येक उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, रुरल हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल या ठिकाणी औषधे उपलब्ध असून त्यांचा भरपूर स्टॉक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, चंद्रपूर-अमरावती-जालना, अकोला, वाशिम, रत्नागिरी, रायगड, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर या जिल्हयांमध्ये डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 पर्यंत मलेरिया, डेंग्यू इत्यादी साथीच्या रोगाने अनेक लोक मृत्युमुखी पडले हे खरे आहे काय, असे विचारले असता मलेरियामुळे 3 व डेंग्यूमुळे 1 मृत्युमुखी पडल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु या दरम्यान अकोला जिल्हयामध्ये डेंग्यू व मलेरियाच्या साथीने जवळपास 15 रुग्ण दगावले आहेत त्याची माहिती उत्तरामध्ये दिलेली नाही. मृत्युमुखी पडलेल्यांची जी आकडेवारी दिलेली आहे ती सुध्दा अपूर्ण आहे. या बाबत चौकशी करुन मंत्रिमहोदय सभागृहाला माहिती देतील काय? दुसरा प्रश्न असा की, रक्तजलाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले त्यांचा तपासणी अहवाल आला आहे काय?

डॉ. विमल मुंदडा : डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 पर्यंतच्या कालावधीमध्ये अकोला जिल्हयामध्ये केलेल्या पहाणीमध्ये हिवतापाचे रुग्ण आढळून आले नाहीत. तथापि, अकोला जिल्हयामध्ये डेंग्यू या रोगाची लागण झालेले 14 रुग्ण आढळून आले.

श्री. पांडुरंग फुंडकर : अकोला जिल्हयातील तेल्हार तालुक्यातील तेल्हार गावामध्ये 25 लोकांना डेंग्यूची लागण झाली होती त्यापैकी 10 रुग्ण मरण पावले आहेत याची आपल्याला माहिती आहे काय?

डॉ. विमल मुंदडा : ही माहिती डिसेंबर 2004 ते जानेवारी 2005 पर्यंतची दिलेली आहे. सन्माननीय सदस्य देत असलेली अधिक माहिती तपासून घेण्यात येईल व त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : दुसरा प्रश्न असा की, रक्तजलाचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत. त्याचा अहवाल आला आहे काय? असल्यास, अहवालामध्ये काय म्हटले आहे?

डॉ. विमल मुंदडा : डेंगी विषाणूच्या परीक्षणासाठी रक्तजल नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले. रक्तजल नमुन्यांच्या प्राप्त अहवालामध्ये विषाणू सापडल्यामुळे संबंधित रुग्णांवर डेंग्यूची ट्रीटमेंट दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मराठवाड्यातील ३३ के.व्ही. सब स्टेशनच्या सुमारे ६० कामांना आवश्यक निधी तसेच साधनसामग्री उपलब्ध करुन देण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही

(२) * २६८१ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार : दि-ांज १६.१२.२००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सोळाव्या यादीतील प्र.क्र.४३५६२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ३३ के.व्ही.सब स्टेशनच्या प्रस्तावित उपकेंद्रात किती निधीची आवश्यकता आहे व तो उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ६४ पैकी ६ उपकेंद्रे कार्यान्वित केल्यानंतर २८ उपकेंद्रांची हाती घेतलेली ज ामे पूर्ज झाली आहेत काय, व उर्वरित उपकेंद्राच्या मंजुरीबाबतची कार्यवाही काय आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : (१) मराठवाड्यातील ३३/११ के.व्ही.च्या प्रस्तावित उपकेंद्रासाठी एकूण ५९.३० कोटी रुपये एवढया अंदाजित निधीची आवश्यकता असून त्यापैकी २१.८९ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(२) ३३/११ के.व्ही. च्या २८ हाती घेतलेल्या उपकेंद्रापैकी १२ उपकेंद्राची कामे पूर्ण झाली असून उर्वरित मंजूर उपकेंद्रे निधी व सामुग्रीच्या उपलब्धतेनुसार कार्यान्वित करण्यात मंडळाने योजिले आहे.

३० उपकेंद्राच्या सुसाध्यते मंजूरी नंतर निधी व सामुग्रीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सदाशिवराव पोळ : सभापती महोदय, ३३ के.व्ही. सब स्टेशनच्या उभारणीसाठी किती निधीची आवश्यकता आहे? व आतापर्यंत किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मराठवाडयाच्या सर्व जिल्हयांमध्ये 33/11 के.व्ही. च्या 64 उपकेंद्राचे काम हाती घेण्याबाबत प्रस्तावित केले होते. त्यासाठी एकूण 67 कोटी 11 लाख रुपये खर्च येणार आहे. यापैकी 21 उपकेंद्रे कार्यान्वित झाली त्यावर 37.49 कोटी रुपये खर्च झाले. 13 सबस्टेशन प्रगतीपथावर आहेत, व उर्वरित सबस्टेशन्सचे काम मार्च 2007 पूर्वी पूर्ण करण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगली जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ग्रामीण रुग्णालये उभारण्याचा निर्णय

(3) * 2143 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्मानीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील प्रश्नांचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली जिल्ह्यातील आष्टा (ता.वाळवा) व माडग्याळ (ता.जत) येथे ग्रामीण रुग्णालय उभारण्यास शासनाने दोन वर्षापूर्वी मंजूरी देवूनही अद्यापही सदरहू रुग्णालयाचे काम पूर्ण झाले नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) सदरहू दोन्ही रुग्णालयांचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता : (1) व (2) आष्टा ता.वाळवा, जि.सांगली येथे ग्रामीण रुग्णालयास दि.26.2.2004 च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली आहे.

माडग्याळ ता.जत येथे अद्याप ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आलेले नाही.

(3) आष्टा जि.सांगली येथील ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली असून आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, शासनाने तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "आष्टा जि.सांगली येथील ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली असून आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे." माझा प्रश्न असा आहे की, हा निधी कव्हा उपलब्ध करुन देण्यात आला आहे ? या निधीची विनियोग झालेला आहे की नाही ? तसेच माडग्याळ येथील रुग्णालयाच्या संबंधात शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जुलै 2004 मध्ये 43 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याठिकाणी ॲप्रोच रोडची गरज होती, त्यामुळे तेथील काम थांबले होते. दि.11-2-2005 रोजी कलेक्टर, सांगली यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. या जमिनीच्या बदलीच्या म्हणजे हस्तांतरणाच्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर ताबडतोब काम सुरु केले जाईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. माडग्याळ येथील रुग्णालयाच्या बाबतीत कोणता निर्णय घेतलेला आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, यासाठी ए.आर.ची परवानगी मिळालेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी जागा उपलब्ध नसताना तरतूद

. . . .2 जे-2

असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

का करण्यात आली ? त्यामुळे ती तरतूद लॅप्स् होते आणि हा निधी इतरत्र वापरता येत नाही. त्यामुळे पहिल्यांदा जागा उपलब्ध करुन, त्यानंतर तरतूद करण्याच्या दृष्टीने शासन आपल्या धोरणात बदल करणार आहे का ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जागा होती, फक्त ॲप्रोच रोडमुळे . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जागा ताब्यात नव्हती . . . .

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जागा ताब्यात होती. फक्त ॲप्रोच रोडसाठी जागेची गरज होती. माननीय वित्तमंत्र्यांनी सोसायटीबरोबर चर्चा केली आणि आता अदलबदल झालेला आहे म्हणजे जागेचा अदलबदल झालेला आहे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : अदलबदल म्हणजे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हस्तांतरीत झालेले आहे.

सभापती : माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, जागेमध्ये बदलाबदल झालेली आहे, म्हणजे मंत्र्यांमध्ये अदलाबदल झाली असे नाही.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, आता जागेचा प्रश्न सुटल्यामुळे रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामास केव्हा सुरुवात होईल आणि किती कालावधीमध्ये हे काम पूर्ण होईल ? तसेच माडग्याळ येथील रुग्णालयाच्या बाबतीत सांगितले की, याबाबतीत मान्यता मिळालेली नाही. तर ही मान्यता का मिळालेली नाही ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले होते की, दिनांक 21-3-2005 ला कलेक्टर, सांगली यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. शासनाने परवानगी दिल्यानंतर आम्ही ताबडतोब काम सुरु करु.

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : शासन परवानगी का देत नाही ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माडग्याळ येथील रुग्णालयाच्या बाबतीत सांगावयाचे तर त्याला लवकरात लवकर मंजूरी देऊ.

एक सन्माननीय सदस्य(खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर कळलेले नाही.

. . . .2 जे-3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती : माननीय मंत्री महोदय सभागृहात व्यवस्थित तयारी करुन येतात.पण काही वेळेला अडचण आली तर त्यांना त्यांच्या कॅबिनेट मंत्री महोदयांनी मदत केल्यानंतर ते लगेच उत्तर देतात.

. . . .2 जे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोन वर्षापासून बंद असलेले शवविच्छेदन केंद्र

(4) * 4457 श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. रजजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ : सन्मानीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील प्रश्नांचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे वडूज (ता.खटाव,जि.सातारा) येथील ग्रामीण रुग्णालयात दोन वर्षापूर्वी शवविच्छेदन केंद्राची निर्मिती करुनही अद्याप चालू न केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार व दिनांक 3 जानेवारी, 2005 रोजी मा.पालकमंत्री,सातारा यांचेकडे शवविच्छेदन केंद्र त्वरीत सुरु करण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अद्याप शवविच्छेदन केंद्र सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(3) शवविच्छेदन केंद्र त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे ?

श्री.रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) व (3) अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सन 2004-05 मध्ये रु.25,051/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "हे खरे नाही." तसेच दुसऱ्या व तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सन 2004-05 मध्ये रु.25,051/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे."

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकीकडे दिले आहे की,25,051 रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तर एकीकडे सांगण्यात येते हे खरे नाही. एकीकडे निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे असे म्हटलेले आहे. हा निधी कुठल्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे ही माहिती मिळेल काय?

डॉ. विमल मुंदडा :अध्यक्ष महोदय, विद्युत सुविधासाठीचे काम अपूर्ण राहिले होते. आणि त्या विद्युत सुविधाचे काम दिनांक 13.3.2005 रोजी पूर्ण झालेले आहे. आणि पुढच्या काळात ते पूर्ण कार्यान्वित होणार आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उपप्रश्न एक च्या उत्तरात "हे खरे नाही" असे म्हटलेले आहे, यातील काय खरे नाही? शवविच्छेदन केंद्र चालू केले असून चालू झाले नाही असे म्हटले आहे हे खरे नाही.की, पालकमंत्री सातारा यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे नाही हे मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे? तसेच अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी वगैरे जे म्हटलेले आहे. ती कोणती कामे अपूर्ण राहिलेली आहेत आणि काम अपूर्ण आहे म्हणजे ते कितपत अपूर्ण आहे आणि या कामाची सद्य:स्थिती काय आहे? तसेच 25051 रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, असे म्हटले आहे. तो निधी शवविच्छेदन केंद्र सुरु करावयाला पुरेसा आहे काय आणि नसल्यास किती अधिक निधीची आवश्यकता आहे, तो निधी केव्हा उपलब्ध होईल?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 25051 रुपये पोष्टमॉर्टेमच्या रुमच्या इलेक्ट्रिफिकेशनसाठी होते. ते काम आता पूर्ण झालेले आहे आणि ते पोस्टमॉर्टेम रुम हँन्डओव्हर झालेली आहे, आणि ते सुरुही झालेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, या उत्तरामध्ये माननीय मंत्री आणि राज्यमंत्री यांचा काही तरी गोधळ होत आहे. इलेक्ट्रिफिकेशनचे काम अपूर्ण आहे म्हणून 25051 रुपये दिले असे कॅबिनेट मंत्रिमहोदयांनी सांगितले. तर ते काम पूर्ण झाले आहे असे आत्ताच राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे. मंत्रिमहोदया म्हणतात हे काम अपूर्ण आहे आणि राज्यमंत्रिमहोदय सांगत आहेत की, हे काम पूर्ण झालेले आहे. शवविच्छेदनासाठी कोल्ड स्टोअरेज अमुक अमुक लागते, तेथे इलेक्ट्रिसिटी शिवाय काय बर्फाच्या लादया पाठवितो काय?

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

इलेक्ट्रिफिकेशन सुरु न होता त्या ठिकाणी शवविच्छेदनाचे काम चालू कसे होऊ शकते? चालू आहे याचा अर्थ काय? इलेक्ट्रिफिकेशनशिवाय ते कसे चालू होईल. याचा अर्थ ते चालू नव्हते. मला असे वाटते की, याबाबतीत काही घाई नाही.हा महत्वाचा प्रश्न आहे. मंत्रिमहोदयांनी नीट माहिती घ्यावी. आणि पुन्हा सभागृहासमोर येऊन माहिती द्यावी.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दि.17.3.2005 ला हे काम पूर्ण झालेले आहे त्यामुळे मी सभागृहाला तसे उत्तर दिलेले आहे.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी 25051 इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. हा अपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला की नाही?प्रश्न असा आहे की, शवविच्छेदन केंद्र त्वरित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आह? ही कार्यवाही करण्यात येत आहे, याचा अर्थ असा की, ही कार्यवाही चालू आहे..

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, कार्यवाही पूर्ण झालेली आहे. इलेक्ट्रिफिकेशनचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण झालेले आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, एखादा विधान परिषद सदस्य ज्यावेळी प्रश्न विचारतो त्या वेळी त्या सदस्यांच्या तो प्रश्न विचारण्यामागील हेतू काय आहे हे लक्षात न घेता ठोकळेबाज पध्दतीने कशी उत्तरे देता येतात याबाबत ग्रीनीचबुकमध्ये तुमच्या उत्तराचे नांव जाईल. प्रश्न असा आहे की, शवविच्छेदनाचे काम सुरु झाले आहे असे म्हटलेले आहे. तर मग गेले दोन वर्षे तेथे शवविच्छेदन होत नव्हते काय? मग तेथे काय करत होतात?

डॉ. विमल मुंदडा :तेथे पोस्टमॉर्टेम होत नव्हते कारण तेथे विद्युतीकरणाचे काम अपूर्ण होते त्यासाठी 25051 रुपये लागणार होते ते पेसे मंजूर करुन दिले आणि आता काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे आता कुठेही अडचण नाही. आता पर्यंत जवळच्या खटाव तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, पुसेगाव, प्राथमिक आरोग्य केंद्र, औंध, प्राथमिक आरोग्य केंद्र, कलेढोन आहे. एक-एक किलो मीटरया अंतरावर हे प्राथमिक आरोग्य केंद होते आणि तेथे शवविच्छेदनाची सुविधा होती. येथील इलेट्रिफिकेशनचे काम पूर्ण झाल्यामुळे आता येथे ही सुविधा उपलब्ध झालेली आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक ३१ जानेवारी,०५ रोजी मुंबई येथे जप्त करण्यात आलेला २०५ लिटर केरोसिनचा साठा.

(५) * २१८६ श्री. अनंत तरे : सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ जानेवारी, २००५ च्या सुमारास (मुंबई) एका लक्झरी बसचा पाठलाग करुन, अवैध मार्गाने भेसळीसाठी वापरण्यात येणा-या निळ्या केरोसिनचा २०५ लिटरचा साठा जप्त करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) अद्याप चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल तटज रे : (१) होय खरे आहे.

(२) होय.

(३) दिनांक २४ जानेवारी,२००५ रोजी उप नियंत्रक शिधावाटप "ई" परिमंडळ, वडाळा यांनी मे. सोनू ट्रॅव्हल्स लक्झरी गाडी क्रमांक एमएच-१ एच-६०९६ या गाडीची तपासणी केली असता, गाडीमध्ये २०५ लिटर निळे केरोसीन आढळून आले.

याप्रकरणात, केरोसीन साठा अवैधरित्या बाळगल्यामुळे प्रकरणी बसचालक व क्लिनरविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत दिनांक २५-१-२००५ रोजी गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणी एकूण २,६५,७४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या केरोसीनचे नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी देण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल अद्याप प्रलंबित आहे. तसेच, सदर गुन्हा अद्याप पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे हे या खात्याचे मंत्री झाल्यापासून ते फार ॲग्रेसीव्ह झालेले आहेत. त्यांच्या बऱ्याच ठिकाणी फार मोठया प्रमाणावर धाडी पडत आहेत. मागे एका ठिकाणी 20 हजार लीटरचा साठा पकडण्यात आला. तुर्भे येथे 12 लाख लीटरचा 60 लाख रुपये किंमतीचा साठा पकडण्यात आला. या ठिकाणी 205 लीटर केरोसिन आढळून आले. परंतु या उत्तरामध्ये थोडीशी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या ठिकाणी जानेवारीमध्ये असा साठा पकडण्यात आला. जानेवारी महिन्यानंतर फेब्रुवारी आणि आता मार्च महिना आला तरी ज्या प्रयोगशाळेकडे नमुने तपासणीसाठी पाठविले त्यांचा अहवाल प्राप्त

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

झालेला नाही. या ठिकाणी जी केस करण्यात आलेली आहे, ज्या लक्झरीमध्ये केरोसिन आढळले त्या बसच्या ड्रायव्हरला आणि क्लिनरला अटक केली परंतु ती लक्झरी सोडून दिली. ती लक्झरी आपण का जप्त केली नाही ? केरोसिन कोणत्या प्रयोगशाळेमध्ये तपासण्यासाठी पाठविले आणि त्याचा अहवाल आतापर्यन्त का प्राप्त झाला नाही ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, यामध्ये सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे केरोसिन जसे जप्त केले त्याप्रमाणे वाहन सुध्दा जप्त केलेले आहे आणि त्या अनुषंगाने आपण ज्या प्रयोगशाळेमध्ये नियमितपणे तपासणीसाठी पाठवितो त्यांच्याकडे हे नमुने तपासणीसाठी दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, अनेक वेळा प्रयोगशाळेमध्ये रॉकेल किंवा पेट्रोल यामध्ये भेसळ झाली की नाही हे तपासण्यासाठी पाठविल्यानंतर त्याचा अहवाल मिळण्यामध्ये विलंब होतो. म्हणूनच विभागामार्फत यासंदर्भात स्वतंत्रपणे प्रयोगशाळा लवकरात लवकर सुरु करता येईल काय याचा विचार करीत आहोत. यातील ज्या ज्या ऑईल कंपन्या आहेत त्यांनी जो नमुना प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविलेला आहे त्याचा अधिक गतिमान पध्दतीने अहवाल पाठविण्यासंबंधी सूचना दिल्या गेलेल्या आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्रिमहोदयांनी या सदनामध्ये असे आश्वासन दिले होते की, दक्षता समित्यांवर विधान परिषदेतील सदस्यांना सामावून घेतले जाईल किंवा त्यांच्या नेमणुका केल्या जातील. यासंदर्भात आजपर्यन्त कोणत्याही नेमणुका झालेल्या नाहीत. आमच्या भागामध्ये केरोसिनचे स्टॉक मिळाले, काळया बाजारातील केरोसिन पकडले गेले, त्याच्या केसेस होत आहेत आणि आम्ही त्या भागात राहात असून सुध्दा प्रत्यक्ष माहिती घेऊ शकत नाही. कारण आम्हाला दक्षता समितीवर आमची नियुक्ती केलेली नाही. तुम्ही ज्या लोकांना नियुक्त केले ते कार्यरत नाहीत. याचा परिणाम असा होतो की, सर्वसामान्य जनतेला, झोपडपट्टीतील जनतेला केरोसिन मिळत नाही. ते काळया बाजारात जात आहे. यासंदर्भात शासन त्वरित काही कार्यवाही करील काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न जरी भिन्न असला तरी महत्वाचा प्रश्न जेष्ठ सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. या ज्या दक्षता समित्या आहेत त्या

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

ता. प्र. क्र. 2186 ..... श्री. सुनील तटकरे .....

गठित करण्याच्या संदर्भात माननीय पालकमंत्री महोदयांना आपण नेहमीच विनंती केलेली आहे. राज्यभरातील सर्वच समित्या रद्द आहेत. तरी सुध्दा आज जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी जी सूचना केली त्यासंदर्भात येत्या महिनाभरात संबंधित पालकमंत्री महोदयांनी या समित्या गठित करण्याबाबत पुन्हा एकदा त्यांना विनंती करण्यात येईल आणि त्यामध्ये विधान परिषद सदस्य ज्या विभागामध्ये राहतात त्या ठिकाणी त्यांचा समावेश त्यामध्ये करण्याच्या संदर्भामध्ये पुन्हा एकदा लिहिण्यात येईल. विशिष्ट कालावधीत जर माननीय पालकमंत्री महोदयांनी त्या समित्या गठित केल्या नाहीत तर तो प्रस्ताव विभागाकडे मागवून विभागाकडून त्या समित्या गठित केल्या जातील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निळया रॉकेच्या संबंधाने परत बरेच प्रश्न उपस्थित झालेले आहेत. या संदर्भात माझा आक्षेप आहे. निळया केरोसिनचा साठा आपण जप्त केला. मुळावर घाव न घालता सिनेमासारखे मध्ये मध्ये गाडीचा पाठलाग करणार आणि गाडया पकडणार. त्यानंतर ज्या ठिकाणी रॉकेलचा साठा आहे त्यासंदर्भात पुढे काहीच होणार नाही. ज्या ठिकाणी मूळ साठा राखून ठेवला जातो, ज्या ठिकाणी निर्मिती केली जाते, भेसळ केली जाते, माझ्या माहितीप्रमाणे पेट्रोल पंपाच्या पाठीमागच्या बाजूला या निळया रॉकेलची सर्रास विक्री चालू असते. लोक रिक्शातून डबे आणून रॉकेल विकत असतात. दुसरा प्रश्न असा की, त्या लक्झरीचा मालक कोण आहे ? त्याच्यावर तुम्ही काय कारवाई केली ? या माणसाकडून परत परत असे गुन्हे होत असतील तर त्याबाबतीत शासनाची काय भूमिका असणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : गाडी क्र.एमएच-1 एच-6096 या लक्झरी बसच्या मालकाविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. परंतु त्याचे नाव माझ्याकडे उपलब्ध नाही. बस चालकाचे नाव आकाराम यादव आणि क्लीनरचे नाव अण्णासाहेब बनगर असे आहे. त्या मालकाचे नाव मी पटलावर ठेवीन. परंतु त्यासंबंधी गुन्हा दाखल झाला आहे. मा.सदस्यांनी विचारले की, केवळ याच पध्दतीने धाडी घालता की काय ? त्याबाबात सांगतो की, शासनाने राज्य दक्षता पथक नेमलले आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मा.विरोधी पक्ष नेत्यांनी या विषयावरील चर्चेच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित केला होता त्यामुळे जिल्हावार दक्षता पथके निर्माण केलेली आहेत. या पथकाच्या माध्यमातून अतिरिक्त जिल्हाधिकारी असतील, जिल्हा पुरवठा असतील यांनी सुध्दा वेळोवेळी पेट्रोलपंपाचे, रॉकेलचे डिलर्स, घाऊक डिलर्स, अर्धघाऊक परवानाधारक आहेत त्या सगळयांच्या महिनाभरात तपासण्या कराव्यात. तपासणीअंती जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशा सूचना दिल्या आहेत आणि त्या पध्दतीने अनेक ठिकाणी पेट्रोल व केरोसीनसंबंधी छापे घालून माल पकडल्याचे निदर्शनास येत आहे.

श्री.दिलीप देशमुख : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, 2,65,740 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, हा मुद्देमाल नेमका काय आहे ? जी लक्झरी बस जप्त केली आहे तिची किंमत कमी लावल्यासारखे वाटते आणि केवळ 205 लिटर रॉकेलचा साठा जप्त केला असेल त्याची किंमत जास्त आहे असे वाटते.

श्री.सुनील तटकरे : जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये नीळया केरासीनचे 35 लिटरचे प्लॅस्टिकचे 3 कॅन ज्याची किंमत 2940, 50 लिटरचे प्लॅस्टिकचे 2 कॅन ज्याची किंमत 2800 रुपये आणि लक्झरी बसची किंमत डेप्रिसिएशन करुन लिहितो त्यानुसार 2 लाख 60 हजार रुपये असा एकूण 2,65,740 रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे म्हटलेले आहे.

श्री.अरविंद सावंत : शासन अधिक धाडी टाकत आहे. दरम्यानच्या काळामध्ये अशा किती धाडी टाकण्यात आल्या आणि त्यात किती रॉकेल जप्त केले आणि जी गाडी जप्त केली आहे ती गाडी शासनाच्या ताब्यात आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्यांनी स्वतंत्र प्रश्न विचारावा किंवा अन्य मार्गाने माहिती घ्यावी. याप्रकरणी जे अपील आहे ते नियंत्रकांकडे सुरु आहे. ते प्राप्त झाल्यानंतर गाडीची माहिती सांगता येईल.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK

ता.प्र.क्र.2186...

श्री.अरविंद सावंत : सध्या ती गाडी कोठे आहे ?

श्री.सुनील तटकरे : उपनियंत्रकांनी धाड घातली आहे. मुद्देमाल जप्त केला आहे त्याची आकडेवारी मी याठिकाणी ठेवली आहे. याप्रकरणी नियंत्रकांकडे अपील चालले आणि अपील चालू असताना त्यांची गाडी परत देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि याप्रकरणी पोलीस तपास चालू आहे.

श्री.रामनाथ मोते : या गाडीच्या मालकांवर सुध्दा कारवाई करण्यात आल्याचे म्हटलेले आहे. मुळात अवैध काम रोखण्यासाठी परिवहन खात्याने या मालकाला जो परवाना दिला आहे तो रद्द केला जाणार आहे काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.सुनील तटकरे : या संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली त्यावेळी असे लक्षात आले की,...

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्या गाडीच्या मालकाचे नियंत्रकांकडे हियरिंग झाले. पण जोपर्यंत प्रयोगशाळेचा अहवाल येत नाही तोपर्यंत ही लक्झरी बस परत कशी दिली ?

श्री.सुनील तटकरे : जो सफरर असतो त्याला नेहमीच अपील करण्याचा अधिकार असतो. 205 लिटरसंबंधीचा हा प्रश्न आहे. मी त्याबाबत तपशीलवार माहिती देत आहे. हे रॉकेल सातारा येथे चालले होते. ज्यावेळी वाहन चालक व क्लीनरला पकडले त्यावेळी त्यांनी रॉकेल कोणाकडून आणले त्याची माहिती दिली. संबंधित माणसांचा पोलिसांनी जबाब घेतल्यानंतर त्यांनी सांगितले की, मी सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यातील आहे, मी अमूक गावचा आहे, माझ्या गावात जत्रा आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 2186 पुढे सुरु...) (श्री. सुनील तटकरे पुढे सुरु...

आम्हाला जे 6 महिन्यामध्ये मिळालेले रॉकेल आहे ते आम्ही यात्रेसाठी पाठवित आहोत असे त्याने सांगितले. ..(अडथळा)... ज्या मराठी माणसाच्या नावाने रॉकेल पकडले गेले त्याच्यासंबंधीची माहिती मी आपणासमोर ठेवीत आहे. दुस-या संबंधितांकडे चौकशी केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमच्या गावच्या घराकडे कोणी नसते. आम्हाला मंजूर झालेले रॉकेल आम्ही पाठविले. परंतु कायद्यानुसार अशा प्रकारे साठा करता येत नाही. त्याने कोणाकडून रॉकेल घेतले याबाबतची सर्व माहिती घेतलेली आहे. हे पकडलेले सर्व रॉकेल ज्यांनी पाठवले ते त्यांच्या सातारा जिल्हयातील स्वत:च्या गावी जात होते. या प्रकरणी सर्व गोष्टींची सुनावणी केल्यानंतर गुणवत्तेवर निर्णय घेतलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : या प्रकरणी अहवाल अजून प्रलंबित आहे. ब-याच वेळा असे होते की. जेव्हा पेट्रोल किंवा रॉकेलचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविले जातात त्यावेळी सप्लायर मार्फत ते बदलले जातात. खरे म्हणजे याबाबतीतील मेडिकल टेस्टिंग एका दिवसात होऊ शकते. तरीही रिपोर्ट वेळेवर उपलब्ध होत नाहीत. तेव्हा अशा प्रकारचे अहवाल ताबडतोबीने मिळण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? या संदर्भात संबंधित प्रयोगशाळांना शासन आदेश देणार आहे काय ? शासन प्रयोगशाळांची संख्या वाढविणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सांताक्रुझ येथील लॅबकडे हे सॅम्पल पाठविण्यात आलेले आहेत. हा अहवाल ताबडतोबीने देण्याच्या संदर्भात आजच सांगितले जाईल. लॅबची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे. संबंधित कंपन्यानी मोबाईल वाहने उपलब्ध करुन द्यावीत असे सांगितले. या संदर्भात मी देखील त्यांच्याशी चर्चा केली आहे. या संदर्भात भारत सरकारकडे पेट्रोल कंपन्यांनी प्रस्ताव पाठविलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

शिगम

राजापूर (जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक शाळेची धोकादायक इमारत

(६) * ३०१८ श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) टाळवडे जिल्हापरिषद प्राथमिक शाळेची इमारत धोज्ादायज् झाली असल्यामुळे शाळेतील शंभर मुले गेल्या कित्येक दिवसापासून झाडाखाली बसून अभ्यास करीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हापरिषदेकडून निधी उपलब्ध होत नसल्यामुळे शाळेची इमारत दुरुस्त होऊ शकत नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामासाठी जिल्हापरिषदेला निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे व शाळेची ही इमारत त्वरीत दुरुस्त होण्यास किती कालावधी लागणार आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता : (१) हे जरे -ाही.

(२) हे जरे -ाही.

(३) जिल्हा परिषद शाळा तळवडे नंबर १ व २ या इमारती सुस्थितीत असल्यामुळे इमारत दुरुस्तीचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री. रणजित देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. उत्तराच्या भाग 3 मध्ये "1 व 2" या ऐवजी "1 ते 4" असे वाचावे, बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. रमेश निकोसे : टाळवडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. 1 व 2 या शळेची इमारत सुस्थितीत असल्याची तपासणी केव्हा करण्यात आली व त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय ? या शाळेची इमारत शाळेतील मुलांना बसण्यायोग्य आहे काय ? या शाळेच्या इमारतींचे आयुष्य किती आहे? ही शाळा केंव्हा बांधली ? या शाळेतील मुले झाडाखालीर बसून शिकत नाहीत ही बाब पूर्ण सत्य आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : तळवडे गावामध्ये 4 शाळा आहेत या 4 शाळांची तपासणी 15 दिवसापूर्वी झालेली आहे. या सर्व शाळांमध्ये मुलांची बसण्याची सोय आहे. या चारही शाळांचे फोटोग्राफ माझ्याकडे असून आवश्यकता असेल तर ते मी मा. सदस्याना दाखवीन.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: ता.प्र.क्र. 2362 नंतर घेण्यासंबंधी

सभापती : आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 7 वरील ता. प्र.क्र.2362 च्या संदर्भात ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी अशी विनंती केली आहे की, ते एका तातडीच्या कामाकरिता बाहेर गेलेले असल्यामुळे सदर तारांकित प्रश्न पुन्हा कधीही घेण्यासंबंधी मा.सदस्यांना विनंती करावी. मला वाटते हा प्रश्न आपण नंतर घेऊ.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>तारांकित प्रश्न क्रमांक -4714</u>

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

2....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक -2379

विदर्भातील मेळघाट, धारणी व चिखलदरा येथे कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू याबाबत नेमण्यात आलेली समिती

(९) * २३७९ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर, श्रीमती कांता नलावडे , श्री. जगदिश गुप्ता : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ज ाय :-

(१) विदर्भातील मेळघाट, धारणी व चिखलदरा येथे कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू कमी करण्याचे दृष्टीने मा.मुख्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली मा.उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास, महिला व बालकल्याण तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री यांचा समावेश असलेल्या एका समितीची स्थापना करण्यात आल्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी दिनांक ९ डिसेंबर, २००४ रोजी जाहिर केले, हे खरे आहे ज ाय,

(२) असल्यास, आतापर्यंत या समितीच्या किती बैठका झाल्या असून या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले व किती प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. विमल मुंदडा : (१) (२) व (३) राज्यात नवीन मिशन तयार करण्यात येत असल्याचे जाहिर केले होते हे खरे आहे. त्यानुसार शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि.११ मार्च,२००५ अन्वये राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य कुपोषण मिशन स्थापन करण्यात आले. सदर मिशनच्या सुकाणू समितीचे मा.मुख्यमंत्री अध्यक्ष असून मा.उप मुख्यमंत्री उपाध्यक्ष आहेत. आदिवासी विकास मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री व महिला व बाल विकास मंत्री इत्यादि सदर समितीचे सदस्य आहेत. सदर मिशनच्या सुकाणू समितीची बैठक झालेली -ाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात थोडी दुरुस्ती करु इच्छिते. उत्तराच्या तिस-या ओळीत "कुपोषण" ऐवजी "पोषण" असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्या प्रमाणे.

3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.2379..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी एका घोषणा केली होती की, विदर्भातील मेळघाट,धाडणी, चिखलदरा या ठिकाणी कुपोषणाने जे बालमृत्यू होतात. त्या बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले पाहिजे यासाठी करावयाच्या उपाययोजनेसाठी एक समिती माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली केली जाईल. उत्तरात असे म्हटले आहे की, 11 मार्च रोजी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापना करण्यात आले आहे मेळघाट,चिखलदरा आणि मेळघाट संदर्भातील स्पेसिफीक प्रश्न विचारला होता. पंरतु सन्माननीय मंत्र्यांनी संपूर्ण राज्यासंबंधीची माहिती दिलेली आहे. तसेच राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन करण्यात आले आहे अशीही माहिती देण्यात आलेली आहे. कालच्या अर्थसंकल्पात यासंबंधीचे कार्यक्रम आपण जाहीर केलेले आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, धाडणी,चिखलदरा आणि मेळघाट हा जो विभाग आहे त्या ठिकाणी दरवर्षी या ठिकाणी कुपोषणाने अनेक बालकांचे मृत्यू होतात.दरवर्षी बालमृत्यूची संख्याही जाहीर होते. हजारोच्या संख्येत बालमृत्यूचा आकडा गेलेला आहे. या विभागासाठी स्पेसिफीक समिती नेमण्यात येणार होती त्या समितीचे काय झाले ?

डॉ. विमल मुंदडा : बालमृत्यूंचे प्रमाण कमी करण्याच्या संदर्भात मेळघाट पॅटर्न राबविला जात आहे. अतिसंवेदनशील असे पाच जिल्हे आहेत त्या ठिकाणी देखील मेळघाट प्रकल्प राबविण्यात येत आहे. चिखलदरा,धाडणी,मेळघाट येथे हा पॅटर्न पूर्वीपासूनच राबविला जात आहे..

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, शासनाने राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन केले आहे. कालच्या अंदाजपत्रकामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी असे सांगितले की, या मिशनचे विभागीय कार्यालय औरंगाबाद येथे राहील. विशेषत: मेळघाट, चिखलदरा, धाडणी या परिसरासाठी आम्ही मागणी केली होती. परंतु या मिशनचे कार्यालय औरंगाबाद येथे ठेवण्यात आले. या मिशनचे कार्यालय विदर्भात का ठेवण्यात आले नाही याची माहिती मंत्री महोदय या ठिकाणी देतील काय ?

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्यावर मला बोलावयाचे आहे. संभाजीनगर कुठे आणि चिखलदरा,धाडणी,मेळघाट कुठे ? सभापती महोदय, अमरावती येथून धाडणी,मेळघाट येथे अधिकारी वेळेवर पोहचू शकत नाही तर

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संभाजीनगर येथून अधिकारी या ठिकाणी कसे काय पोहोचू शकतील ? सदर मिशनचे कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. माझा प्रश्न असा आहे की, सदर मिशनचे कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी ठेवण्यात येईल काय ?

डॉ.विमल मुंदडा : हा विषय राज्यव्यापी स्वरुपाचा आहे. संपूर्ण राज्यासाठी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन करण्यात आलेले आहे. हे संपूर्ण राज्यासाठी मिशन स्थापन करण्यात आलेले आहे...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेबांना सांगू इच्छितो की, हरकतीच्या मुद्दयातून तुम्ही जे काही विचारले त्यावर मंत्र्यांनी काय उत्तर द्यावे अशा प्रकारचे बंधन मला त्यांच्यावर घालता येणार नाही. मी तसे बंधन मंत्र्यांवर घालणार नाही. मंत्री महोदय योग्य उत्तर देण्याची काळजी घेतील.

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.प्र. 2379 पुढे सुरु..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, विदर्भातील मेळघाट,धारणी व चिखलदरा येथे कुपोषणामुळे बालमृत्यू कमी करण्याचे दृष्टीने मा. मुख्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली मा.उपमुख्यमंत्री,आदिवासी विकास,महिला व बालकल्याण तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री यांचा समावेश असलेल्या एका समितीची स्थापना करण्यात आल्याचे मा. सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांनी दिनांक 9 डिसेंबर,2004 रोजी जाहीर केले हे खरे आहे काय ? राज्याच्या दृष्टीने हाप्रश्न विचारला नव्हता. हाप्रश्न विदर्भातील धारणी,मेळघाट आणि चिखलदरा या स्पेसिफिक भागात होणा-या बालमृत्यूंच्या संदर्भात विचारला होता. त्यासाठी ही समिती स्थापन केली होती.

सभापती : मघाशी सुध्दा या उद्देशाने प्रश्न विचारला होता. शासन म्हणून मंत्रीमहोदयांनी कोणते उत्तर द्यावे हा त्यांचा अधिकार आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मिशनच्या कामाची जी व्याप्ती आहे त्याप्रमाणे पहिल्या टप्प्यामध्ये आपण पाच आदिवासी जिल्हे घेणार आहोत. त्यामध्ये अमरावती जिल्हयाचा समावेश मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या समितीमध्ये आहे. सुकाणू समिती केलेली आहे. पाच जिल्हे म्हणजे ठाणे,नाशिक,नंदुरबार,अमरावती आणि गडचिरोली असे आहेत. पोषण मिशनमध्ये पहिल्या टप्प्यामध्ये हे जिल्हे आपण घेतलेले आहेत. मुख्यालय औरंगाबाद येथे आहे कारण उस्मानाबाद किंवा नांदेड जिल्हा असेल त्याठिकाणी ग्रेड-3 ची कुपोषित बालके नाहीत. औरंगाबादमध्ये महिला बाल विकास विभागाचे सचिव श्री. रमणि यांनी चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे. राज्य समन्वयक म्हणून समितीचे सदस्य सचिव ते राहणार आहेत. तीन समित्या आहेत. राज्य समन्वयक म्हणून श्री. रमणि यांची एक समिती आहे. कुपोषण मिशन म्हणजे मंत्री महिला आणि बाल विकास यांच्या अध्यक्षतेखालील समिती आहे. त्यामध्ये आदिवासी विकास विभाग,आरोग्य विभाग,ग्राम विकास विभाग व अन्यमंत्री यांची एक समिती आहे आणि मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये उपमुख्यमंत्री उपाध्यक्ष आहेत. त्यामध्ये या सर्वांचा अंतर्भाव आहे आणि मुख्य सचिव यामध्ये कोऑर्डिनेटर आहेत. विशेषत: अमरावती जिल्हयाचा पहिल्या टप्प्यामध्ये समावेश केलेला आहे. औरंगाबाद येथे मुख्य कार्यालय राहणार आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2379 पुढे सुरु...

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हाप्रश्न निर्माण झाला होता तो डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनामध्ये निर्माण झाला होता आणि शासनाने निर्णय जाहीर केला होता तो मेळघाटासाठी केला होता. मेळघाटासाठी जी समिती जाहीर करण्यात आली होती त्यामध्ये डॉ. बंग समवेत ती वेगळी समिती होती की हीच समिती होती. अमरावती जिल्हयातील मेळघाट परिसर आहे त्या भागामध्ये कुपोषणाचा विषय नेहमी येत असतो. अनेक योजना झाल्या. परंतु त्यातून काही निष्पन्न होत नसल्यामुळे डॉ. बंग यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये एक समिती जाहीर करण्यात आली होती. रिपोर्ट सुध्दा शासनाजवळ आलेला आहे. हे खरे आहे काय आणि जर खरे असेल तर समितीने काय काय शिफारशी केलेल्या आहेत ? हा प्रश्न अमरावती आणि त्या परिसरातील आहे. मंत्रीमहोदय उत्तर देत आहेत ते संपूर्ण महाराष्ट्राच्या बाबतीत देत आहेत. या समितीची एकही बैठक झालेली नाही. ही बैठक तातडीने घेऊन सुकाणू समितीच्या शिफारशी सदनासमोर केव्हा आणल्या जातील ?

यानंतर श्री. गायकवाड ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 2379.....

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगितले की, आपण नवीन आरोग्य पोषण मिशन तयार केलेले आहे.संपूर्ण राज्यासाठी हे मिशन राहणार आहे त्याचबरोबर ते अमरावतीसाठीसुध्दा राहणार आहे फक्त त्याचा कक्ष औरंगाबाद येथे राहणार आहे. सन्माननीय सदस्यांनी डॉ. अभय बंग यांच्या अहवालाचा उल्लेख केलेला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छिते की,त्यांचा पहिला अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला असून सर्व सन्माननीय सदस्यांना तो देण्यात आला आहे.दुसरा अहवाल 31 मार्च पूर्वी ते शासनाला देणार आहेत. त्यानंतर हा अहवालसुध्दा सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत स्पेसिफिक असून काही विभागापुरताच विचारण्यात आलेला आहे.तेव्हा तेवढयापुरताच खुलासा न करता संपूर्ण महाराष्ट्राच्या बाबतीत किंवा संपूर्ण आदिवासी पट्टयाच्या बाबतीत शासन काय करीत आहे याचे उत्तर देण्यात आलेले आहे. माननीय सदस्यांनी स्पेसिफिक विभागापुरतेच विचारलेले असल्यामुळे ज्या उद्देशाने प्रश्नकर्त्या सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारलेला आहे तो उद्देश लक्षात घेऊन माननीय मंत्रिमहोदयांनी त्याचे उत्तर द्यावयास पाहिजे होते.परंतु ते उत्तर देण्यात आलेले नाही.औरंगाबाद शहराच्या संदर्भात फक्त उत्तर देण्यात येत आहे. विदर्भातील मेळघाट,धारणी,चिखलदरा येथे कुपोषणामुळे अनेक बालके मृत्यूमुखी पडतात तेव्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी काय उपाययोजना करण्यात आलेली आहे आणि या समितीच्या शिफारशीच्या बाबतीत पुढे काय व्यवस्था करण्यात आलेली आहे यासबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे .

डॉ.विमल मुंदडा :सभापती महोदय, मागच्या वेळचे प्रोसिडिंग्ज सन्माननीय सदस्य तपासून पाहू शकतात त्यावेळी मिशनच्या बाबतीत उलेख करण्यात आला होता परंतु आता तो विषय संपलेला आहे.अमरावती जिल्हयासाठी स्पेशल मेळघाट पॅटर्न नुसार बालमृत्यू दर कमी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल हे मी आपल्याला सांगू इच्छिते.बालमृत्यू कमी करण्यासाठी मेळघाट पॅटर्ननुसार असलेल्या उपाययोजना आणखी व्यवस्थितपणे राबविल्या जातील.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, डॉ.अभय बंग यांनी आपला पहिला अहवाल दिला असून त्यात त्यांनी काही शिफारशी केल्या आहेत.त्या अहलाच्या शिफारशीची अंमलबजावणी अजून

2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

झालेली नाही या शिफारशी विचाराधीन आहेत असे उत्तर मागच्या वेळी देण्यात आले होते आणि आज सुध्दा त्या प्रश्नाला तेच उत्तर देण्यात आले आहे.काल माननीय अर्थमंत्र्यांनी भाषण करतांना असे सांगितले की, आम्ही राजमाता जिजाऊ मिशन स्थापन करीत आहोत त्यातून आम्ही अवेअरनेस कॅम्पेन करु. त्यासाठी केवळ प्रसिध्दी देण्यात येणार आहे त्यामुळे या मुलांचे पोषण होणार नाही.कालच्या भाषणात माननीय अर्थमंत्र्यांनी फक्त पब्लिसिटी अवेअरनेस एवढेच म्हटलेले होते. कालचे त्यांचे भाषण आपण काढून पाहिल्यास त्यात त्यांनी काय म्हटलेले आहे हे आपल्याला समजेल.हे नवीन मिशन केवळ अवेअरनेस कॅम्पेन करणार असेल तर त्यातून कुपोषित बालकांचे मृत्यू कमी होणार आहेत काय ? या विषयाच्या बाबतीत शासन गंभीर नाही.एकाच दिवशी देण्यात आलेली दोन वेगवेगळी उत्तरे आपण पहावीत.या बाबतीत एकही बैठक घेण्यात आलेली नाही. बालमृत्यूच्या संदर्भात हा महत्वाचा प्रश्न विचारण्यात आलेला आहे .ज्या मिशनची घोषणा करण्यात आलेली आहे तो केवळ अवेअरनेस कॅम्पेन आहे.कुपोषणामुळे होणारे बालमृत्यूंचे प्रमाण कसे थाबणार आहे? याबाबतीत ठोस उत्तर देण्यात येत नाही. डॉ.अभय बंग यांनी ठोस अहवाल सादर केला होता त्या अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत तेव्हा याशिफारशी केव्हा लागू करण्यात येणार आहेत ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छिते की, ते दोन विषय एकत्र करतात.प्रश्नात विचारण्यात आलेले असल्यामुळे त्याचे उत्तर येथे देण्यात आले होते. त्याचबरोबर मिशनच्या बाबतीत येथे उल्लेख करण्यात आला होता .डॉ.अभय बंगच्या अहवालाच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे त्यांचा पहिला अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता.. बालमृत्यूची नोंद व्यवस्थित करण्यात आली पाहिजे. असे त्यांनी सांगितले होते. तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता.याबाबतीत उपाययोजना करण्याच्या संदर्भात ते दुसरा अहवाल सादर करणार आहेत . त्यांनी दुसरा अहवाल सादर केल्यानंतर तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : पहिला अहवाल विचाराधीन आहे.

डॉ.विमल मुंदडा : त्यांनी जो पहिला अहवाल सादर केला होता तो मागच्या नागपूरच्या.अधिवेशनात पटलावर ठेवला होता. तसेच मी ज्या समितीच्या बाबतीत सांगितले होते ती

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

समिती वेगळी आहे.प्रभावीपणे आणखी काम करण्यासाठी नेमलेली ही समिती आहे.अशा प्रकारे या दोन वेगवेगळया समित्या आहेत. त्यांचे अहवाल वेगवेगळे आहेत.ॲक्शन टेकन रिपोर्ट आल्यानंतर तो अहवाल आम्ही आपल्याला देऊ. दिनांक 11 मार्च 2005 रोजी ही समिती नेमण्यात आली होती व कॅबिनेटमध्ये हा विषय घेण्यात आला आहे.हे काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी ही समिती नेमण्यात आलेली आहे. त्या संदर्भात मी वेगळे काहीही सांगत नाही. बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे,मातांचे संगोपन चांगल्याप्रकारे करणे,गर्भवती महिला व स्तनदा महिला यांची चांगल्या प्रकारे काळजी घेणे यासारखे सगळे विषय हे सोशियो - एकोनॉमिकशी रिलेटेड आहेत.त्यामुळे यामध्ये हेल्थ एज्युकेशनचा पार्ट आहे, अवेअरनेसचा प्रोग्राम आहे. त्याचबरोबर आपण पंधरा आदिवासी जिल्हयामध्ये नव संजीवनीचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे आपण राबवत आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याबाबतीत आपल्याकडून संरक्षण देण्यात यावे ज्यावेळी मेळघाटमध्ये कुपोषणाचा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी तत्कालिन आरोग्य मंत्री श्री.दिग्विजय खानविलकर यांच्याकडे डॉ.अभय बंग यांची समिती नेमण्याच्या बाबतीत मी सभागृहात आग्रह धरला होता व त्यामुळे ही समिती नेमण्यात आली होती.डॉ.अभय बंग समितीने आपला प्राथमिक अहवाल दिलेला आहे.तो अहवाल सभागृहासमोर सादर करण्यात आला होता....अडथळा.. सन्माननीय मंत्री प्रा.वसंत पुरके यांना मी सांगू इच्छितो की आपण या ठिकाणी आदिवासींच्या कुपोषणासंबधी चर्चा करीत आहोत.शासन तर त्याबाबतीत काही करीत नाही तेव्हा त्यामध्ये आपण तरी लक्ष घालावे.डॉ.अभय बंग यांना आपण महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला होता.डॉ.अभय बंग यांनी आपला प्राथमिक अहवाल शासनाला सादर केला आहे तो अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला होता. माझा प्रश्न विचारण्याचा उद्देश असा होता की,मेळधाट,धारणी,चिखलदरा इत्यादी भागातील कुपोषणाच्या बाबतीत डॉ.अभय बंग यांचा जो पहिला अहवाल सादर झाला आहे त्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे ?डॉ.अभय बंग बाजूला राहिले आणि आता राजमाता जिजाऊ माता बाल संगोपन आरोग्य व पोषण मिशन स्थापन झालेले आहे..

नतर श्री.किल्लेदार

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू....

सगळे महान आहेत. यांच्या सुकाणू समितीमध्ये मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख,उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आहेत. हे सुकाणू भरकटलेले आहेत. कारण सुकाणू समितीची 11 मार्चला स्थापना झालेली आहे, त्यानंतर या सुकाणू समितीला विचार करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. कारण ते बाकीच्या कामामध्ये व्यस्त आहेत. सन्माननीय डॉ.मुंदडा मॅडमना विनंती करतो की, एकदा डॉ.अभय बंग समितीने आपला अहवाल दिल्यानंतर पुन्हा सुकाणू समिती स्थापन करण्याची गरज नाही. त्याचा कशाला डमरू वाजविता ? बजेटमध्ये त्याबाबतचा उल्लेख करा, त्याचा प्रचार करा. आपल्या प्रचारापेक्षा आणि फोटोपेक्षा आदिवासी मुलांचे प्राण वाचवा. आपले डिपार्टमेंट मुलांचे प्राण वाचवत नाही. त्यामध्ये सगळे घोटाळे आहेत, म्हणून बंग समितीने तुमचे डोळे उघडले, रिपोर्ट दिला. त्यावर तुम्ही कोणती कारवाई केली, हा खरा प्रश्न आहे. कारवाई करण्याचे राहिले बाजूला आणि सचिव समिती, सुकाणू समिती, मुख्यमंत्र्याची समिती नेमली जाते. समिती म्हणजे टर्केमायशीनची कॅप्सुल आहे. जेव्हा कामे करावयाची नसतात, तेव्हा समित्या स्थापन केल्या जातात, हा सरकारमधील अनुभव आहे. या प्रश्नावर अभय बंग समितीने दिलेला रिपोर्ट आहे. कदाचित आपल्याला त्यामधील काही गोष्टी मान्य असतील, नसतील. आपण सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंत्री आहात, त्याबाबतची आपण कारवाई करायला पाहिजे. याबाबत पुन्हा दुसरी ही नवीन समिती कशाला पाहिजे ? मा.मंत्री महोदया, आपण डॉक्टर आहात,मंत्री आहात, डॉ. अभय बंग कमिटीचा रिपोर्ट आहे. पुन्हा नव्याने सुकाणू समितीचे लचांड कशाला लावून घेता ? त्यामध्ये कोणाचा पायपोस कोणामध्ये नाही, मिटिंगला ते आले तर हे येत नाहीत, हे आले तर ते येत नाहीत. मंत्री हे अनेक कामामध्ये बिझी असतात. डॉ.बंग समितीचा रिपोर्ट घेऊन यातील प्रत्यक्ष फॅक्टस् फाईंडींग करून कारवाई का करत नाही.? मग आपण पुन्हा असे म्हणाल की, सुकाणू समितीचा अहवाल मिळाला नाही, म्हणून कारवाई केली नाही. सुकाणू समितीतील सदस्य सगळे भरकटलेले आहेत. कोणाला वेळ नाही. आदिवासी मुलांचे मृत्यू होत आहेत. डॉ बंग समितीचा अहवाल आपण सभागृहाला सादर केला होता, त्या आधारावर मेळघाट, चिखलदरा या भागात या समितीने सुचविलेल्या सुचनांप्रमाणे आपण काय कारवाई केली ?

डॉ.विमल मुंदडा : समितीच्या अहवालात बालमृत्यूचे प्रमाण आणि मानवी टिश्युचे जे रिपोर्टींग होते, ते व्यवस्थितपणे झाले पाहिजे, हा त्यांचा प्रमुख मुद्दा होता. त्यामधील सूचनांप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

एसकेके)

डॉ.विमल मुंदडा (पुढे चालू ...

कारवाई करण्यात येत आहे. रिपोटिंग वाढविण्याच्या संबंधातील त्यांचा मुद्दा होता, याबाबत विरोधी पक्षनेत्यांनाही माहीत आहे.

श्री.नितीन गडकरी : डॉ. बंग साहेबांनी येऊन मला सांगितले की, डॉक्टर सहकार्य करत नाहीत, बैठकीला कोणी येत नाहीत, नेमलेल्या लोकांना भत्ते दिले जात नाहीत. कोणाला बैठक बोलवू देत नाहीत. डॉ.बंग यांना 'महाराष्ट्र भूषण' हा किताब देऊन सरकारने गौरव केला. ते डॉ.बंग मला म्हणाले की, सरकारला या समितीचे कामकाज पुढे चालू ठेवण्यास स्वारस्य नाही. त्या समितीचे बोर्ड सचिव डॉक्टर आहेत, ते बैठकीला उपस्थित रहात नाहीत.

डॉ.विमल मुंदडा : मी जबाबदारीने सांगू इच्छिते की, डॉ.अभय बंग साहेबांची मा.मुख्यमंत्र्यांबरोबर दोनवेळा बैठक झाली होती. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या कुटुंबकल्याण विभागाचे प्रधान सचिव यांना त्या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून घेतलेले आहे.जेणेकरुन ज्या काही अडचणी आल्या तर त्या त्यांच्याकडून दूर होतील. महिला बाल कल्याण विभागाचे माजी सचिव श्री गोरडे त्या समितीमध्ये होते. त्यांच्याही बैठका झाल्या. त्यामुळे त्यांना जे अपेक्षित आहे, त्यापध्दतीने करण्यास सांगितलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : डॉ.बंग समितीने रिपोर्ट दिल्यानंतर एक तरी बैठक झालेली आहे काय ?

डॉ.विमल मुंदडा : त्यांच्याबरोबर वारंवार बैठका झालेल्या आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये किंवा बाहेरही आरोग्य विभाग असेल, महिला बाल विकास विभाग असेल, आदिवासी विभाग असेल त्या ठिकाणी दोन-तीन महिन्यामध्ये मी स्वत: चार-पाच बैठका घेतलेल्या आहेत. समितीच्याही चार बैठका झालेल्या आहेत.

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

सभापती : आपण माझ्याकडे लेखी स्वरुपात लिहून द्यावे.

--

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे.

मु.शी. : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा, ग्राहस संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहार वितरणाबाबत " या विषयावरील श्री.विलास अवचट, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनंत तरे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, डॉ.अशोक मोडक, वि.प.स. आणि सर्वश्री सुधीर जोशी, राजेंद्र पाटणी, विजय वडेट्टीवार, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 19 डिसेंबर 2003 रोजी उत्तरित इ ालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 37194 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठवण्यात आली आहे.

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस : कृपया येथे अधिक माहिती छापावी.)

..... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन् 2002-03 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2002-03 चा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचा सन् 2001-02, 2002-03 व 2003-04 चा अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा व बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

****

पृ.शी./ मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी "सातारा जिल्ह्यात गेल्या 8 दिवसांपासून दरोडेखोरांनी घातलेला प्रचंड धुडगूस व केलेली लुटालूट तसेच गेल्या आठवड्यात झालेल्या खुनाच्या घटना " याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होऊ शकत नसल्याने मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र विषय गंभीर असल्याने याबाबत शासनाने निवेदन करावे.

..... एसएस 3 ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

मा.सभापती ...

त्यानंतर सर्वश्री नितीन गडकरी व अन्य सन्माननीय सदस्यांनी "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371(2) च्या अनुषंगाने माननीय राज्यपालांनी 25 फेब्रुवारी, 2005 रोजी शासनाला दिलेल्या निदेशाचा अनुपालन अहवाल आणि सन 2005-06 साठी जिल्हानिहाय पाटबंधारे प्रकल्पां वरील तरतुदींचे स्पष्टीकरणात्मक विवरणपत्र या वर्षीच्या अर्थसंकल्पाबरोबर सभागृहाला सादर केलेले नसणे." याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. मी याबाबत सांगू इच्छितो की, काल दिनांक 21.3.2005 रोजी या संदर्भात शासनाला निदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही होईल. तरी मी या सुचनेस माझी अनुमती नाकारीत आहे ....

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, हा थोडासा गंभीर असा विषय आहे. मला आपले लक्ष एका विशेष गोष्टीकडे वेधावेसे वाटते. अध्यक्ष महाराज, भारतीय घटनेच्या कलम 371(2) खाली राज्याचे तत्कालीन राज्यपाल डॉ.अलेक्झांडर यांनी राज्य सरकारला जे निदेश दिले होते ते दरवर्षी बजेटपूर्वी सभागृहासमोर सादर केले जातात. मागील वर्षी देखील हे निदेश आणि त्याप्रमाणे बॅकलॉग असलेल्याला भागाला, जिल्ह्यांना किती पैसा दिला आहे वा दिला नाही याचा अनुपालन अहवाल असे दोन्ही दिल्याशिवाय बजेटला काही अर्थ उरत नाही. अध्यक्ष महाराज, बजेटमध्ये माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशांचा उल्लेख नसणे, त्याबाबतची कोठल्याही प्रकारची माहिती बजेटमध्ये नसणे ही महामहीम राज्यपालांच्या निर्देशांची अवहेलना आहे. केवळ एवढेच नाही तर लोकशाहीमध्ये बजेटची जी सँक्टीटी आहे त्यानुसार घटनेमध्ये लिहिलेले आहे त्यानुसार भारतीय संसदेने जे बिल पास केले आणि त्याप्रमाणे माननीय राष्ट्रपतींनी राज्यांच्या राज्यपालांना जे अधिकार डेलिगेट केले आहे त्या अधिकारांचा वापर करून राज्यपालांनी जे निदेश राज्य सरकारला दिले आहेत आणि या सभागृहामध्ये देखील राज्याच्या ॲडव्होकेट जनरलनी सांगितले आहे की, राज्यपालांचे हे निर्देश सरकारवर बंधनकारक आहेत आणि ते पाळले गेले नसतील तर ते घटनाबाह्य आहे. .....

(यानंतर श्री.जागडे ...टीटी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

अशा परिस्थितीत या तरतुदींचे पालन केले आहे की नाही ? या बाबतचे निर्देश काय आहेत ? अनुपालन अहवाल दिला पाहिजे. पाटबंधा-यांसाठी किती पैसा दिला आहे. या बद्दलची माहिती आम्हाला मिळालेली नाही. माननीय सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, याच कारणामुळे गेल्या वर्षी दोन ते तीन दिवस कामकाज स्थगित करावे लागले. त्यावेळी त्यावेळचे पीठासीन अधिकारी यांनी जे आदेश दिले आहेत, ते आताही कायम आहेत. असे असताना त्या आदेशांचे पालन करण्यात आले नाही. हे शासन आपले तसेच मा. राज्यपालांनी दिलेले आदेश पाळत नाही. सभापती महोदय, मी विरोधी पक्षाचा सदस्य आहे, विरोधी पक्षनेता आहे. या सभागृहाच्या थोर परंपरा आहेत, पध्दती आहेत. त्या पाळणे हे माझे कर्तव्य आहे. शासनाने या निमित्ताने आपला अवमान केला आहे. आपल्या निर्देशांची अवहेलना केली आहे. मा. राज्यपालांच्या निर्देशांची अवहेलना केली आहे. माननीय राज्यपालांनी दिलेले आदेश तसेच आपण दिलेले आदेश हे शासन पाळत नाही. आतापर्यन्त सतत दोन वर्षे असा प्रकार घडला आहे. पुन्हा पुन्हा तसेच होणे म्हणजे आपला तसेच मा. राज्यपालांचा अपमान शासनाने केला आहे. हे योग्य नाही. माननीय राज्यपालांनी दिलेल्या आदेशाची प्रत व त्या बाबतचा अनुपालन अहवाल देण्याची आवश्यका आहे. It is a part and parcel of the Budget. The Government is supposed to declare this at the time of presenting the Budget to the House. The directions given by His Excellency, the Governor should be supplied to us and the decision given by the Hon. Chairman should be honoured. म्हणून सभागृहासमोर ही सर्व कागदपत्रे जोपर्यन्त येत नाहीत, तोपर्यन्त मला सभागृहाच्या कामकाजात सहभागी होत येत नाही. शासनाने जरुर आपला तसेच राज्यपालांचा अपमान करावा. त्यांनी त्यात सहभागी व्हावे, परंतु मी मात्र त्यामध्ये सहभागी होणार नाही. गेली दोन वर्षे असेच घडले आहे. आपला तसेच मा. राज्यपालांचा अपमान शासनाने केला आहे, हे योग्य नाही. म्हणून जोपर्यन्त आम्हाला ही सर्व कागदपत्रे मिळत नाहीत, तोपर्यन्त आम्हाला सभागृहाच्या कामकाजात भाग घेता येणार नाही. त्यांनी जर लोकशाहीची थट्टा केली तरी मी ती करणार नाही. आपला तसेच माननीय राज्यपालांचा अपमान होणार नाही, हे मला पाहिले पाहिजे. म्हणून या बाबतची सर्व कागदपत्रे आम्हाला मिळाली पाहिजे. काल आपण या बाबत आदेश दिले आहेत, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. स्वाभाविकपणे दोन वेळचे रेकॉर्ड पाहिल्यानंतर असे आदेश आपण दिले असणार. आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

दिलेले आदेश तसेच माननीय राज्यपालांनी दिलेले आदेश हे शासन पाळत नाही. घटनेने दिलेले निर्देश हे शासन पाळत नाही. या ठिकाणी शासनाने नियमांचा भग केला आहे. माननीय अध्यक्षांनी तसेच मा. राज्यपालांनी दिलेले आदेश शासनाने धाब्यावर बसविले आहेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. काळ सोखावत आहे. म्हणून या सभागृहाचे पावित्र्य टिकवावयाचे असेल तर या बाबतची सर्व कागदपत्रे आम्हाला मिळाली पाहिजेत. तसे झाले नाही तर आम्हाला सभागृहाच्या कामकाजात भाग घेता येणार नाही. याची दखल सत्ताधारी पक्षाने घ्यावी. तसेच आम्ही जी मागणी केली आहे, ती मान्य करावी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, गेली दोन वर्षे अंदाजपत्रक मांडल्यानंतर हा मुद्दा समोर येत आहे. गेल्या वेळी ॲडव्होकेट जनरल यांनी सभागृहात येऊन या बाबतची माहिती दिली आहे. नियमाने हे शासनावर बायडींग आहे. आता मात्र झेरॉक्स कॉपी वेळेवर काढल्या जातील. पीठासीन अधिका-यांनी या बाबत दोन वेळा आदेश दिले असतानाही काल कोणीही हो म्हंटले नाही. अजूनही याच्या प्रती आम्हाला न मिळाल्यामुळे आम्हाला आज या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना द्यावी लागली. अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर तीन गोष्टी सभागृहाला सादर होणे आवश्यक आहे. डायरेक्शन्स काय आहेत ? याची प्रत सभागृहाला सादर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जिल्हावार डिस्ट्रीब्युशन होणे आवश्यक होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि गेल्या वर्षीचा अनुपालन अहवाल सुध्दा या ठिकाणी दाखल होणे आवश्यक होते. एवढा साधा शिष्टाचार या सभागृहामध्ये शासनाकडून पाळला जात नसेल तर ती अत्यंत अयोग्य अशाप्रकारची गोष्ट आहे. सर्व कॉस्टिटयुशनल डॉक्युमेंट ही अंदाजपत्रकाशी रिलेव्हंट असल्यामुळे ती सभागृहामध्ये ताबडतोब सर्क्युलेट झाली पाहिजेत असे आपण शासनाला सांगावे अशी माझी आपणाला विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी एकच विनंती करतो की, जसे आपण काल या ठिकाणी शासनाला आदेश दिले होते त्याप्रमाणे विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी चार वेळा शासनाला सांगून सुध्दा शासन ऐकत नाही म्हणून ते बिच्चारे सभागृहातून निघून गेले. हा विषय आपल्या सभागृहाशी संबंधित नाही, त्या सभागृहाच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करण्याचा आपल्याला अधिकार नाही. विधानसभेच्या कामकाजाशी संबंधित माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशासंबंधी आपल्याला काहीही बोलावयाचे नाही. या सभागृहामध्ये आम्ही काल हा विषय उपस्थित करुन शासनाला याची आठवण करुन दिली होती तरी सुध्दा शासनाने अजून कार्यवाही केली नाही. शासनाजवळ जर झेरॉक्स मशीन नसेलतर आमच्या विरोधी पक्षनेत्यांच्या कार्यालयामधील झेरॉक्स मशीनवर 50 प्रती तात्काळ काढण्याची आपण व्यवस्था करु. सभापती महोदय, किती लहानशी गोष्ट आहे? प्रश्न कागदपत्राचा नसून सॅन्क्टिटीचा आहे, आपल्या सन्मानाचा आहे, भारतीय घटनेचा आहे, भारतीय घटनेमध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा आहे. हे सभागृह नियमाने, कॉंस्टिटयुशनमधील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे चालते. एकेक विषयासाठी विधीमंडळाने नियम तयार केले आहेत, आणि त्या नियमांना आधार भारतीय घटनेचा आहे. त्या आधारावर माननीय राज्यपाल महोदयांनी निदेश दिले आहेत. आणि आपण सुध्दा काल निदेश देऊन सुध्दा हे शासन नॉन सिरियसनेस आहे. काल आपण सांगितल्याप्रमाणे आज हे डॉक्युमेंट आम्हाला मिळतील असे वाटले होते. परंतु आपण केलेल्या सूचनेला त्यांनी केराची टोपली दाखविली. सभापती महोदय, तसे पाहिलेतर हे कागदपत्र साधे आहेत ते आज कां देता आले नाहीत? काल आपण आदेश देऊन सुध्दा दिले नाहीत. आणि आज आपणास पुन्हा आदेश देण्यासाठी आणि शासनाला सांगण्यासाठी आम्हाला या बाबतीत खंबीर भूमिका घ्यावी लागत आहे. माझी आपणास विनंती आहे की, जोपर्यंत या सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्री किंवा माननीय मुख्यमंत्री येऊन याबाबत निवेदन करीत

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

नाहीत तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज आपण स्थगित करावे. आणि या पुढील कामकाज घेऊ नये. कारण आम्हाला हे आता सहन होणार नाही. हा आमचा घटनात्मक अधिकार आहे. माननीय राज्यपालांचा व सभापती महोदय आपलाही सन्मान राखला गेला पाहिजे. एकीकडे आपण माहितीच्या अधिकाराची भाषा बोलता, आणि दुसरीकडे सभागृहात दोन वर्षापासून मागणी करुन सुध्दा कागदपत्रे दिली जात नाहीत. सभापती महोदय, आपण आदेश देऊन सुध्दा आपल्या आदेशाचे पालन केले जात नाही. लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्या सहनशीलतेच्या हे पलिकडे गेले आहे म्हणून आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी मी विनंती करतो.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज आपण 15 मिनिटांकरिता तहकूब करावे. झेरॉक्स मशीन बंद आहे काय, याबाबत आपण मंत्रिमहोदयांना विचारावे...

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी व माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत शासनाच्या वतीने माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करु नये. ती कागदपत्रे वितरीत करीपर्यंत लक्षवेधी सूचना व सभागृहाचे अन्य कामकाज सुरु ठेवण्यात यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, काल आपण आदेश दिले. त्यानंतर, मंत्रिमहोदय त्यांच्या विभागाच्या अधिकाऱ्यांना साधे आदेश सुध्दा देऊ शकले नाहीत?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते म्हणत आहेत त्याप्रमाणे ती माहिती देण्याची व्यवस्था शासनातर्फे केली जाईल. तोपर्यंत पुढील कामकाज चालू ठेवावे अशी माझी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला मागचा अनुभव चांगला नाही. खालच्या सभागृहामध्ये माननीय अध्यक्षांनी चार वेळा आदेश देऊन काय झाले हे आपल्याला माहीत आहे...

सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी खालच्या सभागृहाचा संदर्भ देण्याचे कारण नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मागील दोन वर्षापासून आपण आदेश देऊन सुध्दा हे शासन त्यांचे पालन करीत नाही...

अशोधित प्रत / शोधित नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सभागृहाला जी माहिती पाहिजे ती तयार आहे. आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे आम्ही ती माहिती सर्क्युलेट करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण काल दिलेले आदेश मंत्रिमहोदयांपर्यंत पोहोचले नाहीत? हे काय सुरु आहे? मंत्रिमहोदयांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना आदेश प्राप्त झाले नाहीत?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण आदेश दिल्याप्रमाणे संपूर्ण कागदपत्रे तयार आहेत. आपण ती कागदपत्रे सर्क्युलेट करावयास परवानगी दिल्यास ती वाटायला सुरुवात केली जाईल...

श्री. नितीन गडकरी : ठीक आहे, ती वाटायला सुरुवात करा, तोपर्यंत 15 मिनिटे सभागृह स्थगित करा. माननीय मंत्रिमहोदय, मी हात जोडून आपली क्षमा मागतो. काल माननीय सभापतींनी या संदर्भात आदेश दिले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

आता माननीय सभापतींचे पुन्हा आदेश घेण्याची कोणत्याही प्रकारे वैधानिक आवश्यकता नाही. आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु झाली. आता 2 वाजून 20 मिनिटे झालेली आहेत. म्हणजे सभागृह सुरु होऊन जवळपास तीन तास झालेले आहेत. या तीन-चार तासामध्ये आपण आम्हाला केव्हाही ते वैधानिकरित्या सर्क्युलेट करु शकला असतात. माननीय सभापतींनी कालच आदेश दिला आहे. आम्ही कालच आमच्या भावना व्यक्त केल्या. पण अजूनपर्यंत तुम्ही आम्हाला माहिती दिलेली नाही. माफ करा आणि आता सांगत आहात की, तुम्ही आदेश दिला की मी लगेच वाटतो. म्हणजे काय ? तुम्ही "होय" म्हणा म्हणजे मी वाटतो. म्हणजे काय ? त्यांनी कालच होय म्हटलेले आहे. तुमचा विभाग तुम्हाला काही सांगतो की नाही हे मला माहिती नाही. त्यांनी कालच सांगितलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. एक म्हणजे तीन कागद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी त्यांनी आपली परवानगी मागावी आणि आपण ती परवानगी द्यावी. 1) दि.25 फेब्रुवारी 2005 चे माननीय राज्यपालांचे निदेश 2) या वर्षासाठी त्या निदेशाप्रमाणे जिल्हावार जे काही ॲलोकेशन केलेले आहे ते. 3) यावर्षाचा अनुपालन अहवाल म्हणजे 2004-2005 या वर्षाचा अनुपालन अहवाल. हे तीनही डॉक्युमेंटस् ठेवण्यासाठी त्यांनी आपली परवानगी मागावी आणि आपण ती द्यावी. मग ते कागद पाच मिनिटामध्ये सर्क्युलेट होतील.

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : होय. आम्ही तयार आहोत. द्या.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये ज्या कागदपत्रांच्या संदर्भात चर्चा झाली किंवा सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, त्याच्या अनुषंगाने अर्थ विभागाने आणि नियोजन विभागाने संपूर्ण कागदपत्रे तयार केलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याप्रमाणे ताबडतोब ते सर्क्युलेट केले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पण त्यापूर्वी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी आपण परवानगी मागितली . . . .

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरता आम्ही आपली परवानगी मागतो. आपण परवानगी दिल्यादिल्या ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

. . . .2 व्ही-2

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती : काल दिनांक 21 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ते आपण कागद पटलावर ठेवले आहेत असे म्हटल्याशिवाय सर्क्युलेट होणार नाही.

श्री.अजित पवार : अहो, मी आता म्हटले . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे त्यांच्याबाबतीत झाले, पण आपण ते कागद पटलावर ठेवले आहेत असे म्हटल्याशिवाय त्याचे वाटप होईल का ?

सभापती : काल दिनांक 21 मार्च 2005 रोजी सदनामध्ये ज्यावेळेला याबाबतीत चर्चा झाली. त्यावेळेला माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरीसाहेब, आपण याबाबतीत एक मुद्दा उपस्थित केला आणि रेफरन्स असा सांगितला की, गेल्या दोन वर्षामध्ये अशी परिस्थिती झालेली आहे. आपले त्यावेळचे म्हणणे असे होते की, "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371(2) च्या अनुषंगाने माननीय राज्यपालांनी 25 फेब्रुवारी 2005 रोजी शासनाला दिलेल्या निदेशाचा अनुपालन अहवाल आणि सन 2005-2006 साठी जिल्हानिहाय पाटबंधारे प्रकल्पांच्या तरतूदीचे स्पष्टीकरणात्मक विवरणपत्र यावर्षाच्या अर्थसंकल्पाबरोबर सभागृहाला सादर करणे आवश्यक आहे." असे ज्यावेळेला तुम्ही सांगितले, त्यावेळेला शासनाने यापध्दतीची दोन डॉक्युमेंट याठिकाणी सदनाला सादर करणे आवश्यक आहे असे मी निदेश दिलेले आहेत. ते काल दिलेले माझे निदेश आहेत तसेच आहेत. फक्त याठिकाणी आता माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरीजी, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि माननीय मंत्री श्री.अजित पवारसाहेब यांनी जी चर्चा केली, त्या अनुषंगाने त्यांनी असे सांगितले की, सरकारची अशी इच्छा आहे, हे जे दोन अहवाल आहेत, हे अहवाल ते पटलावर ठेवतील. त्याला मी परवानगी देतो आणि ज्यावेळेला ते अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतील त्यावेळेला तुमच्यासमोर ते अहवाल पटलावर ठेवले असे मी जाहीर करतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मग दहा मिनिटे थांबण्याची गोष्ट झाली.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ते आता म्हणतात की, आम्हाला तुमचे आदेशच मिळालेले नाहीत. तुम्ही काल आदेश दिलेले आहेत, ते त्यांना माहितीच नाही. त्यांची माहिती अशी आहे की, कालचे आदेश त्यांच्यापर्यंत पोहोचलेलेच नाहीत. हा अजून गोंधळ आहे. हा

. . . .2व्ही-3

श्री.नितीन गडकरी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सँटीटीचा प्रश्न आहे. हा आपल्या सन्मानाचा प्रश्न आहे. हा भारतीय घटनेचा प्रश्न आहे. माझी हात जोडून विनंती आहे की, 15 मिनिटासाठी सभागृह स्थगित करावे. त्यांना कागद आणू द्या. आपण परवानगी द्या. हे तीनही आदेश आम्हाला द्या.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्यापूर्वी आपल्या हातात कागद पाहिजे, आपली परवानगी घ्यावयास पाहिजे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आताच आपण चर्चा करीत असताना सांगितले की, मी तशा प्रकारे शासनाला सांगितलेले आहे. काल आपण सांगितलेले आहे. आजचा दिवस अजून संपलेला नाही. आजचे कामकाज संपण्याच्या आत ही संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अजित पवार..

अध्यक्ष महाराज, या सभागृहात शेवटी चर्चा झाली पाहिजे. परंतु चर्चा होत असतांना काही कागदपत्र ठेवण्याकरिता थोडासा तरी अवधी मिळाला पाहिजे.काल आपण सांगितल्यानंतर आज ती माहिती सभागृहासमोर ठेवण्याची शासनाची तयारी आहे. विभाग त्याच्या संदर्भातील संपूर्ण माहिती थोडया वेळात सभागृहासमोर ठेवणार आहे.

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. आम्ही असे म्हणतो की, It is a part and parcel of the budget. आम्ही सहनशील आहोत. आम्ही सहन केले. आम्ही म्हटले ठीक आहे. आता ती माहिती द्या. वास्तविकपाहता तुम्ही ही माहिती बजेटबरोबरच द्यावयास पाहिजे होती. त्यासाठी आम्ही आपल्याला वारंवार सांगितले असतांना देखील तुम्ही आमच्या बजेटच्या बॅगमध्ये ती माहिती टाकलेली नाही. याबद्दल दिलगिरी व्यक्त करा वगैरे असे आम्ही तुम्हाला सांगितलेले नाही. ही माहिती दिली पाहिजे असे मा. अध्यक्षांनी सांगितले आहे हे तुम्हाला काल कळले. माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या दोन-चार पानाच्या पत्राची झेरॉक्स करणे, जिल्याला किती पैसे मिळतात याच्या ॲलोकेशनचा अहवाल देणे आणि अनुपालन अहवाल देणे, या तीन गोष्टी देणे एवढया कठीण आहे काय? श्री. अजित पावारसाहेब तुम्ही मागच्या वर्षी पाटबंधारे मंत्री होतात. त्याआधी श्री. राजेंद्र दर्डा हे अर्थ राज्यमंत्री होते. श्री. जयंत पाटील सहेबांना माहीत आहे. तुम्हाला माहीत आहे. तुम्ही अनुभवी आहात. दर वर्षी हेच नाटक कां? पुन्हा पुन्हा हेच करायचे का? सभापती महोदय, जोपर्यंत हे तीन डाक्युमेंट मिळत नाहीत, तोपर्यंत आम्ही सभागृहाच्या कामकाजात भाग घेणार नाही. हे डाक्युमेंट मिळेपर्यंत अध्यक्ष महाराज, आपण हे सभागृह स्थगित करा.हा वेळेचा प्रश्न नाही, हा सभागृहाचे पावित्र्य भंग करण्याचा प्रश्न आहे. बजेटच्या बरोबर ते डाक्युमेंट द्यावयास पाहिजे, ते तुम्ही देत नाही. वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारुन त्या डॉक्युमेंटची सॅन्टीटी कमी करता. सभापतीचा आदेश पालन करीत नाही, राज्यपालांच्या आदेशाचे पालन करीत नाही, आणि आम्हाला बजेट बरोबर जे कागदपत्र द्यावयास पाहिजेत ते ही देत नाही. आणि वरुन आम्ही देणार आहोत तुम्ही वाट पाहा असे म्हणत असाल तर हा घटनेचा अवमान आहे. अध्यक्ष महोदय, आम्ही हे सहन करु शकत नाही. जोपर्यंत हे कागदपत्र मिळत नाहीत, तोपर्यंत सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यात आम्हाला स्वारस्य नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एका भागात पैसे जितक्या लवकर मिळताता त्याच्या ऑपोझिट डायरेक्शनने येथे कॉन्स्टिटयुशनल ऑर्डर मिळायला सुध्दा येथे भांडण करावे लागते. शिवाय वातावरण असे होत आहे की, आम्हीच काही तरी त्रास देतो. ही कॉन्स्टिटयुशनल ऑर्डर आहे आणि तिचे सर्क्युलेशन हे बाईंडींग आहे. कम्प्लसरी आहे, हे ॲडव्होकेट जनरलने सांगितलेले आहे. त्यामुळे दोन वर्षे या सभागगृहात दोन-दोन दिवसाचा तीन-तीन दिवसाचा वेळ या कामी खर्च झाल्यानंतर ते ले झाले. ते शोभनीय नव्हते. ते योग्य नाही. म्हणून या वेळेला आम्ही मागणी न करता आणि सभापती महोदय, आपण आदेश न देता ते अंदाजपत्रकाच्या भाषणाबरोबर सर्क्युलेट व्हावयास पाहिजे होते.अंदाजपत्रकावर दोन तास भाषण झाले. त्यामध्ये यासंबंधात एका ओळीचा सुध्दा उल्लेख नाही. आणि जो उल्लेख आहे, तो डायरेक्शनच्या विरोधात आहे. पण तो उल्लेख आहे. माझे म्हणणे असे की, अंदाजपत्रकावरील हे भाषण नाही. किमान कॉन्स्टिटयुशनल ऑर्डर आम्हाला मिळाली पाहिजे. त्याच्यासाठी जणूकाही आम्हीच त्रास देत आहोत असे वातावरण निर्माण होणे हे काही बरोबर नाही. सभापती महोदय, आपल्याला विनंती अशी आहे. आपण जे सांगितले ते बरोबर आहे. याचे कारण आपल्या हाती ती कॉपी असल्याशिवाय ती सभागृहाच्या पटलावर ठेवलेली आहे असे म्हणणे बरोबर नाही. पध्दत अशी आहे की, ती कॉपी आपल्या समोर दिली पाहिजे, सायटेशन आले पाहिजे, आपली परवानगी घेतली पाहिजे. सभागृहासमोर ते ठेवले आहे असे म्हटले पाहिजे. तर आम्हाला ते पावते नाही तर पावत नाही. अर्थात तो एकंदर नियमांचा भाग आहे. अध्यक्ष महाराज, माझी आग्रहाची विनंती आहे की, ही अतिशय दु:खद अशा प्रकारची गोष्ट आहे. "Constitutional orders relating to the budget allocation not accompanied" ही गोष्ट काही चांगली नाही. म्हणून निश्चितपणाने आपण त्यांची अडचण समजून घ्या, खरोखरच काही अडचण असेल तर आम्ही सुध्दा चर्चा करायला तयार आहोत, यायला तयार आहोत. खरोखरच अडचण असेल तर अध्यक्ष महाराज, ते सुध्दा करता येईल. पण दोन-दोन वर्षे तसेच होऊन पुन्हा तिस-याही वर्षी तसेच होणे ही गोष्ट काही शोभनीय नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, भारतीय घटनेप्रमाणे माननीय अर्थमंत्र्यांनी जे बजेट महाराष्ट्राच्या विधानसभेत, विधान परिषदेत सादर केले आहे ते आपण कम्प्लीट ऐका. त्या बजेटला महाराष्ट्राच्या महामहिम राज्यपालांनी, राष्ट्रपतींनी दिलेल्या आदेशानुसार ज्या डायरेक्शन दिलेल्या आहेत, त्या घटनात्मक डायरेक्शन आहेत. त्या डयरेक्शनचा उल्लेख बजेटमध्ये नाही, त्याची कॉपी बजेटच्या पुस्ताकात नाही. मग हे बजेट राज्यपालांच्या डायरेक्शनविना असलेले बजेट हे डॉक्युमेंट कम्प्लीट बजेट आहे काय? आपण मला संरक्षण द्या. या विषयावर हे कम्प्लीट बजेट आहे काय? हे बजेट कम्प्लीट होऊ शकत नाही. महामहिम राष्ट्रपतींनी राज्यपालांना डेलिगेट केलेल्या पॉवरप्रमाणे या डायरेक्शन सरकारला देण्यात आलेल्या आहेत, त्याचे प्रतिबंब बजेटमध्ये आले पाहिजे. त्या करिता रिफ्लेक्ट झालेल्या या डायरेक्शन्स आहेत. They are part and parcel of the budget. These directions are issued by the Governor at the time of preparation of the budget..दिनांक 22 फेब्रुवारी रोजी माननीय राज्यपालांनी शासनाला डायरेक्शन दिलेल्या आहेत.

प्रथम सौ. रणदिवे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

याचे कारण असे की, मार्चमध्ये तुम्ही बजेट तयार करता. ते बजेट तयार करण्याच्या आधी माननीय राज्यपालांनी या डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. त्याचा यामध्ये उल्लेख नाही. त्याचा कागद दिलेला नाही. त्याचे पत्र दिलेले नाही. त्यांची माहिती दिलेली नाही. त्यांची कॉपी दिलेली नाही. मग हे बजेट पूर्ण कसे होईल ? घटनेप्रमाणे हे पूर्ण बजेट कसे होऊ शकते ? याचे उत्तर आपण द्यावे. सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. अशा प्रकारे अनकॉन्स्टीटयूशनल पापात आम्ही सहभागी होऊ इच्छित नाही. त्यांना जे व्हायोलेशन करावयाचे असेल ते त्यांनी करावे. त्यांचे जे काम आहे त्यांनी ते करत राहावे. याबाबतीत जे बोलावयाचे आहे ते आम्ही चर्चेच्या वेळी बोलू पण ती कागदपत्रे मिळण्याचा आमचा अधिकार आहे. जे सरकार या ठिकाणी माहितीच्या अधिकाराचे बिल पास करते ते सरकार बजेटबरोबर डायरेक्शन्सच्या कॉपीज देखील इश्यू करीत नाही. यापेक्षा लोकशाहीमध्ये आणखी कोणते दुर्दैव असू शकते ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. या कॉन्स्टीटयूशनल ऑर्डरबद्दल किंवा माननीय राज्यपालांच्या आदेशाबद्दल जर त्यांच्याकडे काही माहिती उपलब्ध नसेल तर तसे सांगावे. परंतु जर त्यांनी अशा प्रकारचे आदेश यांना दिले असतील तर त्याच्या प्रती या बजेटबरोबरच आम्हाला मिळणे हा या सदनाचा हक्क आहे. याचा त्यांनी खुलासा करावा.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आज दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक चार वर लक्षवेधी सूचनेची बाब आहे. आपल्यामार्फत सभागृहाला आणि आपल्यालाही माझी विनंती आहे की, आपण लक्षवेधी सूचना घ्याव्यात. त्यानंतर 2004-05 च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेची बाब आहे. पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होण्याच्या आत आपली परवानगी घेऊन, जी माहिती सभागृहाने मागितलेली आहे, सन्माननीय सदस्यांनी मागितलेली आहे ती आम्ही सर्क्युलेट करु. ती माहिती आपुणा सगळयांच्या समोर सादर केली जाईल.. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्दा उपस्थित केला. काल राज्याच्या माननीय अर्थमंत्र्यांनी आणि अर्थराज्यमंत्र्यांनी राज्य शासनाचे यंदाच्या वर्षीचे बजेट सर्वांच्या समोर ठेवलेले आहे. त्याच्या संदर्भात चर्चा होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड/मिठा

श्री. अजित पवार ....

ती चर्चा होत असताना बजेटबद्दल माननीय विरोधी पक्ष नेत्यांना जे काही वाटते ते त्यांनी सांगावे. उत्तराच्या भाषणामध्ये त्यासंदर्भात राज्य शासनाची भूमिका या ठिकाणी स्पष्ट केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : आपण समजून घ्यावे. भारतीय घटनेप्रमाणे आपण बजेट मांडत आहात. महाराष्ट्राच्या माननीय राज्यपाल महोदयांनी माननीय राष्ट्रपतींनी दिलेल्या निदेशाप्रमाणे दिनांक 22 फेब्रुवारीला निदेश दिलेले आहेत. ते निदेश बजेटपूर्वी दिलेले आहेत. These are the directions issued by the Governor to the State Government. तुम्ही ते पाळा किंवा नका पाळू. काय करावयाचे तो तुमचा प्रश्न आहे. माझा एकच मुद्दा आहे की, तुम्हाला दिलेल्या डायरेक्शन्स या बजेटमध्ये प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. कारण तुम्हाला त्या कॉन्स्टीटयूशनल डायरेक्शन्स मिळालेल्या आहेत. तुम्ही आम्हाला ते डॉक्युमेंट्स तरी द्यावेत. ते द्यावयाचे आहे की नाही हे आपण आम्हाला सांगावे. या डायरेक्शन्स तुम्ही आम्हाला देत नाहीत. It is a breach of the Constitution. माननीय राज्यपालांच्या डायरेक्शन्सशिवाय तुमचे बजेट पूर्ण होऊ शकत नाही. कारण The Governor has issued the directions to the Government i.e. the Finance Minister.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी ज्या डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत त्याचे तंतोतंत पालन या बजेटमध्ये केलेले आहे आणि ज्या डायरेक्टीव्हज आपण म्हणत आहात त्या थोडयाच वेळात आपल्याकडे ....

श्री. नितीन कडकरी : आपण असे का बोलत आहात ? मी या पदाचा राजीनामा देणास तयार आहे. मी सभागृहातून जातो. तुम्ही माननीय राज्यपालांच्या डायरेक्शन्सचे पालन केले आहे असे म्हणत आहात. मी तुम्हाला बोलत नाही. तो विषय मी चर्चेमध्ये बोलताना काढीन. आता हा विषय त्या सर्व कागदपत्रांचा आहे. The directions issued by the Governor are under Presidential Order which is a part and parcel of the budget. Either you submit it or not. तुमचे पाप पुण्य तुमच्या बरोबर आहे. But, you have to place it before the House as it is a part and parcel of the budget.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत की, माननीय राज्यपालांच्या डायरेक्शन्सचे पालन केलेले आहे. आता बजेटची जी मोठी बॅग मिळाली त्यामध्ये दोन पानांचा भार भारी झाला असता काय ? डायरेक्शन्स काय आहेत हे आम्हाला कसे कळेल ? डायरेक्शन्स काय आहेत आणि त्याचे पालन झाले की नाही हे जाणून घेण्याचा आम्हाला अधिकार आहे ना ? गेली दोन तीन वर्षे सातत्याने सभागृहाचे दोन दोन, तीन तीन दिवस यामध्ये जात आहेत. मला या गोष्टीचे दु:ख वाटते. घटनेच्या कलम 371(2) अन्वये माननीय राष्ट्रपतींनी आदेश काढावयाचे आणि माननीय राष्ट्रपतींनी दिलेल्या आदेशांचा वापर करुन माननीय राज्यपालांनी निदेश काढल्यानंतर ते आम्हाला मिळत नाही. कालचे जाऊ द्या. तुम्ही काल आदेश दिले आणि आम्ही आज नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. ती सूचना एक तास अगोदर विभागाकडे जाते. त्यामध्ये आम्ही स्पष्ट म्हटले आहे की, या तीन गोष्टी देणे हे घटनात्मकदृष्टया बंधनकारक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सभागृहाच्या पटलावर ठेवले असे म्हणण्यामध्ये आपली अशी अडचण आहे की, आपल्यासमोर सुध्दा ती प्रत आलेली नाही. मग माझा प्रश्न आहे की, ही गोष्ट अत्यंत अशोभनीय वाटते. या सभागृहात बसण्यास आम्हाला संकोच वाटते.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मा.विरोधी पक्ष नते श्री.नितीन गडकरी आणि या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.बी.टी.देशमुखसाहेब यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत कोणचेही दुमत नाही. कारण 371 (2) अन्वये राज्यपालांचे निदेश या सभागृहात वितरित केले पाहिजेत. ही भूमिका गेल्यावेळी याठिकाणी उपस्थित केली होती. ही कागदपत्रे न देण्यामागे सरकारचा कोणताही हेतू नाही. मा.मंत्रिमहोदयांनी सभागृहाचे कामकाज पूर्ण होण्यापूर्वी संबंधित कागदपत्रे वितरित केली जातील असे सांगितले आहे. त्यामुळे काही हरकत राहील असे मला वाटत नाही. जे आवश्यक आहे ते केले पाहिजे हा मुद्दा मान्य केला तरी सभागृहाचे कामकाज पूर्ण होण्यापूर्वी ती कागदपत्रे सादर होण्याचा प्रश्न आहे. पण घटनात्मक मुद्दे उपस्थित करुन सभागृहासमोरील अन्य विषयांची चर्चा थांबवू नये असे माझी दोन्ही मा.सदस्यांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मा.सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना एक वकील म्हणून लहानसा प्रश्न विचारतो. असे म्हणतात की, कायदा आंधळा असतो, गाढव असतो, त्याला एव्हिडंस आणि ॲक्ट समजतो. भारतीय घटनेप्रमाणे जी गोष्ट बंधनकारक आहे आणि ती केली नाही म्हणजे आपण भेळ खाताना विसरुन गेलो असा मुद्दा आहे काय याचे उत्तर मा.सदस्यांनी द्यावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : 371 (2) च्या अनुषंगाने राज्यपालांनी जे निदेश दिले आहेत ते वितरित केले पाहिजे हे मी मान्य करतो. प्रश्न असा आहे की, ते आता मिळाले पाहिजेत. यासंबंधी काल मा.सभापतींनीही निदेश दिलेले आहेत. त्यानुसार ते दिले जातील.

श्री.नितीन गडकरी : काल बजेट मांडताना दिले नाही तरीही आम्ही बजेट थांबविले होते काय ? ही कागदपत्रे किती महत्वाची आहेत यासाठी मी घटनेतील तरतूद वाचून दाखवितो. यामध्ये असे म्हटले आहे की, "Special provision with respect to the States of Maharashtra and Gujarat.-

2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK

श्री.नितीन गडकरी...

(2) Notwithstanding anything in this Constitution, the President may by order made with respect to the State of Maharashtra or Gujarat, provide for any special responsibility of the Governor for-

(a) the establishment of separate development boards for Vidarbha, Marathwada, and the rest of Maharashtra or, as the case may be Saurashtra, Kutch and the Gujarat with the provision that a report on the working of each rest of these boards will be placed each year before the State Legislative Assembly;

(b) the equitable allocation of funds for developmental expenditure over the said areas, subject to the requirements of the State as a whole;"

सभापती महोदय, राज्यपालांना ज्या पॉवर दिलेल्या आहेत त्या संवैधानिक पॉवर्स आहेत. त्या 22 फेब्रुवारीलाच का दिल्या जातात ? आजपर्यंत तिन्ही वर्षी फेब्रुवारीलाच त्या का मिळतात ? याचे कारण असे की, मार्च महिन्यात बजेट सादर केले जाते म्हणून दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात ऑर्डर्स मिळतात. त्या ऑर्डर्स का दिल्या जातात ? सरकारचे आर्थिक प्रतिबिंब म्हणजे काय ? हे बजेट आहे. ते बजेट कोण देतो ? अर्थमंत्री देतात. बजेट कोणाचे आहे ? राज्याचे आहे. त्याचे प्रतिक कोण आहे ? राज्याचे अर्थमंत्री आहेत. निदेश कोणाला मिळाले ? म्हणजे ते कोणाकडे रिसिव्ह झाले ? नियोजन विभागाने राज्यपालांचे निदेश रिसिव्ह केले. त्या नियोजन विभागाने निदेश इश्यू केल्यानंतर ते बजेटपूर्वी प्राप्त झाल्यानंतर त्यात काय करावयाचे, काय करावयाचे नाही, किती ठेवावयाचे हा अधिकार तुमचा आहे, असे कोठेही लिहिलेले नाही. घटनेप्रमाणे तुम्हाला पाळावयाचे आहे किंवा नाही, त्याप्रमाणे चालावयाचे आहे की नाही हे पापपूण्य तुमचे आहे. दिलेले निदेश संवैधानिक आहेत. बजेट हा संवैधानिक आयटम आहे. मनी बिलसंबंधी येथे व्याख्या इ ालेली आहे. ते कोणी द्यावे, कसे द्यावे याबद्दल भारतीय घटनेमध्ये व्याख्या आहे. त्या मनी बिलपूर्वी राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत ते तुमचे प्रतिबिंब आहे. तुम्हाला आवडो न आवडो तुम्हाला काय करावयाचे आहे ते करावे. मा.अर्थराज्यमंत्री आदरणीय डॉ.देशमुख म्हणाले की, आम्ही कागदपत्रे दिलेली आहेत. त्यासंबंधी चर्चेच्यावेळी काय चिंधडया उडवावयाच्या आहेत त्या उडवू.

नंतर श्री.शिगम..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकाची नाही

शिगम

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...) 2.40

ते तीन डॉक्युमेंट आम्हाला द्या. तीन डॉक्युमेंट हा आरसा आहे. तुम्ही काय केले हे सिध्द करण्यास ते पुरेसे आहे. आपण राईट ऑफ इन्फॉर्मेशन मान्य केलेला आहे. काल आम्हाला डॉक्युमेंट उपलब्ध झाले नाही. आज तरी ते उपलब्ध व्हावे. पाहिजे तर ते डॉक्युमेंट अर्ध्या तासाने द्यावे. हे डॉक्युमेंट न देणे हे घटनाबाह्य वर्तन आहे. सभापती महोदय, मी आपणास विनंती केली. कामकाज चालू देणार नाही असेही सांगितले. सातत्याने दोन वर्षे असे प्रकार घडलेले आहेत. मा.सभापतींनी हे डॉक्युमेंट ताबडतोबीने द्यावे असे सांगितले. वास्तविक पाहता बजेट मांडण्याच्या वेळी हे डॉक्युमेंट मिळावयास पाहिजे होते. परंतु काल ते मिळाले नाहीत. म्हणून हे बजेट पूर्ण नाही. मा. राज्यपालांच्या डायरेक्शन्स असल्या शिवाय बजेटची प्रक्रिया शंभरटक्के पूर्ण होत नाही. या सभागृहाची सॅन्क्टीटी मेन्टेन करण्याची आवश्यकता आहे. म्हणून ही तीन डॉक्युमेंट ताबडतोबीने द्यावीत आणि नंतर पुढील कामकाज घ्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. अजित पवार : मी सभागृहाला वारंवार विनंती करीत आहे की, आजच्या चार लक्षवेधीवरील कामकाम संपण्याच्या आत काल सांगितलेली माहिती पटलावर ठेवण्यात येईल. आता लागलीच बजेटवर चर्चा होत नाही. माझी मा. सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि मा. विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांना विनंती आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : याप्रकरणी अधिका-यांना जबाबदार धरा. दरवर्षी त्याच त्याच चुका ते करीत आहेत.

श्री. अजित पवार : लक्षवेधीवरील कामकाज चालू ठेवावे. ते कामकाज संपण्याच्या आत संपूर्ण कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : काल माझे मित्र अर्थ राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख हे पहिल्यांदाच बजेट मांडत होते. त्यामुळे त्यांना अडथळा करण्याची माझी इच्छा नव्हती. मी त्यावेळी शांत राहिलो.

श्री. अजित पवार : आपण लक्षवेधीवरील कामकाज घेऊ...

प्रा. बी.टी.देशमुख : माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की, मागील दोन अडीच वर्षे हा प्रकार सातत्याने सुरु आहे. सभापती महोदय, आपण यासंदर्भात आदेश दिलेत. आम्ही थांबलो.गेल्या वर्षी सुध्दा हाच प्रकार झाला. कॉन्स्टीट्युशनल ऑर्डर्सच्या संदर्भाने या सभागृहामध्ये कागदपत्रे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिगम

(प्रा. बी.टी.देशमुख पुढे सुरु...

जाणूनबुजून न देणे ही गोष्ट आक्षेपार्ह आहे. सभापती महोदय, मी संरक्षण मागतो. प्रादेशिक असमतोलाच्या बाबतीत यादेशातील हाएस्ट ॲथॉरिटीने दिलेले आदेश सर्क्युलेट केले जात नाहीत अशी मा.सदस्यांच्या मनामध्ये भावना निर्माण झालेली आहे. अशा प्रकारे दरवर्षी दोन-दोन तीन-तीन दिवस सभागृहाचे कामकाज थांबविण्यासंबंधी विनंती करावी लागते. सभागृहाची सॅन्क्टीटी राहाण्याच्यादृष्टीने हे डॉक्युमेट् शासनाने दिले पाहिजे. लक्षवेधी सूचना नेहमीच होत असतात. परंतु आवश्यक असणारे डॉक्युमेंट सभागृहाला सादर न करणे ही गोष्ट बरोबर नाही.

सभापती : आजही दोन्ही बाजूकडून या विषयावर सविस्तर भाष्य करण्यात आले आहे. घटनेच्या अनुच्छेद 371(1) आणि (2)च्या अनुषंगाने मा. राज्यपालांनी 25 फेब्रुवारीला जे आदेश दिले ते आदेशही बजेटचा भाग होतो असे मा.सदस्यांनी याठिकाणी मत व्यक्त केलेले आहे. त्याच बरोबर बजेट मांडत असताना पाटबंधारे विभागाने ज्या जिल्हानिहाय तरतूदी केलेल्या आहेत त्या तरतुदीचे स्टेटमेंट सादर करणे आवश्यक आहे. गेली दोन वर्षे या संदर्भात सभागृहामध्ये सातत्याने चर्चा केलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.सभापती...

एक वेळा आपण राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांना या सभागृहात पाचारण केले होते आणि त्यांचे याबाबतीतील मत या सभागृहात आपण नोंदवून घेतले होते. या सगळया पार्श्वभूमीचा मी विचार केला आहे. मला वाटते सन्माननीय मंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितल्या प्रमाणे हे डॉक्यूमेंट शासनाला देण्यामध्ये अडचण नाही, अशी परिस्थिती नाही. ते डॉक्यूमेंट दोन मिनिटांमध्ये देण्यास अडचण नाही. 15 मिनिटांमध्ये देण्यास अडचण नाही. म्हणून मला असे वाटते की, शासनाने याबाबतीत यत्किंचितही विलंब न करता तातडीने दोन्ही डॉक्यूमेंट हे पटलावर ठेवण्याकरिता माझ्याकडे दिले तर त्यातील अत्यंत महत्वाचा जो भाग आहे, तो शासनाने कृतीने पाठविलेला असेल असे मला वाटेल. म्हणून मी सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांना पुन्हा सांगेल की, याबाबतीत तुमचे जे मत आहे ते मला सांगा. म्हणजे यासंबंधीचा निर्णय घेणे मला सोपे जाईल.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण जे निदेश दिलेले आहेत ते शासनाला मान्य आहेत. आमची सगळी कागदपत्रे तयार झालेली आहेत. आपली परवानगी घेऊन ती कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर तातडीने ठेवण्याची कार्यवाही करण्यात येईल. तो पर्यन्त लक्षवेधी सूचनेवरील चर्चा आपण सुरु करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ (बसून) : यांना कामकाज थांबविण्यात स्वारस्य आहे..

प्रा.बी.टी.देशमुख : आम्हाला कामकाज थांबविण्यात मुळीच स्वारस्य नाही. आम्हाला सभागृहाचे कामकाज थांबविण्यात स्वारस्य असते तर आम्ही नियम 93 ची सूचना दिली नसती.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी मान्य केले की, आम्ही तातडीने कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. आमची त्याला तयारी आहे. आपण शासनाला निर्देश दिलेले आहेत. सभापती महोदय, सभागृहापुढील कामकाज तेवढेच महत्वाचे आहे याबद्दल दुमत नाही. परंतु बजेटमध्ये हे कॉन्स्टिटयूशनल डायरेक्शन्स आहेत त्याची सॅक्टीटी आहे. शासनाने काल कागदपत्रे दिलेली नाहीत, आज देखील ती दिलेली नाहीत. माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता अथवा आपण अर्धा तास सुटी घेतो तेवढा वेळेपर्यन्त तहकूब करावे. या मधल्या कालावधीत शासनाने कागदपत्रे आणावीत. ती कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु करावे. आपल्या आदेशाची सँटीटी,राज्यपालांच्या आदेशाची सँटीटी, आणि भारतीय घटेनेची सँटीटी ही मेन्टेन झाली

2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

पाहिजे. त्यास आपण निग्लेक्ट करता कामा नये. नाही तर "चलता है, कभी भी दिया तो भी चलता है, यही तमाशा है, यही नाटक है, हर साल यही करना है". असे करणे बरोबर नाही. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज 30 मिनिटांकरिता तहकूब करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : मी असा निर्णय घेत आहे की, आपण रोज काही वेळ सुटी घेतो. ती सुटी आपण आत्ताच घेऊ. परंतु या कारणासाठी सभागृह तहकूब करण्यात आले असे कोणी मानू नये. मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करतो. परंतु मधल्या काळात जी सुटी देण्यात येते ती आज दिली जाणार नाही. हे आपल्याला मान्य आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : होय.

सभापती : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.48 ते 3.03 पर्यन्त स्थगित झाली.)

यानंतर श्री.कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी मा. उपसभापती

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय, मा. राज्यमंत्री कागदपत्रे आणण्यासाठी गेलेले आहेत असे दिसते. अजून आम्हांला कागदपत्रे मिळाली नाहीत. पुन्हा 15 मिनिटांकरिता किंवा अर्ध्या तासाकरिता सभागृह तहकूब करावे. आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे कागदपत्रे मिळालेली नाहीत. जोपर्यंत कागदपत्रे मिळत नाहीत तोपर्यंत सभागृह तहकूब करावे. किती वेळासाठी तहकूब करावे ते मा. पाटबंधारे मंत्री श्री. अजित पवार यांना विचारुन ठरवा.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, संबंधित खात्याचे राज्यमंत्री कागदपत्रे आणण्यासाठी गेले आहेत. तोपर्यंत कामकाजपत्रिकेवरील पुढील कामकाज सुरु करावे.

श्री. नितीन गडकरी : मा. सभापतींनी सभापतीस्थानावरुन निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे कागदपत्रे मिळाली पाहिजेत.

उपसभापती : कागदपत्रे मिळण्यास थोडा वेळ असेल तर पुढील कामकाज घेऊ.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मग मला संपूर्ण रामायण सांगावे लागेल. या सभागृहाची सॅन्कटीटी, या सभागृहाचा सन्मान, माननीय राज्यपालांचा सन्मान, भारतीय राज्य घटनेचा सन्मान तसेच आपला सन्मान इत्यादी सर्व बाबीसबंधी मला पुन्हा सांगावे लागेल. केवळ कागदपत्रे हा एवढाच मुद्दा नाही तर... It is a part of the Budget. जोपर्यन्त आम्हाला हे कागदपत्रें मिळत नाही तोपर्यन्त सभागृहाचे कामकाज आम्ही पुढे चालवू शकत नाही. आपण अर्ध्या तासाकरता सभागृहाची बैठक स्थगित करावी. माननीय वित्त राज्यमंत्र्यांना मी विचारु इच्छितो की , त्यांनी हे कागदपत्रें आणली आहेत काय ?

डॉ.सुनील देशमुख :अजून आणलेले नाही.

श्री.नितीन गडकरी : मग सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी. किती मिनिटासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावयाची याबाबतीत आपण माननीय सभापतींना सांगावे.

डॉ.सुनील देशमुख : 15 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

श्री.नितीन गडकरी : जोपर्यन्त आम्हाला कागदपत्रे मिळणार नाहीत तोपर्यन्त आम्ही सभागृहाच्या कामकाजात भाग घेणार नाही.

उप सभापती : आज सकाळी 10.00 वाजल्यापासून आपण सर्वजण येथे उपस्थित आहोत तेव्हा अर्धा तास आपण मध्यंतर घेऊ या. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.36 वाजता पुन: भरेल .

(15.06 ते 3.36 पर्यन्त मध्यंतर)

नंतर श्री.किल्लेदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी मा.उपसभापती)

पृ.शी. व मु.शी : अनुशेषासंबंधीचा अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्या आदेशाप्रमाणे रिझनवाईज अलोकेशन ऑफ आऊटले ऑफ बॅकलॉग इन ॲन्युअर प्लॅन 2005-2006 व रिजनवाईज अलोकेशन ऑफ आऊटले इन द इरिगेशन सेक्टर इन ॲन्युअल प्लॅन 2005-2006 ही दोन्ही कागदपत्रे सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्यात आली.

श्री.पांडुरंग फुंडकर : आम्हाला अहवालाच्या प्रती मिळालेल्या नाहीत.

उपसभापती : कागदपत्रे वाटण्यास सुरुवात केलेली आहे. आता आपण पुढचा विषय घेऊ.

--

3 डी-2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील पूर्णा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील टाटा कंपाऊंड येथे ठाण्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने एका गोदामावर छापा टाकून सुमारे 9 कोटी रुपयांचा वनस्पती भेसळयुक्त तेलसाठा जप्त करणे", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर मा.सदस्य प्रा.शरद पाटील व इतर माननीय सदस्यांनी "शासनाने सिंगल फेजिंगमुळे सक्तीने भारनियमन लादल्याने ग्रामीण उद्योगांवर व शेतकऱ्यांवर आलेले संकट", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर मा.सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "दिनांक 21-3-2005 रोजीपासून सांगली शहरात सुरू असलेल्या गॅस्ट्रोच्या साथीमुळे अनेक नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 21 मार्च, 2005 रोजी अमरावती येथील टेलीनेटवर्क या दुकानात पेप्सीच्या शीतपेयात मासाचे तुकडे व शेवाळ आढळून येणे," या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्रीमती संजीवनी रायकर व इतर सन्माननीय सदस्यांनी "महाराष्ट्रातील माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांसमोर सुरु केलेले धरणे आंदोलन", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

श्रीमती संजीवनी रायकर : या विषयावर शासनास निवेदन करण्यास सांगावे.

उपसभापती : शासनाने या विषयावर निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/

पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन संबंधी

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. मागच्या आठवडयामध्ये मी 93 ची सूचना दिली होती. अकोला शहरातील व्यापारी पेठ गेल्या आठ दिवसापासून बंद आहे. त्यांचे ॲक्टॉयच्या संबंधात म्हणणे असे आहे की, ॲक्टॉच्या संबंधात टेंडर निघालेले असताना, महानगरपालिकेचा ठराव विरोधात असताना, जी.सी.चा ठराव विरोधात असताना, स्टँडिंग कमिटीचा ठराव विरोधात असताना गव्हर्नमेंटनी खाजगी माणसाला ॲक्टॉयचे काम दिले. त्या विरोधात गेले आठ दिवस अकोला शहार पूर्णपणे बंद आहे. त्याबाबतची सूचना काल आम्ही दिली. त्याबाबत आपण शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते परंतु त्याबाबत अजूनही शासनाने निवेदन केलेले नाही. आज तेथील शहर बंद आहे. तेथील सर्वसामान्य माणसाची अतिशय कुचंबना होत आहे. त्यांना कोणतेच सामान,जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत.

यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वस्तू मिळत नाहीत, भाजीपाला मिळत नाही, काहीही मिळत नाही अशी स्थिती आहे. खरे म्हणजे या विषयावर या अगोदरच निवेदन होणे आवश्यक होते. काल देखील मी हे निवेदन होईल यासाठी वाट पाहिली. पण काल झाले नाही. आज नियम 93 खालील जवळपास 10 निवेदने आलेली आहेत पण त्यामध्येही हे निवेदन आलेले नाही. तेव्हा उद्या तरी मी दिलेल्या नियम 93 च्या सुचनेवर शासनाला आपण निवेदन करण्यास सांगावे.

उपसभापती : या विषयाचे निवेदन उशीरात उशीरा उद्या करण्यात यावे.

श्री. कन्हैयालाल गिडवानी : अध्यक्ष महाराज, मी दिलेल्या नियम 93 खालील सुचनेवर देखील उद्या निवेदन केले जावे. आपण तसे आदेश द्यावेत ही विनंती.

उपसभापती : ठीक आहे. उद्या त्यावर निवेदन केले जावे.

****

हरकतीच्या मुद्याबाबत ....

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता आम्हाला वित्त मंत्र्यांकडून आपल्या आदेशानुसार जी कागदपत्रे वितरित करण्यात आली आहेत त्यामध्ये केवळ माननीय राज्यपालांच्या डायरेक्टिवज्च आहेत. त्यावरील अनुपालन अहवाल तसेच जिल्हा निहाय तरतुदींबाबतचा अहवाल काही मिळालेला नाही. ....

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, शिवाय हे सारे इंग्रजीमध्ये आहे. मराठी भाषेमधून ही माहिती आम्हाला का दिली जात नाही ?

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : अध्यक्ष महाराज, या कागदपत्रांमध्ये जे ॲनेक्श्चर दिलेले आहे त्यात म्हटलेले आहे की, ..." Expenditure figures for 2004-2005 for outlay allocated for backlog removal is not available at this stage as the financial year 2005-2005 is going on and these figures will be available after 31st March, 2005. Once the expenditure figures for 2004-2005 are made available then the remaining financial backlog as on 1st April, 2005 will be updated."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुळकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, आपण मागील वर्षी देखील या सभागृहामध्ये होता. त्यावेळेस सदस्यांना जिल्हा निहाय पाटबंधारे प्रकल्पांसाठी कशी तरतूद केलेली होती ती माहितीही दिलेली होती, मात्र या कागदपत्रांमध्ये नेमकी तीच माहिती दिलेली नाही तसेच अनुपालन अहवाल देखील मागील वेळेस दिला गेला होता तोही दिलेले नाही. केवळ माननीय राज्यपालांच्या डायरेक्टिव्ज् टेबल केलेल्या आहेत. बाकी दोन महत्त्वाची डॉक्युमेंटस् काही दिलेली नाही.

डॉ. सुनील देशमुख : अध्यक्ष महाराज, अनुपालन अहवाल अजून तयार व्हायचा आहे. 31 मार्च पर्यंतचा तो तयार करण्यास सांगितले होते. पण आता डिसेंबर पर्यंतचाच करायला सांगितला आहे आणि तो उद्यापर्यंत आपल्याला मिळू शकेल. तरी आपण तेवढी मुदत द्यावी.

उपसभापती : उद्या नाही तरी परवा पर्यंत तरी द्या.

डॉ.सुनील देशमुख : अध्यक्ष महाराज, होय. जिल्हानिहाय प्रकल्प आणि त्यावर आतापर्यंत करण्यात आलेले ॲलोकेशन वगैरेची माहिती त्यामध्ये दिली जाईल.

****

..... 3इ 3 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : व्यवसाय अभ्यासक्रम (एमसीव्हीसी व द्विलक्षी) मधील शिक्षक/ निदेशक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर 2004 पासून वेतन न मिळणे.

मु.शी. : व्यवसाय अभ्यासक्रम (एमसीव्हीसी व द्विलक्षी) मधील शिक्षक/ निदेशक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर 2004 पासून वेतन न मिळणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : महोदय, सर्वश्री. सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी "व्यवसाय अभ्यासक्रम (एमसीव्हीसी व द्विलक्षी) मधील शिक्षक/निदेशक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर 2004 पासून वेतन न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 खाली मा.उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, एम.सी.व्ही.सी. आणि बायफोकल शिक्षक/निदेशकांचा, विशेषत: विदर्भ विभागातील, हा प्रश्न आहे. त्यांना नोव्हेंबर 2004 पासून पगार मिळालेला नाही आणि त्यांच्या इतरही मागण्या आहेत त्या संबंधात शासनाने अजूनपर्यंत काहीही निर्णय घेतलेला नाही. 14 फेब्रुवारी 2004 रोजी माननीय मंत्र्यांबरोबर या संबंधात चर्चा झाली परंतु एकाही मागणीबाबत निर्णय झाला नाही. या निवेदनात दिलेल्या माहितीनुसार वेतन थकबाकीची रुपये 9 कोटी 20 लाख आणि 2004-05 या वर्षामतील नियमित वेतनासाठी 18 कोटी 28 लाख रुपये अशा एकूण 27 कोटी 48 लाख 2 हजार इतक्या रकमेपैकी 20 कोटी इतक्या रकमेस शासनाने 2004-05 च्या आठमाही अंदाजात मंजुरी दिलेली आहे. म्हणजे 2003-04 मधील पुन्हा 7 कोटी बाकी ठेवलेलेच आहेत. तेव्हा 31 मार्च 2005 पूर्वी हे 20 कोटी वजा जाता उरलेले 7 कोटी 48 लाखरुपयांची व्यवस्था केली जाईल काय ? तसेच संचालक, सचिव यांचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार सर्व महाराष्ट्रातील निवेदक/शिक्षक यांना कालबद्ध पदोन्नती देण्या संबंधात 1994 चा जो आदेश आहे त्यानुसार 12 वर्षानंतर ही कालबद्ध वरिष्ठश्रेणी दिली जाईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, या निवेदनात म्हटल्याप्रमाणे आम्ही एकूण 27 कोटी 48 लाख 2 हजार पैकी 20 कोटी इतकी रक्कम मंजूर करून रिलिज केलेली आहे आणि 7 कोटी अजून बाकी आहेत. तर ते लौकरच म्हणजे मार्च अखेर रिलिज आम्ही करू आणि बाकीचे जे प्रश्न आहेत ... या कर्मचारी संघटनेने जे 17 मुद्दे पाठविले आहेत त्यातील काही आपण पूर्ण केलेले आहेत आणि काही पुढील काही दिवसात करू. ....

(यानंतर श्री. जागडे ..... 3एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आपल्या विभागाने जो जी. आर. काढला आहे, तो मी वाचून दाखवितो. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी मिळण्याबाबत जी अट आहे, ती अशी आहे की, नियुक्तीच्या दिनांकापासून 12 वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा फायदा शिक्षकांना देण्यात यावा. 1994 साली हा जी. आर. काढण्यात आला आहे. 10 वर्षे झाल्यानंतरही या जी.आर. ची अंमलबजावणी करण्यात येत नाही. त्यामुळे या जी.आर.ची अंमलबजावणी केली जाईल आणि नियुक्तीच्या दिनांकापासून 12 वर्षे मोजून शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा फायदा मिळेल, असे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देणार आहेत काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याबाबत शासनाचे लक्ष आहे. लवकरात लवकर या बाबतची तपासणी करुन योग्य ती कारवाई करु.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माझे समाधान झालेले नाही. मा. जैन साहेबांनी 7 मार्च रोजी आम्हाला चर्चेसाठी बोलाविले होते. परतु काही अडचणीमुळे ही चर्चा होऊ शकली नाही. त्यावेळी असे म्हटले होते की, कॅबिनेटसमोर हा विषय ठेवला जाईल. या विषयाबाबत माननीय मंत्रिमहोदय एक महिन्यांत आमच्याबरोबर चर्चा करतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : हे अधिवेशन संपल्यानंतर जरुर या विषयाबाबत चर्चा करु. सन्माननीय सदस्यांना सदरहू बैठकीला बोलावून निर्णय केला जाईल.

--

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : सातपाटी (पालघर) डहाणू, उंबरगावपर्यन्तच्या समुद्रात भूकंपीय तेल संशोधनाचा सर्व्हे परदेशी कंपन्यामार्फत सुरु असणे.

मु.शी. : सातपाटी (पालघर) डहाणू, उंबरगावपर्यन्तच्या समुद्रात भूकंपीय तेल संशोधनाचा सर्व्हे परदेशी कंपन्यामार्फत सुरु असणे या बाबत श्री. अनंत तरे या दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (मत्स्योद्योग राज्यमंत्री) : अध्यज महोदय, श्री.अनंत तरे यां□ "सातपाटी (पालघर) डहाणू, उंबरगावपर्यन्तच्या समुद्रात भूकंपीय तेल संशोधनाचा सर्व्हे परदेशी कंपन्यामार्फत सुरु असणे" या विषयावर □यम 93 अ□ये जी सूच□ दिली होती, तिला अ□मजू□ आपज □देश दिल्याप्रमाजे मला □वेद□ ज रावयाचे आहे. □वेद□च्या प्रती सदस्यां□ अजोदरच वितरीत जे लेल्या असल्या□मी हे □वेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : □वेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यांत आले आहे.

□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सातपाटी, डहाणू, उंबरगावपर्यन्त समुद्रात मच्छिमारांच्या मासेमारी क्षेत्रातील भूकंपीय तेल संशोधनाचा सर्व्हे परदेशी कंपन्यामार्फत सुरु आहे. हे सर्व्हेक्षणाचे काम 21 जानेवारी 2005 पर्यन्त पूर्ण होणार होते. आता या सर्व्हेक्षणाचे काम मे 2005 पर्यन्त सुरु राहणार आहे. शासनाने या बाबत जी कमिटी नेमली होती, त्या समितीने आपला अहवाल दिला आहे. मच्छिमारांचे यामुळे हाल होत आहेत. ही बाब शासनाने तत्वत: मान्यही केली आहे. आपण निवेदनात असे म्हटले आहे की, " मच्छिमारांना नुकसानीसंदर्भात भरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत ओ.एन.जी.सी. कडे पाठविण्यात आला आहे." आता हा अहवाल केव्हा पाठविण्यात आला आहे ? 21 जानेवारी 2005 पर्यन्त हे सर्व्हेक्षण पूर्ण होणार होते. आता हे सर्व्हेक्षण मे 2005 पर्यन्त चालणार आहे. यामध्ये या भागातील मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तेव्हा हे आपण तातडीने थांबविणार आहांत काय ? याबाबत मच्छिमार सोसायटींच्या नेत्यांची एक बैठक आपण आयोजित करणार आहांत काय ? यामध्ये जी नुकसान भरपाई झाली आहे, त्या बाबत विचार करण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, समुद्रातील तेल शोधण्याचे कंत्राट ओएनजीसीने दोन फॉरेन कंपन्यांकडे दिले आहे. या बाबत मच्छिमारांना विश्वासात घेऊन त्यांची कमिटी केली आहे. त्याप्रमाणे करण्यात येणा-या सर्व्हेक्षणाचा कार्यक्रम 15 दिवस तरी अगोदर मच्छिमारांना कळविण्यात येणार आहे. त्याप्रमाणे कार्यक्रमही ठरला होता. परंतु फ्रेंच कंपनीची मशिनरी मधल्या काळात बिघडली. तसेच त्सुनामी लाटांमुळे यामध्ये अडचणी निर्माण झाल्या. त्याप्रमाणे सुरुवातीला 19 दिवसांचा कार्यक्रम ठरविण्यात आला होता. तो 42 दिवसांवर गेला. यामध्ये मच्छिमारांचे नुकसान इ ाले आहे, असे ओएनजीसीचेही मत आहे. मच्छिमारांनी जे दावे दाखल केले, त्याप्रमाणे 36 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, असे दिसून आले. आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी 89 लाख रुपयाचे नुकसान झाले आहे, असा अहवाल दिला आहे. तसेच या काळात मच्छिमारांना मासेमारी करता आली नाही म्हणून मच्छिमारांचे 16 कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे, असे त्यांचे मत आहे.

(यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

ओ.एन.जी.सी. आणि संबंधित कंपन्या मान्य करायला तयार नाहीत. पहिल्यांदा जे ठरले होते त्यामध्ये याचा समावेश नाही. परंतु 89 लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी असा शासनाचा प्रयत्न आहे. त्याकरिता डेप्युटी डायरेक्टर, मत्स्य व्यवसाय, सी.जी.जी. कंपनीचा एक प्रतिनिधी आणि ओ.एन.जी.सी. चा एक प्रतिनिधी अशी तिघांची समिती गठीत केली आहे. 10.3.2005 रोजी या समितीची स्थापना झाली आहे. 2 आठवडयात या समितीची बैठक घेऊन मत्स्य व्यवसाय आयुक्तांनी जो अहवाल दिला आहे त्याप्रमाणे 89 लाख रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येणार आहे.

श्री. अनंत तरे : 21 जानेवारीला हे संरक्षण संपणार होते, ते मे पर्यंत चालू रहाणार आहे. जूनमध्ये मच्छिमारी बंद होते. तेव्हा हे तातडीने थांबविण्याचे आदेश आपण देणार आहात काय? समुद्रामध्ये मासे पकडण्यासाठी त्या भागात गेल्यानंतर त्यांच्या बोटींचे नुकसान केले जाते, त्यांना मारहाण केली जाते, त्यांच्या बोटीचे इंजिन पळविले जाते या गोष्टी आपण थांबविणार कां?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यामध्ये डी-170 हा एरीया 1560 चौ. कि.मी. चा आहे. त्याचे पाच भाग केले असून हा सर्व्हे तिसऱ्या भागामध्ये सुरु आहे. बाकीच्या सर्व भागांचा सर्व्हे पूर्ण झाला असून त्याठिकाणी मच्छिमारीला काही अडचण नाही. ज्या ज्याठिकाणी मशिनरीचे नुकसान वगैरे झाले असे म्हटले आहे तो थोडासा भाग राहिला आहे, बाकीच्या ठिकाणी मच्छिमारीला काहीही अडचण नाही. हे सर्व्हे ताबडतोबीने पूर्ण करुन मच्छिमारांना मान्सूनपूर्वी हा भाग लवकरात लवकर मोकळा करुन मिळावा असा आग्रह शासन धरणार आहे. त्यासाठी मी बैठक लावणार आहे. त्याचप्रमाणे मा. सदस्य दगडफेक झाल्याचे म्हणाले, त्याबाबत सी.जी.जी. कंपनीने यलोगेट पोलीस स्टेशनला आमच्यावर मत्स्य व्यावसायिकांनी दगडफेक केली अशी तक्रार करुन त्यांनी फ्रान्सच्या कॉन्सुलेट जनरलना सुध्दा कळविले. त्यांनी पोलीस स्टेशनला याबाबत वेगळीच तक्रार केली आहे.आणि म्हणून याबाबत मा. उप मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये एक बैठक व चर्चा झाली होती. तेव्हा ताबडतोब एक महिन्याच्या आत मच्छिमार कृती समिती आणि आपली सुध्दा माझ्या दालनामध्ये बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : दि.14.3.2005 रोजी कोयना धरणाच्या परिसरामध्ये बसलेला भूकंपाचा धक्का.

मु.शी. : दि.14.3.2005 रोजी कोयना धरणाच्या परिसरामध्ये बसलेला भूकंपाचा धक्का याबाबत डॉ.नीलम गो-हे सर्वश्री. अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. विलास अवचट, ॲड. अनिल परब यां-ी दिलेली नियम 93 अ-वये सूच-ा.

डॉ. राजेंद्र शिंगणे (भूकंप पुनर्वसन व मदतकार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे सर्वश्री. अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. विलास अवचट, ॲड. अनिल परब यां-ी "दि.14.3.2005 रोजी कोयना धरणाच्या परिसरामध्ये बसलेला भूकंपाचा धक्का" या विषयावर नियम 93 अ-वये जी सूच-ा दिली होती, तिला अ-ुलजू-ा, आपज निदेश दिल्याप्रमाजे मला निवेद-ा ज्रावयाचे आहे. निवेद-ाच्या प्रती सदस्यां-ा अजोदरच वितरीत जेलेल्या असल्या-े मी हे निवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अतिशय खेदाची आणि चिंता वाटावी अशी ही घटना आहे. भूकंप होऊन आठ दिवस होऊन गेले. आपले अधिवेशन झाले त्या पहिल्याच दिवशी भूकंपाचा धक्का बसला. खरे म्हणजे 14 तारखेला भूकंप झाल्यानंतर शासनाने स्वत:हून सभागृहामध्ये निवेदन करावयास हवे होते. नागपूरच्या अधिवेशन काळात लातूरला भूकंप झाला त्यावेळी शासनाचे लक्ष वेधले होते. तेव्हा शासन स्वत:हून निवेदन कां करीत नाही? म्हणून या निवेदनाच्या माध्यमातून माझा पहिला प्रश्न असा की, भूकंप झाल्यानंतर शासनाने स्वत:हून निवेदन करावयास पाहिजे याची शासनाला कल्पना आहे तरमग निवेदन कां करीत नाही? आम्ही सभागृहामध्ये निवेदन करण्याची विनंती करीपर्यंत आपण कां थांबलात? सदनामध्ये या भूकंपाच्या तीव्रतेबद्दल संपूर्ण माहिती कां दिली नाही? दुसरा प्रश्न असा की, भूकंप व त्सुनामीच्या संदर्भात अगोदरच्या प्रश्नामध्ये उल्लेख झाला होता. आपण एका बाजूला म्हणतो की, महाराष्ट्रामध्ये आपत्कालीन आराखडा तयार आहे. सर्व प्रश्नांच्या संदर्भात आम्ही आपत्कालीन डिझास्टर मॅनेजमेंट इंस्टिटयुट तयार केले आहे असे शासन म्हणते. परंतु प्रत्यक्ष जेव्हा जेव्हा अशा घटना घडतात तेव्हा आपत्कालीन व्यवस्थापनेच्या दृष्टीकोनातून आपण काय कारवाई केली? तिसरा प्रश्न असा की, त्या घटनेनंतर पुन्हा भूकंपाचे धक्क बसले आहेत. तेव्हा भूकंप मापनाच्या यंत्रणेसंबंधी आपण मुंबई महानगरपालिकेला सूचना दिल्याचे आम्ही वाचले आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्रात यासंबंधी कोणत्या दक्षता घेतल्या आहेत. भूकंप मापक यंत्रे अनेक ठिकाणी बंद आहेत त्याबाबत आपण काय कारवाई केली आहे? आणि भूकंपाच्या संदर्भात या विधानभवनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तुमच्याकडे कोणती यंत्रणा तयार आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे भूकंपाच्या संदर्भात याठिकाणी अगोदरच निवेदन करावयास हवे होते, ही गोष्ट खरी आहे. ज्यादिवशी भूकंप झाला, त्यानंतर आपले सभागृह संपले होते . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे बरोबर नाही. सभागृह सुरु होते.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्यादिवशी 3 वाजून 20 मिनिटांनी भूकंप झाला . त्यावेळेला सभागृह सुरु होते. मग माननीय मंत्री महोदय, हे सभागृह संपले होते असे कसे म्हणत आहेत ?

श्री.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, विधानसभेचे सभागृह तीनच्या सुमारास संपले होते आणि 3 वाजून 20 मिनिटांनी भूकंप झाला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी निवेदनाबाबत जो मुद्दा उपस्थित केला, त्याबाबतीत यापुढे याबाबतीत खबरदारी घेतली जाईल आणि पुन्हा अशी चुक होणार नाही यादृष्टीने शासन स्वत: लक्ष घालेल. सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रश्नामध्ये आपत्कालीन व्यवस्थेच्या बाबतीत उल्लेख केला आहे. दुर्दैवाने भूकंप होतो, तेव्हा तो होण्यापूर्वी सूचना मिळेल अशा प्रकारचे तंत्रज्ञान अजून तरी आपल्याकडे विकसित झालेले नाही. परंतु 1993 साली लातूर येथे भूकंप झाला होता. त्यानंतर ख-या अर्थाने आपत्ती व्यवस्थापनाच्या कामास गती प्राप्त झाली. महाराष्ट्र राज्यात आपत्ती व्यवस्थापनाची सुरुवात संपूर्ण भारत देशामध्ये प्रथमच सुरु झाली आहे. त्यामध्ये जिल्हानिहाय व आपत्तीनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार केले आहेत. या आराखड्याचे दर सहा महिन्यांस अद्यावतीकरण केले जाते. राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर तसेच विभागीय पातळीवर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या नियंत्रण कक्षामध्ये दूरध्वनी, बिनतारी संदेश यंत्रणा, व्ही-सॅट दूरध्वनी, व्हीडीओ कॉन्फरन्सिग इ.सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. राज्य स्तरावरील नियंत्रण कक्ष अहोरात्र कार्यरत राहून इतर नियंत्रण कक्ष जसे पोलीस नियंत्रण कक्ष, पोलीस आयुक्त नियंत्रण कक्ष, महानगरपालिका नियंत्रण कक्ष, भारतीय हवामान खात्याचे नियंत्रण कक्ष, रेल्वे नियंत्रण कक्ष यांच्याशी सतत संपर्कात राहतात. जीआयएस वर आधारीत आपत्ती व्यवस्थापनाच्या माहितीची पध्दत सुरु करण्यात आली. भूकंपरोधक तंत्राने घराचे बांधकाम करणे व परंपरागत पध्दतीने बांधण्यात आलेल्या घरांचे भूकंप रोधक तंत्राने मजबूतीकरण करणे यासंबंधात सर्व समावेशक माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

. . . .3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देत असताना माझी किमान अशी अपेक्षा होती की, या नियम 93 च्या सूचनेमध्ये जे जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्यांना उत्तरे मिळतील. याठिकाणी निवेदनामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की," मुंबई शहरातील जुन्या धोकादायक इमारतींची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे." पण ज्या दिवशी भूकंप झाला, त्याच दिवशी 182, राजा राममोहन रॉय बिल्डींग व 409, जगन्नाथ शंकरशेठ मार्गावरील एक इमारत, या दोन इमारतींना तडे गेले. त्यानंतर तेथे घरदुरुस्ती मंडळाला पाचारण करण्यात आले आणि त्याठिकाणी प्लॉपिंग करण्यात आले. ही वस्तुस्थिती माननीय मंत्री महोदयांना माहिती नाही का ? हा गृहनिर्माण विभाग आपल्या अखत्यारित येत नसला तरी आपण याबाबतीत त्या विभागाकडे प्रश्न विचारुन त्यांच्याकडून माहिती घेतली होती का ? आपण जर त्यांना याबाबतीत विचारले असते, तर आपल्याला समजले असते. तेव्हा याबाबतीत खुलासा करणे आवश्यक आहे.

श्री.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंदर्भात उत्तरात स्पष्टपणे उल्लेख केला आहे की, "मुंबई शहरातील जुन्या धोकादायक इमारतींची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे." तर मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून ज्या धोकादायक इमारती असतील, तर तेथील रहिवाशांना खोल्या खाली करण्याबाबत नोटीस दिली जाते. तसेच तेथील रहिवाशांना संक्रमण शिबिरामध्ये जागा दिली जाते. या इमारती दुरुस्त करण्यासाठी किंवा त्यांची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिका कार्य करते.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय दिशाभूल करीत आहेत. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी विचारु इच्छितो की, मुंबई महानगरपालिका उपकर प्राप्त इमारतींची पुनर्बांधणी करीत नाही. गृहनिर्माण मंडळ याबाबतीत सर्व चौकशी करते याची आपल्याला कल्पना आहे का ?

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

उपसभापती :93 अन्वये निवेदन आहे. यावर आणखी एखादा प्रश्न विचारता येईल.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये म्हणून या ठिकाणी खुलासा होणे गरजेचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला आहे तो आम्हाला मान्य आहे. कामकाज जास्त आहे. त्यामुळे नियम 93 च्या निवेदनावर जास्त चर्चा होऊ नये हे ठीक आहे. पण एखादे निवेदन असे असू शकते की, त्याचे गांभीर्य सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असते. अशा वेळेला आपले संरक्षण आम्हाला उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. हा भूकंपचा आणि जुन्या चाळीचा विषय मुंबईत अत्यंत गंभीर आहे.

उपसभापती : प्रत्येक प्रश्न जनतेच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा असतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझ्या निवेदनात सांगितले की, ज्या जुन्या इमारती आहेत त्यांच्या दुरुस्तीची, पुर्नबांधणीची जबाबदारी महापालिकेची असते, ही अत्यंत चुकीची माहिती रेकॉर्डवर येते. ही जबाबदारी सरकारची आहे. धरदुरुस्ती मंडळाची आहे. महापालिका फक्त उपकर जमा करते. बाकी पूर्ण जबाबदारी सरकारची म्हणजे घर दुरुस्ती मंडळाची आहे. तेव्हा भूकंप झाल्या नंतर ज्या 16 हजार जुन्या चाळी या मुंबई शहरामध्ये आहेत त्या संदर्भात शासनाचे काय धोरण राहणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मुंबई शहरातील ज्या जुन्या जितक्या धोकादायक इमारती आहेत त्यांची योग्य ती दक्षता बृहन्मुंबई महानगरपालिका घेत आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांकडे माहिती नसेल तर त्यांनी ती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री. चंद्रकांत हंडोरे :सभापती महोदय,मुंबई शहरात ज्या मोडकळीस आलेल्या इमारती आहेत त्यांची दुरुस्तीची कामे घरदुरुस्ती मंडळ करते.

उपसभापती : निवेदन क्रमांक 4. श्रीमती संजीवनी रायकर.

.....2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कायम मान्यता असलेल्या शाळांना एक वर्षाची मान्यता देणे,मान्यता काढणे, अकारण व अवेळी शाळांची तपासणी करणे .

मु.शी.: कायम मान्यता असलेल्या शाळांना एक वर्षाची मान्यता देणे,मान्यता काढणे, अकारण व अवेळी शाळांची तपासणी करणेबाबत सर्वश्री व्ही. यू.डायगव्हाणे, बी. टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे यांनी नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) :अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही. यू.डायगव्हाणे, बी. टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे यांनी कायम मान्यता असलेल्या शाळांना एक वर्षाची मान्यता देणे,मान्यता काढणे, अकारण व अवेळी शाळांची तपासणी करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, या ठिकाणी जे निवेदन वितरीत करण्यात आलेले आहे त्यामध्ये माझ्या नावाचा उल्लेख नाही. तसेच इतर सदस्यांच्याही नावाचा उल्लेख नाही. तेव्हा ती सर्व नांवे त्यामध्ये ॲड केली असतील तर ती सगळी नांवे वाचून दाखवा.

उपसभापती : श्रीमती संजीवनी रायकर, व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी देशमुख, व्ही.डी.खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापुरे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, माझ्या नावाबरोबर श्री. मोते आणि इतर सदस्यांचीही नांवे होती ती घातलेली नाहीत.

उपसभापती : येथे जेवढी नांवे आली, तेवढी घालण्यात आलेली आहेत.

श्रीमती संजीवनी रायकर :सभापती महोदय, मी त्याच दिवशी बोलले होते की, दोन दिवस आगोदर मी हाच प्रश्न विचारलेला असतांना आपण निवेदन नाही म्हणून संगितले होते आणि आता निवेदन आलेले आहे. म्हणून या निवेदनामध्ये माझे नांव आधी घालावयाला सांगितले होते. तसे आता सुरु आहे.

उपसभापती : आपण प्रश्न विचारा.

श्रीमती संजीवनी रायकर : "देविचा रोगी दखवा आणि शंभर रुपये मिळवा" अशी जी घोषणा आहे. त्याच्या ऐवजी कुठलेही काम शिक्षण विभागातून करुन घ्या आणि 100 रुपये मिळवा असे म्हणावयाची वेळ आलेली आहे. तुकडयांना मान्यता, शाळेला मान्यता, शिक्षकांची मान्यता या प्रत्येक गोष्टीचे पैशाविना काम होत नाही.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ....

अशाच तऱ्हेची एक केस मुंबईला झालेली होती. त्यामध्ये त्याला जामिनावर सोडले. त्या शिक्षण अधिकाऱ्याला निलंबित केले. शिक्षकाला नोकरीपासून वंचित राहावे लागले. चार वर्षानंतर निकाल लागला. त्याला अजूनही अधिकाऱ्यांनी न्याय दिलेला नाही. प्रकरण असेच चालू राहणार आहे. याबाबतीत संपूर्ण विभागाची, विशेषत: नागपूरचा हा प्रश्न आहे, त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची आपण चौकशी करणार काय ? आतापर्यन्त अशी किती प्रकरणे झाली ? किती पैसे घेतले ? याची चौकशी करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर काल 21 मार्चला उपशिक्षणाधिकाऱ्याला निलंबित केले. अशी अनेक प्रकरणे महाराष्ट्रामध्ये आहेत. शिक्षण विभागामध्ये भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनलेला आहे. सभापती महोदय, हे एकटे श्री. सुरदुसे नाहीत. असे अनेक सुरदुसे नागपूर आणि अन्य विभागामध्ये आहेत. आज शाळेची मान्यता वर्धित करण्याची जी पध्दत आहे त्यामध्ये पहिल्यांदा एका वर्षाची मान्यता दिली जाते आणि त्यानंतर एकेक वर्षाची मान्यता चार वर्षे दिली जाते. अशा प्रकारे पाच वर्षे झाल्यानंतर कायम मान्यता दिली जाते. आता उलट सुरु झाले आहे. ज्या शाळांना कायम मान्यता प्राप्त झालेली आहे त्यांना एक वर्षाची मान्यता देतात आणि भ्रष्टाचार करतात. यामध्ये लाखो रुपये, कोटयवधी रुपये खातात. त्यांचा रेट ठरलेला आहे. माझ्याकडे काही उदाहरणे आहेत. पाच वर्षाच्या मान्यतेसाठी 20 हजार रुपये, पाच वर्षापेक्षा जास्तची मान्यता हवी असेल तर हे 25 हजार रुपयांचे सुरदुसे प्रकरण आहे. यापूर्वी अनेक अधिकारी निलंबित झालेले आहेत. आपण सहा महिन्याच्या आत चौकशी समिती सेटअप करतो. परंतु सहा महिन्याच्या आत चौकशी समिती सेट अप झाली नाही तर तो आपोआप कामावरु रुजू होतो. सहा महिन्यामध्ये याची चौकशी पूर्ण करुन त्याला बरखास्त करणार काय ? शाळेची मान्यता वर्धित करणे याबाबतचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. या ठिकाणी फक्त नागपूर विभागाचा प्रश्न असल्यामुळे नागपूर विभागामध्ये मान्यता वर्धितच्या संदर्भात आणि 6 सप्टेंबर, 1999 च्या शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या मान्यतेच्या संदर्भात जो जी. आर. काढला आहे या दोन्ही बाबतीमध्ये मान्यता देणे, त्या मान्यतेला शासनाने परवानगी दणे आणि शाळेच्या वर्धित मान्यतेच्या संदर्भातील

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड/मिठा

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे ....

जे प्रकरण आहे त्यासंदर्भात नागपूरमधील पोलखोल नावाची एक संघटना आहे त्यांनी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील, माननीय शिक्षण मंत्री तसेच सचिव श्री. जयराज फाटक यांना पत्र दिलेले आहे. स्मरणपत्र दिलेले आहे. परंतु शिक्षण विभागाने कारवाई केलेली नाही. जुलै-ऑगस्टमध्ये मान्यता वर्धित करण्याची प्रकरणे नियमाप्रमाणे निकाली काढली जातील काय ? पोलखोल संघटनेने दोन वर्षापूर्वी श्री. मोरे साहेब यांना 170 पानांचे निवेदन दिले होते ते निवेदन आणि आपल्याकडे जे निवेदन आहे त्या निवेदनावर आपण चौकशी करुन दोन किंवा तीन महिन्यामध्ये या प्रकरणाचा पर्दाफाश करणार काय ? चौकशी करणारा अधिकारी दुसऱ्या विभागाचा असला पाहिजे. त्याच विभागाचा असेल तर गोपालकाला होतो. म्हणून दुसऱ्या विभागाचा एखादा चांगला अधिकारी नेमावा. दोन तीन महिन्यात याची पूर्ण चौकशी करुन त्याचा अहवाल पुढच्या अधिवेशनात ठेवणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, श्री. सुरदुसे, उपशिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आणि ते जामिनावर सुटले आहेत हे खरे आहे. त्याच्या विरुध्द विशेष अधिकारी नेमून त्याची विभागीय चौकशी केली जाईल. पाच महिन्यांच्या आत त्याचा निकाल लावला जाईल. नागपूर विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे साहेबांनी ज्या तक्रारी केलेल्या आहेत, शाळेला वर्धित मान्यता देणे किंवा स्टाफ ॲप्रुव्हलसाठी मान्यता देणे यामध्ये झालेला भ्रष्टाचार यांची सुध्दा खास पथक नेमून चौकशी केली जाईल आणि जरुर पडली तर ती चौकशी गुन्हा अन्वेषण खात्याकडे दिली जाईल. सन्माननीय सदस्यांनी पोलखोलची जी माहिती दिलेली आहे त्याचा सुध्दा चौकशीसाठी वापर केला जाईल आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये हा भ्रष्टाचार निपडून काढला जाईल असे सभागृहाला आश्वासन देतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नवीन वर्धित मान्यता देण्याचे प्रकरण गंभीर आहे. या सभागृहापर्यंत सुध्दा ते हिंमत करतात. त्यांची हिंमत किती आहे ते पहावे. या निवेदनातील एक वाक्य मी वाचून दाखवितो. यामध्ये असे म्हटले आहे की, "विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांच्या समवेत दिनांक 13.12.2004 च्या सभेत चर्चा झाली. सदरच्या सभेमध्ये विभागातील सर्व शिक्षणाधिकारी यांना शाळांची मान्यता वर्धित करण्यासंदर्भात शिक्षण उपसंचालकांनी मौखिक निर्देश दिले होते." म्हणजे या मान्यता दिल्या नव्हत्या म्हणून निर्देश दिले होते. पुढे असे वाक्य आहे की, "शिक्षणाधिकारी स्तरावर त्याप्रमाणे किंबहूना, त्यापूर्वीच कार्यवाही झालेली आहे." म्हणजे शिक्षण उपसंचालक यांनी अगोदरच आदेश दिले होते ते का दिले हे संघटनेच्या मिटिंगमध्ये सांगावयास पाहिजे होते की हे सर्व आदेश अगोदरच दिलेले आहेत. आदेश अगोदर दिले नव्हते हे लक्षात आणून दिल्यानंतर विभागीय उपसंचालकांनी सांगितले की, यामध्ये भ्रष्टाचार होत असल्यामुळे मी आदेश देत आहे. पण येथे वाक्य असे आहे की, "यापूर्वीच कार्यवाही झालेली आहे." दोनपैकी सत्य काय आहे आणि असत्य माहिती पुरविणा-यांवर कारवाई केली जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : आताच मा.सदस्य श्री.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे या शाळेच्या मान्यता 13.12.2004 च्या सभेत सर्व विभागाच्या शिक्षणाधिका-यांना बोलावून देण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी झाले आणि काही ठिकाणी झाले नाही हे खरे आहे. परंतु आता मा.सदस्य जर माहिती देत असतील तर त्याची संपूर्ण चौकशी करुन त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

पृ.शी. : मुंबईत आंध्र प्रदेश, जम्मू काश्मीर, नागालॅण्ड येथून मोठया प्रमाणात बेकायदेशीर शस्त्र परवाने आणले जाणे.

मु.शी. : मुंबईत आंध्र प्रदेश, जम्मू काश्मीर, नागालॅण्ड येथून मोठया प्रमाणात बेकायदेशीर शस्त्र परवाने आणले जाणे याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण आणि विनोद तावडे यांनी "मुंबईत आंध्र प्रदेश, जम्मू काश्मीर, नागालॅण्ड येथून मोठया प्रमाणात बेकायदेशीर शस्त्र परवाने आणले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शहरामध्ये भारतातील वेगवेगळया प्रांतातून सुमारे 536 खोटया प्रमाणपत्रांच्या आधारावर शस्त्रात्र परवानग्या मिळविल्या गेल्या आहेत त्याच्यातील 5-6 जणांना शासनाने अटक केली आहे. पोलिसांच्या चौकशीमध्ये असे लक्षात आले आहे की, एका माजी राज्यमंत्र्यांच्या दबावामुळे आणि मुंबईतील दोन हॉटेल मालक श्री.दिनेशकुमार शर्मा आणि श्री.संतोष रॉय यांच्या मदतीने ते विशेष कार्यकारी दंडाधिकारी आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "होय, हे खरे आहे. मुंबईमध्ये राहतात असे बहुतेक शस्त्र परवानाधारक हे त्यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील धारण शस्त्र सुरक्षारक्षक म्हणून काम करण्यासाठी वापरतात. काही कायम स्वरुपी मुंबईत राहणा-या इसमांनीही नागालँडसारख्या राज्यातून खोटे निवासाचे पत्ते देवून शस्त्र परवाने मिळविलेले आहेत. मग ते नियमित कोणी केले आणि त्यावर का कारवाई करण्यात आली नाही ? हया 536 खोटया परवान्यापैकी सुमारे 400 जणांनी जे परप्रांतीय खाजगी सुरक्षारक्षक आहेत त्या सगळयांना परवानगी दिली. परंतु लष्करातील महाराष्ट्रातील मराठी तरुण ज्यांनी शस्त्रात्राचा परवाना मागितला होता त्यापैकी एकालाही परवाना का दिला नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नागालँड, जम्मू काश्मीर आणि उत्तर प्रदेश या राज्यातील शस्त्र परवाने घेऊन काही लोक या मुंबईमध्ये वास्तव्यास आहेत हे खरे आहे. तेथून सुध्दा बनावट कागदपत्रे सादर करुन शस्त्रात्र परवाने मिळविले आहेत. जी सिक्युरिटी एजन्सी आहे त्यांच्याकडे काम करणारे जे लोक आहेत आणि मुंबईमध्ये रहात आहेत त्यांनी सुध्दा नागालँड, उत्तर प्रदेश या राज्यांमधून खोटया कागदपत्रांच्या आधारे शस्त्रात्र परवाने घेतले आहेत हे खरे आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अशा लोकांना महाराष्ट्रातून ऑल इंडिया परमिशन का देण्यात आली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्यांना महाराष्ट्रातून ऑल इंडिया परमिशन देण्यात आलेली नाही. नागालॅण्डमधून ऑल इंडिया परमिशन घेतलेली आहे. मुंबईमध्ये त्यांचे वास्तव्य 30 दिवसापेक्षा जास्त असेल तर येथील नोंदणी करणे त्यांना बंधनकारक आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये ज्यांनी ज्यांनी नोंदणी केलेली आहे त्यात सुध्दा ते बोगस असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सल्लाउद्दीन हफीज शेख, इम्तियाज अहमद सज्जाद, दिनेशकुमार या सगळयांना कोणत्या गुन्हयाखाली अटक करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : बनावट कागदपत्रे तयार करुन सल्लाउद्दीन शेख आणि संबंधित व्यक्ती आहे त्यांनी येथील लोकांना पकडून 25-30 हजारांमध्ये नागालॅण्डमधून बनावट परवाने मागवित होते. तेथूनच ऑल इंडिया परमीशन घेऊन ते मुंबईमध्ये तो परवाना आणून देत होते. त्या कारणामुळे त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : महाराष्ट्राचे पोलीस नागालॅन्ड पोलिसांचे काम करीत आहेत काय ? ज्या अर्थी, महाराष्ट्रातील पोलिसांनी त्यांना अटक केली त्याअर्थी, त्यांनी महाराष्ट्रात गुन्हे केलेले आहेत. नागालँडचे पोलीस किंवा जम्मूचे पोलीस येथे आले होते काय ? त्यांना अटक केली याचा अर्थ त्यांनी येथे काही गुन्हे केलेले आहेत. तुमची केस ट्रान्स्फर केली. दोन विशेष कार्यकारी अधिकारी कोणत्या आमदाराच्या शिफारशीवरुन नेमलेले होते ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : मी मघाशी सांगितले की, ते बनावट लायसन्स तयार करुन येथील लोकांना देत होते. संबंधित व्यक्तिनी एका ठिकाणी लायसन्स घेतले आणि ते दुस-या ठिकाणी 30 दिवसापेक्षा जास्त काळ राहाणार असतील तर त्याबाबत तेथील आयुक्तांकडे किंवा जिल्हाधिका-यांकडे तशी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्यांनी नोंदणी केली नाही. हे लोक बनावट लायसन्स तयार करुन त्याचे वाटप करीत असल्याचा सुगावा पोलिसांना लागला. त्यानुसार पोलिसांनी छापा घातला आणि त्यामध्ये त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

श्री. अनिल परब : ते बनावट लायसन्स देत असल्याचे सिध्द झाले असेल तर त्यांच्यावर शस्त्र अधिनियमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे काय ? असेल तर तो कोणत्या कलमाखाली दाखल केलेला आहे ? जी सेक्शन्स आहेत त्यामध्ये पोलीस नेहमी पळवाटा ठेवतात असा आतापर्यन्तचा अनुभव आहे. तेव्हा या प्रकरणी कोणत्या गुन्ह्याखाली आणि सेक्शनखाली केस दाखल झालेली आहे ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : आर्म ॲक्ट 1992च्या कलम 62(4) अन्वये शस्त्र परवानाधारक 30दिवसापेक्षा जास्त काळ दुसरीकडे जाणार असतील तर त्यासंदर्भात त्यांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे. आर्म ॲक्टच्या कलम 30 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. विनोद तावडे : अटक झालेल्या 6 व्यक्तींमध्ये शासनाने नेमलेले दोन विशेष कार्यकारी अधिकारी आहेत. तेव्हा त्या दोघांची विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याबाबत कोणी शिफारस केलेली आहे ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : ती माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जळगांव-जामोद तालुक्यातील (जि.बुलढाणा) वडगांव गड येथील अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार

मु.शी.: जळगांव-जामोद तालुक्यातील (जि.बुलढाणा) वडगांव गड येथील अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता विधान परिषद सदस्य यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता, विधान परिषद सदस्य यांनी "जळगांव-जामोद तालुक्यातील (जि.बुलढाणा) वडगांव गड येथील अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

श्री. पांडुरंग फुंडकर : अतिशय गंभीर आणि धिक्कार करावा अशा प्रकारची एक घटना बुलढाणा जिल्हयामध्ये 10 फेब्रुवारीला घडली. 10 फेब्रुवारीला एका दलित समाजाच्या मुलीवर भर दुपारी एका नराधमाने तिला जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्यावर दोनदा बलात्कार केला. बलात्कार केल्यानंतर तिला आणि तिच्या आईवडिलांना धमक्या देण्यात आल्या. त्या मुलीला अशी धमकी दिली की, तू जर तक्रार केली तर तुझ्या आईवडिलांना आणि तुला जिवे मारुन टाकू. ही अल्पवयीन मुलगी आहे. धमकीमुळे मुलीच्या आईवडिलांनी पोलिसांत तक्रार केली नाही. परंतु काही सामाजिक संघटनांनी याबाबतीत पुढाकार घेतला. तेथील शिवसेनेच्या प्रमुखाने त्या मुलीच्या आईवडिलांना संरक्षण देण्याची हमी दिल्यामुळे त्या मुलीच्या वडिलांनी 16 तारखेला कम्प्लेन्ट दाखल केली. 16 तारखेला कम्प्लेन्ट दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्या मुलीला 22 तारखेला मेडिकल तपासणीसाठी नेले. बलात्कार 10 तारखेला झाला. त्यानंतर 12 दिवसांनी मेडिकल तपासणी केली गेली. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 16 तारखेला कम्प्लेन्ट केल्यानंतर मेडिकल तपासणी करण्यासाठी 6 दिवस का लागले ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : घटना 10 तारखेला घडली हे बरोबर आहे. 16 तारखेला फिर्याद दिली हेही बरोबर आहे. त्यानंतर त्या मुलीला मेडिकलसाठी पीएचसी सेंटरला पाठविले. तेथे महाले नावाचे डॉक्टर होते. तपासण्याची सुविधा नसल्याने डॉ.महालेंनी रिपोर्ट दिला नाही....

श्री. पांडुरंग फुंडकर : बलात्कार झाल्यानंतर त्या मुलीची 12 दिवसांनी मेडिकल तपासणी केली. हे गाव जळगाव जामोद तालुक्यात आहे. 5.कि.मी. अंतरावर जळगाव येथे प्रायमरी हेल्थ सेंटर आहे. तेथे मेडिकल ऑफिसर आहे. पोलिसांनी त्या मुलीची जळगाव येथे मेडिकल तपासणी न करता तेथून 60 कि.मी अंतरावर असलेल्या खामगाव येथे तिला मेडिकल तपासणीसाठी नेले. जळगाव येथे महिला मेडिकल ऑफिसर असताना त्या मुलीची जळगाव येथे मेडिकल तपासणी न करता तिला खामगाव येथे मेडिकल तपासणीसाठी नेण्याचा पोलिसांचा काय हेतू होता ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्या ठिकाणी अत्याचारग्रस्त मुलीची वैद्यकीय चाचणीची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे खामगाव येथे तपासणीसाठी नेण्यात आलेले होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या ठिकाणी घटना घडली. त्या ठिकाणी जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. त्या आरोग्य केंद्रात महिला वैद्यकीय अधिकारी आहे. तेथील महिला वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस.झालेली आहे. या महिला वैद्यकीय अधिका-यांकडून तपासणी न करता तिला 60 कि.मी. अंतरावरील खामगाव येथे नेण्यात आले. या अत्याचारग्रस्त महिलेस खामगाव येथे नेण्याचा पोलिसांचा उद्देश काय होता ? या प्रकरणाची पोलिसात तक्रार नोंदवून घेण्यास पोलीसच जबाबदार आहेत. या प्रकरणातील आरोपीचे पोलिसांशी संगनमत होते. पोलिसांनी आरोपीस सांगितले की, मुलीच्या कुटुंबियास अशा प्रकारची धमकी द्या. पोलीस स्टेशनपासून तीन कि.मी.अंतरावर अशा प्रकारची घटना होते. याघटनेची पोलीस स्टेशनला सहा-सहा दिवस माहिती मिळत नाही. सभापती महोदय, काही संघटना जर या प्रकरणात पुढे आल्या नसत्या तर तर हे प्रकरण दाबले गेले असते. एका गरीब अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला गेला असताना स्थानिक पोलीस वेगळे वगळ देण्याचा प्रयत्न करीत आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुलगी त्यावेळी तेथे नव्हती. ती अकोला येथे होती.ज्या मुलाने अत्याचार केला होता त्याच्या भावाने आणि त्याच्या वडीलांना सदर मुलीच्या कुटुंबियांना दम दिला होता की, जर तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली तर तुम्हाला आम्ही मारुन टाकू. त्यामुळे मुलीचे पूर्ण कुटुंब अकोला येथे गेले होते. ते कुटुंब जेथे रहात होते तेथे स्त्री रोग तज्ञ नव्हते म्हणून त्या मुलीस खामगाव येथे तपासणीसाठी आणले.

श्री. पांडुरंग फुंडकर : जळगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी डिटेल माहिती दिली तर त्या अनुषंगाने चौकशी करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांकडून बरोबर उत्तर येत नसल्यामुळे हे निवेदन आपण राखून ठेवावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : 22 तारखेस त्या तरुणीची वैद्यकीय तपासणी केली असे उत्तरात नमूद केलेले आहे. एवढया दिवसानंतर त्या तरुणीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्या तरुणीवर बलात्कार झाला हे सिध्दच होऊ शकत नाही. मागे या सभागृहामध्ये अशाच प्रकारचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी गृह राज्यमंत्र्यांनी अशी माहिती दिली की, बलात्कार झालेल्या महिलेची 48 तासांच्या आत वैद्यकीय तपासणी केली गेली तरच बलात्कार केल्याचे सिध्द होते. त्यांनी वैद्यकीय अधिका-यांनाच या प्रकरणी अटक केली आहे. त्या वैद्यकीय अधिका-यास अटक करण्याचे कारण सांगण्यात आले आहे की, त्याने खोटा अहवाल दिला. या संपूर्ण प्रकरणामध्ये पोलिसांनी गोंधळ निर्माण केलेला आहे. पोलिसांना जनतेचे संरक्षण करण्यासाठी ठेवले आहे की जनतेला त्रास देण्यासाठी त्यांना नेमले आहे. माझे देखील म्हणणे आहे की, हे निवेदन राखून ठेवावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : पोलिसांनी या प्रकरणात षडयंत्र रचलेले आहे असा माझा त्या ठिकाणच्या पोलिसांवर जाहीर आरोप आहे. सदर प्रकरण ज्या पोलीस अधिका-याने व्यवस्थित हाताळले नाही त्याची चौकशी केली गेली पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्या प्रमाणे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी केली जाईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : या प्रकरणी डी.वाय.एस.पी. यांच्याकडून चौकशी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी केली जाईल काय ?

उपसभापती : या संदर्भामध्ये सदनाच्या भावना लक्षात घेता आपण या प्रकरणाची तातडीने वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करावी. त्यासंबंधीचा अहवाल..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उपसभापती : सगळयांच्या भावना जाणून घेऊन मी या प्रकरणाची वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करावी असा निर्देश दिलेला आहे. मी पुन्हा निर्देश देतो की, या प्रकरणाची वरिष्ठ

3..

मा.उपसभापती...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिका-यामार्फत चौकशी करावी व ही चौकशी दोन ते चार दिवसात पूर्ण करावी त्यासंबंधीचा अहवाल सभागृहात द्यावा. तो अहवाल सभागृहात आल्यानंतर जर सभागृहाचे समाधान झाले नाही तर आपण पुढची कार्यवाही करु.

(अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. विनोद तावडे : हे निवेदन राखून ठेवावे.

उपसभापती : सदस्यांचा भावना लक्षात घेता सदर निवेदन राखून ठेवण्यात येत आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: थेऊर(जि.पुणे) येथे दलित कुटुंबावर केलेला गोळीबार.

मु.शी.: थेऊर(जि.पुणे) येथे दलित कुटुंबावर केलेल्या गोळीबारा-बाबत डॉ.नीलम गो-हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे यांनी थेऊर(जि.पुणे) येथे दलित कुटुंबावर केलेला गोळीबार याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेले असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, थेऊर भागामध्ये अतिशय अशांततेचे वातावरण निर्माण झालेले आहे आणि प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून शासनाने असे प्रकार पुन्हा होऊ नयेत म्हणून कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, थेऊर गावामध्ये प्रतिबंधक उपाय म्हणून संबंधित उपसरपंच काळे आणि त्याचे सहा साथीदार यांना अटक करण्यात आलेली आहे आणि गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आमच्या माहितीप्रमाणे पुढील महिन्यात याठिकाणी ग्रामपंचायतीची निवडणुक होणार आहे. त्याच्याशी या गावातील तणावाचा संबंध आहे काय ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, ग्रामपंचायतीची निवडणूक नंतर होणार आहे. परंतु जे कारण घडले त्यानुसार कांबळे नावाची जी व्यक्ती होती त्यांच्या वाढदिवसाचे पोस्टर्स लावले होते आणि ती पोस्टर्स फाडण्यावरुन दंगल झाली. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा काही संबंध नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, दलित कुटुंबावर अत्यंत पाशवी हल्ला करण्यात आला त्यावेळेस पोलीस स्टेशनमध्ये कॉन्स्टेबलसहित एकही पोलीस अधिकारी उपस्थित नव्हता. पोलीस स्टेशन बंद होते आणि वारंवार माहिती देऊन देखील आणि तक्रार करुन देखील त्या पोलीस स्टेशनचा एकही अधिकारी किंवा कॉन्स्टेबल दलित परिवाराच्या संरक्षणासाठी धावून आला नाही उलट आरोपींना संरक्षण देण्याचा प्रयत्न त्याठिकाणी करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी व्हावी यासंदर्भात आपण सरकारला निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंबरनाथ येथील सीतामाऊली शाळेच्या 64 विद्यार्थ्यांकडून फी जमा करुन परीक्षेस बसू न देणे.

मु.शी.: अंबरनाथ येथील सीतामाऊली शाळेच्या 64 विद्यार्थ्यांकडून फी जमा करुन परीक्षेस बसू न देण्याबाबत सर्वश्री अनंत तरे डॉ. दीपक सावंत,डॉ.नीलम गो-हे,सर्वश्री अरविंद सावंत, ॲड.अनिल परब,मधुकर सरपोतदार,विलास अवचट यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री अनंत तरे,डॉ. दीपक सावंत,डॉ. नीलम गो-हे,अरविंद सावंत,ॲड.अनिल परब,मधुकर सरपोतदार,विलास अवचट यांनी अंबरनाथ येथील सीतामाऊली शाळेच्या 64 विद्यार्थ्यांकडून फी जमा करुन परीक्षेस बसू न देण्याबाबत नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या सदनाच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मा.सदस्य श्री. संजय दत्त यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन हा प्रश्न सदनामध्ये मांडला होता. त्यावर निर्णय होऊ शकला नाही. कल्याण मधील चोपडे विद्यालय आणि अंबरनाथच्या सीतामाऊली विद्यालयातील जवळजवळ 64 विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता आले नाही. निवेदनामध्ये सांगण्यात आले आहे की, गेल्यावर्षी सुध्दा ता.प.क्र. 43498 हाप्रश्न मा. जगन्नाथ शेवाळे आणि इतर सदस्यांनी मांडला होता आणि 9 मे,2003 रोजी संबंधित शाळा बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. कारण गेल्यावर्षी सुध्दा विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता आले नव्हते. माझा प्रश्न असा आहे की,गेल्या वर्षी सुध्दा असा प्रकार घडला,यावर्षी सुध्दा असा प्रकार घडला. विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगितले होते की, शाळा बंद करण्यात येईल तरीसुध्दा शाळा सुरु राहिली. शाळा बंद करण्याचे आदेश गेल्यावर्षी दिले होते काय ?शाळा का बंद झाली नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सिताबाई डोंगरे शिक्षण मंडळ,मुंबई या संस्थेने एक अधिकृत सितामाऊली विद्यामंदीर अंबरनाथ आणि चोपडे विद्यालय,कल्याण अशा दोन शाळा चालू केल्या. त्यापैकी सितामाऊली विद्यामंदीर अंबरनाथ या विद्यालयाला प्राथमिक शाळेला मान्यता आहे.माध्यमिक शाळेला मान्यता नाही. चोपडे विद्यालय,कल्याण याला मान्यताच नाही. 2003 मध्ये 10 वी च्या वर्गाला प्रवेश मिळावा म्हणून संस्था कोर्टात गेली आणि त्यानी कोर्टातून आदेश मिळविला आणि मुलांना परीक्षेला बसू दिले. पुन्हा शासनाने कळविले की, अनधिकृत शाळा तुम्हांला चालू करता येणार नाही. वर्तमानपत्रामध्ये शिक्षणाधिका-यांनी जाहिराती दिल्या. पुन्हा 2004 मध्ये ही संस्था पुन्हा कोर्टात गेली. कोर्टाने सांगितले की, गेल्यावर्षी तुम्ही शासनाला फसविले आहे तुम्ही शाळा बंद करा. यावेळी विद्यार्थ्यांना परीक्षेला बसायला परवानगी मिळणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड ...

:

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ ...

गेल्या वर्षी परीक्षेला न बसल्यामुळे 23 विद्यार्थ्यांचें नुकसान झाले होते. .या वर्षी संस्था चालक कोर्टात गेले नव्हते तर .14 फेब्रुवारी 2005 रोजी संस्था चालक शासनाकडे आले होते व शासनाला त्यांनी अशी विनंती केली होती की, खाजगी नोंदणी पध्दतीने या मुलांना परीक्षेला बसू देण्यात यावे. ही पध्दत शासनाकडे आहे.त्यानुसार एखादा विद्यार्थी जर चौथी पर्यन्त शिकला असेल तर त्याला दहावीच्या परीक्षला बसण्याची परवानगी देण्यात येते. त्याप्रमाणे या विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता व 18 फेब्रुवारी 2005 रोजी शासनाने या अर्जाच्या बाबतीत अती विलंब फी भरुन प्रवेश द्यावा असे एस.एस.सी. बोर्डाला कळविले होते .त्यानंतर या संस्थेचे चालक तिकडे गेलेच नव्हते ते एकदा 9 मार्च 2005 रोजी गेले होते परंतु 5 लाख 95 हजार 960 रुपये फी भरावी लागेल असे सांगण्यात आल्यामुळे ही फी भरण्यास ते पुन्हा गेले नव्हते.त्यामुळे 74 विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसता आले नाही.सभापती महोदय, मी सदनाला सांगू इच्छितो की, त्या संस्था चालकाविरुध्द फौजदारी दावा दाखल केलेला आहे .त्याचबरोबर दोन वेळा कोर्टाने त्यांना अटक केलेली होती असे असतांनासुध्दा व शिक्षण खात्याने वर्तमानपत्रात माहिती देऊन सुध्दा पालक आपल्या पाल्यांना त्या शाळेत का पाठवतात ? आणि आपणसुध्दा शिक्षण प्रतिनिधी म्हणून काय करतात ? यासबंधीसुध्दा चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

उप सभापती : यानतर पुढचे नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन घेण्यात येईल.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करतात)

उप सभापती : नियम 93 च्या सूचनेवर एकच प्रश्न विचारता येईल असे मी सुरुवातीलाच सागितलेले आहे.मला सुध्दा विषयाचे गांभीर्य कळते.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने विद्यार्थ्यांची आणि पालकाची फसवणूक होत आहे. केवळ संस्था चालक श्री.कांबळे हे फरार होतात हा एकच मुद्दा नाही.तर शिक्षणखाते असो वा अन्य कोणतेही खाते असो त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना या बाबतीत अवगत का केले नाही.?.या संस्थेतर्फे फसवणूकीचे धंदे चालू आहेत याबाबतीत शिक्षण खात्याने पालकांना न सांगितल्यामुळे विद्यार्थ्यांचे पैसे बुडाले आहेत त्याचबरोबर तीन वर्षे वाया गेली आहेत.शिक्षण खात्याने विद्यार्थ्यांना व पालकांना वर्तमानपत्रातून वा निरनिराळया माध्यमातून अवगत का केले नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : त्याबाबतीत वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली होती ?

श्री.हसन मुश्रीफ :मुंबईच्या सगळया वर्तमानपत्रात याबाबतीत प्रसिध्दी देण्यात आली होती त्याचबरोबर त्या व्यक्तीविरुध्द फौजदारी केसेस दोन वेळा दाखल करण्यात आल्या होत्या.पालकाच्या घरात पत्र पाठविणे हा एकच पर्याय आमच्याकडे शिल्लक होता. त्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही पर्याय आमच्याकडे नव्हता.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शाळेचे संस्था चालक श्री.सिंध्दार्थ कांबळे गेल्या तीन वर्षापासून पालकांची आणिं विद्यार्थ्याची फसवणूक करीत आहेत.त्यामुळे विद्यार्थ्याचे आणि पालकांचे गेल्या तीन वर्षापासून नुकसान झालेले आहे.त्याला शासनच संपूर्णपणे जबाबदार आहे.जर शासनाने वेळीच त्या शाळेच्या संस्था चालकाच्या विरुध्द कारवाई केली असती आणि ही शाळा बंद करण्यासबंधी वेळीच उपाययोजना केली असती तर विद्यार्थ्याचे नुकसान झाले नसते. केवळ वर्तमानपत्रात नोटिफिकेशन प्रसिध्द करुन हा प्रश्न सुटणार नाही.झोपडपट्टीतीन अनेक विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत.त्यामुळे याबाबतीत शाळा बंद करण्यासाठी प्रत्यक्षात शासनाने काय कार्यवाही केली ? याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी .केवळ या विद्यार्थ्याचे नुकसान या संस्था चालकांनी केलेले नाही तर प्रत्येक शिक्षकाकडून त्यांनी दीड लाख रुपये धेतलेले आहेत तसेच खोटे कागदपत्र देऊन एक एक लाख रुपयांचे कर्ज त्यांच्या नावावर बॅन्केकडून घेतलेले आहे.याबाबतीत डी.सी.पी यांच्याकडे मार्च 2004 मध्ये शिक्षकांनी तक्रारी केल्या होत्या.तेव्हा याही बाबतीत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय , 2003-2004 मध्ये दिनांक 4-3-2004 रोजी गुन्हा क्रमांक आय 58 / 2004 खाली आय.पी.सी. कलम 420 ब ,406 ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्याचबरोबर 2004-2005 या वर्षात 13.3.2005 रोजी गुन्हा क्रमांक 75/205 खाली आय.पी.सी.कलम 420 ब,406 ब आणि 34 ब अन्वये पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनधिकृत शाळांची सगळी यादी वर्तमानपत्रात दरवर्षी प्रसिध्द करण्यात येते.या स्पसेफिक शाळेच्या बाबतीत सुध्दा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले होते तसेच या शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांना प्रवेश घेऊ नये असे आवाहन सुध्दा वर्तमानपत्रात करण्यात आले होते.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : या शाळेच्या बाबतीत दोन तीन वेळा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

नंतर श्री.किल्लेदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (पुढे चालू....

माझा आक्षेप असा होता की, या ठिकाणी पोलीसच्या संदर्भात जी कलमे घातलेली आहेत. पोलीस विभाग असे म्हणतो की, या कलमांअंतर्गत शाळा बंद करताच येत नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोते यांचा प्रश्न मला कळालेला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.मोते यांना सूचना करतो की, त्यांनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला. ती गंभीर बाब आहे याची मलाही कल्पना आहे. मी मा.मंत्री महोदयांना अशी विनंती करतो की,सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी ज्या बाबीचा उल्लेख केला, त्याचा समावेश या सूचनेमध्ये नव्हता, ती त्यांच्याकडून माहिती घ्यावी आणि त्या प्रकरणीही तातडीने कारवाई करावी अशी मी सूचना करतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांकडून याबाबतची माहिती घेण्यात येईल आणि आपण केलेल्या सूचना नव्हे तर ते आदेश मानून कारवाई करण्यात येईल.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : पोलीस विभागाची कलमे यामध्ये अंतर्भूत केलेली आहेत, त्याचा कोणताही परिणाम होत नाही

उपसभापती : आता आपल्यासमोर एकूण चार लक्षवेधी सूचना आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पॉईन्ट आफॅ इन्फर्मेशन आहे. सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील 9 वा प्रश्न, प्रश्न क्रमांक 2379 च्या संदर्भात माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

उपसभापती : तो प्रश्न संपलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : त्या प्रश्नाच्या संदर्भत माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, डॉ.अभय बंग समितीच्या किती बैठका झाल्या ? त्यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, एकही बैठक झालेली नाही. गेल्या फेब्रुवारी महिन्यामध्ये डॉ.अभय बंग समितीची पुणे येथे बैठक झाली. त्याचा अहवाल शासनाकडे प्रलंबित आहे. परंतु मंत्रीमहोदयांनी कोणत्याही प्रकारचा अहवाल माझ्याकडे मिळालेला नाही असे सांगितले. त्यांचे चुकीचे उत्तर रेकॉर्डवर राहू नये म्हणून सांगतो की, गेल्या महिन्यामध्ये अभय बंग समितीची पुणे येथे बैठक झाली. त्या ठिकाणी सर्व अधिकारी उपस्थित होते. त्या ठिकाणी त्यांनी डायरेक्शन दिलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

उपसभापती : त्याबाबतचा अहवाल आपल्याला मिळाला नसेल तर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्याकडून तो घ्यावा.

आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

श्री.अनंत तरे : माझ्या 93 च्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी घ्यावयाचे राहिलेले आहे.

उपसभापती : एकाच दिवशी आपली बरीच निवेदने आलेली आहेत.

श्री.अनंत तरे : आपल्या कार्यालयामधूनच प्रोसेस होऊन आलेली आहेत.

उपसभापती : एका दिवशी एका सन्माननीय सदस्यांचे 93 चे एकच निवेदन चर्चेसाठी घ्यायला पाहिजे.

..... 3P-3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

पृ.शी. : पालघर तालुक्यातील (जिल्हा ठाणे) पांजरा येथील एकाच कुटुंबातील चौघांची केलेली निर्धुण हत्त्या.

मु.शी. : "पालघर तालुक्यातील (जिल्हा ठाणे) पांजरा येथील एकाच कुटुंबातील चौघांची केलेली निर्धुण हत्त्या" याबाबत श्री.अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) सभापती महोदय, मा सदस्य श्री.अनंत तरे यांनी "पालघर तालुक्यातील (जिल्हा ठाणे) पांजरा येथील एकाच कुटुंबातील चौघांची केलेली निर्धुण हत्त्या", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपज निर्देश दिल्याप्रमाजे मला निवेदन जाहीर करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अजोदरच वितरीत केलेल्या असल्यामी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, पालघर तालुक्यातील बोर्डसर-चिल्हार फाट्याजवळ पांजरा येथील एकाच कुटुंबातील दोन बालकांसह कैलास विष्णू पाटील व त्यांच्या पत्नी आणि दोन बालकांसह हत्त्या करण्यात आली. निवेदनामध्ये सांगितलेले आहे की, या प्रकरणी तीन व्यक्तीस अटक करण्यात आली होती. त्यांना कधी अटक केली आणि कधी सोडले ? दुसरा प्रश्न असा की,जबाबामध्ये श्री.रणजित राजू शर्मा यांनी काय सांगितलेले आहे ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : कै. कैलास पाटील यांच्यासह त्यांच्या कुटुंबाच्या हत्त्या प्रकरणी तीन लोक गावामध्ये त्यांच्या विरुध्द होते, या संशयावरुन त्यांना अटक केली. चौकशीअंती असे कळले की, याप्रकरणी त्यांचा काही संबंध नाही. म्हणून त्यांना सोडून देण्यात आले. त्यानंतर श्री.रणजित शर्मा आणि श्री.गोविंद पांडुरंग मिसाळ या दोघांना अटक करण्यात आली.

श्री.अनंत तरे : अटक केल्यानंतर त्यांना सोडण्याचा अधिकार आपल्याला आहे काय ?

उपसभापती : त्यांनी सोडलेले नाही.

श्री.अनंत तरे : त्यांनी आताच तीन व्यक्तींना पकडले आणि नंतर सोडून दिल्याचे सांगितले.

श्री.सिध्दराम म्हेत्रे : जी मयत व्यक्ती होती, त्यांच्याशी यांची दुष्मनी होती, म्हणून तीन लोकांना अटक केलेली होती. त्याबाबत त्यांची पोलीसांनी सखोल चौकशी असता, यामध्ये त्यांचा काही हात नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले. त्यानंतर जे खरे आरोपी श्री.रणजित शर्मा आणि श्री.गोविंद पांडुरंग रसाळ यांना पकडण्यात आले.

श्री.अनंत तरे : श्री.शर्मा यांनी आपल्या जबानीमध्ये काय सांगितलेले आहे ?

श्री.सिध्दराम म्हेत्रे : श्री.शर्मा यांनी मालकिनीच्या घरामध्ये चोरी केली होती, त्या चोरीचा पत्ता श्री.विठ्ठल पाटील याला लागलेला होता. त्यावर श्री.पाटील यांनी श्री.शर्माला सांगितले की, तू चोरी केल्याच्या संदर्भात मी तुझ्या मालकिनीला सांगणार आहे. त्यावर चिडून जाऊन श्री.पाटील याची मर्डर केल्याचे श्री.शर्मा यांनी सांगितलेले आहे.

-

आता 93 चे निवेदन सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे आहे. परंतु सन्माननीय सदस्य अनुपस्थिती आहेत.

यानंतर श्री.सुंबरे . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मोर्बे धरण प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न.

मु.शी. : खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मोर्बे धरण प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न याबाबत सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आणि प्रा.शरद पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. ..

" अनेक कारणांनी रखडलेला खालापूर तालुक्यातील (जिल्हा रायगड) मोर्बे धरण प्रकल्प आता नवी मुंबई महापालिकेला अर्पण करण्याचा समारंभ निश्चित होणे, तत्कालीन ग्रामविकास मंत्र्यांनी मोर्बे प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन न देता 30 टक्के अनुदान तसेच पुनर्वसनाच्या ठिकाणी नागरी सोयीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच 58 प्रकल्पग्रस्तांना नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करून घेण्याबाबत केलेली घोषणा, तथापि यातील एकाही गोष्टीची पूर्तता झालेली नसणे, 18 गावे व 9 वाड्यांसाठी सुरू केलेली चौक-टेंभरी योजना 90 टक्के काम पूर्ण होऊनसुद्धा जाणीवपूर्वक सुरू न करणे, त्यामुळे 18 गावातील लोकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागणे, परिणामी ही योजना तात्काळ सुरू करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, त्याचप्रमाणे मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तांना तात्काळ सेवेत घ्यावे तसेच 30 टक्के अनुदान द्यावे व पुनर्वसनाच्या ठिकाणी नागरी सोयी पुरवाव्यात, अशा लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागण्या तात्काळ पूर्ण न करताच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून हा प्रकल्प नवी मुंबई महापालिकेला अर्पण करण्यामुळे या भागातील शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) : महोदय, या लक्षवेधी सुचनेवरील निवेदनाच्या प्रति माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे, मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

.....3क्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा.जलसंपदा मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

प्रा. शरद पाटील : अध्यक्ष महाराज, या मोर्बे धरणाचा प्रश्न गेल्या 15-16 वर्षापासून चिघळत राहिलेला आहे. 1989 साली सिडकोसाठी पाणीपुरवठा व्हावा या उद्देशाने या धरणाचा प्रस्ताव तयार झाला. त्यासाठी 58 शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या गेल्या. सिडकोने सुरूवातीस या योजनेसाठी पैसे दिले. पण नंतर त्यांनी पैसे देणे बंद केले आणि या धरणाचे पाणी घेण्याचेही नाकारले. परिणामी योजना अर्धवट पडून राहिली. दुसरे कोणी या धरणाचे पाणी घेते काय म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रयत्न झाले. शेवटी नवी मुंबई महानगरपालिकेने या धरणाचे पाणी घेण्याचे मान्य केले आणि पैसे देण्याचेसुद्धा मान्य केले. अध्यक्ष महाराज, गेल्या 15-16 वर्षामध्ये या धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मात्र झालेले नाही. या लक्षवेधी सुचनेवर उत्तर देताना या निवेदनात म्हटलेले आहे की, त्या वसाहतीमध्ये काही किरकोळ कामे अजूनही अपूर्ण आहेत. तर ती किरकोळ कामे कोणती ? आणि ती केव्हा पूर्ण करून देण्यात येतील ? दुसरे म्हणजे या निवेदनातील पृ.2 वरील परिच्छेद 2 मध्ये म्हटले आहे की, "... पर्यायी जमीन देता येत नसल्याने या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करून महसूल विभागाने प्रस्तावित केलेली 30 टक्के सानुग्रह अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली असून रुपये 1,29,66,208 इतकी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महसूल विभागाकडे संबंधितांना अदा करण्यासाठी वर्ग केली आहे." अध्यक्ष महाराज, मात्र हे सानुग्रह अनुदान देण्यापूर्वी प्रत्येक प्रकल्पग्रस्तांकडून पुन्हा पैसे मागणार नाही असे 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याची सक्ती केलेली आहे, हे खरे आहे काय ? त्यामुळे त्या प्रकल्पग्रस्तांनी तसे लिहून देण्याचे नाकारलेले आहे हे खरे आहे काय ? तसे असेल तर विनाअट हे पैसे सदरहू प्रकल्पग्रस्तांना दिले जातील काय ? अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी हे तीन नेमके प्रश्न उपस्थित केले आहेत 1) किरकोळ कामे कोणती व ती केव्हा पूर्ण करणार, 2) 30 टक्के सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधित प्रकल्पग्रस्तांना विनाअट देणार काय ? आणि 3) नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवर या प्रकल्पग्रस्तांना कायम स्वरूपी नोकरी देणार काय ?

श्री. अजित पवार : अध्यक्ष महाराज, खरे तर हा प्रकल्प पिण्याच्या पाण्यासाठी असल्यामुळे त्यामध्ये पुनर्वसन कायदा पूर्वलक्षीप्रभावाने लागूच करता येत नाही. तरीही यातून व्यवहार्य मार्ग काढावा म्हणून अशा पध्दतीने इतरत्र कोठेही सानुग्रह अनुदान देण्यात आलेले नाही तरीदेखील 30 टक्के सानुग्रह अनुदान येथील प्रकल्पग्रस्तांना देण्याचा निर्णय झाला आणि काही जण सातत्याने या

..... 3क्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

प्रकल्पग्रस्तांना कोर्टामध्ये जाण्यास सांगतात वा वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी निर्माण करतात म्हणून याबाबत चर्चा करीत असतानाच त्यांचे प्रतिनिधी आणि मी स्वत: या संबंधात या विषयी चर्चा केली आणि आम्हीच त्यांना सांगितले हाते पुन्हा नव्याने प्रश्न याबाबत निर्माण करू नका. त्यावेळेस त्यांच्या प्रतिनिधींनी मान्य केले होते की, आम्ही नव्याने असे कोणतेही प्रश्न निर्माण करणार नाही आणि तसे लिहून देण्याची तयारीही त्यांनी दाखविली आणि त्याप्रमाणे काहीही लिहूनही दिलेले आहे. त्यामध्ये कोठल्याही प्रकारे त्यांना अडचणीत आणण्याची आपली भूमिका नाही. अध्यक्ष महाराज, यामध्ये सानुग्रह अनुदानाच्या रकमेचे पूर्णपणे वाटप अजून झालेले नाही. परंतु बहुतांश लोकांनी या 1 कोटी 29 लाख 66 हजार 208 रकमेपैकी आपापली रक्कम नेलेली आहे आणि बाकी राहिलेल्यांनीही आपल्या वाट्याची रक्कम न्यावी अशा प्रकारे प्रयत्न केले जातील. अध्यक्ष महाराज, या पुनर्वसित गावांना 13 नागरी सुविधा देण्याच्या सूचनाही आपण केल्या आहेत. .....

(यानंतर श्री. जागडे ..... 3आर 1 ...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार.....
तेथील कामे चालू आहेत. या बाबत विशेष बाब म्हणून शासनाने हा निर्णय घेतला आहे. तसेच प्रकल्पाचे पाणी नवी मुंबईला देण्याचा निर्णय झाला आहे. नवी मुंबई महानगरपालिका या धरणाचे काम करीत आहे. आता या ठिकाणी काहीच कामेच शिल्लक राहिलेली आहेत. बरीचशी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उघडी गटारे आणि इतर काही थोडी थोडी कामे राहिलेली आहे. 45 लाख रुपयाची कामे त्या ठिकाणी शिल्लक राहिलेली आहेत. ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेला सांगण्यात येईल तसेच या गावांना सर्व नागरी सुविधा देण्यात येतील. माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे, या प्रकल्पग्रस्तांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या नोक-यांमध्ये सामावून घेण्यात येईल काय ? त्या ठिकाणी एकूण 58 कंत्राटी कामगार काम करीत आहेत. त्यानी मध्यंतरीच्या काळामध्ये उपोषणही केले होते. कुशल आणि अकुशल कामगारांना जे वेतन मिळत होते, त्यामध्ये वाढ करावी , अशी त्यांनी विनती केली होती. ती विनंती मान्य करण्यात आली आणि त्यानंतर त्यांनी आपले उपोषणही सोडले आहे. तसेच त्यांची दुसरी मागणी अशी होती की, दर महिन्याचे वेतन हे 15 तारखेला देण्यात यावे. त्यांची ही देखील मागणी मान्य केली आहे. पाठीमागील काही राहिलेली रक्कम कंत्राटी कामगारांना देऊन टाकली आहे. आता या मोर्वे धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर या कंत्राटी कामगारांना नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये हस्तांतरीत करण्यात येईल. नवी मुंबई महानगरपालिकेला त्याला मान्यताही दिली आहे. त्यामध्ये कोणतीही अडचण राहणार नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्त 18 गावांना पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था होईल काय ?

श्री. अजित पवार : ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहे. या योजनेचे 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. या धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर, या ठिकाणी जो एक कोल्हापूर टाईप बंधारा बांधण्यात आलेला आहे, त्या बंधा-यातून पाण्याचा सोर्स घेण्यात येणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने आतापर्यन्त सर्वच गोष्टी मान्य केलेल्या आहेत. धावरी नदीवर कोल्हापूर टाईप बंधारा बांधून पाण्याचा साठा होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सुरु केली आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आणि कोल्हापूर टाईप बंधा-यात पुरेसे पाणी उपलब्ध झाल्यानंतर कोणतीही अडचण येणार नाही. या गावांना पाणी देण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची परवानगी लागणार आहे. नवी मुंबई महानगरपालिका या बाबत योग्य ती कार्यवाही करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : एचएच.सी.ई.टी.परीक्षा व एमएच. इंजिनियरिंग सी.ई.टी. परीक्षा दि. 7 मे 2005 व ए.आय.सी.ई.टी. परीक्षा 8 मे 2005 रोजी ठेवण्यात येणे.

मु.शी. : एचएच.सी.ई.टी.परीक्षा व एमएच. इंजिनियरिंग सी.ई.टी. परीक्षा दि. 7 मे 2005 व ए.आय.सी.ई.टी. परीक्षा 8 मे 2005 रोजी ठेवण्यात येणे यासंबंधी डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अनिल परब, दिवाकर रावते, विलास अवचट, अनंत तरे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : अध्यज महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीज डे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यांनी निवेदन ज रावे. अशी विनंती ज रतो.

" बारावीनंतर विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याबाबत महत्वपूर्ण ठरणाऱ्या मेडिकल प्रवेश परिक्षा व अभियांत्रिकी प्रवेश परिक्षा व अखिल भारतीय अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा या तीन महत्वपूर्ण परिक्षा मे,2005 मध्ये दोन दिवसाच्या फरकाने म्हणजे एमएच.सी.ई.टी व एम.एच.इंजिनिअरिंग सीईटी या दोन्ही परिक्षा एकाच दिवशी दिनांक 7 मे, 2005 रोजी तर ए.आय.ई.ई.ई. परिक्षा 8 मे, 2005 रोजी ठेवण्यात येणे, सदर तिन्ही परिक्षा या व्यावसायिक असल्याने त्यांचे विद्यार्थी जगतात अनन्य महत्व असणे, सदर महत्वाच्या परिक्षा लागोपाठ एक दिवसाआड ठेवल्याने या तिन्ही परिक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचंड धावपळ करावी लागणे, अभ्यासाला वेळ न मिळणे, परिणामी विद्यार्थ्यांवर पडणारा मानसिक व शारिरिक ताण, 7 मे रोजी होणाऱ्या दोन्ही परिक्षा राज्यस्तरीय असल्याने त्यासाठी परिक्षा केंद्रे जिल्ह्यांच्या ठिकाणी असल्याने हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांना जिल्ह्यांकडे यावे लागणे, परंतु ए.आय.ई.ई.ई. या अखिल भारतीय स्तरावरील परिक्षेसाठी मुंबई, पुणे, नागपूर यासारखी महानजरी शहरे जेंद्र ठेवण्यात येणे, त्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या अखिल भारतीय परिक्षेला धावपळ करावी लागणे, दूरवरचे केंद्र मिळाल्याने जो विद्यार्थी तीनही परिक्षेला बसू पाहणार आहे अशांना एक परिक्षेस मुकावे लागणार असल्यामुळे वरील तिन्ही परिक्षेला बसणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी सदर परिक्षांच्या काळात पुरेसे अंतर ठेवण्याची केलेली रास्त मागणी, त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष व दाखविलेली अक्षम्य बेपर्वाई, त्यामुळे विद्यार्थ्यांत व पालकांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रोफेशनल कॉलेजमध्ये जाणा-या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. दर वर्षी इंजिनियरींग आणि मेडिकल कॉलेजमध्ये जाणा-या विद्यार्थ्यांची सीईटी होत असते. तसेच ऑल इंडिया लेवलवर एक सीईटीची परीक्षा होत असते. आता या परीक्षांच्या वेळी या वर्षी खूप घोळ झाला आहे. मेडिकल आणि इंजिनियरींग कॉलेजच्या सीईटीच्या परीक्षा एकाच वेळी होत असतात. तर ऑल इंडिया लेवलची परीक्षा 8 मे रोजी होत असते. अशा वेळी आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी नागपूरला पोहोचू शकत नाही.

(यानंतर श्री. सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, शासनाने उत्तरात म्हटले आहे की, अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सी.ई.टी. प्रवेश परिक्षा 7 मे 2005 ऐवजी 12 मे 2005 रोजी घेण्यात येणार आहेत. ज्यावेळी अखिल भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने तारीख डिक्लेअर केली होती, त्यावेळी आपण सु-मोटो निर्णय घ्यायला पाहिजे होता. परंतु आम्हाला लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाकडून उत्तर घ्यावे लागले...

उपसभापती : शासनाने तुम्हाला लक्षवेधी सूचना मांडण्याकरिता संधी उपलब्ध करुन दिली.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या मागे दुसरी गोम आहे. सी.ई.टी. च्या दिवसाला चार परीक्षा होतात. फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजी आणि मॅथ्स या विषयांच्या परीक्षा इंजिनिअरिंग आणि मेडिकल्सच्या विद्यार्थ्यांना द्याव्या लागतात. या चार विषयांच्या परीक्षा सकाळी 10 वाजल्यापासून संध्याकाळी 4 वाजता संपतात. बायॉलॉजी आणि मॅथ्सचे दोन पेपर असतात. विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने थोडी पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. कारण पावणे दोन लाख विद्यार्थी या परीक्षेला बसतात. बायॉलॉजी आणि मॅथ्स हे दोन विषय भिन्न आहेत. एकाच दिवशी दोन विषय घेतले तर ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चुकीचे ठरते. कारण या दोन विषयांचा अभ्यास आणि इंजिनिअरिंग व मेडिकलचा अभ्यास यामध्ये प्रचंड तफावत आहे. माझी शासनाला अशी सूचना आहे व आग्रह धरणार आहे की, फिजिक्स व केमिस्ट्री या दोन विषयाची परीक्षा 12 मे ला घ्यावी आणि दुसऱ्या दिवशी बायॉलॉजी व मॅथ्स या दोन विषयांची परीक्षा घेण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय?

दुसरा प्रश्न असा की, निवेदनामध्ये "अखिल भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार" असे म्हटले आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश काढले आहेत काय? नाहीतर उद्या न्यायालयाने आदेश दिले नाहीत असे आपण सांगाल. 12 मे ही तारीख लक्षवेधी सूचना दिल्यानंतर ठरविली की, मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश काढल्यानंतर ठरविली?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या वर्षी दोन महिन्यापूर्वीच शासनाने तारीख डिक्लेअर केली. परीक्षेची तारीख लवकर डिक्लेअर व्हावी आणि विद्यार्थ्यांना त्याची अगोदर माहिती मिळावी यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. म्हणून शासनाने ही तारीख डिक्लेअर केली. अखिल भारतीय विज्ञान परिषदेची तारीख ही नंतर डिक्लेअर झाली. ते पाहून माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

यांनी लक्षवेधी सूचना दिली. आपण म्हटल्याप्रमाणे माननीय सदस्य मला अगोदर भेटले असते तर सभागृहाचा वेळ यामध्ये वाचला असता. परंतु मी त्यांना धन्यवाद देतो की, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी मांडला आहे. त्यांनी सुचविल्याप्रमाणे दोन दिवस परीक्षा घेणे शासनाला शक्य वाटत नाही, तरी सुध्दा ही बाब तपासून पहाण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : आपण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विचार करा. सकाळी 10 ते संध्याकाळी 4 वाजेपर्यंत ते पेपर देणार आहेत. यामध्ये इंजिनिअरिंग आणि मेडिकल असे दोन भिन्न विषय आहेत. विद्यार्थी दोन्हीकडे ट्राय करणार. फिजिक्स-केमिस्ट्री हे दोन विषय इंजिनिअरिंग आणि मेडिकलला कॉमन विषय आहेत. जर आपण एवढा निर्णय घेतला आहे तर सभापती महोदय, आपल्या सांगण्यावरुन मंत्रिमहोदयांनी निर्णय घ्यावा अशी माझी आपणामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : मा. सदस्य डॉ. दीपक सावंत यांना विद्यार्थ्यांसंबंधी सहानुभूती आहे. आणि ते विद्यार्थी संघटनेतून, संघर्षातून पुढे आले आहेत. तेव्हा यासंबंधी माननीय सदस्यांबरोबर बसून आजच निर्णय घेण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) औद्योगिक वसाहतीच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिला जात असलेला निकृष्ट व अपुरा आहार.

मु.शी.: कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) औद्योगिक वसाहतीच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिला जात असलेला निकृष्ट व अपुरा आहार यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, प्रा.फौजिया खान, सर्वश्री सदाशिवराव पोळ, वसंत पवार, जगन्नाथ शेवाळे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े नि-यम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि-ज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी नि-वेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

"कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) औद्योगिक वसाहतीत असलेल्या व 21 मुले असलेल्या अंध, मूक, बधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांना तेथील कर्मचाऱ्यांकडून दिला जात असलेला निकृष्ट व अपुरा आहार, विद्यार्थ्यांना गेले तीन महिने आंघोळीसाठी गरम पाणी न देणे, विद्यालयासाठी 3 गॅस सिलेंडर मंजूर असताना त्यापैकी विद्यालयात मात्र एकच सिलेंडर असल्याचे तहसिलदारांच्या प्रत्यक्ष पाहणीत दिसून येणे, कणकवली येथील दूध डेअरीतून मुलांना करण्यात येणारा दूध पुरवठा बंद करुन तो रत्नागिरी येथील एका खाजगी ठेकेदाराकडून करण्यात येणे, धान्य ठेवलेल्या डब्यात अळया आणि कचरा आढळून येणे, आदल्या दिवशी मळून ठेवलेल्या पीठाच्या दुसऱ्या दिवशी चपात्या बनविणे, स्वयंपाकात कुजके टोमॅटो वापरणे, विद्यार्थ्यांना गणवेश न पुरविता त्यांना आपापल्या घरुन कपडे आणण्यास सांगणे, मुलांना स्वत:चे कपडे धुवायला लावणे, पाणी आणावयास लावणे, इत्यादी गलथान प्रकार एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी दिनांक 11 मार्च 2005 रोजी अंधशाळेच्या अधिकाऱ्यांना घातलेला घेराव, त्यावेळी त्याठिकाणी आलेल्या कुडाळ तहसिलदारांच्या उपस्थितीत विद्यालयाची पहाणी करण्यात आली असता उघडकीस आलेली वस्तुस्थिती व गलथान कारभार, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, शासनाची प्रतिक्रिया".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे(सामाजिक न्यायमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन
(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, "आंधळे दळतंय आणि कुत्रे पिठ खातंय" असा हा सर्व प्रकार आहे. या ठिकाणी देण्यात आलेले निवेदन अतिशय भावनाशून्य अशाप्रकारचे आहे. तसेच, या निवेदनामध्ये तफावत आहे, हे निवेदन ॲरोगंट आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

याठिकाणी निवेदनामधील दुस-या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "शाळेतील मुलांना शासनाने विहित केल्याप्रमाणे आहार देण्यात येतो व तो पुरेसा दिला जातो. स्थानिक ठिकाणी उपलब्धतेनुसार जेवणात भाज्यांचा वापर केला जातो. निकृष्ट व अपुरा आहार याबाबत प्रवेशित विद्यार्थ्यांने तक्रार केलेली नाही. मात्र कडधान्ये ही मोड आणून ती पूर्णत: शिजवून दिली जात नाही. असे आढळून आले आहे." म्हणजे अन्नात भेसळ आहे. विहिरीला पाणी नाही.

(सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे खाली बसून बोलतात व हसतात.)

सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गो-हे या स्त्री आहेत आणि तरीही त्या हसत आहेत. परंतु मोड न आलेले कडधान्य खाल्ले तर त्यामुळे पोटाला त्रास होतो याची साधी आपल्याला कल्पना नाही का ?

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

श्री.जितेंद्र आव्हाड : अहो, धान्य ठेवलेल्या डब्यात अळया सापडलेल्या आहेत. तुम्हाला माहिती नाही. तुम्ही अभ्यास केलेला नाही. अळया सापडल्या आहेत म्हणून त्यांना पकडून मारले आहे. नंतर तेथे शिवसैनिक आंदोलन करण्यासाठी गेले आहेत. तुम्हाला माहिती नसेल तर सांगतो. एका स्त्रीला समजले पाहिजे की, मोड न आलेले धान्य खाल्ले की पोटात काय होते ? कशाला उगाच वाद घालत आहात.

(काही सन्माननीय सदस्य आपसात बोलतात.)

श्रीमती संजीवनी रायकर : मोड न काढता ते कडधान्य भाजून शिजवले तर ते बाधत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, तेथे असे काहीच केलेले नाही, कशाला बाजू घेत आहात. तर त्याठिकाणी गरम पाणी मिळत नाही. जे पीठ सापडले, ते दुस-या दिवशी वापरणार असे सांगितले आणि ते खराब झालेले नाही असे याठिकाणी सांगण्यात आले आहे. तेव्हा याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे, म्हणजे एकंदरीतच हे उत्तर भावनाशुन्य अशा प्रकारचे असून त्यातून गोरगरीबांबद्दल कणव आहे असे दिसून येत नाही. आमचे स्पष्ट मत आहे की, आश्रमशाळा, अनाथालये असो किंवा गोरगरीबांचा जेथे प्रश्न येतो आणि खास करुन आश्रमशाळांमध्ये भ्रष्टाचारा-व्यतिरिक्त काहीही होत नाही. येथील कर्मचा-यांना कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडलेले आहेत.त्यांना

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

टी.व्ही.वर दाखविलेले आहे. असे असताना शासन सर्व कर्मचा-यांना सस्पेंड करणार आहे का ? तसेच याबाबतीत चौकशी करुन त्यांना कायमचे निलंबित करणार आहे का ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केलेला आहे. कुडाळमध्ये जी मूक, बधीर शाळा आहे. त्याठिकाणी राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. त्या आंदोलनामुळे तेथील कर्मचा-यांनी काही गोष्टी कबूल केल्या आहेत की, त्यांच्याकडून चुका झालेल्या आहेत. परंतु हे तितकेच खरे आहे की, त्यामुळे त्यांनी नंतर सुधारणा करुन विद्यार्थ्यांना चांगले जेवण देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यांना गरम पाणी दिले जात आहे. त्यांचे कपडे धुतले जात आहेत. तेथील कर्मचा-यांनी चुक कबूल केल्यानंतर शासनाने तहसिलदार, संचालक आणि जिल्हा परिषदेच्या अधिका-यांची समिती गठीत करुन संपूर्ण चौकशी करण्याचे काम त्यांच्याकडे दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी चौकशी केलेली आहे आणि संबंधितांवर कारवाई करण्याचे निश्चित केले आहे. त्यांची दोन इन्क्रीमेंट कमी करण्याचे ठरविलेले आहे. जिल्हा समाजकल्याण अधिका-यांना तेथून बदलण्यात आले आहे. या पुढच्या काळामध्ये मूक, बधीर शाळा असेल, आश्रमशाळा किंवा वसतीगृहे असतील या सर्व ठिकाणी विद्यार्थ्यांची हेळसांड झाली तर तेथे कोणताही अधिकारी असेल किंवा कर्मचारी असेल, त्याची गय केली जाणार नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, "आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते."

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, दोन महिन्यापूर्वी याच जिल्हा परिषदेच्या महिला आणि बाल कल्याण या विभागाच्या माध्यमातून जिल्हयातील सर्व अंगणवाडीसाठी इलेक्ट्रिकच्या शेगडया देण्याचे ठरविण्यात आले. त्या शेगडीची किंमत 175 रुपये होती.लहान मुलांचे जवेण शिजवण्यासाठी त्या शेगडया दिल्या होत्या. त्या सर्व शेगडया लिक होत होत्या. आणि त्या नादुरुस्त होत्या. यासंबंधीची नंतर चौकशी झाली. आणि ज्या शेगडया 175 रुपयाला या लोकांना वाटल्या होत्या त्या जिल्हा परिषदेने 690 रुपयात खरेदी केल्या होत्या. त्यामध्ये 8 लाख रुयाचा भ्रष्टाचार या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झाला होता. याचे प्रायश्चित म्हणून जिल्हा परिषदेच्या बाल कल्याण खात्याच्या सभापती अस्मिता बांधेकर यांचा त्या ठिकाणी राजीनामा घेण्यात आला. आता त्या त्याठिकाणी पदावर नाहीत. सभापती महोदय,हे प्रकरण सुध्दा गंभीर आहे.गंभीर अशा अर्थाने आहे की, जे विद्यार्थी अंध आहेत, बधीर आहेत, मुके आहेत. हे 21 विद्यार्थी एम.आय.डी.सी.विभागाच्या छत्र शाळेमध्ये आहेत.ज्या पध्दतीने या सर्व मुलांची हेळसांड झाली.

डॉ. नीलम गो-हे : याचा काय संबंध आहे?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : काय संबंध आहे ते मी आपल्याला सांगतो. आपल्याला कां कीव आली ते मी नंतर सांगतो.सभापती महोदय, शिवसेनेच्या ताब्यामध्ये ही संपूर्ण जिल्हा परिषद आहे. आणि ही जिल्हापरिषद त्या ठिकाणी मनमानी कारभार करते. ही संपूर्ण जिल्हा परिषद भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे. अधिकारी सुध्दा या पदाधिका-यांच्या दवाखाली दबलेले आहेत. म्हणून त्यांचा आवाज कोणी ऐकत नाही. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. या सर्व कर्मचा-यांना सस्पेंड करुन यांच्या विरुध्द आपण कारवाई करणार आहात काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : अध्यक्ष महोदय, त्या कर्मचा-यांवर कारवाई केलेली आहे. त्यांच्या दोन इन्क्रीमेंट कमी केलेल्या आहेत. त्याच बरोबर तेथील जे समाजकल्याण अधिकारी आहेत, त्यांना तेथून बदलण्यात आलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲडव्होकेट श्री. गुरुनाथजी कुलकर्णी यांना यातील विषय काय आहे ते माहीत नाही. हा विषय सोडून ते दुस-याच कुठल्या तरी क्षेत्रात जातात . कुठलाही त्यात विषय असेल तर त्यांच्या या उत्तराला माझा हरकतीचा मुद्दा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सभापती महोदय, मी ही लक्षवेधी सूचना लावली होती. त्यात जो विषय आहे तो मला माहीत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझ्या जवळ हा संपूर्ण विषय आहे आणि हा विषय मी वाचलेला आहे. मला या विषयावर प्रश्न विचारावयाचे आहेत. पण विषयाच्या बाहेर जाऊन काही तरी बडबड करणे याला इररिलिव्हन्ट टॉक म्हणतात.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, यामध्ये 8 लाख रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या मुलांविषची मला अतिशय आदर आहे. यातील जो विषय आहे तो अतिशय महत्वाचा आहे.पण त्या विषयाला फाटे फोडून दुस-या क्षेत्रात प्रवेश करणे कधीही योग्य नाही.

(काही सदस्य एकदम बोलत असतात)

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मी उत्तर दिलेले आहे. त्या कर्मचा-यांच्या दोन इन्क्रीमेंट कमी केलेल्या आहेत. शाळेतील पाच कर्मचा-यांच्या कर्तव्यात हलगर्जीपणा केल्या बद्दल दोन वेतनवाढी रोकण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. अधीक्षक प्रशासकीय अंध शाळा कुडाळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. वि. दु. कांबळी यांच्याकडून काढून घेऊन ...(उत्तर अर्धवट)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, एवढा मोठा भ्रष्टाचार झालेला असतांना शासन त्यांचे दोन इन्क्रीमेंट कमी करते. त्यांना सस्पेंड करा.

(काही सदस्य एकदम बोलत असतात)

(उत्तर आले नाही.)

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये काम करणा-या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून 2002 पासून वेतन न मिळणे.

मु. शी. : राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये काम करणा-या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून 2002 पासून वेतन न मिळणे यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे, जगदीश गुप्ता, वसंतराव खोटरे, व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, नानासाहेब बोरस्ते, जी. एल. अैनापूरे, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे व डॉ. अशोक मोडक यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये काम करणारे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून 2002 पासून वेतन न मिळाल्याने प्रचंड असंतोष निर्माण होणे, कर्मचाऱ्यांनी आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयासमोर सुरु केलेले आमरण उपोषण, या उपोषणाची शासनाने कोणतीही दखल न घेणे, आदिवासी विभागाच्या अनुदानित आश्रमशाळेसाठी निश्चित धोरण न आखणे, शासनाकडून वारंवार दर महिन्याला नवीन आदेश, परिपत्रके इ.काढली जाणे, अनुदानित आश्रमशाळेकरिता अनुदान निर्धारण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सुट्टीच्या दिवशी अथवा शाळा सुरु असतांना भेट देणे, अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षिका व पहारेकरी यांच्या नेमणुकांना मान्यता न देणे, आहाराच्या प्रमाणात कपाती व शासकीय आश्रमशाळांमध्ये विसंगती असणे, परिणामी आदिवासी अनुदानित आश्रमशाळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, विद्यार्थ्यांचे होत असलेले प्रचंड हाल, याप्रकरणी शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही बाब बरीच चमत्कारिक आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी माझे मार्गदर्शन करावे. हा जो आदिवासी विकास विभाग आहे या विभागाच्या सचिवांना जसे आपण उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार देतो त्याप्रमाणे उत्कृष्ट अधिकाऱ्याचा पुरस्कार दिला पाहिजे. ते सगळयांना त्रास देतात. त्यांना मंत्रालयातून का हाकलत नाही ? हे कळत नाही. त्यांना बेमुर्वतखोरपणे हाकलले पाहिजे. सध्या शासकीय आदिवासी आश्रमशाळा, अनुदानित आदिवासी आश्रमशाळा आणि समाजकल्याण विभागाच्या आश्रमशाळा यामधील विद्यार्थ्यांच्या आहारातील तफावत कशी आहे ती पहावी. शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये इयत्ता 1 ते 7 मधील एका मुलाकरिता 400 ग्रॅम गहू, अनुदानित आश्रमशाळा, समाजकल्याण यांच्याकडे 400 ग्रॅम आणि आदिवासी अनुदानित आश्रमशाळेमध्ये 150 ग्रॅम गहू दिला जातो आणि इयत्ता पाचवी ते सातवीच्या मुलांसाठी 200 ग्रॅम गहू दिला जातो. तांदुळाच्या बाबतीत आदिवासी शासकीय आश्रमशाळेमध्ये 100 ग्रॅम, समाजकल्याणच्या अनुदानित आश्रमशाळेमध्ये 100 ग्रॅम आणि अनुदानित आदिवासी आश्रमशाळेमध्ये 100 ग्रॅम दिला जातो. डाळींच्या बाबतीत आदिवासी शासकीय आश्रमशाळेमध्ये 75 ग्रॅम, समाजकल्याणच्या अनुदानित आश्रमशाळेमध्ये 130 ग्रॅम दिली जाते आणि आदिवासी अनुदानित आश्रमशाळेमध्ये 150 ग्रॅम व पाचवी ते सातवीसाठी 40 ग्रॅम दिली जाते. अनुदानित आश्रमशाळेमध्ये तेल नाही. त्यांना बिनतेलाच्या भाज्या बनवाव्या असे सांगतात. तेलासाठी पैसे नाहीत. मिठासाठी पैसे नाहीत. हे काय चालले आहे ? शासकीय आदिवासी आश्रमशाळेकरिता एक निकष, अनुदानित आश्रमशाळा समाजकल्याण यांच्याकरिता एक निकष आणि अनुदानित आदिवासी आश्रमशाळेकरिता दुसराच निकष आहे. ही जी तपावत आहे ती ज्यांच्या डोक्यातून निघाली, माननीय मंत्रिमहोदय श्री. गावित साहेब, यांची मनमानी किती दिवस चालणार आहे ? तुमचे अधिकार तुम्ही दाखविणार की नाही ? अशा लोकांचे आपण किती दिवस ऐकणार आहात ? श्री. लिमये, श्री. रमेशकुमार हे आदिवासींचे शत्रू आहेत. आदिवासींची उपासमार करण्याकरिता ते जबाबदार आहेत. त्यांना नोकरीतून काढले पाहिजे. याबाबतीत आपण एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने काय करणार आहात ? जे चार आयुक्त आहेत त्यांना आणखी अवार्ड द्या. नाशिकला माझ्या माहितीप्रमाणे श्री. बनगीनवार नावाचे अपरआयुक्त होते. ते चंद्रपूरचे आहेत. ते बोगस आहेत. हे चारही आयुक्त भयंकर आहेत. काही सन्माननीय सदस्य ते भ्रष्टाचारी आहेत असे म्हणत आहेत. ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

भ्रष्टाचारी आहेत असे मी म्हणत नाही. परंतु हे सगळे उलटया डोक्याने काम करतात. नाशिक विभागात आदिवासी आश्रमशाळेतील 1454 कर्मचाऱ्यांना तीन वर्षापासून मान्यता मिळालेली नाही. आयुक्त, नाशिक आहेत, अपर आयुक्त आहेत. सचिव आणि हे चार आयुक्त असे पाच जणांचे मंत्रिमंडळ आहे. एकाचा दुसऱ्याला पायपोस नाही. एकाने काही केले की दुसरा करु देत नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. गावित साहेब, हे तुमच्याच नशिबी कसे आले ? तिकडे श्री. अण्णा हजारे आणि इकडे हे आपल्या नशिबी आले आहेत. दोन्ही बाजूने तुमची अडचण केली. या 1454 शिक्षकांना तीन वर्षापासून मान्यता नाही. त्यांना मान्यता का मिळाली नाही ? त्यातील कोणाचीही डायरेक्ट नेमणूक झालेली नाही. सेवायोजन विभागाकडून नेमणुका झाल्या. डायरेक्ट नेमणुका किती झाल्या ते सांगा. सेवानियोजन कार्यालयाकडून नियमानुसार सगळया नेमणुका झालेल्या आहेत. त्यांना तीन वर्षात मान्यता का देत नाही ? मी भोजन अनुदानाच्या बाबतीत सांगितले. किती संस्था चालकांनी थेट नियुक्ती केली ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

त्यांना 10-10 वर्षे कायम केलेच नाही. ते कर्मचारी 3-3 वर्षे चकरा मारत आहेत. विभागीय आयुक्त म्हणतात की, संस्थानिहाय आरक्षण पाळा आणि हे म्हणतात की, प्रत्येक शाळानिहाय आरक्षण पाळा, यातील काय घ्यावयाचे हा प्रश्न आहे. दोघांचे आदेश वेगवेगळे आहेत. या संस्थेमध्ये 1454 कर्मचारी आमरण उपोषण करीत आहेत, त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. या 1454 लोकांना मान्यता का दिली नाही ? त्या रमेशकुमार यांच्यावर कारवाई करावी.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, 1494 कर्मचा-यांच्या मान्यतेचा प्रश्न आहे. विहित पध्दतीने जागा भरल्या पाहिजेत त्या पध्दतीने त्यांनी भरल्या नाहीत. प्रामुख्याने रोस्टरप्रमाणे भरती केली पाहिजे होती त्याप्रमाणे ती केलेली नाही आणि अप्रशिक्षित नेमणूका करणे किंवा पूर्वी सुप्रीम कोर्टाचे आदेश त्याप्रमाणे सेवायोजन कार्यालयाकडून नावे मागितली पाहिजेत आणि जाहिरात देऊनही नावे मागतिली पाहिजेत या तिन्ही पध्दतीप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे होती ती केलेली नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, अप्रशिक्षित शिक्षकांच्याबाबत शिक्षण विभागाने जी.आर.काढला होता. आदिवासी विभागाने काढलेला नाही. प्राथमिक शिक्षकांच्या डीएड झालेल्या 1494 मध्ये जवळपास 793 जागा आहेत. त्यात प्रामुख्याने आदिवासींच्या जागा रिक्त आहेत, व्हीजेएनटीच्या जागा रिक्त आहेत. तसेच एसबीसीच्या जागा रिक्त आहेत. हे डीएड विद्यार्थी मिळत नाही म्हणून जागा भरण्यासाठी परवानगी दिली नाही. परंतु आता सुधारित आदेश काढले आहेत की, प्रशिक्षित डीएड विद्यार्थी मिळत नसेल तर बारावीच्या आधारावर पदे भरण्यासाठी मागील महिन्यात आदेश दिले आहेत. त्यामुळे आता मोठया प्रमाणावर जागा निश्चितपणे भरल्या जातील. रोस्टरप्रमाणे जागा भरल्या नाहीत, एका प्रकरणासंबंधी कोर्टाने आदेश दिलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : विभागीय आयुक्त कार्यालयात एक मागासवर्गीय सेल आहे. त्यांचे म्हणणे आहे की, शाळानुसार आरक्षण न ठेवता संस्थेच्या एकापेक्षा जास्त शाळा असल्यास संस्थानिहाय आरक्षण ठेवावे. तुमचे म्हणणे आहे की, शाळानिहाय आरक्षण पाहिजे. हे चूक आहे.

डॉ.विजयकुमार गावित : पहिल्याने शाळानिहाय आरक्षण पाळावे असे शासनाने आदेश दिले होते. मी आजच आदेश दिले आहेत की, संस्थानिहाय आरक्षण पाळावे. एक गोष्ट खरी होती की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

संस्थानिहाय गृहित धरत असताना जेवढया आदिवासी आश्रमशाळा असेल त्या संस्थानिहाय आरक्षण करावे असे आदेश दिलेले आहेत. मधल्या काळामध्ये शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांबाबत जेवणासंबंधी अमूक वस्तू इतकी पाहिजे यासंबंधी निकष ठरवून दिलेले होते. त्यामध्ये तफावत होती, ती दुरुस्त करण्याबाबत आदेश निर्गमित करीत आहोत.

श्री.नितीन गडकरी : माझा प्रश्न असा आहे की, आदिवासी आश्रमशाळा, समाजकल्याणच्या आश्रमशाळा आणि अनुदानित आश्रमशाळा यातील मुले ती मुलेच आहेत. एका शाळेतील विद्यार्थी एक पोळी खाईल, दुस-या शाळेतील दोन खाईल, एका शाळेतील मुला बिन मीठाची भाजी खाईल, दुस-या शाळेतील बिन तेलाची भाजी खाईल हा काय तमाशा चालला आहे ? सगळयांना मानवी निकष आहेत की नाही ? तिघांचे तीन निकष कशासाठी लावता ? हे नसते धंदे करण्यास कोणी सांगितले आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सगळयांना समान निकष असावयास पाहिजे ही मा.विरोधी पक्ष नेत्यांची सूचना आहे त्याप्रमाणे समाजकल्याणच्याबाबतीत करु. त्याचप्रमाणे अनुदानित आश्रमशाळा आणि शासकीय आश्रमशाळांमध्ये जे कर्मचारी आहेत त्यांच्यामध्ये जी तफावत आहे ती तफावत तपासून यापुढील काळामध्ये शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा असेल त्यांना शासकीय आश्रमशाळेचा जो पॅटर्न आहे तो जून महिन्यापासून अंमलात आणला जाईल, त्यांना समान निकष राहतील.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : निकष समान राहतील ना ?

डॉ. विजयकुमार गावित : समान राहतील.

प्रा. बी.टी.देशमुख : या ठिकाणी मा. मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये जे वाक्य दिलेले आहे ते नियमाच्या विरुध्द आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, शाळानिहाय आरक्षणाचे तपशील ठेवण्याबाबत दोन अधिकारी वेगवेगळया प्रकारचे आदेश देत होते. आता संस्थानिहाय आदेश दिलेले आहेत. माझे म्हणणे असे आहे की, जाहीरात देऊन आणि सेवायोजन अधिकार्-याकडून उमेदवारांची यादी मागवून शिक्षकांच्या नेमणुका केल्या असतील तर त्यास आपण मान्यता द्याल काय? माझ्या माहिती प्रमाणे नागपूर विभागात 300 ते 500 शिक्षकांच्या नेमणुका विहित पध्दतीने झालेल्या आहेत. त्या नेमणुकांना आपण मान्यता द्याल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : विहित पध्दतीने नेमणुका झाल्या असतील तर त्यांना मान्यता देण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षिकेचे पद अनेक वर्षापासून रिक्त आहे. यासंदर्भात कार्यवाही सुरु असून प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला आहे असे आपण म्हटलेले आहे. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी या पदांना तसेच पद निर्माण करण्याला मान्यता दिली जाईल काय?

डॉ. विजयकुमार गावित : पदांच्या संदर्भात मी स्पष्टपणे सांगितले आहे, मग ते स्त्री अधिक्षिकेचे पद असेल,पहारेक-याचे पद असेल, कामाठ्याचे पद असेल किंवा चौकीदाराचे पद असेल या पदांच्या संदर्भात शासकीय पॅटर्न प्रमाणेच हा पॅटर्न आम्ही करीत आहोत. त्यामुळे यामध्ये कोणतीही तफावत राहाणार नाही. पूर्वी हे स्त्री अधिक्षिकेचे पद नव्हते. या संदर्भात स्पष्ट सांगायचे झाले तर आम्ही मधल्या काळामध्ये बैठक घेतली होती. यासंदर्भात आदेशही निर्गमित करण्यात येणार होते. पण पूर्वी 8 वी ते 10 वीचा अभ्यासक्रम माध्यमिक होता. त्यामुळे सब्जेक्ट टिचर मिळत नव्हते. म्हणून 1ली ते 4थी अभ्यासक्रम हा प्राथमिक आणि 5 वी ते 10वी पर्यन्तचा माध्यमिक करायचे ठरविले. यामुळे सब्जेक्ट टिचर मिळतील. स्त्री अधिक्षिकेचे पद आम्ही देत आहोत. पूर्वी पहारेकरी नव्हता. ते पद देत आहोत. पुढच्या शैक्षणिक वर्षापासून हे सर्व लागू होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/

डॉ. अशोक मोडक :मंत्री महोदयांनी आपल्या निवेदनामध्ये हायकोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. तो निर्णय माझ्याकडे आहे. मी आपणास तो वाचून दाखवतो. मघाशी मा. विरोधी पक्षनेते म्हणाले ते किती महत्वाचे आहे ते मला आपणास पटवून द्यायचे आहे. आयुक्तांनी ॲप्रुव्हलला रिजेक्शन केले. त्या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने 16.2.2005 रोजी निर्णय दिलेला आहे. मी तो आपणास वाचून दाखवितो. मला त्यानंतर प्रश्न विचारावयाचा आहे. "In view of the above facts in our considered opinion the order of rejection of approval..."

प्रा. बी.टी. देशमुख : म्हणून त्या लोकांनी हायकोर्टात जाऊन न्याय मिळविला.

डॉ. अशोक मोडक : हा जो रिजेक्शनचा विषय आहे त्यावर बोळा फिरविलेला आहे. म्हणजे आयुक्तांनी मनमानी चालविलेली आहे. आता सुदैवाने हायकोर्टाने ही मनमानी मान्य नाही असे सांगितलेले आहे. निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे की, जर न्यायालयाचा निवाडा प्राप्त झाला तर विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने पुढील कारवाई करण्यात येईल. आता आपण या सर्व पदांना मान्यता देणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, हा निकाल येण्यापूर्वी एक दोन संस्थांच्या बाबतीत मी बैठक घेतलेली होती. पूर्वी सुप्रिम कोर्टाचा 1990ला आदेश आलेला होता त्या आदेशामध्ये त्यांनी सांगितले होते की, दोन्ही पध्दतीने भरती केली असेल तरच आपण इम्प्लीमेंट करायचे. पण ब-याचशा संस्थांनी त्यापूर्वीच ही भरती केलेली आहे.ही भरती पूर्वीच केलेली असल्यामुळे मंत्री मंडळासमोर जाऊन त्यास अप्रुव्हल देऊ. सुदैवाने कोर्टाने देखील निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाप्रमाणे आम्ही लॉ डिपार्टमेंटला विचारतो. त्यांनी जाहीरात देऊन पदे भरली असली किंवा सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवार मागवून पदे भरली असली तरी त्याबाबतीत आम्हाला विधी व न्याय विभागाने सांगितले तर त्या भरतीला मान्यता देऊ.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे फार मोठया घोटाळयाचे प्रकरण आहे.मी गेली अनेक वर्षे विधानमंडळाचा सदस्य आहे. असा विभाग त्यातील महाभयानक अधिकारी मी कधी पाहिलेले नाही. लोकांचे अतिशय हाल होत आहेत, बालके मृत्यूमुखी पडत आहेत.लोक आमरण उपोषणास बसलेले आहेत. मला माफ करा बोलले पाहिजे. डॉ. गावीत साहेब विभागाचे अधिकारी तुमचे ऐकत नाही. तुमची काय अडचण आहे याची मला कल्पना नाही. सभापती महोदय, माझी आपणास एकच विनंती आहे की, या आदिवासींच्या महत्वाच्या प्रश्नाकरिता आपल्या दालनात एक बैठक बोलवा. संबंधीत प्रतिनिधी, मंत्री, अधिकारी, यांना बैठकीत बोलवा,तसेच आम्हाला देखील त्या बैठकीत बोलवा. जे कायद्यात बसत असेल ते तुम्ही करा. त्या गरीब लोकांना तुम्ही संरक्षण द्या. याबाबतीत तुम्ही बैठक बोलवावी व या विषयावर चर्चा घ्यावी अशी आपणास विनंती करतो.

उपसभापती : पुढच्या आठवडयात यासंदर्भातील बैठक बोलाविण्यात येईल. त्या बैठकीत आपण निर्णयाप्रत येऊ.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील अनुपस्थित.)

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :वासुदेव बळवंत फडके यांच्या वाडयाचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर करण्याबाबत.

मु. शी. :"वासुदेव बळवंत फडके यांच्या वाडयाचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर करण्याबाबत" सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.अनिल परब यां□ एक विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

" शिरढोण येथे असलेल्या वासुदेव बळवंत फडके यांच्या वाडयाचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर व्हावे अशी मागणी गेल्या काही वर्षापासून सातत्याने होत आहे. परंतु हे स्मारक करण्यासाठी राज्य शासनाने अद्याप हा वाडा पूर्णपणे आपल्या ताब्यात घेतलेला नाही. राष्ट्रीय स्मारक तयार करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने निश्चित योजना आणि आराखडा तयार केलेला नाही. स्मारक समितीतर्फे येथे चालविण्यात येणा-या उपक्रमांसाठी राज्य शासनाकडून अनुदान मिळत होते. मात्र गेल्या पाच वर्षापासून वाचनालय व ग्रंथालय वगळता अन्य दोन उपक्रमांना मिळणारे अनुदानही बंद झाले आहे. या वाडयाचे राष्ट्रीय स्मारक करण्याच्या दृष्टीने योजना व आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाचा परतावा न मिळणे.

मु. शी. :सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाचा परतावा न मिळणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.अनंत तरे यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

" महाराष्ट्र शासनाने 17 मार्च,1970 रोजी मुंबईतील गर्दी आणि वाहतुकीची कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने मुंबईला पर्यायी शहर म्हणून नवी मुंबई ही 21 व्या शतकातील नगरी उभारण्याचा निर्णय घेतला. या नवीन शहरास वसविण्यासाठी शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) या कंपनीची स्थापना करुन त्यांनी विकास आराखडा तयार करुन 344 चौ.कि.मी.एवढया क्षेत्रफाळावर 14 छोटया व स्वयंपूर्ण अशा नगरांची स्थापन केली आहे. असे असले तरी या ठिकाणचा मूळचा प्रकल्पग्रस्त शेतकरी,शेतमजूर,मिठागर कामगार मात्र भूमिहीन होऊन आपल्या भविष्याच्या चिंतेत गढला आहे. येथील स्थानिक शेतक-यांच्या लाखमोलाच्या जमिनी 27 हजार रुपये प्रति एकराने सिडकोने संपादित करुन घेतल्या आहेत. या शेतक-यांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या जमीन संपादित केल्यामुळे शेतकरी,शेतमजूर,मिठागर कामगार बेरोजगार झाले. अशा सर्व प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या संपादित जमिनीच्या साडेबारा टक्के भूखंड परतावा करण्याचा निर्णय घेतला. परंतु या प्रकल्पग्रस्तांच्या अशिक्षितपणा, आर्थिक परिस्थितीमुळे असलेला मागासलेपणा याचा फायदा येथील बिल्डरांनी उचलून सिडकोतील भ्रष्ट अधिका-यांच्या संगनमतामुळे प्रकल्पग्रस्तांच्या नावावर प्लॉट काढून इमारती उभारण्याचे काम सुरु आहे. यामुळे प्रकल्पांमध्ये त्यांच्या भवितव्याविषयी निर्माण झालेली साशंकता. याबाबत शासनाने योग्य कार्यवाही करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

सभापती महोदय, 21 व्या शतकासाठी मुंबईला पर्यायी शहर म्हणून नवी मुंबई उभारण्यात आलेली आहे.नवीन मुंबई उभारण्यासाठी ज्या ज्या 49 हजार शेतक-यांनी जागा दिली आहे. त्यापैकी फक्त 19 हजार शेतक-यांना आजपर्यन्त शासनाने अनुदान दिलेले आहे. नवीन मुंबईची निर्मिती झाली त्यावेळी माननीय श्री. शरद पवार यांचे सरकार होते. त्यावेळच्या सरकारने प्रकल्पग्रस्त शेतक-यांना साडेबारा टक्के भूखंड देण्याचे मान्य केले. परंतु आज 21 हजार प्रकल्पग्रस्त आहेत त्यांनाच यासंबंधीचा मोबदला मिळालेला आहे. या ठिकाणी विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने मागणी आहे की, सिडकोतील भ्रष्ट अधिका-यांच्या माध्यमातून शेतक-यांना देय असलेले साडेबारा टक्के जे भूखंड आहेत ते भूखंड शेतक-यांच्या नावाने खाजगी विकासकांना देण्याचे कटकारस्थान जोरदारपणे सुरु आहे. यासंदर्भात तातडीने शासनाने चौकशी करावी. ठाणे,रायगड जिल्हयातील ज्या प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळालेले नाहीत त्यांना भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी अशी शासनास विनंती करतो.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेऊन आरे कॉलनीतील तलाव तसेच अनेक झाडे नष्ट होण्याची निर्माण झालेली भिती.

मु. शी. : रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेऊन आरे कॉलनीतील तलाव तसेच अनेक झाडे नष्ट होण्याची निर्माण झालेली भिती याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्रीमती संजीवनी रायकर यां□□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□□ मांडतो.

" मुंबईचा विकास करण्याच्या हट्टापायी रस्ता रुंदीकरण काम हाती घेऊन आरे कॉलनीतील तलाव तसेच अनेक झाडे नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे. पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची झालेली परिस्थिती "

सभापती महोदय, आरे कॉलनी ते पवई पर्यन्त सहा पदरी रस्ता करण्याचे शासनाने ठरविले आहे. आरे कॉलनी हे प्रेक्षणीय स्थळ आहे. झाडे लावा आणि झाडे जगवा अशा प्रकारची घोषणा शासनामार्फत करण्यात येते. प्रत्यक्षात मात्र आरे कॉलनीतील एक हजाराच्या वर झाडे तोडून हा रस्ता तयार केला जाणार आहे. आरे कॉलनी हे प्रेक्षणीय स्थळ असल्यामुळे मुंबई शहरातील अनेक लोक आपल्या कुटुंबियांसह सुटीच्या दिवशी तेथे फिरण्यासाठी जातात. त्या ठिकाणी सुंदर तलाव आहे. तो तलाव सुध्दा बुजविण्याचे काम शासनाकडून करण्यात येणार आहे. त्या तलावाचे आधीच सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. तलावाचे सुशोभिकरणाचे काम झालेले असताना तो चांगला तलाव बुलविणे हे योग्य होणार नाही.जागेश्वरी लिंक रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. त्यामुळे आरे कॉलनी ते पवई असा सहा पदरी रस्ता करण्याची काही गरज नाही.यासंदर्भात आरे कॉलनी बचाव समिती स्थापन करण्यात आलेली आहे व त्यास

7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पर्यावरणवाद्यांनी लोकांनी या आरे कॉलनी बचाव समितीला पाठिंबा दिलेले आहे. शासनाने सहा पदरी रस्ता करण्याचे काम सोडून द्यावे आणि आरे कॉलनीचे जे वैभव आहे ते तसेच अबाधीत ठेवावे अशी शासनास विनंती आहे.

उपसभापती : मा.सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत अनुपस्थित.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी::राज्यातील दूध उत्पादक सहकारी संस्थांमध्ये पुरुष सभासदांबरोबर त्यांच्या पत्नीलाही सहयोगी सभासद करणे.

मु. शी.:राज्यातील दूध उत्पादक सहकारी संस्थांमध्ये पुरुष सभासदांबरोबर त्यांच्या पत्नीलाही सहयोगी सभासद करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त :(महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यात विशेषत: मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात दुध व्यवसाय हा ग्रामीण भागाचा कणा असून या व्यवसायात जनावरांची खरी देखभाल प्रामुख्याने महिलाच करीत असतात. त्यात जनावरांची देखभाल करणे, चारा-पाणी घालणे,घास काढणे, त्याची स्वच्छता, निगा राखणे ही महिलाच करीत असतात. दुधाचे बील दर दहा दिवसांनी संबंधित सहकारी दुध संस्थामार्फत अदा केले जाते. राज्यातील सर्व दूध सहकारी संस्थांमध्ये पुरुषच सभासद असल्यामुळे आणि आपल्या समाजामध्ये अजूनही दूध उत्पादक सहकारी संस्थांमध्ये दर दहा दिवसांनी मिळणारे दुधाचे बील पुरुषांच्या खात्यावर जमा होऊन त्यांच्या हातात पडते...

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. संजय दत्त ...

तेव्हा त्या पैशाचा ब-याच ठिकाणी योग्य तो विनियोग आपल्या कुटुंबियांसाठी न करता त्याच्या मर्जीवरच तो वापरला जातो. त्यामुळे ब-याच वेळी कुटुंबियांचे मोठे नुकसान होते, ही बाब लक्षात घेऊन या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी राज्यातील प्रत्येक संस्थेत पुरुष सभासदाबरोबर त्यांच्या पत्नीलाही सहयोग सभासद सक्तीने करण्यात यावे व दुधाचे बील हे त्यांच्या पत्नीच्या नावे अदा करण्याची कायदेशीर पोटनियम दुरुस्ती करण्याबाबतचा अध्यादेश शासनाने ताबडतोब लागू करावा,पत्नी हयात नसल्यास सभासदांची आई,अविवाहीत बहीण किंवा मुलगी यांची सहयोगी सभासद म्हणून या अध्यादेशात तरतूद करावी व शासनास याबाबत योग्य सूचना देण्यात याव्यात ही या विशेष उल्लेखाद्वारे विनंती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुरबाड येथील श्री. लियाकत शेख यांना झालेली अटक.

मु. शी : मुरबाड येथील श्री. लियाकत शेख यांना झालेली अटक यासंदर्भात मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी नियम 101(अ) अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून मा.गृहराज्यमंत्र्यांचे निवेदन.

उपसभापती : मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी मुरबाड येथील श्री. लियाकत शेख यांना झालेली अटक यासंदर्भात नियम 101(अ) अन्वये सूचना दिलेली होती. त्यासंदर्भात मा.गृहराज्यमंत्री निवेदन करतील.

श्री. सिध्दराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, मा.सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी नियम 101(अ) अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2004-05 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व उद्या दिनांक 23 मार्च,2005 रोजी घ्यावयाचे ठरले आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1. मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-2,ए-4,सी-1,सी-10,एफ-2,एफ-3,एफ-4,एफ-5,जे-1,जे-2,क्यू-2,क्यू-3.
2. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एच-1,एच-5,एच-6,एच-7,एच-8,एच-10
3. सहकार,पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2,व्ही-3,व्ही-5,
4. जलसंपदा(कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभेक्षत्र विकास,पाणी पुरवठा स्वच्छता विभागाच्या मंत्र्यांच्या पूरक मागण्या क्रमांक आय-1,आय-2,आय-3,वाय-1,वाय-3,वाय-6
5. वस्त्रोद्योग,माजी सैनिकांचे कल्याण,रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-5,व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

6. वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक जी-1,जी-2,जी-5,जी-6,जी-7,जी-8,ओ-6,ओ-7
7. पणन व रोजगार हमी योजना,संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-1,व्ही-4,एक्स-2,ओ-2
8. सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक आर-1,आर-3
9. अन्न व औषधे प्रशासन व विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागणी क्रमांक एन-1
10. अन्न ,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एम-1,एम-2
11. वन मंत्र्यांच्या विभागाच्या मागणी क्रमांक सी-7

मा. सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे आता पूरक मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करतील.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पूरक मागण्यांच्या संदर्भात जे विभाग याठिकाणी चर्चेसाठी ठेवण्यात आलेले आहेत त्यामध्ये महसूल आणि वन विभागाच्या बाबतीत मी बोलणार आहे. या विभागाच्या संदर्भात बाब क्र. 25 आणि पृष्ठ क्र. 18 कडे मी मंत्रीमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. यामध्ये गोदावरी सहकारी साखर कारखान्याच्या मदतीसाठी पूरक मागणी केलेली आहे आणि त्यासाठी जवळजवळ 88 लाख रुपये दिले जाणार आहेत. यासंदर्भात मी असे म्हणेन की, अशा प्रकारे जर आर्थिक सहाय्य शासन देणार असेल तर त्याला आमचा विरोध नाही. अनेक महामंडळे आजारी पडली आहेत. भूविकास बँक, शेती विकास महामंडळ इ. अनेक उपक्रम आहेत. बाब क्र. 24 मध्ये शेती महामंडळाकरिता 5 कोटी 51 लाख रुपये इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ही सगळी महामंडळे शासन खरोखरच व्यवस्थित चालविणार असेल आणि त्यांना सक्षम करणार असेल तर आम्ही या पूरक मागण्यांचे स्वागत करतो. परंतु असे होता कामा नये की ही महामंडळे चालू आहेत आणि फक्त शासनाचा खर्च होत आहे आणि या महामंडळांचा रिझल्ट मात्र दिवाळखोरीच्या दिशेने वाटचाल करणारा आहे अशा प्रकारचे चित्र उभे राहू नये असा या मागणी पाठीमागचा उद्देश दिसतो.

यानंतर श्री. गायकवाड ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..

.सभापती महोदय,यानंतर मला नगर विकास विभागाची बाब क्रमांक 40 पान नंबर 33 सबंधी बोलावयाचे आहे.या बाबीमध्ये मॅनग्रोव्ह वनस्पतीचे जतन करणे व वर्सोवा येथे संरक्षण भिंत बांधण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला सहाय्यक अनुदान देण्यासाठी 1 कोटी 28 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे मला याबाबतीत एवढेच म्हणावयाचे आहे की, मुंबई शहरातील मॅनग्रोव्ह वनस्पतीची झुडपे आज उध्वस्त होत आहेत. मुंबई शहरातील बिल्डर्स लोकांनी हा धंदा सुरु केलेला आहे. वर्सोवा परिसरातील ही झुडपे उध्वस्त करण्यात आली असून आजच्या लोकसत्ता या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर तो फोटो छापण्यात आला आहे.कशा पध्दतीने ही मॅनग्रोव्ह वनस्पती नष्ट केली जात आहे याची त्यावरुन आपल्याला कल्पना येईल असे प्रकार होता कामा नये. एखादी त्सूनामी लाट मुंबईच्या दिशने याची अशी कोणाचीही इच्छा नाही परंतु यदाकदाचित ही त्सुनामी लाट जर मुंबई शहरात आली तर मॅनग्रोव्ह वनस्पती नष्ट .केल्यामुळे त्या लाटा नागरी वस्तीवर येऊन आदळतील. त्यामुळे मुबई शहराचे मोठया प्रमाणावर नुकसान होऊ शकते.तेव्हा मॅनग्रोव्ह वनस्पतीचे जतन करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर आपण जी संरक्षण भिंत बांधणार आहात ती मजबूत असण्याची आवश्यकता आहे.एन.जी.ओ. तर्फे ज्या भिंती घालण्यात येतात त्या एक वर्षसुध्दा टिकत नाहीत. मरिन लाईन्स जवळ अशा प्रकारच्या भिंती पूर्वी घालण्यात आल्या होत्या परतु आज त्या भिंती कशा आहेत हे जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की अनेक ठिकाणी या भिंती कोसळल्या आहेत. तेव्हा या भिंतीचे मजबुतीकरण करण्यासाठी त्या ठिकाणी आणखी सिमेन्टचे ओडके आणून टाकावे लागत आहेत. त्या भागात सुध्दा आता गुन्हे व्हावयास लागले आहेत. तेव्हा जे काम करण्यात येणार आहे ते चांगल्या प्रकारे व्हावयास पाहिजे.जो निधी महानगरपालिकेला देण्यात येणार आहे त्या निधीचा वापर योग्य प्रकारे वापर झाला पाहिजे आणि हे काम चांगल्या प्रकारे झाले पाहिजे तसेच मॅनग्रोव्ह वनस्पतीचे चांगल्याप्रकारे संरक्षण करण्याची गरज आहे.शासनाने या कामासाठी जरुर पैसे खर्च करावेत परंतु ते पैसे योग्य कारणी लागतील याची शाश्वती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी असे मला या निमित्ताने त्यांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 54 पान नंबर 45 संबंधी बोलावयाचे आहे.केन्द्रीय मार्ग निधीतून (नियत वाटप) तरतूद करुन रस्ते व पुलांची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ....

बांधकामे कार्यान्वित करणे यासाठी 42 कोटी 15 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे ज्या कामासाठी हा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे .त्याप्रमाणे पूल आणि रस्ते जर होत आसतील तर खूप आनंदाची गोष्ट आहे.या बाबतीत एम.एस.आर.डी.सी.ने जो पूल बांधला आहे त्याचा मला या ठिकाणी उल्लेख करावयाचा आहे.बान्द्रा पूर्वेहून विधान भवनाकडे येतांना जो पूल बांधण्यात आला आहे त्या ठिकाणी आता आपण समुद्र मार्गाने जाणारा सेतू पूल बांधणार आहोत त्या पुलाच्या सुरुवातीला ज्या पध्दतीने बांधकाम करण्यात आले होते त्याबाबतीत मी मागच्या मंत्र्यांनासुध्दा विनंती केली होती की, आपण स्वत: येऊन त्या ठिकाणची पहाणी करावी. तेथे सकाळी 8.30 वाजल्यापासून दुपारी 12.00 वाजेपर्यन्त रहदारी जाम होते.त्या ठिकाणी रहदारी कशी जाम होते याची माननीय मंत्रीमहोदयांना कल्पना असेल.अर्धा तास लोकांना ट्राफिकमध्ये थांबावे लागते.ज्या कारणासाठी हा पूल बांधला, ज्या कारणासाठी पश्चिम द्रूत गती मार्गावर पूल बांधले तो उद्देश सफल होत नाही.त्याचा परिणाम असा होतो की, त्या भागात संपूर्ण रहदारी जाम होते.त्याचे एकच कारण असे आहे की, डाव्या बाजूने जो रस्ता येतो व तो माहिम कॉजवे येथे मुख्य रस्त्याला मिळतो. त्या ठिकाणी बाजूला होर्ल्डिग लावण्यासाठी स्टॅन्ड उभे करण्यात आलेले आहेत. त्यामुळे रस्ता रुंद होऊ शकत नाही. त्यामुळे होर्ल्डिगपासून मिळणारे उत्पन्न महत्वाचे आहे की रस्ता मोठा करुन रहदारी सुरळीत करणे महत्वाचे आहे याचा शोध घेऊन त्याबाबतची पहाणी करुन रहदारी सुरळीत करण्यात यावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या सबंधीचा उल्लेख की मागेसुध्दा केला होता परंतु त्याकडे लक्ष दिले गेले नाही असे मला वाटते.सुदैवाने आपण 15 कोटी रुपये खर्च करीत आहात. तेव्हा मुंबईच्या ज्या अनेक व्यथा आहेत त्यापेकी ही खूप मोठी व्यथा आहे ही व्यथा दूर करण्याचा आपण प्रयत्न कराल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

नंतर श्री.किल्लेदार

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू....

सभापती महोदया, गृहनिर्माण विभागाच्या एका बाबीवर बोलून माझे भाषण संपविणार आहे. पृष्ठ क्रमांक 115, बाब क्रमांक 104. मंजूर अनुदानाहून अपेक्षित खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त निधी 19 लाख 94 हजाराची तरतूद केलेली आहे. गृहनिर्माण विभाग हा मा.मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयही उपस्थित नाहीत. परंतु या विभागाच्या एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. जुने भाडेकरू मुंबई गृहनिर्माण विभागाच्या वस्त्यांमध्ये रहातात. त्यांच्या नावे मालकी हक्काने गाळे करुन दिलेले आहेत. गृहनिर्माण मंडळाने गेल्या महिन्यात असा निर्णय घेतलेला आहे की, त्या गाळयामध्ये रहात असलेल्या पूर्वीच्या भांडेकरुंना एनअे टॅक्स म्हणून दोन दोन महिन्यांनी 56 हजाराची बिले पाठविलेली आहेत. इमारत बांधून 50 वर्षे झालेली आहेत आणि मालकी हक्काने त्यांच्या नावे घरे झालेली आहेत, अशा परिस्थितीत गृहनिर्माण मंडळ जर त्यांच्याकडून एनअे टॅक्स वसूल करत असेल तर ते योग्य नाही, यादृष्टीने लक्ष घालावे. मा.मुख्यमंत्री उपस्थित असते तर त्यांच्याकडून खुलासा घेता आला असता. परंतु ते उपस्थित नाहीत. याबाबतची नोंद घेऊन त्याचा खुलासा करावा, एवढी विनंती करून माझे विचार संपवितो.

--

4 B-2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2004-2005 चे खर्चाचे पूरक विवरणपत्राचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. पृष्ठ क्रमांक 18, बाब क्रमांक 24 महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे, यांस अल्प मुदतीचे कर्ज देण्यासाठी तरतूद करण्याची पूरक मागणी केलेली आहे. शेती महामंडळ शासनाने बंद केलेले आहे, त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना व्हीआरएस देण्याकरिता 5 कोटी 51 लाख 45 हजाराची तरतूद केलेली आहे.

श्री.राजेंद्र शिंगणे (बसून) : आपण शेती महामंडळ बंद केलेले नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : ठीक आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुळकर्णी ....

अध्यक्ष महाराज, पृ.46, बाब क्रमांक 54 - रत्नागिरी जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी नाटे आणि जैतापूर गावांदरम्यान जैतापूर खाडीवर पूल बांधण्याचे योजले आहे आणि त्यासाठी 18.65 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय श्री.अंतुले हे या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळेस सागरी महामार्गाची सुरूवात त्यांनी केली होती. त्या ठिकाणी काही बुलांची बांधकामे झालेलीही आहेत आणि आज त्यांचेच शिष्य असलेले सन्माननीय श्री.रविशेठ पाटील हे या खात्याचे राज्यमंत्री म्हणून येथे उपस्थित आहेत. माझी या निमित्ताने त्यांना विनंती आहे की, या सागरी महामार्गामध्ये नाटे-जैतापूर पूल हा सीआरएफ मध्ये मंजूर झालेला आहे त्याचे केव्हाही भूमिपूजन होऊ शकते अशी स्थिती आहे. अध्यक्ष महाराज, या सागरी महामार्गावर आणखी 3-4 पूल आहेत आणि माझ्या माहितीप्रमाणे केवळ 38 कि.मी.रस्ता त्यात व्हायचा आहे. हे रस्ते आणि हे पूल पूर्ण झाले तर कोकणातील जनतेचे जे कोकण रेल्वेचे एक स्वप्न होते तसेच सागरी महामार्ग पूर्ण होण्याचे देखील स्वप्न आहे तेही पूर्ण होईलच शिवाय राष्ट्रीय महामार्ग क्र. 17 आहे त्यालाही पॅरलल रस्ता यामुळे उपलब्ध होईल आणि जलदगतीने वाहतूक होऊ शकेल. अध्यक्ष महाराज, या सागरी महामार्गाचे वैशिष्ट्य असे आहे की, हा जो 760 कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टी आपल्याला मिळालेली आहे त्या किनारपट्टीला पॅरलल असाच हा रस्ता जात असल्याने यामुळे या जिल्ह्यांतील पर्यटन देखील वाढेल. म्हणून या नाटे-जैतापूर पुलासाठी तरतूद केल्याबद्दल मी या निमित्ताने सरकारचे अभिनंदन करतो. अध्यक्ष महाराज, या पुलाबरोबरच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही महत्त्वाचे पूल आहेत की ज्या संदर्भात यापूर्वीच्या या खात्याच्या राज्यमंत्री सन्माननीय श्रीमती वसुधाताई देशमुख यांनी नागपूर अधिवेशनामध्ये आणि मुंबईच्या अधिवेशनामध्ये देखील आश्वासन दिलेले होते. मिठमुंबरी-तारामुंबरी पुलासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाईल, तसेच दुसरा एक महत्त्वाचा पूल म्हणजे मसुरे-बांदिवडे पूल आहे, या पुलासाठी देखील सातत्याने वर्षानु वर्षे मागणी तेथील लोक करीत आहेत. बांदिवडे खाडी आहे तेथे पावसाळ्यामध्ये समुद्राला जेव्हा उधाण आलेले असते. आणि त्या परिसरातील 150 हून अधिक मुले शिक्षणासाठी येत-जात असतात. तेव्हा या पुलांसाठी ताबडतोब कारवाई करावी अशी मला या निमित्ताने आपल्याला सूचना करावयाची आहे. त्याचबरोबर मोंड वानिवडे-टेंबुवली हाही एक महत्त्वाचा पूल आहे आणि हा पूल

..... 4सी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कुळकर्णी ....

झाला तर त्या भागातील 40 हजार लोकवस्तीला फायदा होणार आहे. तेव्हा या पुलाच्या बाबतीत सुद्धा शासनाने लक्ष घालावे आणि यासाठीसुद्धा पैशाची तरतूद करावी. त्याचपमाणे किरणपाणी पूल हा गोवा-सिंधुदुर्ग जोडणारा आहे. हे प्रकरण आता सीआरएफकडे गेलेले आहे. खरे तर हा पूल गोवा आणि महाराष्ट्र अशा दोन्ही राज्यांनी एकत्र येऊन करण्याचे ठरविले असते तर लवकर पूर्ण होऊ शकला असता. गोव्यामध्ये बीजेपीचे सरकार असताना गोव्याचे मुख्यमंत्री श्री.पर्रिकर यांना मी स्वत: भेटण्यास गेलो होतो. त्यांनी या पुलाचा अर्धा खर्च म्हणजे सुमारे 12 कोटी रुपये देण्याचे मान्य केले असते तर आपल्या महाराष्ट्र राज्यानेदेखील 12 कोटी रुपये यासाठी दिले असते आणि हा पूल पूर्ण होऊ शकला असता. पण दुर्दैवाने तसे होऊ शकले नाही. आता हे प्रकरण सीआरएफ कडे गेलेले आहे तेव्हा त्याचा तरी आपण पाठपुरावा करावा अशी मी या निमित्ताने आपणास विनंती करतो. अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे हे 3-4 पुलांचे बांधकाम झाले तर सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झालेलाच आहे, त्याला मोठा फायदा होऊ शकेल. त्यादृष्टीने यापुढे सुद्धा इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण केले तर पर्यटनाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात फायदा मिळेल. ....

(यानंतर श्री. जागडे .... 4डी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. कोकण पॅकेजमध्ये कोकणाच्या पर्यटनाच्या विकासासाठी शासनाने 20 कोटी रुपये दिले आहे. आता याबाबतची कामे सुरु आहेत. साधारणत: ही कामे लवकरात लवकर पूर्ण होतील. ही कामे लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच रक्कम लॅप्स होवू नये म्हणून मी एक पत्र माननीय मंत्रिमहोदयांना अगोदरच दिले आहे.

यानंतर मी पान क्र. 154 वरील बाब क्र. 140 वर बोलणार आहे. सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान वाढवून मिळावे, अशी मागणी ग्रंथालय चळवळीत काम करणारे माजी सदस्य श्री. पटने हे सातत्याने करीत होते. आता हे अनुदान शासनाने वाढवून दिल्यामुळे या ठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना त्याचा फायदा होणार आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, पृ.क्र.3 वरील बाब क्र. 1 वर मी माझे विचार मांडीत आहे. राजकीय निर्णय वेळेवर होत नसल्यामुळे शासनाला हा बोजा सहन करावा लागला आहे. दक्षिण नागपूरच्या निवडणूकीबाबत मी समजू शकते. परंतु दक्षिण सोलापूरच्या निवडणूका प्रश्न नव्हता. या साध्या कामाकरीता 50 लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. याबद्दल मी खेद व्यक्त करते. आमच्या गावातील छोट्या छोट्या विकासाच्या योजना पैशाअभावी अर्धवट राहतात. परंतु नाहक घेतलेल्या निवडणूकीमुळे शासनाला 50 लाख रुपयांचा भार पडला आहे, याबद्दल मी चिंता व्यक्त करते.

सभापती महोदय, यानंतर मी पान क्र. 4 वरील बाब क्र. 7 वर बोलणार आहे. महाराष्ट्रात अधिवास असलेल्या दुस-या जागतिक महायुध्दातील माजी सैनिकाच्या विधवाच्या निवृत्तीवेतनाच्या दरात शासनाने वाढ केली आहे. 675 रुपयाची वाढ करण्याचे ठरविण्यात आले आहे. या बाबत मी शासनाचे स्वागत करते. मला या निमित्ताने एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. सैनिकांच्या विधवांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत शासनाने विचार केला पाहिजे. त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. आज या सैनिकांच्या कुटुंबाची परिस्थिती काय आहे ? या ठिकाणी शासनाने गिल्ड ऑफ सर्व्हिसची हेल्पलाईन घेऊन सक्षम सेवा देणे आवश्यक आहे. सैनिकांच्या विधवाना द्यावयाच्या रकमेत शासनाने वाढ केली आहे, ही चांगली गोष्ट केली आहे. परंतु ही रक्कम त्यांना मिळते की नाही, हे शासनाने पाहिले पाहिजे. नाहीतर तिचे नातेवाईकच याचा गैरफायदा घेतील. म्हणून या बाबत विभागाने योग्य प्रकारची तपासणी करण्याची आवश्ययकता आहे. आपण जो पैसा वाढवून दिला आहे, तो त्या विधवेपर्यन्त पोहोचला पाहिजे. नाहीतर दिलेला पैसा हा वाया जाईल.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदया, मी आता बाब क्रमांक 44-45 कडे वळते. याठिकाणी पुण्यातील दोन रस्त्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. पान क्र. 49 वर बारामती तालुक्यातील सुपा मोरगाव निरा मार्ग व रायगड व पुणे जिल्हयाला जोडणाऱ्या कोल्हार ताम्हणीघाट पौड पुणे मार्ग या दोन्ही रस्त्यांवरुन मी तीन महिन्यापूर्वी प्रवास केलेला आहे. तेव्हा हे दोन्ही रस्ते अत्यंत सुस्थितीत असतांना त्या रस्त्यांकरिता तरतूद कशासाठी करण्यात आली आहे हे मला समजत नाही. त्या रस्त्यावरुन पर्यटक जात असतात इतके चांगले रस्ते पाहून मला समाधान वाटते. फक्त त्या रस्त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. हा रस्ता निर्मनुष्य असल्यामुळे त्याठिकाणी सुरक्षेची व्यवस्था करावयास हवी.

सभापती महोदया, दुसरे म्हणजे माळशेज घाटातून पुणे जिल्हयात दुसऱ्या बाजूने प्रवेश करतो त्यावेळी ठाणे जिल्हयातील हद्दीपर्यंत रस्ता चांगला आहे. परंतु ज्या क्षणी माळशेज घाटातून ठाणे जिल्हयाची हद्द संपते व पुणे जिल्हयात जुन्नरची हद्द सुरु होते त्यावेळी 5 कि.मी. पर्यंत गेल्यानंतर लक्षात येते की, त्या रस्त्यावर प्रचंड खड्डे आहेत. आपण जेवढे बारामतीकडे लक्ष देता तेवढे जरा जुन्नरकडे सुध्दा लक्ष द्यावे. म्हणून जुन्नरकडील माळशेज घाटातील रस्ता आपण दुरुस्त करावा अशी माझी सूचना आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अनेक रस्त्यांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामध्ये हडपसर-जेजुरीच्या रस्त्याचा प्रस्ताव केला आहे त्याचे मी स्वागत करते. परंतु या ठिकाणी जिल्हयाची यादी पाहिलीतर त्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांची नावे आहेत परंतु सिंधुदुर्ग जिल्हयाचे नाव नाही याचा मला खेद वाटतो. उदा. हिंगोली, गडचिरोली जिल्हयापासून सर्वच जिल्हयांकडे कमी अधिक प्रमाणात शासनाने लक्ष दिले आहे. तर मग सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व रस्ते उत्कृष्ट आहेत असा त्याचा अर्थ होतो काय? त्या ठिकाणी एकाही रस्त्याची आवश्यकता नाही काय? तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनतेच्या शिव्या खाव्यात असा आपला हेतू आहे काय? म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये ज्या ज्या रस्त्यांची आवश्यकता आहे त्यांचा समावेश पुढील नियोजनामध्ये आम्हाला दिसेल असे मला वाटते.

सभापती महोदया, नगर-शिर्डी या रस्त्याच्या बाबतीत सांगावयाचे झालेतर 25 ते 30 किलोमीटरचा रस्ता अतिशय वाईट आहे. नगरवरुन शिर्डी 40 कि.मी. वर असून या रस्त्यावर दर महिन्याला अपघात होत असतात. या रस्त्यावरुन साखर कारखान्यांकडे वाहने जातात, दुचाकी22-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

वाहने जातात. शिर्डी शहर मोठे होत चालले आहे, त्याचा विस्तार होत आहे . त्यामुळे मोठया प्रमाणामध्ये वाहने बाहेर जात असतात. आपल्या माहितीसाठी सांगते की, कॉग्रेसच्या कार्यकर्त्या श्रीमती सुजाता ढवळे यांचे याच रस्त्यावर अपघाती निधन झाले आहे. तेव्हा नाशिक व नगरहून शिर्डीला येणाऱ्या दोन्ही रस्त्यांची रुंदी वाढविली पाहिजे. तसेच, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पाऊले उचलण्याच्या दृष्टीने एखादा बाय पास रस्ता करता आला तर त्याचा चांगला उपयोग होईल. परंतु त्या संबंधी या दोन बाबी मागण्यांमध्ये दिसत नाहीत याचा मला खेद होतो.

सभापती महोदया, पान क्र. 84 वरील बाब क्र. 73 ते 76 या विधी व न्याय विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात या ठिकाणी निर्णय घेण्यात आला आहे. वास्तविक नेहमी आम्ही सभागृहामध्ये मागणी मांडीत असतांना संबंधित मंत्रिमहोदयांना आमचे म्हणणे ऐकण्याचा कंटाळा आलेला असतो, आणि खाली बसून मंत्रिमहोदय काही तरी "लवकर उरका" अशाप्रकारच्या खुणा करीत असतात. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आम्हाला या ठिकाणी भाषण करण्याची हौस नाही, किंवा आम्ही रिकाम टेकडे म्हणूनही आलेलो नाही. कौटुंबिक न्यायालयासंबंधीचा कायदा 1984 साली संमत करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या भागामध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन केली पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाला कळविले. माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येक जिल्हयामध्ये 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, सातारा इत्यादी जिल्हयांमध्ये कौटुंबिक न्यायालये स्थापन व्हायला पाहिजेत. जेणेकरुन पती-पत्नींमध्ये असलेल्या पोटगी, घटस्फोट, दत्तक घेणे, मुलाची कस्टडी इत्यादी प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून लवकर निर्णय लागू शकेल. आज हजारो खटले कौटुंबिक न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

म्हणून कौटुंबिक न्यायालयाचा आयटमचा यामध्ये समाविष्ट करावा आणि निदान पुढच्या काळात म्हणजे तीन-चार वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने अनेक ठिकाणी कौटुंबिक न्यायालये कशी होतील ते पहावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, वन विभागाच्या संदर्भात आमच्या काही अपेक्षा होत्या. महसूल व वन विभागाच्या बाबतीत आदरणीय माननीय मंत्री महोदय सविस्तर उत्तरे देतात. पण बिबटयांचा बंदोबस्त आणि त्याचबरोबर दूरदर्शनवरुन ऐकले आहे की, वनामध्ये अनेक अवैध दारुचे धंदे चालतात. विशेषत: दारु साठविण्यासाठी फॉरेस्टचा उपयोग केला जातो. आता वनाच्या संरक्षणाच्या बाबतीत तुमचा विभाग लक्ष घालणार आहे. याठिकाणी तुम्ही "वनाचे संरक्षण" हा शब्द वापरलेला आहे. तर अशा वेळी तेथे दारुच्या धंद्याचे अतिक्रमण होऊ नये हे यामध्ये गृहीत धरलेले आहे का? हा माझा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा की, केंद्रीय मंत्रीमंडळात श्री.सुरेश प्रभू मंत्री होते, तेव्हा त्यांनी जॉईंट फॉरेस्ट प्रोग्रॅमसाठी महिलांचा काय आहे ? त्यांच्या अडचणी काय आहेत ? तसेच वने व पर्यावरण या विषयावर कोणत्या योजना राबविता येतील यासाठी राष्ट्रीय समिती केली होती. या समितीने दिलेला अहवाल केंद्र शासनाने स्विकारलेला आहे आणि राज्यांना असे कळविलेले आहे की, आदिवासी भगिनी इंधन आणत असताना, अनेक ठिकाणी फॉरेस्ट गार्ड बरोबर त्यांचे वादविवाद होतात. तेव्हा जॉईंट फॉरेस्ट प्रोग्रॅमच्या विकासासाठी महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने केंद्राने जो अहवाल केलेला आहे, तो पुढच्या काळामध्ये आपण स्विकारुन याचा फायदा जास्तीतजास्त गरीब समाज घटकांना कसा होईल हे पहावे असे सांगू इच्छिते आणि सभापती महोदया, मी आपले विशेष आभार मानते आणि माझे भाषण संपविते.

. . . .4 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, 2004-2005 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात माझी भूमिका व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, पूरक मागण्यांचे समर्थन करीत असताना, काही बाबी शासनाच्या लक्षात आणून देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. पान क्र.4, बाब क्र.7 यामध्ये महाराष्ट्रात अधिवास असलेल्या दुस-या जागतिक महायुध्दातील माजी सैनिक/त्यांच्या विधवांच्या निवृत्ती वेतनाच्या दरात वाढ करण्यासाठी 6 कोटी 73 लाख 23 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. ही खरोखरच आपल्या राज्यासाठी मोठी स्वागतार्ह आणि भूषणावह बाब आहे. कारण दुस-या महायुध्दा मध्ये ज्यांनी कामगिरी बजावली आहे त्यांच्या तसेच ज्या सैनिकांना या युध्दामध्ये वीरगती प्राप्त झाली आहे, त्यांच्या विधवांना मिळणा-या निवृत्तीवेतनाच्या दरामध्ये वाढ करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे आणि ती निश्चितच अत्यंत योग्य आहे.

सभापती महोदया, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर पान क्र.67, बाब क्र.57 यामध्ये गृहनिर्माण व नगरविकास महामंडळाच्या, ज्याला आपण हुडको म्हणतो. त्यांच्या कर्ज सहाय्यातून मार्ग व पुलांची बांधकामे कार्यान्वित करण्यासाठी पूरक मागणी करण्यात आली आहे. ती देखील उचित आहे. यासाठी 70 कोटी 17 लाख रुपयांची मागणी केलेली आहे आणि मी त्याचे समर्थन करतो. पण पुलाचे बांधकाम करीत असताना मुंबई सारखी समुद्र किना-यावरील जी इतर शहरे आहेत, त्यांना जल वाहतुकीच्या मार्गाने जोडण्याचा प्रयत्न केला तर रस्त्यावरील गर्दी कमी करता येण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे इंटरनल सागरी वाहतूक झाली, अशी व्यवस्था करण्यात आली तर दुधात साखर पडावी तसे होईल असे मला म्हणावेसे वाटते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

पृष्ठ क्रमांक 68, बाब क्रमांक 59. कोकण व खानदेश विकास पॅकेज अंतर्गत ग्रामीण रुग्णालयाची एकंदरीत चालू असणारी कामे पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त तरतुदीची पुरक मागणी करण्यात आलेली आहे. खरे पाहिले तर कोकणचा निसर्ग, कोकणचे सौंदर्य अत्यंत रमणीय आहे. अत्यंत देखणे आहे. विशेषत: पावसाळयाच्या दिवसात, हिवाळयाच्या दिवसात कोकणचा निसर्ग महाराष्ट्राचे काश्मिर म्हणावयास हरकत नाही. तेथे प्रसन्न वातावरण आहे. कोकण सुंदर आहे. वैभवशाली आहे. मात्र त्या कोकणात राहणारी जनता मोठी गरीब आहे. श्री. रवि शेठ या ठिकाणी बसलेले आहेत. ते याचा गंभीरपणे विचार करतील.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): सायंकाळचे 6.00 वाजेले आहेत. सभागृहाच्या अनुमतीने सभागृहाची वेळ आजचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे सभापती महोदया, मी याठिकाणी कोकणच्या सौंदर्याची माहिती देत होतो. तसे पाहिले तर कोकणच्या सौंदर्याची सर्वांना माहिती आहे. परंतु कोकण जरी नैसर्गिकदृष्टया समृध्द असला तरी कोकणच्या विकासासाठी या कष्टकरी, गोरगरीब रानावनात, जंगल, पाडयात राहणा-या गोरगरीब जनतेसाठी, बहुजन समाजासाठी कोकण ग्रामीण रुग्णालयाच्या पुर्ततेसाठी ही विशेष तरतुद करण्यात आलेली आहे, ती देखील अत्यंत समर्थनीय आहे. ते काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि कोकणामधील जनतेला खानदेशातील जनतेला या विशेष पॅकेजचा फायदा मिळावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

पृष्ठ क्रमांक 18, बाब क्रमांक 24. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित पुणे यांच्या कर्मचा-यांच्या वेतनाची थकबाकी होती. या वेतन थकबाकीच्या तरतुदीमुळे कर्मचा-यांची दैन्यावस्था, दूरावस्था थांबिविण्यासाठी रुपये 5,51,45,000/- रुपयाची तरतूद पुरक मागणीच्या रुपाने करण्यात आलेली आहे. निश्चितच शेती महामंडळ, पुणे या ठिकाणी काम करणा-या कर्मचारी वर्गाला आता मोठा दिलासा मिळाल्या शिवाय राहणार नाही.

पृष्ठ क्रमांक 32, बाब क्रमांक 38, 39, 42 आणि 44 लहान व मध्यम शहराच्या एकात्मिक नागरी विकासासाठी केंद्रीय सहाय्य योजनेंअंतर्गत अधिक नियत वाटप करणे तसेच मेगासिटी प्रकल्पासाठी अपेक्षित खर्च पुरवणी मागणीच्या रुपाने मागणी करण्यात आली आहे, ती देखील योग्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

बाब आहे. रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी नगरपालिकांना आणि महानगरपालिकांसाठी जी 42,24,74000/-रुपयांची पुरक मागणी करकण्यात आलेली आहे.हे सर्व ठीक आहे. नगरपालिका, महानगरपालिकांचे रस्ते हे शहरांचे आहेत. टाऊनशीपचे आहेत. त्यांचे रस्ते् चांगले झाले पाहिजेत यामध्ये वाद नाही, हे रस्ते चांगले करीत असतांना सरकारने ठरविले होते की, प्रत्येक गाव मुख्य रस्त्याशी जोडले गेले पाहिजे, तसेच जोडला जाणारा रस्ता चांगला असला पाहिजे, ही अपेक्षा व्यक्त केली होती, अशी व्यथा व्यक्त केली होती. ती प्रत्यक्षात उतरली तर त्याच्या सारखी चांगली गोष्ट दुसरी कोणती राहणार नाही. संपूर्ण राज्यातील जी छोटी गावे असतील ती मोठया शहरांशी जोडली गेली पाहिजेत. ग्रामीण भागाचे शहरीकरण जोपर्यंत होत नाही तोपर्यंत नवीन विचार, नवीन प्रबोधन, नवीन पध्दती यांचे ज्ञान, तंत्रज्ञान मानवी विकासासाठी आवश्यक गोाष्टी असतात. जुन्या रुढी परंपरा टाकून देऊन नवीन विचार घेऊन जाणारी पिढी निर्माण करवयाची असेल तर त्यासाठी ऑर्गनायझेन आवश्यक आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे .....

सरकारने या माध्यातून सर्व ग्रामीण भागाला जोडले तर नव्या विचाराचा प्रवाह जाऊन त्या ठिकाणी चांगले समाज परिवर्तन घडू शकते. पृष्ठ क्रमांक 34 वर बाब क्रमांक 44 आहे. यामध्ये जुळया शहरांच्या विकासासाठी ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील जमीन संपादन करण्याच्या संदर्भात यामध्ये पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही मागणी अत्यंत योग्य आहे.

सभापती महोदय, विधि व न्याय विभागाच्या बाबतीत पृष्ठ क्रमांक 83 वर बाब क्रमांक 72 मध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरिता 18 मारुती बॅलेनो गाडयांची खरेदी करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. याबद्दल निश्चितच मला आनंद वाटतो. कारण आपल्या राज्यातील मंत्रिमहोदयांसाठी स्कोडा गाडया घेण्याचा विचार होता. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरिता या गाडया घेण्यासाठी तरतूद केली आहे. खरे म्हणजे आमच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये हजारो प्रकरणे तुंबलेली आहेत. त्यांचा लवकर निपटारा व्हावा, आमच्या न्यायमूर्तींची कार्यक्षमता वाढावी, त्यांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात याची काळजी घेणे आपले आणि सरकारचे कर्तव्य आहे. याची जाणीव ठेऊन त्यांच्याकरिता ज्या 18 मारुती बॅलेनो गाडयांसाठी पुरवणी मागणी केलेली आहे त्याला माझे समर्थन आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 85, बाब क्रमांक 75 यामध्ये सरकारी वकील, अतिरिक्त सरकारी वकील, उच्च न्यायालय यांच्या कार्यालयातील संगणकीकरणाकरिता पुरवणी मागणी केलेली आहे. केसेसचा निपटारा लवकर झाला पाहिजे यासाठी संगणकीकरणासह जेवढया आधुनिक पध्दतीचा वापर करता येईल तेवढा केला तर जनतेला दिलासा मिळेल. त्यामुळे मी या पुरवणी मागणीचे समर्थन करतो. पृष्ठ क्रमांक 144 वर सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्रमांक 125 व्दारे शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्याचेही मी समर्थन करतो. त्यानंतर पृष्ठ क्रमांक 145 वर बाब क्रमांक 127 यामध्ये सहकारी कताई गिरण्यांना भाग-भांडवली अंशदान देण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. ही पुरवणी मागणी योग्य आहे असे मला वाटते. याच पृष्ठावर बाब क्रमांक 129 व्दारे महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेने नाबार्डचे जे कर्ज द्यावयाचे आहे ते कर्ज देण्याकरिता 121 कोटी 7 लाख रुपयांची तरतूद या पुरवणी मागणीव्दारे करण्यात आली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अनंत तरे)

प्रा. जोगेंद्र कवाडे....

याचा निश्चितच महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेला लाभ होईल आणि नाबार्डचे कर्ज त्यांना देता येईल. तसेच आपल्या राज्य शासनाची प्रतिष्ठा कायम राहील.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 77 वर बाब क्रमांक 67 यामध्ये मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्चाच्या संदर्भात पुरवणी मागणी केलेली आहे. यामध्ये भातसा तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळाला अंशदान देण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. परंतु विदर्भातील एकमात्र मोठा प्रकल्प म्हणजे गोसीखूर्द प्रकल्पाच्या बाबतीत यामध्ये कोणत्याही प्रकारच्या पुरवणी मागणीची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्या दृष्टीकोनातून विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. एका गोष्टीबाबत मी अभिनंदन करतो. बाब क्रमांक 68 मध्ये लहान पाटबंधारे योजनांसाठी जी अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आलेली आहे त्यामध्ये नाशिक जिल्हयातील श्रीमंत, चोलमूख व रोशनी तसेच नागपूर जिल्हयातील भिवापूर व नान्ही लहान पाटबंधारे योजनांच्या कामाची गती राखण्यासाठी तसेच

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

तसेच अमरावती जिल्हयातील लोणी धवलगिरी योजनेसाठी 14.39 त्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करतो. परंतु गोसीखूर्द नावाचा एकमात्र प्रकल्प आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यासाठी विदर्भातील लोक नाराज आहेत आणि त्याच्यातून स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जाते.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्र.129 वरील बाब क्र.106 वर मी बोलतो. जागतिक बँकेद्वारे सहाय्य करण्यात येणा-या महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत सामुग्री घेण्यासाठी लाक्षणिक मागणी केली आहे ती योग्य आहे.

यानंतर बाब क्र.107 वर मी माझे विचार मांडणार आहे. सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेमध्ये सुधारणा करुन जास्तीत जास्त मुलींना लाभ मिळवून देण्यासाठी ही मागणी केलेली आहे आणि ही मागणी योग्य आहे.

यानंतर महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्र.17 वरील बाब क्र.21 वर मी बोलतो. बीड जिल्हयामध्ये मांजरी येथे युवा शांतिवन पर्यटन केंद्राच्या विकासासाठी तरतूद करण्याचे प्रयोजन आहे. जेव्हापासून नामदार श्री.बबनराव पाचपुते यांच्या नेतृत्वाखाली वन खाते आले आहे तेव्हापासून वन विभागात हिरवळीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागपूरसारख्या शहरामध्ये संपूर्ण वन विभागाचे मुख्यालय निर्माण करुन वारंवार अधिका-यांच्या बैठका घेऊन वन विभागात चांगले वातावरण निर्माण केले आहे. त्यांनी पर्यावरणाचा विकास करण्याची सुरुवात केली आहे. मांजरीसारख्या ठिकाणी शांतिवन करण्यासाठी 24 लाख 87 हजाराची मागणी करण्यात आली आहे. वास्तविक ही मागणी तुटपुंजी आहे. सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांचे मी समर्थन करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार मानतो आणि आपली रजा घेतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपली विशेष आभारी आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्र.3, बाब क्र.2 वर मी माझे विचार प्रथम मांडते. प्रशासन सुधारण्याच्या बाबतीत शासनाने योग्य ती पावले उचलली पाहिजेत. आजही लोकप्रतिनिधींपेक्षा अधिका-यांच्या हाताच सत्ता आहे असे जाणवते. एखाद्या प्रकरणी मंत्रिमहोदयांनी सचिवांना 2-4 वेळा सांगितल्यावरही कामे होत नाहीत असे आपल्याला दिसून येते. मंत्रालयाच्या बाहेर मोठमोठया रांगा लागलेल्या दिसतात. लोक फार मोठया आशेने शासनाकडे पाहत आहेत. परंतु 10-10 फे-या मारुनही निराश होऊन परत जावे लागते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु...

पृ.क्र.3 वरील बाब क्रमांक 2च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, प्रशासकीय यंत्रणा सुधारल्या शिवाय आपल्या शासनाचा कारभार कार्यक्षम होणार नाही याची शासनाने दखल घ्यावी.

नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 39, पृ.क्र. 32 संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबई महानगरासाठी असणारी अत्यंत महत्वाची योजना म्हणजे वांद्रा- नरीमन पॉइन्ट समुद्री जोड रस्ता. या प्रकल्पासाठी सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यामध्ये होणार आहे. पहिला टप्पा वांद्रा ते वरळी आणि पुढचा टप्पा वरळी ते नरीमन पॉईन्ट असा आहे. पहिल्या टप्प्याचे काम सुरु आहे आणि कालच सादर केलेल्या बजेटमध्ये या कामाचा उल्लेख आलेला आहे.

अशा परिस्थितीमध्ये एमएसआरडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी असे वक्तव्य केलेले आहे की, हा रस्ता वरळीच्या पुढे नेपियन सी रोड पर्यंतच बांधला जाईल. हे त्यांचे वक्तव्य गैरसमज पसरविणारे आहे. तरी माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाची व्याप्ती नि:संदिग्धपणे, स्पष्टपणे मांडावी आणि किती निर्धारित कालावधीत हा प्रकल्प पूर्ण होईल यासंबंधी कृपया खुलासा करावा.

दिनांक 19 मार्चच्या "टाईम्स ऑफ इंडिया" मध्ये मुंबई लिंकिंग रोड-रिलिफ रोड ते जुहू विलेपार्ले येथील व्ही.एम.रोड यांना जोडण्यासाठी जुहू विमानतळाच्या खालून भुयारी मार्ग काढण्याची योजना सुचविली आहे. यामुळे एस.व्ही.रोड आणि जुहू तारा रोड यावर होणारी प्रचंड गर्दी कमी होण्यास मदत होईल. महापालिकेची ही योजना राज्य सरकारने मुंबईच्या विकासाचा एक भाग म्हणून हाती घेऊन सिव्हिल ॲव्हिएशन डिपार्टमेंटची संमती मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न करावेत. तसेच योजनेला आर्थिक सहाय्य देण्याचाही प्रयत्न करावा. तसेच सर्व महत्वाच्या अर्टेरियल रोडवर त्यांना काटकोनात येऊन मिळणा-या रस्त्यावरुन येणा-या वाहनांना उजवी वळणे काढून टाकून उत्तर दक्षिण वाहतूक सरळ चालू राहाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तशा सूचना वाहतूक विभागाला देऊन ही गोष्ट तात्काळ अमलात आणावी. ही अखर्चिक बाब अग्रक्रमाने हाती घ्यावी.

नगरविकास विभागाच्या पृ.क्र. 32 वरील बाब क्रमांक 39च्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, मुंबई महानगर पालिकेच्या एन वार्डाच्या अंतर्गत येणा-या विक्रोळी पार्क साईट येथील आनंदगड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/

(श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु...

नाका ते वर्षानगर या रस्त्याची फार मोठी दुर्दशा झालेली आहे. गटाराचे पाणी रस्त्यावर येते. रस्त्यावर खूप खड्डे पडलेले आहेत. फेरीवाल्यांनी पूर्ण रस्ता व्यापला आहे. या रस्त्याला पर्यायी रस्ता नसल्यामुळे पूर्ण रहदारी या रस्त्यावरुनच होते. हा रस्ता करण्यासाठी महानगरपालिकेच्या एन वार्डच्या अधिका-यांना योग्य ते आदेश द्यावेत आणि रस्त्यावरील फेरीवाले हटविण्याच्या सूचना द्याव्यात. याबाबत मी यापूर्वी सभागृहामध्ये दोन वेळा प्रश्न उपस्थित केले होते. परंतु काहीही कारवाई झालेली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र. 45 वरील बाब क्रमांक 54 संबंधात मी सांगू इच्छिते की, मिरज तालुक्यातील मिरज ते सलगरे हा 30 कि.मी. रस्ता अत्यंत खराब आहे. त्याचप्रमाणे लिंगनूर ते बेळकी व बेळंकी ते खटाव हा 10 कि.मी.चा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. माझी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती आहे की, वरील रस्त्याबाबतचे प्रस्ताव तातडीने मागवून त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधीतांना द्याव्यात एवढे बोलून आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, पान क्रमांक 111, बाब क्रमांक 106 च्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. मघाशीच सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी या मागणीचा उल्लेख केला. जागतिक बॅन्क सहाय्यित महाराष्ट्र आरोग्य सेवा सेवा विकास प्रकल्पांतर्गत 136 रुग्णालये व अन्य 8 बांधकामांसाठी निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, आपण जागतिक बँकेकडून वेगवेगळ्या योजनांच्या कामासाठी नेहमी निधी घेत असतो. हा निधी किती घेतो, कसा घेतो, कोणत्या कामांसाठी घेतो, याबाबतची माहिती सभागृहाला सांगितली गेली पाहिजे. जीवनदायी योजनेसाठी, रुग्णालये बांधण्यासाठी, रुग्णालयात मशिनरी खरेदीसाठी इत्यादी अनेक प्रकल्प जागतिक बँकेच्या माध्यमातून आपण हाती घेत असतो. या जागतिक बँकेकडून आरोग्य विभागास गेल्या वर्षी किती निधी प्राप्त झाला याचा ताळेबंद माननीय मंत्री महोदया आपल्या मार्फत आम्हाला देतील काय ? 1 136 रुग्णालयांसाठी निधीची मागणी करण्यात आलेली आहेत. ही रुग्णालये महाराष्ट्रातील कोणकोणत्या जिल्हयात होणार आहेत ? या रुग्णालयांची कामे किती दिवसापासून प्रलंबीत आहेत याची माहिती देखील मंत्री महोदया आम्हाला देतील काय ? दरवर्षी या बाबीत वाढ सुचविली जाते. जितकी वर्षे वाढतात त्यामुळे बांधकामाची किंमत वाढत जात असते. जितके दिवस बांधकाम चालत राहील तेवढा अधिका-यांना ते सोयीचे होत असते. अधिकारीवर्ग ही कामे लवकर पूर्ण करीत नाहीत त्यामुळे जागतिक बँकेकडून येणारा पैसा हा अनाठायी वापरला जातो.

सभापती महोदय,पान क्रमांक 125, बाब क्रमांक 110 या अनुषंगाने मी बोलणार आहे. मुंबईत जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत आणि महाराष्ट्रात जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. त्या विषयासंबंधीची ही मागणी आहे. सेंट जॉर्ज रुगणालय,जी.टी.रुग्णालय, कामा व आलब्लेस रुग्णालय, अतिविशेषोपचार रुग्णालय,नागपूर इत्यादीसाठी यंत्रसामुग्री घेण्याचा हा प्रस्ताव आहे. या रुग्णालयांसाठी एवढया मोठया प्रमाणात सामुग्री खरेदी करण्यात येणार आहे. या रुग्णालयांमध्ये यापूर्वी यंत्रसामुग्री कधी घेतलीच नव्हती काय असा प्रश्न आमच्या समोर उभा राहिलेला आहे. कारण या मागणीमध्ये इन्स्ट्रूमेंटची नावे दिलेली आहेत ती मुलभूत इन्स्ट्रूमेंट आहेत. काही इन्स्ट्रूमेंट आहेत ती आधुनिक आहेत. ही इन्स्ट्रूमेंट नव्हती तर ही रुग्णालये कशी चालविली जात होती ? या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

रुग्णलयांमधील पूर्वीची इन्स्ट्रूमेंट कुठे गेली ? या रुग्णालयातील इन्स्ट्रूमेंट भंगारात काढली की लिलावात काढली हा बेसीक प्रश्न आमच्या समोर उभा राहिलेला आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी इन्स्ट्रूमेंटच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयामध्ये कॅन्सरच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी कोबाल्ट मशीन आलेले आहे. ते मशीन गेली काही वर्षे बंद आहे. ते सुरु करावे अथवा त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था व्हावी अशी मी सभागृहात वारंवार मागणी केलेली आहे.परंतु आजपर्यन्त कोणत्याही संबंधीत मंत्र्यांनी माझ्या मागणीकडे गंभीरतेने पाहिले नाही. नागपूर मेडीकल कॉलेजचे वैशिष्ट असे आहे की, नागपूरच्या बाजूला असलेले छत्तीसगड, मध्यप्रदेश येथील रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेण्यासाठी येतात. या रुग्णालयातील कोबाल्ट मशीन बंद पडलेले आहे. त्या ठिकाणी दुसरी कोणतीही पर्यायी व्यवस्था त्य करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, अंबेजोगाई येथे कोबार्ल्ट मशीन आहे. परंतु ते मशीन चालविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नाही. ते मशीन एका खाजगी संस्थेला भाडे देऊन या मशीनचा वापर करण्यात येत आहे. ही अतिशय विचित्र बाब आहे. या दोन्ही बाबीकडे शासनाने घालण्याच्या संदर्भात शासनास निर्देश दिले तर बरे होईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थिती अतिशय दयनीय झालेली आहे त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये यांचा विचार केला तर विशेषत: मोखाडा येथील जे ग्रामीण रुग्णालय आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

या रुग्णालयाला साधा कलर सुध्दा करण्यात आलेला नाही. केवळ फरशा बदलण्यात आल्या आहेत. ग्रामीण रुग्णालयाचे मोठया हॉस्पीटलमध्ये रुपांतर करण्याचा प्रयत्न केलेला नाही. महाराष्ट्रामध्ये अशी किती ग्रामीण रुग्णालये आहेत की ज्यांना हॉस्पीटलचा दर्जा देण्यात आलेला नाही याची माहिती द्यावी. चूर्णी मधील जे हॉस्पीटल आहे ते काटकुंज येथे हलविण्याचा प्रयत्न सुरु आहे. चूर्णी भाग आदिवासी भाग असून तेथे कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. इतर पूरक मागण्यांचे जे विषय आहेत त्या विषयाच्या बाबतीत मी उद्या सविस्तर बोलणार आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री नतिकोद्दीन खतिब (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित):सभापति महोदय, मैं वर्ष 2004-05 की पूरक मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं. सार्वजनिक बांधकाम विभाग के अन्तर्गत बाब क्रमांक 54 के संबंध में मैं यह बताना चाहूंगा कि अकोला शहर में बालापुर तालुका के अन्तर्गत नेशनल हाईवे एवं स्टेट हाईवे है. वहां पर दो नदियाँ भी हैं. यहाँ पर जो रास्ता है वह ब्रिटीश काल में बना हुआ है., आज उस रास्ते की हालत अच्छी नहीं है. इसलिए वहां पर हमेशा दुर्घटना का खतरा बना रहता है. इसलिए मैं माननीय मंत्री जी से विनती करुंगा कि वहां पर सर्वे कराकर दो पुलों का निर्माण किया जाए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 58 के संबंध में मैं यह कहना चाहता हूं कि बालापुर यह एक तालुका प्लेस है इसलिए इस हिसाब से वहां पर एक रेस्ट हाऊस होना चाहिए. आज वहां पर जो रेस्ट हाऊस है, वह 100 साल पुराना है. इसलिए इस रेस्ट हाऊस का विस्तार करना चाहिए. माननीय मंत्री महोदय इस ओर ध्यान दें, ऐसी मेरी विनती है.

सभापति महोदय, नियोजन विभाग के अन्तर्गत बाब क्रमांक 102 के संबंध में मैं माननीय मंत्री जी से विनती करुंगा कि आमदार निधि को लेप्स नहीं किया जाना चाहिए. क्योंकि कई बार किसी वजह से आमदार निधि का पैसा खर्च नहीं हो पाता है, जैसे कि किसी चुनाव की वजह से आचार संहिता लागू हो जाने के बाद आमदार निधि किसी भी कार्य पर खर्च नहीं हो पाता है. इस निधि में से हम कुछ रकम जिला परिषद, नगरपरिषद, और बांधकाम विभाग के किसी कार्य पर खर्च करने के लिए देते हें लेकिन आचार संहिता की वजह से वह रकम एक वर्ष के अन्दर खर्च नहीं हो पाती है. इसलिए मेरी विनती है कि एक वर्ष के भीतर रकम खर्च नहीं होती है तो उस रकम को लेप्स नहीं किया जाना चाहिए. उस रकम को अगले साल खर्च करने की अनुमति मिलनी चाहिए. और जिस तरह से खासदार निधि होती है, उसी तरह से आमदार निधि होनी चाहिए.

सभापति महोदय, मैं शासन को मुबारकबाद देना चाहता हूं. ख़रीफ़ की फसल में किसानों को नुकसान हुआ था, इस वजह से कर्ज का ब्याज शासन ने माफ कर दिया है. मैं शासन से यह विनती करना चाहता हूं कि इस साल विदर्भ और मराठवाड़ा में गारपीट होने की वजह से

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फसल को नुकसान पहुंचा है. इसलिए जिस तरह से 2003-04 में किसानों को उनके द्वारा लिए गए कर्ज पर ब्याज माफ कर दिया गया था, उसी आधार पर इस साल जिन किसानों की फसल को नुकसान पहुंचा है, उन्हें कर्ज का ब्याज माफ किया जाए.

सभापति महोदय, महिला व बाल विकास विभाग के अन्तर्गत बाब क्रमांक 144 के संबंध में मैं यह कहना चाहूंगा कि अंगणवाड़ी सेविका अपनी मांगों के बारे में आजाद मैदान पर अनशन कर रही है. मैं माननीय मंत्री जी से अनुरोध करुंगा कि अंगणवाडी सेविकाओं की मांगों पर सहानुभूतिपूर्वक विचार करें. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.....

इसके बाद श्री अवचट जी का भाषण.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 3 पान नंबर 3 संबंधी मला बोलावयाचे आहे या पूरक मागणीमध्ये 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे .परदेशी भारतीयासाठी " प्रवासी भारतीय दिवस "हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे .मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, ही पूरक मागणी आपण केलेली आहे त्याचा उद्देश काय होता ? दोन दिवस हा दिवस आपण साजरा केला होता.,परदेशातील जे भारतीय आहेत त्यांनी जास्तीत जास्त गुंतवणूक करावी असा आपला उद्देश होता काय ? आणि त्याचे फलित काय साध्य झाले? याबाबतीत स्पष्टीकरण करावे.यानंतर मला सार्वजनिक बांधकाम खात्याची बाब क्रमांक 54 पान नबंर 45 सबंधी मला बोलावयाचे आहे. 42 कोटी 15 लाख रुपयांचा निधी केन्द्र सरकारने आपल्याला रस्त्यासाठी दिलेला आहे.परंतु आघाडी शासनाचा या खात्यावर कोणताही अंकूश नाही.गेल्या हिवाळी अधिवेशनात मी याच भ्रष्टाचाराच्या बाबतीत प्रश्न मांडला होता. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी मला असे सागितले की, एक महिन्याच्या आत संबंधित कार्यकारी अभियंत्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. परंतु आजच मी औरंगाबादच्या मुख्य अभियंत्यांना विचारले होते तेव्हा मला असे समजले की, अजूनही त्या कार्यकारी अभियंताच्या विरुध्द कारवाई झालेली नाही.औरंगाबाद जिल्हयातील खुल्ताबाद - गल्लेबोरगाव या रस्त्याच्या नुतनीकरणासाठी अडीच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.व त्याप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यावेळी एका पात्र नसलेला ठेकेदाराला 27 टक्के कमी दराने काम देण्यात आले होते. हे काम पूर्ण झाले होते .तेव्हा 50 लाख रुपयांचे सेव्हींग झाले होते.त्यावेळी या कार्यकारी अभियंत्यांनी 50 लाख रुपये शिल्लक राहिल्यामुळे दोन्ही बाजूंना मुरुम टाकण्यासाठी पाच पाच लाख रुपयांच्या दहा निविदा काढल्या आणि या कामाचे कार्यादेश देण्यात आले होते. परंतु हे कार्यादेश फक्त टेबलवरच राहिले प्रत्यक्षात काम मात्र काहीही झालेले नाही.अशा प्रकारे त्या कार्यकारी अधिका-यांनी भ्रष्टाचार केला असल्याचा मुद्दा मी गेल्या अधिवेशनात मांडला होता . संभाजीनगर जिल्हयातील खुल्ताबाद गल्लेबोरगाव असे त्या रस्त्याचे नाव आहे व या कार्यकारी अधिका-याचे नाव श्री.घाणेकर असे आहे. तेव्हा या अधिवेशनामध्ये तरी माननीय मंत्रीमहोदय त्या कार्यकारी अधिका-याच्या विरुध्द कारवाई करतील काय ? असे मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ...

सभापती महोदय,यानंतर मला सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 100 पान नंबर 108 संबधी बोलावयाचे आहे.श्रावण बाळ सेवा योजनेसाठी या पूरक मागणीमध्ये तरतूद करण्यात आली असून 65 वर्षावरील वृध्द व निराश्रित व्यक्तींना 175 रुपयाचे सहाय्य देण्यात येणार आहे .गेल्याच अधिवेशनामध्ये माननीय अर्थमंत्र्यानी ही योजना जाहीर केली होती. 65 वर्षावरील निराधार व्यक्तींना 175 रुपये देण्याची ही योजना आहे..ज्या ज्या वेळी निरनिराळया जिल्हयात मी गेलो व तेथील जिल्हाधिका-यांना तसेच तहसिलदारांना विचारले तेव्हा त्या योजनेच्या बाबतीत कोणालाही कार्यादेश देण्यात आलेले नाही असे मला समजले. असे असतांना ही योजना आपण कोणासाठी केली आहे? ज्यावेळी आपण योजना जाहीर करतो त्यावेळी त्या योजनेचा लाभ खरोखर किती लोकांना झाला हे माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगणे आवश्यक आहे

सभापती महोदय, यानंतर मला गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 104 पान नंबर 115 सबंधी बोलावयाचे आहे.मुबई भाडे नियंत्रण कायद्या खालील सक्षम प्राधिकरणाच्या आस्थापनेच्या कार्यालयासाठी 4 लाख 69 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.मुंबईच्या भाडेकरुच्या दृष्टिकोनातून हा फार महत्वाचा प्रश्न आहे.भाडे नियंत्रण कायदा लागू करण्यात आला होता आणि 100 पट भाडे दिल्यानंतर तो भाडेकरु घर मालक होणार होता परंतु मुंबईतील सर्व चाळ मालक एकत्र आले आणि त्यांनी कोर्टात दावा दाखल केला होता. हायकोर्टाने जो निर्णय दिला होता त्या निर्णयाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. आता हे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे.सभापती महोदय, मुंबईतील भाडेकरुंच्या दृष्टीने भाडे नियंत्रण कायदा महत्वाचा आहे.मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,सुप्रीम कोर्टात हा कायदा किती वर्षापासून प्रलंबित आहे. ? माझ्या माहिती प्रमाणे दहा बारा वर्षापासून भाडे नियंत्रण कायदा सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे.मालक वर्गाने एकत्र येऊन त्यांनी सुप्रीम कोर्टात आव्हान दिल्यामुळे जर हे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित राहणार असेल तर सामान्य माणसाला 100 पट भाडे देऊन त्याला कधीच घर मिळणार नाही.म्हणून माझी माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,हे प्रकरण सुप्रीम कोर्टात किती वर्षा पासून प्रलंबित आहे ? या प्रकरणाची सध्यस्थिती काय आहे ? आणि आपले ॲडव्होकेट जनरल या बाबतीत काय करीत आहेत ?. मुंबईच्या सर्वसामान्य

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ...

भाडेकरुला न्याय हायकोर्टाने दिला होता परंतु त्याबाबतीत सुप्रीम कोर्टात आव्हान दिले गेले. तेव्हा हायकोकर्टाने सर्वसामान्य माणसाला जो न्याय दिला होता तो न्याय या माणसाला मिळण्यासाठी काय करण्यात येणार आहे ?

नंतर श्री.किल्लेदार

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (पुढे चालू..

सभापती महोदय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग या विभागाची मागणी क्रमांक 103, पृष्ठ क्रमांक 146 साखरकारखान्यांना कर्जासाठी 3 कोटी 25 लाख रुपयाची पूरक मागणी केलेली आहे. एकीकडे साखरकारखाने आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेले आहेत. अशा परिस्थिती पुन्हा त्यांना कर्ज द्यायचे हे धोरण बरोबर नाही. हे कर्ज शासन त्यांना कशासाठी देत आहे, हे समजत नाही. आम्ही कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे चुकारे देण्यासाठी शासनाकडे पैसे मागतो, पण ते दिले जात नाहीत. तसेच गृहनिर्माण विभागामार्फत भाडेकरुंच्या पुनर्रचित इमारती नव्याने बांधण्याकरिता निधी उपलब्ध होत नाही. शासनाचह साखरकारखान्यांवर एवढी कृपादृष्टी का आहे ? याबाबतचे संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो..

--

3N-2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, मैं वर्ष 2004-05 की पूरक मांगों का समर्थन करने के लिए खड़ी हूं.

वन विभाग - बाब क्रमांक 19 : औरंगाबाद में स्थित गौताला सेंक्चुरी का सर्वे और डिमार्केशन का आदेश माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद की खंडपीठ ने लगभग सात वर्ष पहले दिया था. खंडपीठ के सामने तत्कालीन प्रधान सचिव (वन विभाग) एवं तत्कालीन चीफ वाईल्ड लाईफ वार्डन ने माननीय न्यायालय को सम्पूर्ण सर्वे और डिमार्केशन एक वर्ष के अन्दर करने का समय मांगा था. इस संदर्भ में न ही सरकार ने माननीय उच्च न्यायालय से समय सीमा बढ़ाने की मांग की ओर न ही सर्वे एंड डिमार्केशन का कार्य किया. यह सर्वे, लैंड रेवेन्यू कोड के अन्तर्गत बाउण्ड्री एंड डिमार्केशन रुल्स के तहत होना था. इसलिए मेरी यह मांग है कि इस कार्य को पूरा करने के लिए तत्काल निधि उपलब्ध कराया जाए और अवमानना के लिए कौन अधिकारी रिसपांसिबल है और कौन अकाउण्टेबल है, उसे आइडेंटीफाई करके उनके खिलाफ कोई न कोई कार्रवाई करने की जरुरत है, ऐसा मैं समझती हूं क्योंकि जहां कोर्ट के आदेश का इस तरह से पालन हो रहा है तो वहां हमारी बात किस तरह से सुनी जाएगी, यह हम सोच सकते हैं.

अन्न व नागरी पुरवठा विभाग - बाब क्रमांक 91 :

सभापति महोदय, यह बात सबको मालूम है कि राशन दुकानों से कभी भी अनुमानित 50 प्रतिशत से ज्यादा लोग अपने कोटे का सामान नहीं उठाते हें परंतु दुकानों के रिकार्ड से लगभग सभी दुकानों से सारा माल उठाया दिखाया जाता है. यहां विशेष बात यह है कि राशन दुकानों से जाने वाला सामान सरकार के द्वारा सब्सीडाइज होता है. इसका मतलब यह हुआ कि सरकार जिन लोगों को सब्सिडी देना चाहती है, वह उनको न जा कर ब्लेक मार्केट में चली जाती हे और यह सब्सिडी करोड़ों रुपये की होती है. जहां राज्यपाल महोदय के अभिभाषण में इ-गवर्नेंस और इन्टरनेट किआस्क का महत्व बताया गया है, वहां मैं यह कहना चाहती हूं कि इस संदर्भ में हर राशन कार्ड धारक को स्मार्ट कार्ड प्रदान किए जाए तो इस समस्या से निज़ात मिल सकती है. इसलिए प्रत्येक राशन की दुकान पर एक स्मार्ट कार्ड रीडर रखा जाए, जिसका अनुमानित खर्च एक हजार रुपये होगा तथा प्रत्येक राशन कार्ड होल्डर को एक स्मार्ट कार्ड दिया जाए, जिसकी अनुमानित कीमत 50 रुपये हो सकती है. इस प्रकार की व्यवस्था करने के बाद इस समस्या से काफी हद तक निपटा जा सकता है. इसके द्वारा शासन को प्रत्येक दिन का वितरीत तमाम

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान ....

आइटम का हिसाब भी मिलेगा तथा सब्सिडाइज आइटम सही लोगों के पास पहुंचा है, इसकी खात्री भी हो पाएगी. इस संबंध में अगर कोई कंपनी बिल्ट ऑपरेट एंड ट्रांसफर (बीओटी) बेसिस पर प्रोजेक्ट लेना चाहती है तो मैं यह निवदेन करना चाहती हूं कि उसको मान्यता दी जाए और शासन इस कार्य हेतु आवश्यक निधि उपलब्ध कराए.

जलसंपदा विभाग - बाब क्रमांक 67

सभापति महोदय, मराठवाड़ा में बहुत सारे प्रकल्प अधूरे पड़े हैं. ये प्रकल्प समय पर पूरे न होने के कारण उनकी इस्टीमेट कास्ट कई गुना बढ़ गई है. पैनगंगा प्रकल्प के लिए जिन लोगों की जमीन एक्वायर की गई है उनमें से कई लोगों को आज तक जमीन का मोबदला नहीं मिला है. इतना ही नहीं यह रिकार्ड भी गुम हो चुका है और इसकी कबूली खुद हिंगोली के जिलाधिकारी ने दी है. इस बात को गंभीरता से लेते हुए, जिनकी जमीन प्रकल्प में गई है, उन्हें उसका तुरंत मोबदला देने की व्यवस्था होनी चाहिए.

सार्वजरिक आरोग्य विभाग - बाब क्रमांक 106

सभापति महोदय, राज्य में प्रायमरी हेल्थ सेंटर की अवस्था बहुत दयनीय हो चुकी है. गोलियां है तो दवा नहीं और दवा है तो गोलियाँ नहीं और अगर कहीं दोनों चीजें मौजूद है तो वहां डॉक्टर रहेगा ही इसकी कोई गारंटी नहीं है. जब तक इसमें बदलाव नहीं आएगा तब तक ग्रामीण जनता आरोग्य सेवा से वंचित ही रहेगी. सभापति महोदय, इससे संबंधित एक और बात मैं कहना चाहती हूं. बहुत सारा परसेंटेज लेकर क्रीम ऑफ सोसायटी के जो बच्चे मेडिकल कॉलेज में पढ़ते हैं, वे ग्रामीण भागों में जाकर काम करेंगे, इसकी कोई गारंटी नहीं है. इसलिए मैं यह सुझाव देना चाहती हूं कि अलग से रुरल मेडिकल कोर्स लिया जाए ताकि ग्रामीण भागों में जाकर काम करने के लिए उन डॉक्टरों पर कम्पलशन किया जा सके. इससे बहुत सारी समस्या हल हो सकती है. जो स्थिति प्रायमरी हेल्थ सेंटर की है, लगभग वहीं दशा जिला रुग्णालयों में देखी जा सकती है. मरीजों को कई दवाइयाँ बाहर से खरीदनी पड़ रही है. बहुत सारे टेस्टस् भी बाहर से करने पड़ रहे है. राज्य की गरीब जनता यह खर्चा नहीं उठा सकती. इसलिए इस पर ध्यान देने की जरुरत है.

सभापति महोदय, मैं एक बात और कहना चाहती हूं कि परभणी जिला रुग्णालय में सीटी स्कॅन और डायलेसिस यूनिट स्थापित हुए कई महिने बीत चुके हैं लेकिन अभी वे शुरु नहीं हुए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हैं. यह बात कई बार यहां पर रखी गई है. लेकिन आज तक कोई समाधानकारक उत्तर नहीं मिला है. ये यूनिट परभणी के जिला रुग्णालय के लिए है, जो कि महाराष्ट्र का दूसरा या तीसरा नंबर का अस्पताल है. इसलिए मैं यह विनती करना चाहती हूं कि अगर ये यूनिट जल्दी से शुरु हो जाएंगे तो गरीब मरीजों को बड़ी राहत मिलेगी, अत: इस ओर ध्यान दिया जाए.

सभापति महोदय, सावित्री बाई फुले योजना के अन्तर्गत टुबेकटोमी करने वाली महिलाओं को इन्सेण्टिव्ह दिया जाता है. मैं शासन से यह कहना चाहती हूं कि उसी आधार पर जो पुरुष नसबंदी करते है,उनको भी इन्सेण्टिव्ह क्यों नहीं देना चाहिए ?

कुछ सम्माननीय सदस्य : पुरुषों को भी नसबंदी कराने पर इन्सेण्टिव्ह दिया जाता है.

श्रीमती फौजीया खान : इन्सेण्टिव्ह देने से नसबंदी कार्यक्रम को बढ़ोतरी मिल सकती है, इसलिए मैंने यह सुझाव दिया है.

महिला व बालविकास विभाग - बाब क्रमांक 141

सभापति महोदय, 14 ऑगस्ट 2004 को केबिनेट ने अंगणवाडी सेविकाओं को प्रति माह 1000 रुपये और मदतनीस को 500 रुपये पेंशन देने का निर्णय लिया था. लेकिन शासन ने आज तक उस आदेश पर अमल नहीं किया है. इसलिए मेरी विनती है कि इस पर तुरंत कार्यवाही होनी चाहिए. इसके साथ ही अंगणवाड़ी कर्मचारियों का न्यूनतम (किमान) वेतन निश्चित करके उन्हें न्यूनतम वेतन कानून के अनुसार वेतन दिया जाना चाहिए.

इसके बाद श्री दत्त

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान जारी....

माननीय अध्यक्ष महोदय, पेज क्रमांक 83 पर विधि व न्याय विभाग की बाब क्रमांक 72 पर अपने विचार रखते हुए मैं कहना चाहूंगी कि नेशनल लॉ स्कूल की तरह राज्य में जो नेशनल लॉ यूनिवर्सिटी बनने जा रही है वह यूनिवर्सिटी मराठवाडा की राजधानी समझे जाने वाले औरंगाबाद शहर में स्थापित किए जाने की मांग बड़े पैमाने पर हो रही है. इस मांग को देखते हुए यह प्रस्तावित यूनिवर्सिटी औरंगाबाद में स्थापित हो, इस तरह की मांग मैं यहां पर करना चाहती हूं.

अध्यक्ष महोदय, सामान्य प्रशासन विभाग की बाब क्रमांक 3 पर बोलते हुए मैं कहना चाहूंगी कि प्रवासी भारतीय दिवस मनाने के लिए 50 लाख रुपए खर्च किए गए हैं. इस दिन को मनाने के लिए किसी को कोई आपत्ति नहीं हो सकती . लेकिन इस दिवस को मनाने से क्या रिजल्ट हमें हासिल हुए, इस बात पर गौर करना चाहिए और उसी हिसाब से अगला कदम उठाना उचित होगा, ऐसा मैं मानती हूं.

माननीय सभापति महोदय, आखिरी बात जो मैं कहना चाहती हूं वह वन विभाग से संबंधित बाब क्रमांक 19 है. फॉरेस्ट कंजरवेशन के बारे में मैं कहना चाहती हूं कि हमारे यहां पर 35 परसेंट फॉरेस्ट होना चाहिए जबकि सिर्फ 10 परसेंट ही हमारे यहां पर फॉरेस्ट है. फॉरेस्ट कंजरवेशन बहुत ही अहम बात है. मेरा कहना है कि फॉरेस्ट कंजरवेशन के लिए एक्जीक्युटिव स्टाफ के पास शस्त्र होना जरुरी है. अभी सिर्फ नक्सलवादी एरिया में ही अधिकारियों को शस्त्र दिए जाते हैं. मुझे कहना है कि जिस तरह से जंगल कट रहे हैं उसको देखते हुए वन संरक्षण के लिए सभी संबंधित अधिकारियों को शस्त्र दिए जाने चाहिए. यदि उनको शस्त्र नहीं दिए गए तो फॉरेस्ट इसी तरह से कटते जायेंगे जिसकी वजह से पर्यावरण संतुलन बिगड़ने की संभावना है और पर्यावरण संतुलन बिगड़ने से हमारे जीवन को खतरा पैदा हो सकता है. माननीय सभापति महोदय, इतना कहते हुए ही मैं अपनी बात खत्म करती हूं.धन्यववाद.

-0-

(इसके बाद श्री जागडें)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पान क्र. 16 वरील बाबक्र. 20 वर माझे विचार मांडणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यानी या बाबत आपण विचार मांडले आहेत. मी त्यांना सपोर्ट करणार आहे. मी सातत्याने एक प्रश्न सदनात मांडीत आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल आणि पेण या भागात कर्नाळा अभयारण्य आहे. तेथील सर्व डोंगर आज बोडके झाले आहे. तेथील आदिवासी तसेच कातकरी महिला डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन जात आहेत. मोठ्या प्रमाणात त्या भागात जंगलतोड होत आहे. आपण या ठिकाणी या जंगलाच्या संरक्षणाची तरतूद करीत आहांत. परंतु ही तरतूद मात्र कागदावरच राहणार आहे. म्हणून या दृष्टीने शासनाने योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, जंगलात अनेक वेळा आगी लागल्याचे प्रकार होतात. जंगलात आपणाला वणवा दिसत असतो. आग लागल्याची दिसत असते. माझी या ठिकाणी एक सूचना आहे. वन विभागाने एसओएस नंबर तयार करावा. आग लागल्याचे कोणाला दिसल्यास त्यांनी तो नंबर डायल करावा. असे केल्यास या आगीवर नियंत्रण येऊ शकेल. तेव्हा या दृष्टीने शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी पान क्र. 33 वरील बाब क्र. 40 वर बोलणार आहे. मॅनग्रोव्ह वनस्पतीचे जतन करण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. परवा आपण ज्या अनधिकृत झोपड्या तोडल्या होत्या, त्या सर्व झोपड्या मॅनग्रोव्ह वनस्पतीच्या ठिकाणीच उभ्या राहिल्या होत्या. दोन काठ्या उभ्या करावयाच्या आणि झोपडी बांधावयाची, असे सर्वत्र घडत आहे. या ठिकाणी मला नाना चुडासामा यांच्या एका बॅनरची आठवण झाली. ते बॅनर असे होते की, "Occupy a land, construct the hut and own a flat." अतिशय मार्मिक असे हे बॅनर आहे. कोणीही या ठिकाणी यावे, जमीन ॲक्युपाय करावी, त्यावर झोपडी बांधावी आणि फ्लॅटचा मालक व्हावे. सभापती महोदय, म्हणून या बाबतची योग्य ती कारवाई शासनाने करावी.

यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 54 वर बोलणार आहे. या ठिकाणी नाशिक जिल्ह्यातील अनेक रस्त्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. मला या ठिकाणी पेठ-सुरगाणा या रस्त्याचा उल्लेख करावयाचा आहे. हा अतिशय दुर्गम आणि आदिवासी भाग आहे. हा रस्ता तयार करण्यासाठी जास्त निधी देण्याची आवश्यकता आहे. तसा निधी दिल्याचे मला ठिकाणी दिसत नाही. तेव्हा या रस्त्याचा विचार शासनाने करावा अशी मी या ठिकाणी शासनाला विनंती करीत आहे. सभापती महोदय, टोल नाक्यावर भरावयाच्या टोलपासून आमदारांना संरक्षण दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

आहे. यासाठी आम्हाला प्रोटोकॉलचा बॅच दिला आहे. आता हा बॅच फक्त आमदारांनाच दिला जातो असे नाही तर कोणालाही हा बॅच दिला जातो.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

तेव्हा मला असे म्हणावयाचे आहे की, खासदारांच्या गाडीवर ज्याप्रमाणे एम.पी. लिहिलेले असते त्याप्रमाणे आमदारांच्या गाडीला सुध्दा खासदारांप्रमाणेच बॅच दिला तर त्याला ऑथेंटीसिटी येईल. या मध्ये माझी अडचण अशी होते की, मी ज्यावेळी माझ्या गाडीतून ठाण्याला ट्रेन पकडण्यासाठी जातो. व मी ठाण्याला गाडीतून उतरल्यानंतर गाडी परत येतांना मी त्या गाडीत नसतो. त्यामुळे माझी गाडी टोल नाक्यावर अडविली जाते. माझ्या ड्रायव्हरकडे चौकशी केली जाते, त्याचे नाव विचारले जाते, गाडीमध्ये आमदार कुणी नाही तर टोल द्या म्हणून सांगितले जाते. गाडीमध्ये आमदार आहे की नाही हे पाहिले जाते व नसेल तर ड्रायव्हरला अपमानास्पद वागणूक दिली जाते. असे होत असेलतर आपण आमचा प्रोटोकॉल काढून घ्या व आम्हाला टोल भरायला सांगा, आम्हाला ते चालेल. परंतु आपण एकीकडे प्रोटोकॉल देता आणि दुसरीकडे अवमानही करीत आहात हे कृपया आपण थांबवा. म्हणून आपण त्या ठिकाणी विशिष्ट प्रकारचे बॅचेस ॲथॉराईज करावेत व त्याची अंमलबजावणी त्वरीत करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने एक गोष्ट सांगू इच्छितो की, या विभागाच्या एस.आर.ए. योजनेंतर्गत सिंधुदुर्ग को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बोरिवली, मागाठणे येथे बांधण्यात आली आहे. या सोसायटीने आपल्या विकासकाबद्दल तक्रार केली. म्हाडा आणि पोलीसांच्या वादंगामध्ये सोसायटीची वाट लागली आहे. त्या इमारतीचा विकासक बदमाश निघाला. त्याने एकाच फ्लॅटवर अनेक लोकांचे खोटे ॲग्रिमेंट फ्रँकींग करुन बुकींग केले. त्याबाबत मी लक्षवेधी सूचना दिली होती. त्याने लोकांची फसवणूक केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, चार वेळा त्याला अटक होऊन सुध्दा तो वांद्रयाच्या कोर्टामधून सुटला. मध्यंतरी ग्राहक संरक्षण कक्षाचे न्यायाधीश यांचेकडे ती केस होती त्यांनाच अटक झाली. यामध्ये आपसात आरोपींशी लागेबांधे होऊन आरोपी सुटतात. तेव्हा या प्रकरणामध्ये आपण लक्ष घालावे अशी विनंती करतो.

दुसरे असे की, मुंबई शहराच्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेला सरकारकडून 578.87 कोटी एवढे पैसे विविध खात्याकडून येणे आहेत. त्या करिता पूरक मागणीमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. त्या बाबत मी थोडक्यात आपणास सांगतो. "अनुदाने, कर व आकार याबाबतच्या थकबाकीपोटी राज्य शासनाकडून पालिकेला 578 कोटी 87 लाख रुपये येणे बाकी आहे. गेल्या काही वर्षापासून पालिकेने पाठपुरावा करुनही राज्य शासनाकडून प्राथमिक शाळांचे 122 कोटी 83

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

लाख रुपये अनुदान माध्यमिक शाळांचे 143 कोटी 15 लाख रुपये अनुदान आरोग्य विषयक वेगवेगळया सेवांसाठी मिळणारे 44 कोटी 35 लाख रुपये अनुदान शासनाच्या जमिनीवरील झोपडपट्टयांवरील सेवा आकारापोटी 55 कोटी 2 लाख रुपये, करमणूक कर अनुदान 21 कोटी 72 लाख रुपये, वेगवेगळया उपकरांची वसुली आणि भरणा यावरील वटाव यांचा यात समावेश आहे. तसेच 11कोटी 23 लाख रुपये, कृषीतर कर आणि भूमी महसूलाचा हिस्सा 14 कोटी 13 लाख रुपये, वाहतूक दिवे उभारणी व व्यवस्थापन आणि रस्ते रंगविण्याच्या कामापोटी 13 कोटी 26 लाख रुपये, पर्यावरण योजनेंतर्गत नागरी सुविधा पुरविणे, भटकी कुत्री मारणे, इमारतींना टेकू लावणे बाबत, मुख्य दंडाधिकारी यांच्याकडून 14 कोटी 92 लाख रुपये अनुदान, मालमत्ता कर 52 कोटी 87 लाख रुपये व शासनाची विविध खाती आणि म्हाडा प्राधिकरणाकडून जल कर आणि जल आकारापोटी 85 कोटी 39 लाख रुपये असे एकूण 578 कोटी 87 लाख रुपये येणे बाकी आहे. याबाबत पूरक मागण्यांमध्ये कुठेही तरतूद नाही. असे असतांना आपण मुंबई महानगरपालिकेकडून अपेक्षा कां करावयाच्या?

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, मुंबई शहराला वैतरणा तलावातून पाणीपुरवठा होतो. हे धरण गेल्या 20 वर्षामध्ये फक्त एकदाच तुडुंब भरुन वाहिले आहे. नाशिक जिल्हयात मुकणे धरण आहे त्यामधून नांदूर-मधमेश्वरमधून नगर जिल्हयातील कोपरगावला पाणी नेण्याचे प्रयोजन आहे. त्याकरिता माजी आमदारांनी स्वत: एक बैठक घेतली होती. त्या बैठकीला शासनाचे अधिकारी हजर राहिले आणि त्यांनी ठरविले की, वैतरणा तलाव वाहून गेल्यानंतर जे पाणी येईल त्याव्दारे मुकणे धरण भरावयाचे. व त्या धरणातून एक वाहिनी काढून ते पाणी कोपरगावला द्यायचा हा कट आहे. मुंबई शहराच्या दृष्टीने पिण्याचा पाण्याचा प्रश्न अतिशय भयानक आहे. तेव्हा वैतरणा धरण भरो न भरो त्यामधील पाणी मुकणे धरणामध्ये सोडून ते धरण भरावयाचे व त्यामधील पाणी वाहिनीव्दारे कोपरगावला सोडून माजी आमदार श्री. कोल्हे यांना समाधान देण्याचा हा कट आहे. या संदर्भात सुध्दा शासनाने अधिक गंभीर होण्याची गरज आहे, मुंबईकरांचे पाणी आपण काढून घेऊ नका अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशोधित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्र.130, पान क्र.146 यासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचटसाहेब यांनी थोडक्यात हा विषय मांडला होता. पण त्यांनी बोलत असताना 3 कोटी 25 लाख रुपये असा उल्लेख केला आहे, पण ही रक्कम 3 कोटी 25 लाख रुपये इतकी नसून ते 325 कोटी रुपये आहेत. मूळामध्ये याठिकाणी ही जी रक्कम दाखविण्यात आलेली आहे, त्याचे वाटपच बेकायदेशीर आहे. हा माझा पहिला मुद्दा आहे. सन 2002, 2003 मध्ये ही रक्कम खुल्या बाजारातून उपलब्ध करुन कारखानदारांना द्यावयाची आहे, ती मिनिमम स्टॅटयुटरी प्राईज, ऊसाचा जो वैधानिक हमी भाव आहे आणि जे कारखानदार तो भाव देऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे मागणी केली होती. खरे म्हणजे 1 रुपयाप्रमाणे मागणी करण्यात आली होती, म्हणजे 625 कोटी रुपयांची मागणी होती. कारण 2002 व 2003 मध्ये साखरेचे उत्पादन साडे बासष्ट लाख टनाचे झाले होते आणि त्याच्या 1 रुपया प्रति किलो याप्रमाणे 625 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. खरे म्हणजे हे जे वैधानिक दर आहेत, तर सर्वच कारखाने हे वैधानिक भाव देऊ शकले नाहीत अशी बाब नाही. तरी सुध्दा सरसकट सर्व कारखान्यांना या पैशाचे वाटप करण्यात आले आहे. जे कारखाने हमी भाव देऊ शकले नाहीत त्यांच्यासाठी ही तरतूद आहे, त्यांच्यासाठी केंद्र शासनाने पैसे दिले होते. पण आपण सरसकट वाटप करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे, तोच बेकायदेशीर आहे. पैशाचा गैरवापर कसा करावयाचा, याचे हे सर्वात मोठे उदाहरण आहे. म्हणजे शासनाने काहीही चुकीची मागणी करावयाची, चुकीची म्हणण्यापेक्षा खोटी माहिती दिलेली आहे. कारण वैधानिक भाव सर्वच कारखाने देऊ शकले नाहीत असे होऊ शकत नाही. कारण त्यातील काही कारखाने बंद पडले आणि आजही म्हणजे या वर्षापासून 70-80 कारखाने बंद आहेत. पण तेव्हा जे कारखाने सुरु होते, ते नंबर बंद पडले. त्यामुळे सर्वच कारखाने हमी भाव देऊ शकले नाहीत असा हा विषय नाही. पण यामध्ये गैरप्रकारे म्हणजे केंद्र शासनाची दिशाभूल करुन त्यांच्याकडून मंजूर करुन घ्यावयाचे आणि बेकायदेशीरपणे 325 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे त्यामध्ये सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे. आपण खुल्या बाजारातून कर्ज घेतलेले आहे. सहा टक्के दराने हे पैसे उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. यामध्ये 2 टक्के कारखाना देणार आहे, दोन टक्के राज्य शासनाचे आहेत आणि दोन टक्के केंद्र शासन देणार आहे. तेव्हा यामध्ये आपल्याला काही सुधारणा करणे गरजेचे आहे. माननीय मंत्री श्री.

. . . .4 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी . . . .

हर्षवर्धन पाटीलसाहेब, आपला स्वत:चा कारखाना आहे. हा गंभीर विषय आहे. याठिकाणी जे बेकायदेशीर पैशाचे वाटप करीत आहात, ते आपल्याला कायदेशीर करावे लागेल. मी परवा वर्तमानपत्रामध्ये वाचले की, या पैशाचा वापर बेकायदेशीर होत आहे म्हणून काही कारखानदारच कोर्टामध्ये गेले आहेत आणि कोर्टाने आदेश दिले आहेत म्हणजे साखर आयुक्तांवर ताशेरे ओढलेले आहेत आणि त्यांच्याकडे प्रतिज्ञापत्राची मागणी करण्यात आली आहे. आपल्याला एखाद्या कारखान्याचे उदाहरण हवे असेल तर ते वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. आपण याठिकाणी जी तरतूद केलेली आहे, ती सरसकट सर्व कारखान्यांसाठी केली आहे. ज्यावेळेला कॅबिनेटची बैठक झाली, त्या बाबतीत मी माहिती घेतली. तर त्यामध्ये काही प्रमुख अधिकारी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा म्हटले होते की, जे आधारभूत किंमत देऊ शकले नाहीत असे जे ठराविक कारखाने आहेत, त्यानांच ही रक्कम द्यावयाची आहे. पण त्यावेळी काही सदस्य उठले आणि त्यांनी सांगितले की, असे नाही, सर्वांनाच पैसे द्यावेत. पण प्रत्यक्षात हे पैसे अनुदान म्हणून नाहीत. त्यामुळे तुम्ही पैशाचा वापर वाटेल तसा करु शकत नाही. म्हणून माझी मागणी अशी आहे की, आपण यामध्ये सुधारणा करावी. केंद्र शासनाने जे आदेश दिलेले आहेत, त्याप्रमाणेच तुम्ही याचे वाटप करावे आणि माननीय मंत्री महोदयांकडून याबाबतीत समाधानकारक उत्तर मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. सदाशिव पोळ (महाराष्ट्र विधानसभा सदस्याद्वांरा निर्वाचित) : सभापती महोदय, पान क्र. 45, बाब क्र. 54, बांधकाम विभाग यावर मी बोलणार आहे. माण तालुक्यातील शिंदी रवु ते वारुगड घाट रस्ता अतिवृष्टी झाल्यामुळे वाहून गेला आहे. त्यामुळे या मार्गावरील सहा महिने झाले एस.टी. बस बंद झाली आहे. तसेच बोथेघाटही वाहून गेला आहे. या दोन्ही घाट रस्ते दुरुस्तीसाठी निधी देण्याची गरज आहे. तसेच सी.आर.एफ. मधून दहिवडी ते मार्डी , ढाकणी ते कुकुडवाड , गोंदवले बुद्रुक ते वरवणे हे अत्यंत खराब झालेले रस्ते दुरुस्त करणे गरजेचे आहे. मा. मंत्री महोदयांनी याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

पान क्र. 84, बाब क्रमांक 73 यावर सभापती महोदय मला बोलावयाचे आहे. म्हसवड, ता. माण या ठिकाणी न्यायालयाचे काम चालू आहे. त्यासाठी खाजगी इमारत भाडयाने घेतली आहे. ती अत्यंत अपूरी आहे. मंत्री महोदयांनी म्हसवड ता. माण या ठिकाणी नवीन इमारतीची सोय करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे. मा. मंत्री महोदयांनी या बाबीकडे लक्ष द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शदर पाटील (पुणे विभाग पदवीधर): सभापती महोदय, सन 2003 च्या रब्बी आणि सन 2004 च्या खरीप हंगामातील पीक कर्जावार जे व्याज माफ केलेले आहे, त्यासंबंधी मला एकच सूचना करावयाची आहे की, ज्या शेतक-यांनी या दोन्ही हंगामातील व्याज आणि हप्ते भरलेले आहेत त्यांना देखील व्याज माफीचा फायदा मिळावा, ही विनंती.एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन, माहिती व जनसंपर्क, भुकंप पुनर्वसन व मदतकार्य, क्रीडा आणि युवक कल्याण, माजी सैनिक कल्याण राज्यमंत्री) : :सभापती महोदय, पूरक मागण्यांवर या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला आणि काही महत्वाच्या सुचनाही त्यांनी केलेल्या आहेत. त्या सर्वांचे मी आभार मानतो. माननीय सरपोतदार साहेबांनी आणि श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी शेती महामंडळाच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. शेती महामंडळाच्या कर्मचा-यांना अनेक दिवसांपासून पगार मिळत नव्हता. त्या पगारापोटी याठिकाणी 5 कोटी 51 लाख रुपये खर्च केलेले आहेत. गोदावरी शुगर मिलच्या अतिरिक्त झालेल्या जमिनीचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. न्यायालयात हे प्रकरण होते. त्या अतिरिक्त झालेल्या जमिनीचा आणि त्या जमिनीवरील झाडांचा मोबदलासुध्दा या मागणीद्वारे देत आहोत. श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी या ठिकाणी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना 600 रुपये अनुदान देत होतो त्यामध्ये 675 रुपयाची वाढ करुन 1275 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय करीत असतांना, ख-या अर्थाने हे पैसे त्यांनाच मिळतील याबाबतीत आम्ही निश्चितपणे जागृत राहून या माजी सैनिकांच्या विधवांनासुध्दा न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याचबरोबर अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेऊन या मागणीच्या निमित्ताने अतिशय उपयुक्त अशा सूचना केलेल्या आहेत. त्यांचे मनापासून आभार मानतो आणि सभागृहाला विनंती करतो की, महसूल, नगर विकास, सामान्य प्रशासन आणि माजी सैनिकांचे कल्याण या खात्याच्या मागण्या मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) :सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पूरक मागण्यांवर फक्त एकच सन्माननीय सदस्य श्री. पोळसाहेब या ठिकाणी बोलले आणि त्यांनी मसवडला न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे अशी मागणी केली. तेव्हा त्याचा आम्ही जरुर विचार करु. विधी व न्याय विभागाच्या 4,74,15,000/- रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात एवढी विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, दुरुस्ती व पुनर्बांधणी, खार जमीन व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सूचना केल्या त्या तपासून त्याबाबत विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी मुंबई भाडे नियंत्रण कायद्याच्या संदर्भात सूचना मांडली. हा मुद्दा सुप्रीम कोर्टामध्ये असल्यामुळे यानंतर शासनाकडून पुन्हा त्याचा विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सिंधुदुर्ग को-ऑपरेटीव्ह सोसायटीचा विकास करण्याच्या बाबतीत आपले मुद्दे मांडलेले आहेत. याची चौकशी करण्यात येईल आणि त्याबद्दल पाठपुरावा करण्यात येईल. सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या पुरवणी मागणी बाब क्रमांक 104 व 105 मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

श्री. रविशेट पाटील (सार्वजनिक बांधकाम, वने, पर्यावरण, आदिवासी विकास राज्यमंत्री): माननीय सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 53 ते 60 यामधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या विविध सूचनांचे मी स्वागत करतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी बांद्रा पूर्व द्रुतग्रती मार्गावरील होर्डीन्गच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबतीत सांगू इच्छितो की, निश्चितपणे ते होर्डीन्ग काढले जातील. जर ते वाहतुकीला अडथळा कोठे निर्माण करीत असतील तर ते होर्डीन्ग काढले जातील. वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सागरी महामार्गाचा प्रश्न उपस्थित केला. त्यामध्ये फक्त दोन ते तीन पूल राहिलेले आहेत. ते सी.आर.एफ. मधून प्रस्तावित केलेले आहेत. ते दोन तीन पूल झाल्यानंतर सागरी महामार्ग पूर्ण होईल. आमचे शासन निश्चितपणे ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सिंधुदुर्गातील काही पूल आहेत त्याबाबतीत निश्चितपणे काही तरतूद करावयाची असेल तर ती सुध्दा केली जाईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी बारामती, ताम्हाणीघाटच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. यावेळी या बजेटमध्ये ताम्हाणीघाटसाठी सुध्दा आपण तरतूद केलेली आहे. माळशेजघाट वगैरे जे रस्ते आहेत त्याच्या बाबतीत बजेटमध्ये तरतूद करुन ते पूर्ण होतील. त्यांनी सिंधुदुर्गातील काही रस्त्यांची मागणी केली. यावेळच्या बजेटमध्ये आपण बरेच घेतलेले आहेत. शिर्डी रस्ता रुंदीकरणाच्या बाबतीत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. शिर्डी रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न आमच्या विचाराधीन आहे. त्यानंतर त्यांनी वनाच्या बाबतीत काही दारुचे धंदे आणि त्यातील अतिक्रमणाबाबत प्रश्न उपस्थित केला. काही ठिकाणी अतिक्रमण होत असेल. त्याबाबतीत आमचे आर.एफ.ओ., डी. एफ. ओ. यांना यासंबंधी संपूर्ण सूचना दिल्या जातील. कोठेही त्याचा वनाला धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी मुंबईच्या काही रस्त्यांसंबंधीचा जे प्रश्न उपस्थित केले त्याबाबतीत सुध्दा आम्ही जाणीवपूर्वक काळजी घेऊन ते रसते पूर्ण केले जातील. त्यांनी मिरज-सरगरे रस्ता, खटाव रस्ता खराब झाला आहे असे सांगितले. त्याबाबतीत ताबडतोब सूचना दिल्या जातील. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ D/

श्री. रविशेट पाटील .....

काही सूचना केल्या. त्यांच्या सूचनांचा सुध्दा आम्ही विचार करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. खतिब तसेच सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनीही सूचना केल्या. सी.आर.एफ.मध्ये गेल्या वेळची मागणी 42.15 कोटी रुपयांची आहे. आता चालू वर्षी 49 कोटीची मागणी आहे. एकूण 91.15 कोटी रुपये एवढा निधी या वर्षी आपल्याला मिळाला तर तेवढा निधी खर्च करणार आहोत. त्यानंतर सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी फॉरेस्टची जी तोड होत आहे त्याबाबत सांगितले. त्यांनी केलेली सूचना लक्षात घेऊन ती कार्यान्वित करु. सन्माननीय सदस्य श्री. सावंत यांनी वनाच्या बाबतीत सांगितले. वनाच्या बाबतीत आम्ही निश्चित काळजी घेऊ आणि योग्य ती खबरदारी घेऊ. त्यांनी मॅनग्रोव्हच्या बाबतीत विशेष काळजी घेण्याबाबत सांगितले. त्याबाबतीत आमच्या अनेक बैठकीमध्ये काळजी घेण्याबाबत संपूर्ण फॉरेस्ट खात्याच्या कर्मचाऱ्यांना सांगितलेले आहे. नाशिक जिल्हयातील काही रस्ते यांनी सांगितले. त्याबाबतीत सुध्दा काळजी घेऊ आणि ते व्यवस्थित करु. त्यांनी प्रोटोकॉल बॅच संबंधी सांगितले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील...

प्रोटोकॉल बॅचबाबत काय करावयाचे त्याबाबत एकत्र बसून निर्णय घेऊ.

श्री.मधुकर सरपोतदार : मा.मंत्रिमहोदयांना माहीत नसेल म्हणून सांगतो की, पार्लमेंटमध्ये खासदारांसाठी एक एम.पी.म्हणून बॅच दिला जातो. तोच लावला जातो. महाराष्ट्रामध्ये एमएलए असा एक सगळयांसाठी कॉमन बॅच करुन दिला तर हा प्रश्न प्रत्येकवेळी कोणत्याही टोल नाक्यावर उपस्थित होणार नाही. (अडथळा) आपल्याकडे दोन स्वतंत्र सचिवालय नाही. परंतु मी सूचना केली आहे त्याबाबत त्या खात्यानेच कार्यवाही करावी.

श्री.रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये रस्त्यांचे डांबरीकरण, रुंदीकरण, बारमाही रस्त्यांनी जोडणे अशा वेगवेगळया मुद्यांचा समावेश आहे. राज्याच्या 1981-2000 रस्ते विकास आराखडयानुसार 2 लाख 70 हजार 10 कि.मी.चे लक्ष्य ठेवले होते. त्यापैकी मार्च, 2003 मध्ये 2 लाख 26 हजार 992 कि.मी.पर्यंत रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले. या रस्त्याच्या लांबीपैकी 1 लाख कि.मी.रस्त्याचे डांबरीकरणाचे लक्ष्य ठेवले होते आणि मला सांगण्यास आनंद होतो की, सा.बां.विभागाने 1 लाख 10 हजार 191 कि.मी.रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण केले आहे. अर्थसंकल्पात उपलब्ध होत असलेला मर्यादित निधी लक्षात घेऊन नाबार्ड व हुडको व इतर वित्तीय संस्थांकडून सहाय्य घेऊन रस्ते विकासाला गती दिलेली आहे. मार्च, 1999 अखेर राज्यातील 40412 गावांपैकी 32361 गावे बारमाही रस्त्याने जोडली होती. तर लोकशाही आघाडीच्या सरकारच्या काळात 2004 पर्यंत 37932 गावे बारमाही रस्त्यांनी जोडली आहेत. 1715 गावे आठमाही रस्त्यांनी जोडली आहेत आणि अद्याप 765 गावे रस्त्याने जोडावयाची शिल्लक राहिली आहेत. त्याची टक्केवारी 1.89 टक्के इतकी आहे. तसेच विभागाने मागील वर्षी 4 वर्षात काही निर्णय घेतले आहेत. यामध्ये पर्यावरण संतुलनासाठी राज्याच्या रस्त्यांच्या दुतर्फा व इतरत्र सुमारे 7 लाख झाडांची लागवड केलेली आहे. बेरोजगार अभियंत्यांना विनास्पर्धा 40 लाखापर्यंत कामे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 27 हजार बेरोजगार अभियंत्यांना 1100 कोटी रुपये किंमतीची विनास्पर्धा कामे दिली गेली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांसंबंधी सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तेवढयापुरतेच उत्तर दिले पाहिजे. आम्ही जेव्हा मुद्दा मांडत होतो तेव्हा वेळेत संपवा असे आम्हाला सांगितले जाते आणि मंत्रिमहोदय सविस्तरपणे उत्तर देत आहेत. नको ते कशासाठी सांगत आहेत ? मी औरंगाबाद जिल्हयातील खुलताबाद तालुक्यातील मौगावबद्दल मुद्दा उपस्थित केला होता त्याबद्दल काही उत्तर देत नाहीत. मी त्या कार्यकारी अभियंत्याचे नाव घेऊन सांगितले आहे.

श्री.रविशेठ पाटील : खुलताबादसंबंधी आपण जी सूचना केली आहे त्याबाबत चौकशी करुन निर्णय घेऊ. सा.बां.विभागाबाबत चर्चा करीत असताना जवळपास सर्व सदस्यांनी रस्ते व पुलाच्या कामासंबंधी आपापले विचार मांडले आहेत. मा.सदस्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला त्यांचा मी आभारी आहे आणि काही मुद्यांमुळे या प्रस्तावांना विरोध दर्शविला त्यांचाही मी आभारी आहे. परंतु ज्या मा.सदस्यांनी मागण्यांना विरोध दर्शविला त्यांचे माझ्या उत्तरामुळे समाधान झाले असेल असा मला विश्वास आहे या पार्श्वभूमिवर सा.बां.विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी मा.सदस्यांना विनंती करुन माझे उत्तर संपवितो.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, सहकार, पुनर्वसन व मदत कार्य या विभागाच्या मागण्यांवर चर्चा होत असताना मा.सदस्य श्री. गिडवाणी यांनी सहकारी साखर कारखान्यांच्या पॅकेजच्या बाबतीत आणि उपलब्ध होणा-या कर्जाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत निश्चितपणे योग्य ती दखल घेतली जाईल. मा.सदस्य प्रा.शरद पाटील यांनी पीक कर्जावरील व्याज माफीचा मुद्दा उपस्थित केला . मा.सदस्य प्रा. कवाडे यांनी सहकार विभागाच्या बाबतदीत मुद्दे उपस्थित केले. या सर्व मुद्यांची योग्य ती दखल घेतली जाईल. तेव्हा सहकार, पुनर्वसन व मदत कार्य विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : मा. मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी याठिकाणी उत्तर देताना सांगितले की, आम्ही त्याची दखल घेऊ. दुस-या बाजूला त्यांनी मागण्या मान्य करण्यासंबंधी विनंती केली आहे. दोन्ही गोष्टी एकाच वेळी कशा काय होऊ शकतात. मला एकाच मुद्याचे स्पष्टीकरण पाहिजे की, केन्द्र शासनाने ज्या काही अटी घालून दिलेल्या आहेत त्या प्रमाणे अंमलबाजवणी करणार काय? केन्द्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे त्याची अंमलबजावणी व्हावी एवढाच माझा मुद्दा आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : साखर कारखान्याच्या संदर्भात केन्द्र सरकारच्या माध्यमातून अटी घालून जे प्रस्ताव आलेले आहेत त्यांची छाननी चालू आहे. शेवटी केन्द्र सरकारने प्रस्ताव मंजूर केलेले असल्यामुळे अटींचे पालन करुनच आपल्याला पुढची कार्यवाही करावी लागेल. ती कारवाई करु असे मी सांगितले. म्हणून मागण्या मंजूर कराव्यात असे मी म्हणालो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा, वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) विभागाच्या मागण्यांवर मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी गोशीखुर्द प्रकल्पा संदर्भात आपले विचार मांडले. मी सांगू इच्छितो की, सन 2004-2005 या वर्षात जानेवारी अखेरपर्यन्त 43.32 कोटी रुपये गोशीखुर्द प्रकल्पावर खर्च केलेले आहेत. हा जवळ जवळ 4 हजार कोटीचा प्रकल्प आहे. अडीच लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्यामुळे हा राष्ट्रीय प्रकल्प घोषित व्हावा असा आपला प्रयत्न असून त्यानुषंगाने केन्द्रीय वन खात्याकडे प्रस्ताव गेलेला आहे. मा. सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी मराठवाड्यातील प्रकल्प निधी अभावी रखडलेले असल्यामुळे त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आपले मत व्यक्त केले.मी त्यांना सांगू इच्छितो की. मराठवाडयासाठी नुकतेच मा. मुख्यमंत्र्यांनी स्पेशल पॅकेज घोषित केलेले आहे. त्यामध्ये रखडलेल्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. मा.सदस्य श्री. खतिब यांनी मार्च महिना संपल्यानंतरही आमदार फंड लॅप्स करु नये अशी सूचना केली. त्यांनी केलेली सूचना शासनाच्या विचाराधीन आहे. मी जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभाक्षेत्र विकास तसेच वित्त व नियोजन खात्यांच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहाला विनंती करतो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या क्रमांक 142, 143 आणि 144 सभागृहासमोर मांडतो. कृपया त्यांना मान्यता द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, वन खात्याच्या बाब क्रमांक 19,20, 21 व 22 वर मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे, मा.सदस्य प्रा. कवाडे, मा.सदस्य श्रीमती फौजीया खान,मा.सदस्य श्री. अरविंद सावंत आणि मा. सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपले विचार मांडले. त्यांनी केलेल्या सूचना जरुर विचारात घेऊन कारवाई केली जाईल. बिबट्यांचा बंदोबस्त करीत आहेत. वनामध्ये असलेल्या दारुच्या भट्टया कायमच्या बंद केलेल्या आहेत. बिबटया वनाच्या बाहेर येणार नाही, त्याला वनामध्येच अन्न उपलब्ध होईल अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. अतिक्रमणे हटविण्याचा कार्यक्रम जोरात सुरु आहे. संजय गांधी उद्यानाला भिंत बांधण्याचा कार्यक्रम सुरु आहे. मा.सदस्य प्रा. कवाडे यांनी युवा शांती पर्यटनाच्या संदर्भात सूचना केली. त्यासाठी आधीच पैसा खर्च केलेला आहे. याठिकाणी हायकोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख करण्यात आला. हायकोर्टाच्या निदेशाप्रमाणे सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी दिलेली आहे. त्या संदर्भात जरुन कारवाई केली जाईल. वनसंवर्धन करणे, तसेच झाडतोडीच्या आणि विक्रीच्या संदर्भात याठिकाणी काही सूचना केलेल्या आहेत. मा.सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी अत्यंत चांगली सूचना केलेली आहे.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते...

ज्या वेळेस वणवा पेटतो त्यावेळी तो विझविणे महत्वाचे असते. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन खात्याने अग्निशमन दल निर्माण करावे. यासंदर्भात आम्ही व्यवस्था करीत आहोत. ज्या ठिकाणी वन विभागाचे जंगल आहे तेथील नगरपालिकांबरोबर संपर्क ठेवून फायर फायटींगचा कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.तसेच या संदर्भात वेगळी यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न वन विभागाच्या माध्यमातून करण्यात येईल. वणव्यास आग लागली तर त्याची माहिती देण्यासाठी ज्या प्रमाणे पोलीस विभागाचा कोड असलेला दूरध्वनी क्रमांक 100 नंबर आहे. तसा कोड नंबर असलेला दूरध्वनी वन विभागाने ठेवावा. वन विभागाचा कोड नंबर असलेला दूरध्वनी निश्चितपणे ठेवण्याचा आम्ही विचार करु. सन्माननीय सदस्यांनी केलेली ही सूचना वन विभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. सभापती महोदय, खारफुटीच्या संदर्भात या सदनाचे जेष्ठ सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी भाष्य केले. या खारफुटीच्या संदर्भात सर्वांच्या लक्षात आलेले आहे की,त्सुनामी लाटा आल्यानंतर त्या थांबविण्याची क्षमता या खारफुटीमध्येच आहे. याच्या अनेक चांगल्या प्रजाती आहेत.70 फुटापर्यन्त वाढतील अशा प्रकारच्या प्रजाती वन विभागाने शोधलेल्या आहेत. यासाठी वन खात्याच्या ताब्यामध्ये 8 हजार 500 हेक्टर जमीन आहे. महसूल विभागाकडे 22 हजार 500 हेक्टर जमीन आहे. ती जमीन वन खात्यास जोडून घेण्याचा प्रयत्न चालला आहे. हा सर्वच पट्टा मॅनग्रोव्हने वाढविण्याचा आमचा विचार आहे. ज्या ठिकाणी मॅनग्रोव्ह आहे तसेच इतरही काही वनस्पती आहेत ती तोडण्यास बंदी असावी यासाठी आपल्याला कायद्यामध्ये सुधारणा करावी लागेल. कायद्यात सुधारणा करण्यासाठी चर्चा चालू आहे. अशा प्रकारची वनस्पतीची तोड करणा-या व्यक्तीवर जामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. हा गुन्हा अजामीनपात्र व्हावा यादृष्टीने आमचा प्रयत्न सुरु आहे. अशा प्रकारची वनस्पती अतिसंवेदनशील म्हणून जाहीर करण्याची वन खात्याची तयारी चालली आहे. तसे झाले तर समुद्राच्या संपूर्ण किनारपट्टीवर या वनस्पतींची मोठया प्रमाणात वाढ होईल. भविष्यात या वनस्पतीचा निश्चितपणे फायदा होऊ शकेल.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, वर्सोवा येथे मॅनग्रोव्हची झाडे खणून बिल्डर लोकांनी त्या ठिकाणी भरणी घातली आहे. त्या ठिकाणचा सगळा भाग उघडा करुन ठेवला आहे. ही झाडे खणून काढल्यामुळे तेथील वस्तीस फार मोठा धोका निर्माण झालेला आहे. आपण कृपया त्याची संपूर्ण चौकशी करुन संबंधीत लोकांवर कारवाई करावी आणि त्या ठिकाणी पुन्हा मॅनग्रोव्हच्या झाडांची लागवड करावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची जरुर चौकशी करण्यात येईल परंतु ती जमीन वन खात्याच्या ताब्यात नाही. ती जमीन सरकारच्या ताब्यात आहे. सरकारची जबाबदारी म्हणून त्यासंबंधीची चौकशी केली जाईल्. कुठल्याही परिस्थितीमध्ये मॅनग्रोची झाडे नष्ट होणार नाहीत म्हणून या वनस्पतीला अतिसंवेदनाशील म्हणून जाहीर करुन त्या संदर्भात कायद्यात दुरुस्ती करण्याची आमची तयारी आहे. वन विभागाच्या ज्या मागण्या सभागृहासमोर सादर करण्यात आल्या आहेत त्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी विनंती करतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन,रोजगार हमी योजना,संसदीय कार्य,महिला व बालकल्याण मंत्री) : सभापती महोदय, पणन,रोजगार हमी योजना,संसदीय कार्य,महिला व बालकल्याण विभागाच्या मागण्या सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या आहेत. त्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री) : सभापति महोदय, मेरे विभाग की बाब क्रमांक 91 और 92 पर माननीय सदस्या श्रीमती फौजीया ख्ांन ने अपने विचार रखे हैं. मैं उनको बताना चाहता हूं कि सरकार ने कंप्युटराइजेशन ऑफ राशनकार्ड का काम शुरु कर दिया है. उसी हिसाब से सॉफ्टवेअर बनेगा. मैं माननीय सभागृह से निवेदन करता हूं कि बाब क्रमांक 91 और 92 को मंजूरी दी जाये. धन्यवाद.

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (अन्न व औषधे प्रशासन मंत्री व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्या विभागात बाब क्रमांक 95 ते 100 सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या आहेत.

बाब क्रमांक 100 च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी एक प्रश्न विचारला होता की, या योजनेमध्ये किती लाभार्थी लाभ घेत आहेत ? या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ही योजना जानेवारी 2004 मध्ये सुरु झालेली आहे. या एका वर्षात 7 लाख 37 हजार 42 लाभार्थी झालेले आहेत. माझ्या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या मागण्या सभागृहात सादर करण्यात आल्या आहेत. या

मागण्याच्या संदर्भात काही सदस्यांनी चर्चा केली होती. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी काही माहिती मागितली होती. ती माहिती मी त्यांना देऊ इच्छितो.च्छतो...

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

वर्ल्ड बँकेची योजना होती ती जून 1999 मध्ये मंजूर झाली आणि 31 ऑगस्ट 2005 पर्यंत संपणे आवश्यक आहे. मा. सदस्यांनी जी माहिती मागितली होती की कोणती हॉस्पीटल्स् या योजनेअंतर्गत घेण्यात आलेली आहेत. 151 हॉस्पीटस् होती त्यामध्ये 27 जिल्हा रुग्णालये,2 जनरल हॉस्पीटल,4 महिला हॉस्पीटल,20 सबडिस्ट्रीक्ट हॉस्पीटल 30 बेड पासून 100 बेडपर्यंत अपग्रेड झालेली होती. 52 हॉस्पीटल 30 पासून 50 बेडपर्यंत अपग्रेड झालेली आहेत. 40 रुरल हॉस्पीटल आहेत त्याला अपग्रेड केलेली आहेत. 8 रिजनल इक्वीपमेंट ॲन्ड रिपेअर वर्कशॉप आहेत. 16 डिस्ट्रीक्ट पब्लीक हेल्थ लेबोरेटरी,1 स्टेट पब्लीक हेल्थ लेबोरेटरी,1 आययूसी ब्युरो पुण्यामध्ये आहे. एक आरोग्य भवन आहे त्याचे बांधकाम मुंबईमध्ये होत आहे. आणखी एका गोष्टीची माहिती मा.सदस्यांनी विचारली होती की किती काम पूर्ण झाले आणि किती बाकी आहे. 147 हॉस्पीटलचे काम पूर्ण झालेले आहे आणिा आरोग्य भवन,मुंबई,100 बेडचे सबडिस्ट्रीक्ट हॉस्पीटल, मुखेड,जि.नांदेड आणि उदगीर व लातूर आणि सबडिस्ट्रीक्ट हॉस्पीटल 50 बेडचे परांडा आणि बसमत हिंगोली यांचे काम पूर्ण व्हावयाचे आहे. वर्ल्ड बँकेच्या पूर्ण प्रोजेक्टची किंमत 651 कोटी इतकी आहे. मा.सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी 2/3 प्रश्न उपस्थित केले होते. एक सावित्रीबाई फुले योजनेबद्दल होते. त्या योजनेमध्ये स्त्री किंवा पुरुष कुणाचेही स्टरलायझेशन झाले तरी लाभार्थी होऊ शकतो. दुसरा प्रश्न होता वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्तीचा होता. लोकसेवा आयोगाला 1082 वैद्यकीय अधिका-यांची मागणी केलेली आहे आणि आम्हांला खात्री आहे की, लौकरात लौकर ही पदे भरली जातील. सिटी स्कॅनचा प्रश्न आहे. लौकरात लौकर पैसा उपलब्ध करुन हे मशीन उपलब्ध करुन दिले जाईल. चूर्णीमधून काटकुंजला रुग्णालय ट्रान्सफर करण्याच्या बाबतीत आता माझ्याकडे माहिती नाही. मी नंतर सांगतो. वर्ल्ड बँकेकडून पैसे कोठे कोठे खर्च करण्यात आले याची माहिती मी लेखी देईन. सभापती महोदय, सभागृहाने या विभागाच्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग,माजी सैनिक कल्याण,रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

तालिका सभापती (श्री. अनंत तरे) : पूरक मागण्यांवरील चर्चा संपली.

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, औचित्याचा मुद्दा आहे. पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये मंत्र्यांची नांवे असतात आणि कोणत्या खात्याचे मंत्री ते आपण शोधायचे असते. माझी विनंती आहेकी, संपूर्ण पूरक मागण्यांबाबत खाते निहाय माहिती असते. खातेनिहाय माहिती देताना उत्तर कोण देतील हेही आम्हांला समजले पाहिजे. ही सुधारणा केली तर चर्चेच्या वेळी सुकर होईल.

तालिका सभापती (श्री. अनंत तरे) : यासंदर्भात वितरीत केलेली माहिती पिजन होलमध्ये ठेवलेली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, असे सांगितले जाते की, खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल. पूरक मागण्यांचे पुस्तक असते ते खातेनिहाय असते. मंत्र्यांऐवजी तेथे खाती लिहावीत असे माझे म्हणणे आहे. खात्यासमोर मंत्री लिहा.

तालिका सभापती : ठीक आहे. अर्धा-तास चर्चा आता सुरु करावी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : कृषि मंडळ कार्यालयाची व पदाची संख्या कमी करण्याचा निर्णय

मु.शी : कृषि मंडळ कार्यालयाची व पदाची संख्या कमी करण्याचा निर्णय या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3853 ला दिनांक 17 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.शरद पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय,कृषि मंडळ कार्यालयाची व पदांची संख्या कमी करण्याचा निर्णय या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3853 ला दिनांक 17 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय,महाराष्ट्र शासनाने 1998 मध्ये कृषी व फलोत्पादन, मृद संधारण,पाणलोट क्षेत्र विकास या तिन्ही योजना एकत्र करुन एक खिडकी योजना सुरु केली होती त्यानुसार प्रत्येकी 21 कर्मचारी असलेले मंडळ कार्यालये राज्यात सुरु करण्यात आली होती व त्या मंडळ कार्यालयाच्या अंतर्गत अंदाजे 25 हजार क्षेत्र आणि या मंडळ कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या कृषि सहाय्यकाकडे तीन ते चार गावे , दोन ते तीन हजार हेक्टर क्षेत्र देण्यात आले होते.त्यानुसार या सर्व योजना एकत्रित करुन एक खिडकी योजना सुरु करण्यात आली होती.

दिनांक .1-2-2001 साली यातील काही योजनांमध्ये आणि कर्मचा-यांमध्ये कपात करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. त्यानुसार जवळपास 5 हजार पदे कमी करण्यात आली होती.ही योजना तसेच कृषि विभाग हा राज्य शासनाकडून काढून जिल्हा परिषदांकडे वर्ग करण्यात आला होता. कृषि सहाय्यकांची पदे आणि मंडळ कार्यालयाची संख्या कमी करण्याचा निर्णय देखील त्यात समाविष्ट होता.लोकप्रतिनिधींनी आणि कृषि खात्यात काम करणा-या कर्मचा-यांनी विरोध केल्यामुळे कृषि विभाग जिल्हा परिषदेला जोडण्याचा निर्णय शासनाने स्थगित केला होता.परंतु शासनाने मंडळ कार्यालये कमी करुन, कृषि सहाय्यकांची पदे कमी करुन तसेच ट्रेसरची पदे रद्द करुन या खात्यामार्फत जे काम चालू आहे त्या कामाची परिणामकता कमी केली आहे. त्यामुळे कृषि सहाय्यकाच्या कामाचा तसेच ज्या शेतक-यांना कृषि खात्याच्या योजनांचा लाभ

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील .....

परिणामकारकपणे मिळत होता त्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.त्यामुळे मी या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करतो की, मंडळ कार्यालये कमी केल्यामुळे ज्या शेतक-यांची अडचण झालेली आहे ती दूर करण्यात यावी. मंडळ कार्यालये आता तालुकयाच्या ठिकाणी असल्यामुळे शेतमक-यांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची वेळ आली आहे.पूर्वीची मंडळ कार्यालयाची संख्या पूर्ववत तशीच ठेवण्यात यावी. तसेच कृषि सहाय्यकांची संख्या कमी करण्यात येऊ नये. ट्रेसरचे पद रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामध्ये बदल करण्यात यावा .प्रत्येक मंडळ कार्यालयातकिमान एक ट्रेसर असावा...

नंतर श्री.किल्लेदार

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे चालू..

त्याचप्रमाणे आपण कृषि विभाग जिल्हापरिषदांना जोडण्याचा स्थगित केलेला निर्णय तो कायमचा रद्द करावा. त्यानंतर सर्वात महत्वाची शेवटची बाब अशी की, सरंगी समिती, डॉ.मुळे समिती व कृषि आयुक्त समिती या शासनानेच नेमलेल्या तीन समित्यांचे अहवाल शासनाला प्राप्त झालेले आहेत. त्या अहवालावर शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नसल्यामुळे त्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊनच शासनाने हे सर्व निर्णय घ्यावेत अशी मी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो.

--

4Z-2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन व रोजगार हमी योजना मंत्री) : मा. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील साहेबांनी यांनी कृषि मंडल कार्यालयाची व पदांची संख्या कमी करण्याच्या निर्णयाच्या संदर्भात अर्धातासाची चर्चा उपस्थित केली. चर्चा उपस्थित करत असताना, या बाबीमध्ये निर्णय करत असतांना पदे कमी करण्यात आली, त्या पदांच्याबाबतीमध्ये आणि विशेष करुन मंडल कार्यालयाच्याबाबतीत आणि ट्रेंसर पदांच्याबाबतीमध्ये निर्णय करत असताना फेरविचार करावा. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, शासनामधील सर्वच विभागामध्ये पदांची पुनर्रचना करण्याचे मोठयाप्रमाणावर काम सुरू होते. त्या अनुषंगाने कृषि विभागामध्ये देखील काही मंडल कार्यालये तालुका स्तरावर शिफ्ट करण्याचा निर्णय झाला. काही रिक्त पदे होती ती अबॉलिश करण्याचाही निर्णय झाला. सहा महिन्यापेक्षा जास्त काळ एखादे पद रिक्त असेल तर ते पुन्हा ग्राह्य धरले जाणार नाही, अशा प्रकारचे शासन स्तरावर काही निर्णय झाले. त्याचा कळत नकळत फटका विभागालासुध्दा बसलेला आहे. परंतु हे सर्व करत असतांना मंत्रिमंडळाने एक धोरणात्मक निर्णय घेतला. 72 वी घटना दुरुस्ती झाली, त्या अनुषंगाने कृषि विभागातील भाग हा जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्याच्या संदर्भातदेखील धोरणात्मक निर्णय झाला. त्यापध्दतीने कारवाई सुरू झालेली आहे. परंतु हे निर्णय झाल्यानंतर जे काही कृषि विभागाच्या माध्यमातून किंवा लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून ज्यावेळेस ही चर्चा पुढे आली, त्यावेळेस शासनाने सरंगी समिती गठित केली, आयुक्त स्तरावर समिती गठित केली. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे.जरुर समितीने शिफारस केल्याप्रमाणे शासन यामध्ये निश्चित मार्ग काढण्याचा प्रयत्न करेल. परंतु आज कोठेतरी काम करणारा कृषि सहाय्यक असेल, ट्रेसर असेल किंवा तालुका स्तरावर काम करणारा आमचा कृषि अधिकारी असेल त्यांच्यावरही थोडी कामाची जबाबदारी अधिक होणार आहे. ती जबाबदारी त्यांनी स्वीकारली पाहिजे. कारण आज शासनामध्ये किती मर्यादेपर्यन्त नोकरभरतीला मान्यता द्यायची हा विचार आज ना उद्या आपल्याला करावाच लागणार आहे. म्हणून थोडीफार संख्या कमी झाली असली तरी त्यांच्यावर वर्कलोड हा थोडा वाढणार आहे. या समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. विशेषत: सरंगी समितीच्या अहवालामध्ये या सगळया बाबी अंतर्भूत आहेत. मला आठवते की, मी 1995 ते 1999 या कालावधीमध्ये मी कृषि विभागाचा राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. त्यावेळेस आपण 'एक खिडकी' योजना काढली परंतु नंतर 2000 साली त्यामध्ये काही बदल झाला. पुन्हा जिल्हापरिषदांकडे स्टाफ वर्ग करण्याचा निर्णय झाला. सरंगी समितीचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे चालू...

आणि कृषि आयुक्तांचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे, त्याप्रमाणे विभागामार्फत निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. या संदर्भात शासन पॉझिटिव्ह विचार करेल, एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

प्रा.शरद पाटील : पदे व्यपगत झालेली आहेत. सरंगी समितीने अहवालामध्ये ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या स्वीकारणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : जी पदे लॅप्स झालेली आहेत, रद्द करण्यात आलेली आहेत, त्यासंदर्भात आपण एक हायपावर समिती गठित केलेली आहे. त्या समितीसमोर हा विचार मांडला जाईल. सरंगी समितीच्या अहवालाची छाननी चालू आहे. त्यामध्ये ज्या योग्य सूचना असतील, त्याबाबत छाननी होऊन रिपोर्ट येईल, तेव्हा त्याबाबतीतील विचार केला जाईल.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वरळी-नरिमन पॉईंट वेस्टर्न फ्री-वे (सी-लिंक) प्रकल्पाबाबत.

मु.शी. : वरळी-नरिमन पॉईंट वेस्टर्न फ्री-वे (सी-लिंक) प्रकल्पाबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक. 3237 ला दिनांक 18.3.2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.कन्हैयालाल गिडवानी यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.कन्हैयालाल गिडवानी (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, "वरळी-नरिमन पॉईंट वेस्टर्न फ्री-वे (सी-लिंक) प्रकल्पाबाबत." या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3237 ला दिनांक 18 मार्च 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, आपल्याला माहितीच आहे की, मुंबईत होत असलेली वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी म्हणून वांद्रे ते वरळी आणि वरळी ते नरिमन पॉईंट येथे वेस्टर्न फ्री-वे (सी-लिंक) बांधण्याची योजना 1998 मध्ये जाहीर करण्यात आली होती पण अजूनही ती अमलात आलेली नाही. अध्यक्ष महाराज, मुंबईच्या पश्चिम उपनगरातून येथपर्यंत येण्यासाठी म्हणजे वांद्रे येथून रस्त्याने प्रवास करून नरिमन पाईंट येथे येण्यासाठी किमान दीड तास रस्त्याने लागतो. म्हणून हा सागरी महामार्ग बांधण्याची कल्पना पुढे आली आणि हा फ्री वे बांधण्याची घोषणा शासनाने केली परंतु गेली आठ वर्षे हा प्रकल्प रेंगाळत राहिलेला आहे. या प्रश्नाच्या उत्तरामध्ये या संबंधात घेतलेल्या निर्णयात सातत्याने बदल करण्यात येत असल्याचे दिसून येते त्यामुळे यासाठी लागणाऱ्या खर्चामध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अध्यक्ष महाराज, या प्रकल्पासंबंधात मी जवळपास 22 हरकतीचे मुद्दे काढलेले आहेत ते याप्रमाणे आहेत ...

1) वरळी तगे नरिमन पॉईंट दरम्यान समुद्रात बांधण्यात येणाऱ्या वरळी-नरिमन पॉईंट वेस्टर्न फ्री-वे (सी-लिंग) प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक मंजुरी देण्याकरिता केंद्रीय पर्यावरण विभागाने कोणकोणत्या अटी घातलेल्या आहेत ?

2) हा प्रकल्प उभारणीसाठी मान्यता देताना पर्यावरण विभागाने घातलेल्या अटीनुसार मुंबई महानगर पालिकेने भारतीय नौदलाला जमीन हस्तांतरित करण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र

..... 5ए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिडवानी ...

घेण्याची देखील अट घातलेली असून त्या अटीची पूर्तता न करताच शासनाने हा प्रकल्प उभारण्याची घोषणा करून पर्यावरण विभागाने घातलेल्या अटीचा भंग केलेला आहे.

3) केंद्रीय पर्यावरण विभागाने या प्रकल्पास मान्यता देताना त्याची किंमत 1500 कोटी एवढी नमूद केली असूनसुद्धा शासनाने या प्रकल्पाची अंदाजित किंमत 2600 कोटी इतकी घोषित करून केंद्रीय पर्यावरण विभागाचीच दिशाभूल केलेली आहे.

4) शासनाने हा प्रकल्प बीओटी बेसिसवर म्हणजे बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर उभारण्याचे निश्चित केल्यामुळे या प्रकल्पासाठी निधी उभारण्याचे स्त्रोत कर्ज व व्याजाचा दर यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही.

अध्यक्ष महाराज, बीओटी तत्त्वावर हा प्रकल्प करताना साधारणपणे बाहेर 6 ते 8 टक्के दराने पैसे घेतले जातात. मी या संबंधात माहितीच्या अधिकाराखाली गेल्या चार महिन्यांपासून माहिती घेत आहे आणि त्यानुसार मला समजले आहे की, बाहेर 7 टक्के व्याजाने कर्ज मिळत असताना 9 टक्के व्याजाने कर्ज दाखविल्याने प्रकल्पाची किंमतीचा भाग देखील महत्त्वाचा झालेला आहे.

5) हा प्रकल्प उभारण्यासाठी शासनाने तांत्रिक अथवा आर्थिक उपाय योजना केलेली नसूनसुद्धा केवळ सवंग प्रसिध्दीसाठी व गुंतवणूकदारांची दिशाभूल करण्यासाठी शासनाने घाईघाईने या प्रकल्पाची घोषणा केलेली आहे.

कारण हा विषय लोकांच्या दृष्टीने महत्त्वाचा झालेला आहे इतका की, या विषयावर काहीही बोलले तरी लोकांचे त्याकडे लगेच लक्ष जाते. त्यामुळे या संबंधात शासनाने काहीही घोषणा केली तरी त्याकडे गांभीर्यानेच पाहिले जाते. म्हणूनच या प्रकल्पाबाबत केवळ प्रसिध्दीसाठी घोषणा न करता प्रत्यक्ष कामाला सुरूवात करून युद्ध पातळीवर काम झाले पाहिजे. अन्यथा प्रकल्पाच्या किंमतीमध्ये आणखी वाढ होणार आहे. अगोदरच हा प्रकल्प गेली 8 वर्षे रेंगाळला असल्याने याच्या किंमतीमध्ये दुपटीने वाढ झालेली आहे.

6) या प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक व तांत्रिक अभ्यासासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया देखील अद्याप पूर्ण झालेली नाही.

..... 5ए 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गिडवानी ...

7) या प्रकल्पाला अनेक संघटनांनी विरोध केला असून या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबईतील दळणवळणात मोठ्या प्रमाणात वाढ होणार असून दाटीवाटीमध्येही वाढ होणार आहे.

अध्यक्ष महाराज, या प्रकल्पाला काही लोकांनी विरोध केलेला आहे. परंतु तो विरोध करताना त्यातील प्रॅक्टिकल भाग देखील समजून घेणे आवश्यक आहे. शिवाय

8) या प्रकल्पामुळे वायू प्रदूषण देखील वाढणार आहे. ....

(यानंतर श्री.जागडे .....5बी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ...

9) या प्रकल्पामुळे परिसरातील मासे मच्छिमारे समुद्री जीव तसेच सागरी किना-याचे सौंदर्य व वातावरण यावर देखील परिणाम होणार आहे. मच्छिमारांनी त्यांच्या अस्तित्वाबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

10) या प्रकल्पामुळे बाधीत होणा-या लोकांना त्यांचा मोबदला मिळेल की नाही याबाबत संशय निर्माण झाला आहे.

11) या प्रकल्पाच्या उभारणीसाठी नरिमन पॉईंट व वरळी येथे समुद्रात भर टाकून रिक्लेमेशन करावे लागणार असल्याने परिसरातील मच्छिमारांवर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे.

12) या प्रकल्पामुळे शहरी करणात वाढ होऊन स्थानिक भूमिपूत्र मच्छिमारांना विस्थापित व्हावे लागणार आहे.

13) या प्रकल्पामुळे लाभ होणा-या गाड्यांची, व्यक्तींची संख्या यांच्या सांख्यिकीय माहितीचे पुनर्विलोकन होण्याची आवश्यकता आहे.

14) या प्रकल्प उभारणी तसेच त्याची भविष्यातील जपणूक या व्यवहारात पारदर्शकता तसेच जनतेला सहभागी करुन घेण्याची आवश्यकता आहे.

15) या प्रकल्प उभारणी नंतर या विभागातील पर्यावरण संतुलन राखण्याचे काम व्यवस्थितरित्या पार पाडले जाईल काय याबाबत येथील जनतेच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. सबब यासाठी नागरी सल्लागार समिती स्थापन करावी अशी लोकांची अपेक्षा आहे.

16) या प्रकल्पाच्या उभारणी दक्षिण मुंबईत रोजच्या रोज येणा-या वाहनांच्या पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होणार असून कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

17) तसेच बेस्टच्या बसेसना या सागरी पुलावरुन जाण्यास परवानगी दिली गेली नसल्याने हा प्रकल्प सामान्य लोकांसाठी नसून धनिकांसाठी बनविण्यात आला असल्याने जनतेत याबाबत ततीव्र नाराजी पसरलेली आहे. सबब बेस्ट बसेससाठी हा पूल खुला करावा, अशी लोकांची असलेली मागणी.

18) हा प्रकल्प राजभवनाच्या जवळून जात असल्याने या पुलामुळे राज्यपालांच्या निवासाच्या सुरक्षिततेचा प्रश्न नव्याने निर्माण होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी.....

19) टेक्निकल ॲडवायझरी कमिटीच्या बैठकीत या प्रकल्पाच्या मुलभूत उभारणीसाठी व बीओटी बेसीसवर उभारण्यासाठी कॅबिनेटच्या सब-कमिटीची मान्यता घेण्यात यावी, असे निश्चित करण्यात आले असून सुध्दा ती घेतलेली नसणे.

20) केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने या प्रकल्पाला मंजूर देताना महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळाने या संदर्भात घातलेल्या सर्व अटींची पूर्तता करावी अशी अट घातलेली असून सुध्दा अनेक अटींचा होत असलेला भंग.

21) एकंदरीतच पर्यावरण विभागाने हा प्रकल्प उभारणीसाठी अनेक क्लिष्ट अटी घातलेल्या असल्याने या प्रकल्पाच्या उभारणीबाबत निर्माण होत असलेली साशंकता.

22) बांद्रा ते वरळी वरळी ते नरिमन पॉईन्ट हे दोन वेगळे प्रकल्प असून सुध्दा प्रकल्प खर्च व त्यातून मिळणारे उत्पन्न हे वेगवेगळे न दर्शविता एकात एक गुंतवणूक करुन जनतेची करण्यात येत असलेली दिशाभूल.

सभापती महोदय, मला शेवटी हेच सांगावयाचे आहे की, हा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा. हा प्रकल्प लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने शासन कोणती पावले उचलणार आहे ? एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी वरळी-परिमन पॉईन्ट वेस्टर्न फ्री-वे प्रकल्पाबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. सभापती महोदय, यातील पहिला टप्पा बांद्रा ते वरळी असा साडेसहा किलोमिटरचा आहे. तसेच यासाठी 1300 कोटी रुपये खर्च येणार आहे. आता या सागरी पुलाचे काम वेगाने सुरु आहे. पहिला टप्पा डिसेंबर 2007 मध्ये पूर्ण होणार आहे. तसेच दुसरा टप्पा हा वरळी ते नरिमन पॉईन्ट आणि नरिमन पॉईन्ट ते कफ परेड असा सागरी पूल राहणार आहे. माहिमची खाडीवरुन आज जवळ जवळ सव्वा लाख वाहने पास होत आहेत. त्यामुळे त्या भागात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असते. म्हणून वरळी ते नरिमन पॉईन्ट हा सागरी पूल होण्याच्या दृष्टीने शासनाचा प्रयत्न सुरु आहे. सभापती महोदय, पर्यावरण खात्याने यास मान्यता दिली आहे. परंतु या ठिकाणी एक अट टाकण्यात आली आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख.....

पर्यावरण व वन विभागाने 10 फेब्रुवारी 2003 ला क्लिअरन्स दिला आहे. फक्त अट एकच आहे की, ही जागा डब्लू.एन.सी. ला मुंबई महानगरपालिकेकडून हस्तांतरीत करावी. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही अट शिथिल करावी यासाठी वन विभागाकडे व पर्यावरण विभागाकडे विनंती केली आहे. ओव्हरऑल संपूर्ण प्रकल्पाला क्लिअरन्स मिळाला आहे. त्यामध्ये टेक्नो एकॉनॉमिकल फिजिबिलिटी स्टडी, जी. ओ. टेक्नॉलॉजी आणि हायड्रॉलिक सर्व्हे या सागरी पूलासाठी केला आहे. त्याचबरोबर भूकंपाच्या बाबतीत संपूर्ण सर्व्हे झाला आहे. वरळी ते नरिमन पॉईंट हा 2600 कोटी रुपयांचा सागरी पूल बी.ओ.टी. तत्वावर करण्याचा निर्णय घेतला आहे. 1998 च्या एस्टिमेटप्रमाणे या प्रकल्पाची किंमत 1500 कोटी रुपये होती. आणि आजच्या एस्टिमेटप्रमाणे संपूर्ण प्रकल्पाची किंमत 2600 कोटी रुपये इतकी आहे. हा संपूर्ण प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर होणार असल्यामुळे त्यासाठी कर्ज घेऊन व्याज देण्याचा प्रश्न नाही.

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, 1500 कोटीवरुन 2600 कोटी रुपये प्रकल्पाची किंमत झाली आहे. आपण बी.ओ.टी. तत्वावर हा प्रकल्प तयार करीत असतांना व्याजाचा दर 9 टक्के आकारला जात आहे याकडे सुध्दा आपण लक्ष दिले पाहिजे...

श्री. अनिल देशमुख : माननीय सदस्यांची सूचना लक्षात घेण्यात येईल. हा संपूर्ण प्रकल्प बी.ओ.टी. तत्वावर करणार आहोत. त्याचप्रमाणे याकरिता कन्सल्टंट नेमण्याकरिता जाहीरात दिलेली असून कन्सल्टंटची लवकरच नेमणूक झाल्यांनंतर पुढील कारवाई करण्यात येईल. हा प्रकल्प नरिमन पॉईंटपासून सुरु झाल्यानंतर तो हाजी अलीला एक कनेक्टर देण्यात येईल, त्यानंतर भुलाभाई देसाई रोडला दुसरा कनेक्टर देण्यात येईल आणि तिसरा कनेक्टर नरिमन पॉईंटला देण्यात येईल. त्यावेळी माननीय राज्यपालांच्या बंगल्याला वळसा घालून तो नरिमन पॉईंटला जाईल. तसेच, मध्ये नेपियन्सी रोडवर एक कनेक्टर देण्याचा आमचा विचार आहे.हा सागरी पूल माननीय राज्यपालांच्या बंगल्याला वळसा घालून नरिमन पॉईंटला नेला तर एक हजार कोटी रुपये जास्त खर्च येईल. म्हणून एक कनेक्टर नेपियनसी रोडला दिला तर तेथून बोगद्याच्या माध्यमातून मलबार हिलच्या खालून बोगदा काढून चौपाटीला नेऊ शकलो तर एक हजार कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपये खर्च वाचू शकेल. म्हणून त्याचे संपूर्ण सर्व्हे करण्याचे काम आम्ही आय.आय.टी. पवई यांना दिले आहे. त्याचा अहवाल लवकरात लवकर आल्यानंतर व अलाईनमेंट फिक्स केल्यानंतर त्याची जाहीरात लवकरात लवकर देऊन हे काम सुरु करु.

दुसरी आनंदाची गोष्ट अशी की, मध्यंतरीच्या काळात माननीय पंतप्रधान मुंबईमध्ये आले होते त्यावेळी महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या व माझ्या खात्याच्या माध्यमातून आम्ही त्यांना या प्रकल्पाचे संपूर्ण प्रेझेंटेशन दिले होते, त्यामध्ये या पूलाचा सुध्दा समावेश होता. त्यावेळी माननीय पंतप्रधानांनी केवळ या प्रकल्पासाठी नाहीतर शिवडी ते न्हावा या 22 कि.मी. चा सागरी पूल व वरळी ते नरिमन पॉईंट या सागरी पूलाला केंद्र सरकारकडून मदत करण्यात येईल. सभापती महोदय, नुकतेच केंद्रीय अर्थमंत्री माननीय श्री. चिदंबरम यांनी बजेट सादर केले त्या मध्ये सुध्दा त्यांनी या दोन्ही प्रकल्पाबाबत उल्लेख केला आहे. त्यापैकी एक म्हणजे मेट्रो रेल्वे आणि दुसरे शिवडी - न्हावा शेवा या 22 कि.मी. चा सागरी पूल आणि तिसरा वरळी-नरिमन पॉईंट या सागरी पूलाचा केंद्र सरकारच्या माध्यमातून पैसे उपलब्ध केले जातील अशाप्रकारची घोषणा त्यांनी केली आहे.. संपूर्ण भारतासाठी साडे पाच हजार कोटींची तरतूद त्यांनी केली आहे. या सर्व प्रकल्पामध्ये शिवडी ते न्हावा,. वरळी ते नरिमन पॉईंट सागरी पूलाचे हे दोन्ही प्रकल्प आम्ही केंद्र सरकारकडे दिले असून साडे पाच हजार कोटी रुपयांमधून या प्रकल्पांना जास्तीत जास्त निधी कसा मिळेल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले की, माननीय राज्यपालांच्या बंगल्याला वळसा घालून जातांना त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होतो. माझ्या माहितीप्रमाणे तो प्रश्न उपस्थित होत नाही. त्या पूलाची ओरिजिनल अलाईनमेंट तीच आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

पण एक हजार कोटी रुपये त्या अलाईनमेंटला खर्च येऊ शकतो. म्हणून मलबार हिलच्या खालून भुयार काढून चौपाटीवर भूयार काढावयाचे का ? यादृष्टीने आम्ही विचार करीत आहोत आणि त्याचा संपूर्ण अभ्यास पवई येथील आय.आय.टी.च्या माध्यमातून सुरु आहे. त्यांचा संपूर्ण रिपोर्ट आल्यानंतर अलाईनमेंट फायनल करुन लवकरात लवकर हा प्रकल्प सुरु करण्यात येईल. त्याचबरोबर इन्फ्रास्ट्रक्चरल कमिटीसमोर हा प्रकल्प गेला की नाही असे सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे. याबाबतीत असा नियम आहे की, 50 कोटी रुपयांच्या वरील कोणताही प्रकल्प असेल तर त्याला इन्फ्रास्ट्रक्चरल कमिटीचे ॲप्रुव्हल असल्याशिवाय एम.एस.आय.डी.सी.ला हा प्रकल्प घेता येत नाही. त्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरल समितीची मान्यता घेण्यात येईल. संपूर्ण अलाईनमेंट झाल्यानंतर आम्ही इन्फ्रास्ट्रक्चरल कमिटीची मान्यता घेऊ.तसेच पर्यावरणाच्या बाबतीत सांगितले, पण पर्यावरणाच्या बाबतीत काही अडचण नाही. तसेच दुसरे असे सांगितले की, वांद्रा ते वरळी आणि वरळी ते नेपीयनसी रोड हे दोन्ही वेगवेगळे प्रोजेक्ट आहेत. सन्माननीय सदस्यांनी हे दोन्ही प्रोजेक्ट लिंकअप करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे कृपा करुन सन्माननीय सदस्यांनी हे दोन्ही प्रोजेक्ट लिंकअप करु नयेत. फेज-1 आणि फेज-2 असे हे दोन्ही प्रोजेक्ट आहेत. वांद्रा ते वरळी या जवळजवळ साडेसहा कि.मी.सागरी पुलाचे काम अतिशय जलद गतीने सुरु आहे आणि आमचा असा प्रयत्न आहे की, 2007 च्या डिसेंबर महिन्यापर्यंत हा 8 लिंकचा पूल वाहतुकीसाठी आम्ही उपलब्ध करुन देणार आहोत. तसेच सन्माननीय सदस्यांनी आरोप केला की, हे जे काही सुरु आहे, ते संपूर्णपणे प्रसिध्दीसाठी सुरु आहे. सभापती महोदय, आपण हा पूल बी.ओ.टी. तत्वावर घेणार आहोत. बी.ओ.टी.तत्वावर मार्केटींग करावयाचे म्हणजे जोपर्यंत आपण लोकांपर्यंत हा प्रकल्प नेणार नाही, त्याची प्रसिध्दी करणार नाही, तोपर्यंत बी.ओ.टी.तत्वावर कोणी घरबसल्या तुमच्या घरी पैसे लावण्यासाठी येणार नाही. त्यामुळे प्रसिध्दीचा प्रश्न नाही. बी.ओ.टी.तत्वानुसार करीत असताना मार्केटींग करावेच लागते आणि मार्केटींगची ही स्टॅटीजी आहे आणि त्यापध्दतीने आम्ही सर्व काम करीत आहोत. व्यावहारीक दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन त्याची संपूर्ण पब्लीसिटी करीत आहोत ही गोष्ट सुध्दा प्रामुख्याने सन्माननीय सदस्यांनी समजून घेतली पाहिजे. तसेच नागरी सल्लागार समिती स्थापन करावी अशी जी सन्माननीय सदस्यांची सूचना आहे, त्याचा सुध्दा अवश्य विचार करण्यात येईल.

. . . .5डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दोन-तीन मुद्यांबाबत खुलासा केला आहे. पण मुळात जो प्रोजेक्ट आहे, त्याला आमचा काही विरोध नाही. पण यामध्ये जो वेळ जातो, तो या चर्चेतील महत्वाचा मुद्दा होता. माननीय मंत्री महोदयांनी पब्लीसिटीबद्दल सांगितले. जाहिरातीबद्दल तुम्ही पब्लीसिटी जरुर करा. पण त्याची वारंवार जी घोषणा केली जाते त्याबद्दल मी उल्लेख केला होता. दुसरा यामध्ये व्हॅल्युएशनचा भाग आहे. या प्रोजेक्टची किंमत 1500 कोटीवरुन 2600 कोटी रुपये झाली. बी.ओ.टी.तत्वावर देताना हा यातील प्रमुख मुद्दा आहे. याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना एक स्पेसीफीक प्रश्न विचारु इच्छितो. आपण बी.ओ.टी.मध्ये सुध्दा याचे व्हॅल्युएशन करतो. कारण जेव्हा पैसे बाजारातून कर्जरुपानें घ्यावे लागतात, त्याच्या व्याजाचा दर काय असावा ? माझें असे म्हणणे आहे की, काही ठिकाणी व्याज दर 7 टक्के असताना, त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न केला पाहिजे. एक्सप्रेस हायवेच्या वेळी सुध्दा हाच विषय उपस्थित झाला होता. ते मी आता परत येथे मांडत नाही. पण त्यामध्ये व्याजाचा दर जास्त आकारला गेला आहे आणि त्यामुळे प्रोजेक्टची किंमत वाढली आहे.

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, याबाबतीत अर्थ विभागाने एक्सप्रेस हायवेच्या बाबतीत आणि या प्रोजेक्टच्या बाबतीत सुध्दा सूचना दिलेल्या आहेत. आपण कर्जरुपाने पैसे घेण्याचा प्रयत्न केला तर ते 7 टक्क्यांनी मिळू शकते. कारण बी.ओ.टी.वाल्यांनी जे व्हॅल्युएशन केले आहे, त्यानुसार 9 टक्क्यांनी आकारण्यात आले आहे आणि त्याप्रमाणे तो प्रोजेक्ट केलेला आहे. तेव्हा कमीतकमी व्याज दराने पैसे घेण्याचा प्रयत्न केला तर या प्रोजेक्टची किंमत कमी होऊ शकते हा माझा मुद्दा आहे. तर आपण तसा प्रयत्न करणार आहात का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, जेव्हा एखादा प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर घेतो, तेव्हा जो कंत्राटदार असतो, तो त्याचा संपूर्ण अभ्यास करतो की, याला संपूर्णपणे किती खर्च येणार आहे आणि याच्यावर आपण किती टोल लावला पाहिजे ? तो किती वर्षासाठी लावला पाहिजे ? यामध्ये किती वर्षाचा कन्सेशन पिरिएड ठेवावा ? याचा संपूर्ण अभ्यास करुन तो आपला प्रस्ताव देतो. समजा उद्या हा पूल बांधण्यासाठी पेपरमध्ये टेंडर काढले, तर या प्रकल्पाकरता इंटरेस्टेड असलेल्या अनेक कंपन्या पुढे येतील आणि आपला रेट कोट करतील की, आम्ही अमुक इतके कोटी रुपये यावर खर्च करु आणि एवढा खर्च करीत असताना हा टोल रेट राहील. 10 वर्षे,

. . . .5डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

15 वर्षे, 20 वर्षे एवढया वर्षासाठी आम्हाला हा टोल लावू द्यावा. असे संपूर्ण कॅलक्युलेशन करुन ते प्रस्ताव देतील. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी व्याजाचा मुद्दा उपस्थित केला आहे.व्याजाचा दर कमी मिळाला तर आनंदाची गोष्ट आहे. कोणत्याही सरकारी संस्थेला कर्ज उभे करावयाचे असेल तर त्यासाठी किती व्याजाचा दर द्यावा यासाठी सचिव स्तरावर हाय पॉवर कमिटी आहे. हाय पॉवर कमिटीने मान्यता दिल्यानंतरच व्याजाचा दर ठरतो. समजा एम.एस.आर.डी.सी.ला कर्ज उभे करावयाचे आहे, आम्हाला 1000 कोटी रुपयांचे कर्ज उभे करावयाचे आहे आणि आम्ही असे म्हटले की, ते कर्ज 13 टक्के व्याजाने घेतो. तर 13 टक्के व्याजाने हे कर्ज घेता येणार नाही. त्या साठी सचिव समितीसमोर जावे लागेल आणि मग सचिव समिती सांगेल की, आजच्या परिस्थितीत एवढा व्याज दर देणे गरजेचे आहे. सचिव समितीने ठरविल्यानंतर आपण त्यानुसार व्याज दर देत असतो. त्यामुळे त्याची सुध्दा काळजी घेण्यात येईल. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे :हा जो बांद्रा-वरळी (सी-लिंक) हा मिसमॅनेज्ड प्रॉजेक्ट म्हणून याची ख्याती गेल्या पाच-सहा वर्षात आपल्याला ऐकावयास मिळते. युतीच्या राज्यात 410 कोटीचा हा प्रॉजेक्ट जाहीर केला. टेंडर्स मागविले गेले.त्यानंतर आघाडी शासन आले आणि गेल्या पाच वर्षानंतर आता कालच्या बजेटमध्ये 1310 कोटी रुपयाची प्रॉव्हिझन या प्रॉजेक्टसाठी सरकारने केली आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न असा आहे की, पाच वर्षात 410 कोटीचा प्रॉजेक्ट 1310 कोटीचा कसा होऊ शकतो. युती शासनाने मला वाटते 8 लेनपर्यंतच हा प्रॉजेक्ट जाहीर केला होता. आता 16 लेन झाल्या असतील तर मला माहीत नाही. पण 8 लेनचा 410 कोटी रुपयाचा प्रॉजेक्ट 1310 कोटी रुपयाचा कसा होऊ शकतो.स्टीलच्या किंमती, सिमेंटच्या किंमतीचा विचार केला तर माझ्या माहिती प्रमाणे स्टीलच्या किंमती फक्त वर्षभरात वाढलेल्या आहेत. त्या तीन-पट चार पट वाढलेल्या नाहीत. मग एवढे कॉस्ट एस्कलेशन होण्याचे कारण काय? माझी माहिती अशी आहे की, सुरुवातीला या प्रॉजेक्टसाठी जे कन्सल्टन्ट अपॉइंट केले होते ते स्वेरड्रुप सिव्हिल लाईन्स, यु.एस.ए. हे होते. त्यांचे कॉन्ट्रॅक्ट अचानकपणे कॅन्सल केले आणि डार अल हॅन्सा लॅबनॉन या कंपनीला ते कन्सल्टन्सीचे काम दिले गेले. हे कन्सल्टन्सीचे काम दिल्यानंतर ड्रॅमॅटिकली या प्रॉजेक्टची कॉस्ट अशी काय वाढविण्यात आली की, जेणे करुन सर्वांना वाटले की, ही प्रॉजेक्टचीच कॉस्ट आहे. पण आधी यु.एस.ए.ची अमेरिकन कंपनी कन्सल्टन्ट होती, त्यांच्यावेळी या प्रॉजेक्टची कॉस्ट 410 कोटी रुपये होती आणि कन्सल्टन्सी चेंज झाल्या बरोबर या प्रॉजेक्टची कॉस्ट कशी काय वाढली ? हिंदुस्थान कन्सल्टन्स कपंनी विषयी अमेरिकन कंपनीने जे रिमार्क्स पास केलेले आहेत. ते ऐकले तर आपल्याला आश्चर्य वाटेल. त्यांचे रिमार्क्स असे आहेत की, "HCC is duly unqualified to complete the project. With an apparent low bid, well below the costs of the project and well below other bidders, the contractor should not have been awarded this contract. Most of the contractor's equipment is of inferior quality, insufficient capacity, not matching the project requirements. The contractor does not have the qualification, technical know-how and expertise to construct the sea link. Manpower is insufficient and lacks the experience for this type of project works."

..2

श्री. प्रकाश शेंडगे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एवढे सगळे रिमार्क्स रेकॉर्डवर असतांना हिंदुस्थान कन्सन्टन्सी कंपनीला हया प्रॉजेक्टचे कॉन्ट्रॅक्ट कसे काय दिले? 18 महिन्यात कामाचा स्पीड फक्त दोन टक्के होता. तरी सुध्दा त्याला कामाची किंमत वाढवून देऊन परत रीटेंडर न करता जी टेंडरची कॉस्ट होती व त्या कॉन्ट्रॅक्टर विषयी एवढे सगळे रिमार्क्स असतांना त्याला हे कॉन्ट्रॅक्ट कसे दिले या सगळयांची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी. म्हणून मी म्हटले की, हा प्रॉजेक्ट टोटली मिसमॅनेज प्रॉजेक्ट आहे. याच्यामध्ये नक्कीच या महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करण्यात आलेली आहे. ही जी कॉस्ट एस्कलेशन झालेली आहे ती आपल्याला अजिबात मान्य नाही. कॉस्ट एस्कलेशन झाले असेल तर ते कसे काय झालेले आहे, यासंबंधीची सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवावी अशी मी मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, अर्धा-तास चर्चेमध्ये वरळी-नरिमन पॉईंट वेस्टर्न फ्री-वे प्रकल्पाच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आला होता. तरी पण सन्माननीय सदस्यांनी बाद्रा ते वरळी सी-लिंक प्रॉजेक्टच्या फर्स्ट पेजच्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रॉजेक्टची पहिल्यांदा कॉस्ट कमी होती, ही गोष्ट खरी आहे. पण मधल्या काळामध्ये वरळी गावामध्ये आमचे जे सगळे मच्छिमार बांधव तेथे राहतात त्यांनी मोठया प्रमाणात आंदोलन केले. त्यामुळे या सागरी पुलाची जी अलाईनमेंट होती ती संपूर्ण अलाईनमेंट बदलावी लागली. जवळ जवळ 700 कोटीचा हा पूल होता. त्याची अलाईनमेंट बदलल्यामुळे हा 700 कोटीचा प्रकल्प शेवटी 1300 कोटीवर गेला. 700 कोटीचा प्रकल्प 1300 कोटीचा करतांना चीफ सेक्रेटरींच्या अध्यक्षतेखाली एक सचिव समिती होती. त्यांनी याचा संपूर्ण अभ्यास केला आणि या पुलाची संपूर्ण अलाईनमेंट बदलल्यामुळे हा पूल 8 लेन्सचा होता. 4 लेन्स + 4 लेन्स केबल स्ट्रेट ब्रिज आहे. केबल स्ट्रेटच्या बाबतीत सुध्दा त्या ब्रिजचे 700 कोटी रुपयाचे जे डिझाईन होते ते 700 कोटीच्या ब्रिजचे डिझाईन वेगळे आहे. त्याची अलाईनमेंट सगळी वेगळी आहे. आता 1300 कोटीच्या ब्रिजचे संपूर्ण अलाईंनमेट आणि संपूर्ण डिझाईन वेगळे आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ....

केबल स्टेड होता परंतु मूळ जे पायलॉन्स आहेत त्याच्या डिझाईनमध्ये त्यांनी फरक केला आहे. केबल स्टेडच्या मूळ डिझाईनमध्ये आणि याच्या डिझाईनमध्ये संपूर्ण फरक आहे. अलाईनमेंट संपूर्ण बदलली. अलाईनमेंट केवळ पाच दहा टक्के बदलली असे नाही. संपूर्ण पायलॉन्सची जी अलाईनमेंट होती त्याबाबत मच्छिमार लोकांनी फार मोठे आंदोलन केले. त्यांनी सांगितले की, या पध्दतीने जर या ठिकाणी सागरी पूल बांधण्यात आला तर आमचा मच्छिमारीचा जो पोटापाण्याचा धंदा आहे तो बंद पडेल. म्हणून त्या पुलाची हाईट वाढविण्यात आली. त्या पुलाचा स्पॅन वाढविण्यात आला. अलाईनमेंट बदलण्यात आली. पुलाची हाईट वाढविण्यात आली. त्यांच्या बोटी खालून जावयास पाहिजे यादृष्टीने संपूर्ण अलाईनमेंट बदलली. यामध्ये कोणत्याही पध्दतीचे मिसमॅनेजमेंट नाही. आपल्याला एकच सांगतो की, आज या पुलाचे काम अतिशय जलद गतीने सुरु आहे. या बांद्रा-वरळी पुलाला जवळजवळ 604 पाईल्स लागणार आहेत. त्या 604 पाईल्सपैकी आतापर्यन्त 289 पाईल्सचे काम झालेले आहे. ज्या पाईल्स कॅप आहेत त्यामध्ये 131 पैकी 27 चे काम झालेले आहे. म्हणजे गेल्या चार वर्षामध्ये तीन ते चार टक्के काम झाले होते. आता या पुलाचे जवळजवळ 18 ते 19 टक्के काम झालेले आहे. पुढील कामे सुध्दा अतिशय जलद गतीने चालू आहेत. डिसेंबर, 2007 पर्यन्त हा पूल वाहतुकीसाठी खुला करावा असा आमचा प्रयत्न आहे.

श्री. अनंत तरे : हा पूल होत असताना त्या ठिकाणी सरुवातीपासून माहीम आणि वरळी या ठिकाणच्या मच्छिमार बांधवांची जी तक्रार होती त्यासंदर्भामध्ये आपण आता उत्तरात सांगितले. तिकडच्या सर्व मच्छिमार नेत्यांनी किंवा मच्छिमार कॉलनीमध्ये त्यांनी जे आंदोलन केले होते त्यांचे सगळयांचे आपण समाधान केले आहे काय ? आता त्यांचा विरोध राहिलेला नाही काय ?

श्री. अनिल देशमुख : अलाईनमेंट चेंज केल्यानंतर त्यांचे समाधान झालेले आहे. त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

उपसभापती : अर्धा-तास चर्चा संपली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 23 मार्च, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 6 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 23 मार्च, 2005 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही